१०
२
प्र/१०/२
ग्रंथालय

# सामाजिक करार

अनुवादक

व.भ.कर्णिक

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/९०/२
मंत्रालय.

भाषांतरमाला क्र. ८.

# सामाजिक करार

ज्यां-ज्याक रूसो लिखित

**SOCIAL CONTRACT**

या ग्रंथाचा मराठी अनुवाद

अनुवादक
वसंत भगवंत कार्णिक

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ
१९७२

१९७२, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ.

पहिलीः आवृत्ती : फेब्रुवारी, १९७२
( फाल्गून, १८९३ )

प्रकाशक :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई ३२.

मुद्रक :

य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणे ३०.

किंमत : ४-००

रुसोलिखित " सामाजिक करार "

मित्रवर्य

तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी,

अध्यक्ष, साहित्य आणि संस्कृति मंडळ,

यांस

त्यांच्या प्रेरणेने केलेले हे भाषांतर

सादर समर्पण.

# निवेदन

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

लक्ष्मणशास्त्री जोशी.

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ.

# प्रस्तावना

युरपमधील अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील विचारवंतांमधे ज्यां-ज्याक रूसोचे स्थान फार मोठे आहे. बुद्धिवादाचे युग म्हणून तो काळ जगाच्या इतिहासात प्रसिद्ध आहे. परंतु रूसोची विचारसरणी त्या युगधर्माशी विसंगत होती. बुद्धिवादाऐवजी तो भावनावादाचा पुरस्कर्ता होता.

रूसोचा जन्म जिनिव्हा येथे १७१२ साली एका गरीब कुटुंबात झाला. बाळपणीच त्याची आई वारली आणि एका आत्येने त्याला वाढवले. लहानपणी त्याच्यावर जे धार्मिक संस्कार झाले ते काल्व्हिनप्रणीत कट्टर ख्रिश्चन धर्माचे. मधे तो काही वर्षे रोमन कॅथलिक बनला होता. परंतु काल्व्हिन संप्रदायाचे त्याच्या मनावरील संस्कार कधीही पुसले गेले नाहीत.

रूसोला जवळ जवळ सबंध आयुष्य दारिद्र्यात आणि दुःखात काढावे लागले तसेच त्याचे वागणे व विचार समाजाला विपरीत वाटतील असे होते. त्यामुळे समाजाने त्याची अवहेलना केली. रूसोच्या ठिकाणी दोष देखील पुष्कळ होते. त्याला नीती-अनीतीची चाड नव्हती. त्याचा स्वभाव आपमतलबी आणि संशयी होता. त्यामुळे ग्रंथकार म्हणून कीर्ती मिळाल्यानंतरही त्याचा शेवट मोठा दुःखकारक झाला. आयुष्याचे अखेरचे दिवस त्याने पॅरिसमधे मोठ्या हालअपेष्टेत काढले. शेवटी त्याला जवळ जवळ वेड लागले होते आणि १७७८ साली तो मरण पावला. आपल्या दुर्भागी आयुष्याची कथा कन्फेशन्स नावाच्या आत्मचरित्रात त्याने कोणताही आडपडदा न राखता लिहून ठेवली आहे. आयुष्यात त्याला ज्या यातना भोगाव्या लागल्या त्यांचा त्याच्या विचारांवर खूप परिणाम झाला.

रूसोचे लिखाण पुष्कळ आहे, पण जगामधे आज जी त्याची ख्याती आहे ती सामाजिक करार या पुस्तकामुळे. हे त्याचे पुस्तक १७६२ साली प्रसिद्ध झाले. त्याचे एमिल हे पुस्तक त्याच वर्षी प्रसिद्ध झाले. पुस्तकांच्या प्रसिद्धीनंतर त्याला पॅरिसहून पळून जावे लागले. जन्मगाव जिनीव्हा येथे त्याला आसरा मिळेना. बर्नही त्याला आसरा देईना. त्याला शेवटी आसरा सापडला तो जर्मनीच्या फ्रेडरिक द ग्रेटच्या राज्यात. तिथे तो तीन वर्षे होता. लोकांच्या विरोधामुळे नंतर त्याला ते ठिकाण सोडावे लागले. प्रसिद्ध इंग्रज तत्त्वज्ञानी ह्यूम याने नंतर त्याला इंग्लंडमधे आसरा दिला.

एमिल हा तसे पाहिले तर शिक्षणावरील प्रबंध. अधिकारीवर्गाला तो आक्षेपार्ह वाटण्याचे कारण नव्हते. परंतु प्रबंधामध्ये कन्फेशन्स ऑफ अ सॅव्होयर्ड व्हिकार ( confessions of a savoyard vicar ) नावाचे एक प्रकरण आहे. त्या प्रकरणात रूसोने आपली स्वाभाविक धर्माबद्दलची मते व्यक्त केली आहेत. रूसोचा देवावर विश्वास होता.

परंतु धर्मग्रंथ अगर प्रेषिताला झालेले देवाचे दर्शन हा त्याचा आधार नव्हता. मनाची साक्ष हा त्याचा विश्वासाचा आधार होता. ही मनाची साक्ष निसर्गदर्शनाने कुणालाही पटू शकते. म्हणजेच धर्मगुरूंच्या किंवा धर्मसंस्थांच्या दलालीची तिथे आवश्यकता नाही. कॅथलिक व प्रॉटेस्टंट दोन्ही धर्मसंप्रदायाना ही मते आवडली नाहीत.

सामाजिक करार हे पुस्तक धार्मिक आणि भौतिक दोन्ही सत्ताधाऱ्यांना अधिक आक्षेपार्ह वाटले. सामाजिक कराराची कल्पना मान्य केली म्हणजे राजांच्या दैवी अधिकाराला स्थानच उरत नाही; राजसत्तेचा नैतिक पाया नष्ट होतो. म्हणून फ्रेंच राज्यकर्त्यांना ते पुस्तक फार भीतिदायक वाटले. पुस्तकाच्या वाचनामुळे लोकांच्या मनात क्रांतीच्या कल्पना स्फुरतील आणि बंडाचा वणवा पेटेल अशी त्यांना धास्ती वाटली.

फ्रेंच राज्यकर्त्यांची ही धास्ती खोटी ठरली नाही. १७८९ साली फ्रेंच राज्यक्रांतीचा वडवानल पेटला तेव्हा क्रांतिकारकांच्या तोंडी होते ते रूसोचे नाव आणि त्यांची प्रेरकशक्ती होती ती त्याच्या सामाजिक करार या पुस्तकातील तत्त्वे व घोषणा! फ्रेंच राज्यक्रांतीचा पाया जो घातला तो बुद्धिवादी विद्वानांनी घडवून आणलेल्या वैचारिक क्रांतीने; परंतु प्रत्यक्ष क्रांतीच्या दिवसात क्रांतिकारकांच्या मनावर अधिक पगडा होता तो रूसोच्या विचारांचा आणि त्याच्या मनोवृत्तीचा. क्रांतीच्या संगराच्या वेळी विवेकशील शुद्ध बुद्धीपेक्षा लोकांना हवी असते भावनोत्कट क्रियाशीलता. रूसोची मदार होती बुद्धीपेक्षा भावनेवर. त्यामुळे राज्यक्रांतीवर त्याचा अधिक प्रभाव पडला आणि क्रांतीचा अग्रदूत म्हणून त्याची जगभर ख्याती झाली.

पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास या आपल्या पुस्तकात बर्ट्रंड रसेल याने म्हटले आहे: "फ्रेंच राज्यक्रांतीमधे बहुतेक पुढाऱ्यांनी सामाजिक करार हे पुस्तक बायबलसारखे स्वीकारले होते. पण बायबलच्या बाबतीत जे घडते तेच बहुतांशी त्या पुस्तकाच्या बाबतीत घडले. पुष्कळांनी ते काळजीपूर्वक वाचले नव्हते आणि त्याच्या भक्तगणांपैकी अनेकांना त्याचा अर्थ नीट समजला नव्हता." ( **The Social Contract** became the Bible of most of the leaders in the French Revolution, but no doubt, as is the fate of Bibles, it was not carefully read and was still less understood by many of its disciples. )

रूसोच्या फ्रेंच राज्यक्रांतीवरील प्रभावाचे उत्तम प्रतीक म्हणजे रोबेस्पयर आणि त्याची रक्तलांछित कारकीर्द. रोबेस्पयर हा रूसोचा कडवा शिष्य. रूसोचे नाव नेहमी त्याच्या तोंडी असे आणि रूसोच्या तत्त्वांची अंमलबजावणी करणे हे तो आपले कर्तव्य मानत होता. स्वतःच्या पुढारीपणाखाली त्याने जी हुकूमशाही प्रस्थापित केली ती रूसोच्या तत्त्वानुसार अशा त्याचा आग्रह होता. फ्रेंच जनतेची, रूसोने घोषित केलेली, सर्वसाधारण इच्छा आपल्या रूपाने प्रगट झाली आहे आणि म्हणूनच तिच्या आड येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला नष्ट करण्याचा आपल्याला अधिकार आहे असा त्याचा दावा होता. रोबेस्पयरच्या

या आग्रहापायी क्रांतीचे अनेक खंदे वीर गिलोटिनला बळी पडले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही उद्दिष्टे बाजूला पडली आणि एका व्यक्तीचे बेबंद राज्य सुरू झाले. रोबेस्प्यरचा त्याच बेबंद राज्यात शेवटी बळी पडला ही गोष्ट वेगळी.

रोबेस्प्यरची कारकीर्द हे रूसोच्या तत्त्वज्ञानाचे प्रात्यक्षिक आहे. आणि ती केवळ एक अकल्पित घटना नव्हती हे त्या तत्त्वज्ञानाने नंतरच्या काळात जे स्वरूप धारण केले त्यावरून सिद्ध होते. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात फ्रान्सपेक्षाही जर्मनीमधे रूसोच्या तत्त्वज्ञानाचा अधिक प्रभाव पडला. आणि तिथे लोकशाहीविरोधी आणि समुदायवादी अशा विचारसरणींना त्याने स्फूर्ती आणि चालना दिली. हेगेलच्या विचारावर रूसोच्या विचारांचा खूपच परिणाम झालेला आहे. आणि विसाव्या शतकात फॅसिझम व नाझीझम या ज्या प्रवृत्ती वाढल्या त्यांचेही पितृत्व रूसोच्या विचारात शोधता येते. हिटलर हे एक रूसोचे फलित आहे असा बर्ट्रंड रसेल यांनी निष्कर्ष काढला आहे.

फ्रेंच राज्यक्रांतीचा अग्रदूत अशी ज्याची ख्याती त्याच्या विचारातून ही अशी स्वातंत्र्य, लोकशाही व व्यक्तीविरोधी फलिते कशी प्राप्त झाली हा एक अत्यंत विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पुष्कळानी त्या प्रश्नाचा विचार केला असून रूसोचे तत्त्वज्ञान आणि नंतरच्या काळात वाढलेले समुदायवादी तत्त्वज्ञान यांच्यामधील पैतृक संबंध त्यांनी सिद्ध केला आहे. या छोट्या प्रस्तावनेत त्याचा ऊहापोह करणे शक्य नाही. एक दोन मुद्यांकडे अंगुलिनिर्देश करणे एवढेच या ठिकाणी शक्य आहे.

सामाजिक कराराची कल्पना पुढे मांडून राजांच्या दैवी अधिकाराचा सिद्धांत उद्ध्वस्त केला हे रूसोचे ऐतिहासिक महत्त्वाचे कार्य आहे. रूसोच्या पूर्वी ग्रोशिअस, हाब्स व लॉक यांनी हे कार्य केले होते. परंतु रूसोची वाणी मोठी प्रभावी म्हणून त्याला हे कार्य अधिक चांगल्या रीतीने करता आले. सामाजिक करार या पुस्तकामधे राज्यशास्त्र-विवेचनाच्या बरोबरीने इतिहास व काव्य देखील आहे. ग्रीसच्या व रोमच्या इतिहासाचा रूसोचा अभ्यास दांडगा होता. त्या इतिहासातील अनेक दाखले पुस्तकामध्ये ठिकठिकाणी विखुरले आहेत. पुस्तकाची भाषा काव्यमय आणि आवेशपूर्ण आहे. त्यामुळे ते फार परिणामकारक ठरले.

परंतु राजांच्या जुल्मी राजवटीला पर्याय म्हणून रूसोला निःसंदिग्धपणे लोकशाहीची राजवट सुचवता आली नाही. त्याला लोकशाही हवी होती, पण ती ग्रीसमधील नगर-राज्यांच्या धर्तीची. अठराव्या आणि नंतरच्या शतकात नगरराज्ये शक्य नव्हती. त्यां राज्यांना अनुरूप अशी जी राजवट त्याने सुचवली आहे ती सर्वसाधारणपणे हुकूमशाही-वादी लोकशाहीची. लोकशाहीबद्दल सामाजिक करारामध्ये रूसोने एके ठिकाणी म्हटले आहे की देवांचा असा एखादा देश असता तर तिथे लोकशाही नांदली असती. इतकी परिपूर्ण राज्यव्यवस्था मानवाना मानवण्यासारखी नाही. हुकूमशाहीवादी लोकशाही हा उघड उघड वदतो व्याघात आहे. पण रूसोच्या ते लक्षात भरले नाही.

ग्रीसमधील नगर राज्ये हे रूसोचे लक्ष्य होते; म्हणजेच त्याला पुढे जाण्याऐवजी मागे जावयाचे होते. म्हणजेच तो पुनरुज्जीवनवादी होता. आणि जुन्या इतिहासातील सांस्कृतिकदृष्टया पुढारलेल्या घटनांपेक्षा त्याला लष्करीदृष्टया शक्तिशाली अशा घटना अधिक आवडत असत. उदाहरणार्थ, ग्रीसच्या इतिहासातील अथेन्सपेक्षा स्पार्टाकडे त्याचा अधिक ओढा होता. संस्कृती आणि सुधारणा त्याला आवडत नव्हती. त्याने आपल्या डोळ्यांपुढे उदात्त वन्य मानवाचे चित्र उभे केले होते. त्या कल्पनेला ऐतिहासिक आधार नाही हे त्याला माहीत होते. परंतु समाजाची पुनर्घटना करण्यासाठी त्या कल्पनेचा उपयोग होईल अशी त्याची धारणा होती.

बुद्धिवादाच्या त्या युगात रूसोची बुद्धीपेक्षा भावनेवर म्हणजेच डोक्यापेक्षा हृदयावर अधिक श्रद्धा होती. बुद्धिवाद त्याला कोरडा व रुक्ष वाटत होता. भावनांना आवाहन केल्याखेरीज समाज बदलता येणार नाही व समाजात काही नवीन व सुंदर निर्माण करता येणार नाही असे त्याचे मत होते. या त्याच्या आग्रहामुळे त्याला नंतर वाढलेल्या अद्‌भुतरम्यवादाचा जनक समजण्यात येते. [अद्‌भुतरम्यवादाने बुद्धिवादाला भावनेची व इच्छाशक्तीची जोड दिली हे उचित झाले. परंतु रूसोची भूमिका तेवढी मर्यादित नव्हती. त्याला बुद्धिवादाचे समूळ उच्चाटन हवे होते आणि भावनेवर कोणतेही नियंत्रण नको होते. म्हणून पुढच्या काळात वाढलेल्या अनेक बुद्धिवादविरोधी प्रवृत्तींना रूसोच्या विचाराशी आपले नाते जुळवता आले.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स आदिकरून देशात जे श्रेष्ठ दर्जाचे अद्‌भुतरम्यवादी वाङ्मय निर्माण झाले त्याच्यावरही रूसोच्या विचारांचा प्रभाव पडलेला होता. ते साहित्यिक रूसोला आपला स्फूर्तिदाता गुरू मानत असत.

सामाजिक कराराच्या रूसोच्या विवेचनात नवीन आहे ती सर्वसाधारण इच्छेची कल्पना. आणि त्या कल्पनेनेच त्याला नंतरच्या काळात हुकूमशाहीचा समर्थक बनवले. सर्वसाधारण इच्छेच्या अंमलबजावणीसाठी राजकीय समाज बनतो आणि नंतर त्या राजकीय समाजामध्ये ती इच्छा अंतर्भूत होते. सर्वसाधारण इच्छा म्हणजे वैयक्तिक इच्छा नव्हे किंवा वैयक्तिक इच्छांची गोळाबेरीज नव्हे. ती काही तरी वेगळीच असते. तिचे स्वरूप स्पष्ट नसल्याकारणाने आणि देशव्यापी समाजात ती अजमावता येणे कठीण झाल्याकारणाने पुढे कुणालाही मीच त्या इच्छेचा प्रतिनिधी आहे असा दावा करून समाजावर स्वतःचे स्वामित्व प्रस्थापित करता येते. तो दावा नाकारण्याचा बंडाखेरीज दुसरा मार्ग नाही; आणि प्रस्थपित सत्तेविरुद्ध बंड पुकारणे नागरिकांना नेहमीच शक्य होत नाही. म्हणजेच हुकूमशाहीच्या प्रस्थापनेचा मार्ग मोकळा होतो. एकोणिसाव्या शतकातील काही नामवंत तत्त्वज्ञानी या रूसोप्रणीत सर्वसाधारण इच्छेच्या आधारेच आपले हुकूमशाहीचे सिद्धांत उभारले आणि त्या सिद्धांतानुसार विसाव्या शतकात अनेक हुकूमशहानी आपली अनियंत्रित राज्ये प्रस्थापित केली. या अनुभवावरूनच रूसोच्या सर्वसाधारण इच्छेच्या कल्पनेबद्दल बर्ट्रंड रसेल यानी लिहिले आहे : " प्रत्यक्ष व्यवहारातील तिचे फळ म्हणजे

रोबेस्प्यरचे राज्य; रशिया आणि जर्मनी ( विशेषतः उत्तरोक्त ) मधील हुकूमशाही–अंशतः रूसोच्या शिकवणुकीचेच फलित आहे. " ( Its first fruits in practice was the reign of Robespierre; the dictatorships of Russia and Germany (especially the latter) are in part–an outcome of Rousseau 's teaching. )

राजकीय समाज जेव्हा बनतो तेव्हा सर्व व्यक्ती आपले सारे हक्क समाजाला प्रदान करतात असा रूसोचा सिद्धांत आहे. प्रदान केलेले हक्क व्यक्तीला परत घेता येतात, पण ते समाजाचा त्याग करून किंवा समाज मोडून. म्हणजेच समाजात राहावयाचे तर व्यक्तींना त्या हक्कावर पाणी सोडावे लागते. सामाजिक करारामध्ये एके ठिकाणी म्हटले आहे, "सामाजिक करारामुळे राजकीय समाजाला आपल्या सर्व सभासदावर संपूर्ण सत्ता प्राप्त होते." समाज व्यक्तीपेक्षा मोठा, त्यालाच सर्वांचे हित–त्यामध्ये व्यक्तीव्यक्तीचे हितदेखील आले–कशात आहे ते अधिक कळते, म्हणून समाजाच्या सर्व नियमांचे व आज्ञांचे पालन करून समाजामध्ये राहणे यात व्यक्तींचे कल्याण आहे अशी एकंदर रूसोची विचारसरणी आहे. ही विचारसरणी पाहिली, की तो समुदायवादी विचारवंतात मोडतो हे स्पष्ट होते. रूसोचा काळ हा व्यक्तिनिष्ठ व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारसरणीच्या प्रभावाचा काळ. त्या प्रभावी विचारसरणीशी रूसोचे विचार विसंगत होते. परंतु प्रतिष्ठित राजसत्तेशी झुंज देण्यात तो देखील सहभागी होता. त्यामुळे ही विसंगती त्यावेळी व त्यानंतरही बराच काळ लोकांच्या ध्यानात आली नाही.

शिवाय एकंदरीत, स्वातंत्र्याला व लोकसत्तेला पोषक असा मजकूरही रूसोच्या लिखाणात ठिकठिकाणी विखुरलेला दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, सामाजिक करारामधील पुढील काही वाक्ये पहावी : " मानवाचा जन्म स्वातंत्र्यात झाला, परंतु सगळीकडे तो शृंखलाबद्ध अवस्थेत दृष्टीस पडतो. " " आपल्या बांधवावर अधिकार गाजवण्याचा निसर्गाने कुणाही मानवाला हक्क दिलेला नाही, " " मनुष्य ज्यावेळी स्वातंत्र्याचा त्याग करतो, त्यावेळी तो आपल्या अस्सल मनुष्यत्वाचा, आपल्या हक्काचा व आपल्या मानवी कर्तव्याचाही त्याग करतो, " "कार्यकारी सत्ता ज्यांच्या हाती असते ते जनतेचे मालक नसून नोकर असतात आणि जनतेस मर्जीस येईल त्याप्रमाणे त्याना नेमता अगर काढता येते. प्रत्येक मनुष्य जन्मतः स्वतंत्र व स्वतःचा स्वामी असल्याकारणाने कुणालाही कोणत्याही सबबीखातर त्याला त्याच्या संमतीखेरीज गुलाम बनवता येणार नाही ", " समाजाशी संबद्ध अशा मतां-खेरीज इतर कोणत्याही मताबद्दल सार्वभौम सत्तेला जाब द्यायला प्रजाजन बांधलेला नसतो. " ही व अशी वाक्ये ठिकठिकाणी दृष्टीस पडतात. तीच लोकांच्या ध्यानात राहिली आणि स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता म्हणून जनमानसात रूसोला मानाचे स्थान प्राप्त झाले.

सर्वसाधारण जनतेबद्दल रूसोच्या मनात आदर व प्रेम नव्हते. आंधळा समुदाय, त्याला स्वतःचे हित कळत नाही, असंस्कृत कळप असे त्याने सामान्य लोकांबद्दल बरेच वेळा लिहिले आहे. सामाजिक करारमधे एके ठिकाणी त्याने लिहिले आहे : " व्यक्तींना

कल्याण दिसते, पण त्या ते टाकून देतात. जनतेला कल्याण हवे असते पण ते तिला दिसत नाही. म्हणून दोघांनाही मार्गदर्शनाची आवश्यकता असते." म्हणून त्याच्या दृष्टीने उत्तम आणि स्वाभाविक योजना तीच की जिथे सुबुद्ध माणसे जनतेवर हुकूमत गाजवतात. रूसोची ही मनोवृत्ती होती; म्हणूनच त्याला खऱ्याखुऱ्या लोकशाहीचा पुरस्कार करता आला नाही. त्याला लोकशाही हवी होती ती नगर-राज्यात रूढ होती ती, प्रत्यक्ष लोकशाही की जिथे वडाच्या झाडाखाली जमा होऊन शेतकरी राज्याचा व्यवहार चालवत असत. ही देखील एक कविकल्पना होती. कारण त्या नगर राज्यातही शहरात आणि शेतीवर शेकडो गुलाम काम करत असत आणि त्यांना राज्यव्यवहारात हिस्सा घेण्याचा अधिकार नव्हता. पण रूसोला ग्रीस व रोम यांच्याबद्दलची ती कविकल्पना फार प्रिय होती.

रूसोला स्वातंत्र्यापेक्षा समतेचे अधिक आकर्षण होते. सामाजिक करारातील पुढे दिलेल्या काही वाक्यांवरून त्याचा समतेबद्दलचा आग्रह स्पष्ट होईल. एके ठिकाणी त्याने म्हटले आहे की सामाजिक करारामुळे नैसर्गिक समता नष्ट होत नाही, तिला नैतिक आणि कायदेशीर स्वरूप प्राप्त होते. त्याच संदर्भात त्याने म्हटले आहे की सगळ्या नागरिकांजवळ काही तरी असते आणि कुणाजवळ फारसे काही नसते अशा समाजाचीच भरभराट होते. राज्य चिरस्थायी व सुदृढ व्हायचे तर त्या राज्यात ज्या गोष्टी अवश्यमेव आहेत त्यांचे रूसोने पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे : " तिथे संपत्तीची अतिरिक्तता असता कामा नये; तिथे लक्षाधीशही नसावेत आणि भिकारीही नसावेत; लक्षाधीश आणि भिकारी यांची ताटातूट करता येत नाही; आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने दोघांचेही अस्तित्व घातक आहे." म्हणजेच समाज सुप्रतिष्ठित व दीर्घायुषी व्हायचा तर तिथे समता असली पाहिजे हा रूसोचा सिद्धांत आहे.

समतेच्या आग्रहाच्या बरोबरीने रूसोच्या लिखाणात गरिबाबद्दलचा कळवळा, अन्यायाविरुद्ध चीड आणि श्रीमंतांचा दुस्वास यांचाही खूप आढळ होतो. त्यामुळे काही जणांनी तर त्याला समाजवादी बनवून टाकले आहे. परंतु केवळ तुरळक वाक्यांवरून एखाद्याचे इतिहासातील स्थान निश्चित होत नाही. ते निश्चित करण्यासाठी त्याच्या एकंदर दृष्टिकोनाचा, त्याच्या समग्र विचारसरणीचा अभ्यास केला पाहिजे. तसा अभ्यास करून प्रसिद्ध तत्त्वचिंतक व इतिहासकार रॉबर्ट फ्लिंट यांनी आपल्या हिस्टरी ऑफ द फिलॉसफी ऑफ हिस्टरी या नामवंत पुस्तकात रूसोचे जे मूल्यमापन केले आहे ते असे : " परंतु हे म्हणणे तितकेच खरे आहे की गरीबाना त्याच्यामधे ( रूसोमधे ) एक आर्जवी फूल लावणारा भेटला, मूक जनतेला आपल्या बाष्कळ बडबडीने तिच्या योग्य मागण्यांना कालिमा फासणारा वक्ता आढळला, लोकशाहीला जुलूमशाहीचा आधार असे जे असत्य त्याचीच कोनशिला करून पुनर्घटना करणाऱ्या शिल्पकाराचे दर्शन घडले आणि अठराव्या शतकातील मनुष्यजातीला दहशतवादी राजवटीमधे घडलेल्या निंद्य गोष्टींचे मूळ व गिलोटिनचे बीज ज्यामधे आहे अशा चुकीच्या कल्पनांचा आणि विकारांचा प्रसार करणारा श्रेष्ठ साहित्यिक दृष्टीस पडला. ( But it is just as correct also to say

that in him the poor have found a persuasive seducer, the dumb millions a voice which by the follies it uttered discredited what was reasonable in their claims, democracy a reconstructor so wise as to choose for its cornerstone the very falsehood on which despotism rests and humanity in the eighteenth century the great literary exponent of those passions and errors which were the seeds of the guillotine, the germs of the infamies of the reign of terror.) प्रसिद्ध क्रांतदर्शी तत्त्वचिंतक एम्. एन्. रॉय यांच्या रीझन, रोमॅंटिसिझम अँड रेव्होल्युशन या पुस्तकावरून हे अवतरण दिले आहे. त्या अवतरणातील रूसोच्या मूल्यमापनाशी रॉय सहमत आहेत आणि बर्ट्रंड रसेल या विख्यात तत्त्वज्ञान्याचा अभिप्राय ही वेगळा नाही.

अशा या रूसोचे सामाजिक करार हे अत्यंत महत्त्वाचे पुस्तक. राज्यशास्त्रावरील अभिजात वाङ्मयात त्याचे स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे. फ्रेंच राज्यक्रांतीवरील त्या पुस्तकाच्या परिणामाचा उल्लेख अगोदरच केलेला आहे. एक आनुषंगिक गोष्ट म्हणून तो परिणाम विचारात घेतला नाही तरीही पुस्तकाचे महत्त्व कमी होत नाही. राजकीय समाजाच्या उत्पत्तीसंबंधी पुस्तकामध्ये जो सिद्धांत प्रतिपादन केला आहे तो आजदेखील अभ्यासकांना विचारार्ह वाटतो. तसेच सर्वसाधारण इच्छेची जी नवी कल्पना रूसोने प्रसृत केली तिचे फार दूरगामी परिणाम झाले आहेत. म्हणून हे पुस्तक चिरंतन महत्त्वाचे आहे. म्हणूनच, मला वाटते, साहित्य संस्कृति मंडळाने त्याचे मराठी भाषांतर प्रसिद्ध करण्याचे ठरविले असावे. भाषांतर इंग्रजी भाषांतरावरून मराठी वाचकाला नीट समजेल अशा पद्धतीने केले आहे. तो प्रयत्न कितपत यशस्वी झाला ते वाचक ठरवतील.

मुंबई,
१६ डिसेंबर १९७१

व. भ. कर्णिक

# शब्द–सूची

( पुस्तकातील इंग्रजी शब्दासाठी वापरलेल्या मराठी प्रतिशब्दांची सूची. साधारण-पणे एकच प्रतिशब्द सर्वत्र वापरला आहे. पण काही ठिकाणी संदर्भानुसार वेगळा शब्द वापरावा लागला आहे. )

| | |
|---|---|
| Alienation | — समर्पण, फारकत, देऊन टाकणे, दान |
| Body Politic | — राजकीय समाज |
| Burgess | — प्रतिष्ठित इसम |
| Citizen | — नागरिक |
| Civil | — नागरी |
| Civil Order | — सामाजिक व्यवस्था |
| Code | — संहिता |
| Comitia | — जनपरिषद |
| Commonwealth | — समाजकुटुंब |
| Consul | — सर्वाधिकारी |
| Convention | — संकेत |
| Despot | — जुलूमशहा |
| Despotism | — जुलूमशाही, जुल्मी राजवट |
| Force | — बळ |
| General will | — सर्वसाधारण इच्छा |
| Government | — शासन |
| Magistrate | — दंडाधिकारी |
| Mob | — झुंड |
| People | — जनसमुदाय, लोक |
| Polity | — राजवट |
| Prince | — राजपुरुष, शासनप्रमुख, राज्याधिकारी |
| Republic | — लोकराज्य |
| Right | — अधिकार, हक्क |

| | | |
|---|---|---|
| Ruler | — | राज्यकर्ता |
| Senate | — | राज्यसभा, वरिष्ठ सभा, |
| Social Order | — | सामाजिक सुव्यवस्था |
| Sovereign | — | सार्वभौम |
| Sovereignty | — | सार्वभौमत्व |
| State | — | राज्य, राज्ययंत्रणा |
| Tribunate | — | लोकपाल संस्था |
| Tribune | — | लोकपाल |
| Tyrant | — | जुलूम करणारा |

* * *

# अनुक्रमणिका


## पुस्तक १

१ पहिल्या पुस्तकाचा विषय २
२ प्राथमिक अवस्थेतील समाजाविषयी ३
३ प्रबळातील प्रबळांच्या हक्काविषयी ५
४ गुलामगिरीविषयी ६
५ मूळ कराराकडे आपल्याला नेहमीच परत जायला हवे ११
६ सामाजिक कराराविषयी १२
७ राज्यकर्त्यांविषयी १५
८ नागरी राज्यसंस्थेविषयी १७
९ स्थावर मालमत्तेविषयी १८

## पुस्तक २

१ सार्वभौमत्व अदेय आहे २१
२ सार्वभौमत्व अविभाज्य आहे २२
३ सर्वसाधारण इच्छा चुकू शकते का ? २४
४ सार्वभौम सत्तेच्या मर्यादांविषयी २५
५ जीवन आणि मरण या हक्काबद्दल २९
६ कायद्याबद्दल ३१
७ कायदे करणाराविषयी ३४
८ लोकांविषयी ३८
९ लोकांविषयी ( चालू ) ४०
१० लोकांविषयी ( चालू ) ४२
११ कायद्याच्या अनेकविध पद्धतींविषयी ४५
१२ कायद्यांचे वर्गीकरण ४७

## पुस्तक ३

१ सर्वसाधारण शासनाविषयी ५०
२ राज्याचे वेगवेगळे प्रकार घडविणाऱ्या तत्त्वाविषयी ५५
३ शासनाचे वर्गीकरण ५७
४ लोकशाहीविषयी ५८

५ उमरावशाहीविषयी ६०
६ राजेशाहीविषयी ६२
७ संमिश्र शासनाविषयी ६८
८ शासनाचा प्रत्येक प्रकार प्रत्येक देशाला सोईचा ठरणार नाही याविषयी ६९
९ चांगल्या शासनाची चिन्हे ७४
१० शासनाचा दुरुपयोग आणि न्हास होण्याची त्याची प्रवृत्ती याविषयी ७६
११ राजकीय समाजाच्या अंगाविषयी ८०
१२ सार्वभौम सत्ता कशी टिकवली जाते त्याविषयी ८१
१३ सार्वभौम सत्ता कशी टिकवली जाते त्याविषयी ( पुढे चालू ) ८२
१४ सार्वभौम सत्ता कशी टिकवली जाते याविषयी ८४
१५ नियुक्त ( Deputies ) अगर प्रतिनिधी यांच्याविषयी ८५
१६ शासनाची प्रस्थापना हा करार नव्हे ८८
१७ शासनाच्या प्रस्थापनेविषयी ९०
१८ शासन बळकावले जाऊ नये यासाठी उपयोगात आणावयाच्या साधनाविषयी ९१


**पुस्तक ४**


१ सर्वसाधारण इच्छा अविनाशी आहे ९४
२ मतदानाबद्दल ९६
३ निवडणुकीविषयी ९९
४ रोममधील जनपरिषदेविषयी १०१
५ लोकपालसंस्थेविषयी १११
६ हुकूमशाहीविषयी ११३
७ निरीक्षकाच्या कामाविषयी ११६
८ नागरीधर्माबद्दल ११८
९ निष्कर्ष १२९
उल्लख-सूची १३०


—x—

# सामाजिक करार

## प्रस्तावना

स्वतःच्या कुवतीचा विचार न करता एक मोठा ग्रंथ लिहिण्याचे काम मी अंगावर घेतले होते. त्याच्यातील एक लहान भाग म्हणजे हा प्रबंध आहे. तो ग्रंथ लिहिण्याचे काम मी कधीच सोडून दिले. तोपर्यंत जे काही लिहून झाले होते, त्याच्यापैकी तुकडे तुकडे जुळवून हा प्रबंध तयार केलेला आहे. लिहिलेल्या मजकुरापैकी महत्त्वाचे असे सर्व त्यात आले आहे आणि लोकांपुढे ठेवण्याच्या दृष्टीने त्याची पात्रता सर्वांत अधिक आहे. उरलेले बाकीचे सर्व आता नष्ट झाले आहे.

# पुस्तक १

## टिपण

शासनाला सामाजिक व्यवस्थेमधे ( civil order ) कायदेशीर व स्थिर आधार सापडतो की नाही याचा विचार करणे हा माझा हेतू आहे. माणसे जशी आहेत तशी व कायदे जसे असतील तसे या दोन गोष्टींचा विचार करून मी हा शोध घेणार आहे. न्याय आणि उपयुक्तता यामधे अंतर पडू नये या दृष्टीने शोध घेताना हक्कानुसार जे करता येते व हितसंबंधानुसार जे मागता येते त्यांच्यामधील नाते कायम ठेवण्याचा मी प्रयत्न करणार आहे. मी सुरुवात करणार आहे ती माझ्या विषयाचे महत्त्व प्रथम सिद्ध केल्या-वाचून. राजकारणाविषयी लिहायला मी कुणी राजा आहे की कायदेमंडळाचा सभासद आहे असा प्रश्न विचारला जाईल. माझे उत्तर आहे–नाही; आणि मी राजा अगर कायदेमंडळाचा सभासद नाही म्हणूनच राजकारण हा माझ्या पुस्तकाचा विषय बनविण्याचे मी ठरवले आहे. मी राजा अगर कायदेमंडळाचा सभासद असतो, तर काय करावे हे सांगण्यासाठी पुस्तक लिहिण्यात मी माझा वेळ दवडला नसता. करायचे ते मी केले असते, अगर गप्प बसलो असतो.

एका स्वतंत्र राज्यात माझा जन्म झालेला असून त्या राज्याच्या सार्वभौम संस्थेचा मी सभासद आहे. सार्वजनिक व्यवहारावर मला विशेष परिणाम करता येत नसेल; परंतु मतदानाचा मला हक्क आहे, म्हणून सार्वजनिक व्यवहारांचे स्वरूप समजावून घेणे हे माझे कर्तव्य आहे. शासनसंस्थेच्या प्रश्नाबद्दल सर्वसाधारण रीतीने विचार करत असताना, माझ्या मायदेशात हे प्रश्न ज्या पद्धतीने हाताळले जात आहेत, तिच्याबद्दल खरे प्रेम वाटावे, अशी नित्य नवी कारणे सापडावी या गोष्टीने माझ्या मनाला सारखा आनंद होत असतो.

### प्रकरण १

## पहिल्या पुस्तकाचा विषय

मानवाचा जन्म स्वातंत्र्यात झाला, परंतु सगळीकडे तो शृंखलाबद्ध अवस्थेत दृष्टीस पडतो. पुष्कळ माणसांना असे वाटते की आपण इतरांचे स्वामी आहो; परंतु इतरांप्रमाणे ते देखील गुलामच असतात. हे परिवर्तन कसे घडून आले ? मला ते माहीत नाही. ते परिवर्तन कायदेशीर कसे ठरले ? या प्रश्नाचे उत्तर मला देता येईल अशी आशा वाटते.

बळ ( Force ) आणि बळाचे परिणाम यांचाच मी विचार करत असतो, तर म्हटले असते : " एखाद्या जनसमुदायावर ( People ) जोवर हुकूम पाळण्याची सक्ती

होत असेल आणि प्रत्यक्षपणे तो समुदाय हुकूम पाळत असेल तर तो ठीक करतो. आणि ते सक्तीचे जोखड झुगारून देण्याचा त्याने प्रयत्न केला व त्यात त्याला यश आले, तर ते अधिकच चांगले होईल. ज्या बळाचा उपयोग करून स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले त्याच बळाचा वापर करून एखाद्या समुदायाने आपले स्वातंत्र्य परत मिळवले, तर त्याला ते मिळवण्याचा हक्क होता असे म्हणता येईल किंवा मुळातच ते स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा दुसऱ्यांना अधिकार नव्हता असे म्हणता येईल." परंतु सामाजिक सुव्यवस्था हा एक पवित्र हक्क आहे. इतर साऱ्या हक्कांचा आधारभूत असा तो हक्क आहे. निसर्गाने तो हक्क दिलेला नाही; त्या अर्थी संकेत (Conventions) हाच त्याचा आधार असावा. हे संकेत कोणते त्याचाच आपल्याला शोध घ्यावयाचा आहे. परंतु अधिक विवेचन करण्यापूर्वी मी आतापर्यंत जे प्रतिपादन केले त्याची सत्यता मला सिद्ध केली पाहिजे.

## प्रकरण २

# प्राथमिक अवस्थेतील समाजाविषयी

समाजाचे जुन्यातले जुने स्वरूप,—ज्याला नैसर्गिक स्वरूप असे म्हणता येईल—ते म्हणजे कुटुंब. स्वसंरक्षणासाठी गरज भासते तोवरच मुले बापाशी संबद्ध असतात. ती गरज संपली की नैसर्गिक बंध तुटतो. त्या वेळेपासून आज्ञापालनाच्या कर्तव्यातून मुक्त झालेली मुले व त्यांच्या जबाबदारीच्या ऋणातून मुक्त झालेला बाप दोघांनाही सारखेच स्वातंत्र्य प्राप्त होते. दोघांमधील बंध त्यापुढे कायम राहिला तर तो निसर्गाने लादलेला नियम नसून स्वतःच्या इच्छेनुसार जाणूनबुजून स्वीकारलेली जबाबदारी असते. कुटुंब हे कुटुंबच राहते, पण ते केवळ संकेतानुसार.

सर्वांनी मिळून उपभोगावयाचे हे स्वातंत्र्य माणसाच्या स्वभावाचा परिणाम आहे. स्वसंरक्षण हा त्याचा पहिला कायदा; स्वतःला काय हवे नको ते पाहणे ही त्याची पहिली काळजी. समजूत येण्याजोगे वय झाले की मनुष्य स्वतःचा मालक बनतो. कारण स्वतःचे जीवन टिकविण्यासाठी काय करणे अवश्य आहे ते त्याचे तोच सर्वांत अधिक जाणू शकतो.

म्हणून, आपण वाटले तर, कुटुंब हेच सर्व राजकीय संस्थांचा नमुना आहे असे समजू शकतो. राजा हा उघड उघड बापाची जागा घेतो; प्रजा ही त्याची मुले, आणि राजा व प्रजा दोघेही आपल्या फायद्याचे होईल तोवर आपल्या स्वातंत्र्याचे दान करतात (alienate their freedom). यामधे फरक आहे तो हा की कुटुंबामध्ये मुलांची काळजी वाहण्याचा मोबदला बापाला मुलांच्यावर त्याचे जे प्रेम असते त्याच्या रूपाने

मिळतो; तर राज्यामध्ये त्याची जागा दुसऱ्यावर हुकमत गाजवण्यामध्ये जो आनंद असतो तो घेतो. कारण राजा आणि प्रजा यांच्यामध्ये प्रेमाचे नाते नसते.

प्रजेच्या हितासाठी राजकीय सत्तेचा कधीच वापर केला जात नाही असे ग्रोशिअसचे ( Grotius ) म्हणणे आहे. आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ तो गुलामगिरीचे उदाहरण देतो. त्याची नेहमीची विवेचनाची जी पद्धत आहे ती वस्तुस्थिती ( fact ) वरून सत्या- ( right ) बद्दल निष्कर्ष काढण्याची[1]. विवेचनाची अधिक तर्कशुद्ध पद्धत स्वीकारणे शक्य होईल. परंतु जुलूम करणाऱ्यांना ( tyrants ) अधिक अनुकूल अशी दुसरी पद्धत सापडणार नाही.

'मनुष्यजात' हा शब्दप्रयोग शंभरांनी मोजता येणाऱ्या थोड्या लोकांना लागू पडतो की ती काही शेकडो माणसे मनुष्यजातीत मोडतात ते ग्रोशिअसवरून निश्चित सांगता येत नाही. त्याच्या पुस्तकावरून असे वाटते की त्याला पहिला अर्थ पसंत असावा. आणि या बाबतीत हॉब्सचे त्याच्याशी एकमत आहे. हे खरे असल्यास त्याचा अर्थ हा की माणसांचे गुरांच्या कळपासारखे वेगवेगळे कळप आहेत; प्रत्येक कळपाचा एक राखणदार असतो आणि तो राखण करतो तो याच हेतूने की शेवटी सर्वांना खाऊन टाकता यावे.

मेंढरापेक्षा मेंढपाळ जसा श्रेष्ठ जातीचा असतो, तसेच माणसांचे राखणदार, म्हण- जेच राज्यकर्ते, आपल्या प्रजेपेक्षा श्रेष्ठ जातीचे असतात. फिलोच्या म्हणण्याप्रमाणे, कालि- गुला बादशहाचा युक्तिवाद होता तो याच स्वरूपाचा होता. आणि त्या उदाहरणावरून बादशहाने निष्कर्ष काढला तो हा की एक तर राजे देव असावेत किंवा त्यांची प्रजा निर्बुद्ध जनावरासारखी असावी.

कालिगुला, हॉब्स व ग्रोशिअस यांचा युक्तिवाद मूलतः एकसारखा आहे. त्यांच्याही कितीतरी पूर्वी ॲरिस्टॉटलने असा सिद्धांत प्रतिपादन केला होता की निसर्गतः माणसे समान दर्जाची नसतात, काही गुलाम बनण्यासाठी जन्मतात तर काही मालक बनण्यासाठी.[2]

ॲरिस्टॉटलचे म्हणणे खरे होते; परंतु परिणामाला तो कारण समजला. गुलामीमध्ये जो मनुष्य जन्मतो तो स्वभावतः गुलाम बनतो हे अत्यंत खरे आहे. शृंखलाबद्ध गुलामाचे सारेच काही नष्ट होते, शृंखलातून मुक्त होण्याची इच्छा देखील. जनावरामध्ये झालेल्या आपल्या परिवर्तनाची युलिससच्या सहकाऱ्यांना जशी आवड वाटू लागली[3] तशी गुलामाला

---

१. सार्वजनिक हक्का ( public right ) बद्दलचे विद्वानांचे शोध म्हणजे पुष्कळ वेळा जुन्या अन्यायांची कथा असते आणि असा शोध घेणे म्हणजे वेळेचा अपव्यय करणे आहे. ( Traite des interets de la France avec Ses voisions एम्. ल. मार्किस द अर्जेनसन, प्रकाशक, रे ऑफ ॲमस्टरडम ). ग्रोशिअसची खरी चूक आहे ती हीच.

२. पॉलिटिक्स पुस्तक १, प्रकरण ५

३. 'बीस्ट्स् मेक युझ ऑफ रीझन' हा प्लुटार्कचा छोटा प्रबंध.

आपल्या गुलामीची आवड वाटू लागते.

काही माणसे स्वभावाने गुलाम असतात, त्याचे कारण हे की निसर्गनियमाविरुद्ध त्यांना गुलाम बनविले जाते. पहिले गुलाम जे बनवले गेले ते बळामुळे; नंतर तो वर्ग चिरस्थायी झाला तो भ्याडपणामुळे.

ॲडम राजांचा किंवा नोआ बादशहाचा मी उल्लेख केलेला नाही. नोआ हा जग आपल्यामध्ये वाटून घेणाऱ्या तीन मोठ्या राजांचा बाप होता. काही मंडळींनी त्यांची शनी-( Saturn ) च्या मुलांशी एकात्मता कल्पिली आहे. कारण शनीच्या मुलांनी तेच केले होते. माझ्या नेमस्तपणाबद्दल खरोखरच माझे कौतुक व्हायला हवे. कारण त्यांच्यापैकी एका राजाच्या घराण्यात माझा जन्म झालेला असून मी बहुतेक सर्वांत मोठ्या शाखेचा थेट वारसदार असेन; आणि कायद्याप्रमाणे माझा हक्क मला शाबित करता आला असता तर सर्व मानवजातीचा मी कायदेशीर सार्वभौम राजा बनलो असतो. ते कसेही असो, सर्वांना हे कबूल करावे लागेल की रॉबिनसन क्रूसो जसा आपल्या बेटाचा स्वामी होता, तसाच ॲडम जगाचा राजा होता. रॉबिनसन क्रूसोच्या बेटावर जोवर दुसरे कोणी नव्हते तोवरच त्या बेटाचा तो स्वामी होता. अशा परिस्थितीत स्वामित्व गाजवण्यात मोठा फायदा असतो तो हा की अगदी घट्टपणे सिंहासनावर बसलेल्या या राजाला बंडाची, कटाची अगर युद्धाची धास्ती बाळगण्याचे कारण नसते.

## प्रकरण ३

# प्रबळातील प्रबळांच्या हक्काविषयी

मनुष्य कितीही प्रबळ असला तरी आपल्या शक्तीला अधिकाराचे ( Right ) व आज्ञापालनाला कर्तव्याचे स्वरूप दिल्याखेरीज त्याला आपले स्वामित्व कायमचे टिकवता येत नाही. म्हणून आपण प्रबळांचा अधिकार असा शब्दप्रयोग वापरू लागलो आहोत. सुरवातीला अधिकार हा शब्द उपरोधाने वापरला गेला, परंतु नंतर त्याला प्रत्यक्षात तत्त्वतः मान्यता मिळाली. त्या शब्दप्रयोगाचा अर्थ मात्र कधीही स्पष्टपणे विशद करण्यात आलेला नाही; शक्ती हा एक शरीराचा गुण आहे; तिच्या परिणामांना नैतिक अधिष्ठान कसे लाभले ते मला कळत नाही. प्रबळांच्या पुढे नमणे जरूरीमुळे घडून येते, इच्छेनुसार नव्हे. जास्तीत जास्त म्हणता येईल ते एवढेच की भोरणीपणाने ते घडवून आणले. पण मग ते कर्तव्य कसे ठरते ?

घटकाभर असा एखादा अधिकार किंवा हक्क खरोखरच आहे असे आपण गृहीत धरू या. हे मान्य करून निष्कर्ष काढला तर अर्थ लावता येणार नाही अशी बडबड तेवढी पदरात पडेल. शक्तीमुळे हक्क निर्माण होतो असे मानणे म्हणजे कार्य आणि कारण

यांचा क्रम बदलण्यासारखे आहे. प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करणारा प्रबळ मनुष्य त्याच्या हक्कांचा वारसदार बनतो. शिक्षा भोगावी न लागता आज्ञाभंग करता आला की आज्ञाभंग कायदेशीर ठरतो आणि ज्या अर्थी महाशक्तिमान हाच खरा असे मानण्यात येते त्या अर्थी शक्तिमान बनणे हाच एक मार्ग आपल्यापुढे मोकळा राहतो. शक्ती एकाच्या हातून दुसऱ्याच्या हाती गेली की नष्ट होणारा हक्क खरा आहे असे कितपत म्हणता येईल ? शक्तीमुळे माणसाला आज्ञापालन करावे लागत असेल, तर कर्तव्य म्हणून ते आज्ञापालन करण्याची आवश्यकता काय ? आणि आज्ञापालनाची सक्ती नसेल, तर पुढे आज्ञापालन करण्याची जबाबदारी त्याच्यावर उरत नाही. याच्यावरून निष्कर्ष निघतो तो हा की अधिकार या शब्दामुळे शक्तीच्या कल्पनेत काहीही भर पडत नाही. या संबंधात तो शब्द पुरा निरर्थक आहे.

शक्तिशाली असतील त्यांच्या आज्ञा ऐका, शक्तीपुढे नमा एवढाच जर, या दंडकाचा अर्थ असेल तर तो दंडक उत्तम आहे. पण त्याची आवश्यकता नव्हती. हा दंडक जे सांगतात त्यांना माझे उत्तर आहे ते एवढेच की त्या दंडकाचा कधी कुणी भंग करत नाही. सर्व शक्तींचा दाता आहे तो परमेश्वर हे खरे आहे, पण सर्व आधिव्याधीही तोच देतो. आधिव्याधींच्या निवारणासाठी डॉक्टरला कधीही बोलवू नये असा या युक्तिवादाचा अर्थ लावायचा का ? जंगलामधे मला एखाद्या दरोडेखोराने अडवले तर त्याच्या दडपणामुळे मला माझी पैशाची थैली त्याला द्यावी लागते. परंतु त्याच्यापासून मला ती वाचवता आली, तर त्याला ती देऊन टाकणे हे माझे कर्तव्य आहे का ? त्याच्या हातातील पिस्तुल हे त्याच्या शक्तीचे प्रतीक आहे. म्हणून हे कबूल केले पाहिजे की शक्तीमुळे हक्क निर्माण होत नाही आणि राज्ययंत्रणेच्या कायदेशीर हुकुमाखेरीज दुसऱ्या कोणत्याही हुकुमाचे पालन करावयास मनुष्य बांधलेला नाही. अशा रीतीने मी प्रथम उपस्थित केलेल्या प्रश्नाकडे आपल्याला पुन्हा पुन्हा वळावे लागते.

## प्रकरण ४

# गुलामगिरीविषयी

आपल्या बांधवांवर अधिकार गाजवण्याचा निसर्गाने कुणाही मानवाला हक्क दिलेला नाही. तसेच शक्तीमुळे कोणताही हक्क निर्माण होत नाही. म्हणून मानवी समाजातील कायदेशीर अधिकाराला आधार जर कोणता असेल तर संमती ( Agreement ).

खासगी नागरिक जर आपल्या स्वातंत्र्याचे दान करून दुसऱ्या माणसाचा गुलाम बनू शकतो, तर एखाद्या समुदायाने तेच करून राजाच्या मर्जीनुसार वागण्याचे बंधन स्वतःवर का लादून घेऊ नये ? हे ग्रोशिअसचे म्हणणे आहे. या युक्तिवादामधे बरेचसे

संदिग्ध शब्द आहेत. त्यांच्या अर्थांचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. तूर्त एकाच शब्दाकडे लक्ष पुरवू या. तो शब्द म्हणजे फारकत करणे ( alienate ). फारकत करणे म्हणजे देणे किंवा विकणे. दुसऱ्याचा गुलाम बनणारा मनुष्य स्वतःला आपण होऊन देत नाही. तो स्वतःला विकतो आणि त्याला त्याच्या बदल्यात कमीत कमी त्याचा चरितार्थ लाभतो. परंतु एखाद्या पुऱ्या समुदायाने स्वतःला का विकावे? प्रजेच्या जीवननिर्वाहाची राजाने सोय करण्याऐवजी राजाचा स्वतःचा जीवननिर्वाह केवळ प्रजेवरच अवलंबून असतो. राबेलेच्या ( Rabelais ) म्हणण्याप्रमाणे राजाचा जीवननिर्वाह म्हणजे दांडग्या खर्चाची बाब आहे. मग माणूस आपले शरीर देतो आणि शरीराबरोबर आपली मालमत्ताही देतो, हे का आपले म्हणणे आहे? मग त्याच्याजवळ काय उरते ते सांगणे मोठे कठीण आहे.

राजा प्रजेला नागरी ( civil ) शांतता देतो असे म्हटले जाईल. ठीक आहे. परंतु त्याच्या महत्त्वाकांक्षेच्या पायी घडून येणाऱ्या युद्धामुळे किंवा त्याच्या कधीही शांत न होणाऱ्या लोभामुळे किंवा त्याच्या मंत्र्यांच्या त्रासदायक मागण्यांमुळे, अंतर्गत भांडणामुळे होणाऱ्या नुकसानीपेक्षा प्रजेची अधिक नुकसानी झाली तर कोणता फायदा तिच्या पदरात पडला? नागरी शांतता हेच जर तिच्या दैन्याचे एक कारण ठरत असेल, तर तिला लाभ कोणचा मिळाला? माणसाला अंधारकोठडीत देखील शांततेने राहता येईल; पण त्या शांततेमुळे त्याला सुख लाभणार नाही. सायक्लपच्या गुहेमधे बंदिस्त झालेले ग्रीक आपल्या भक्षणाची पाळी केव्हा येते त्याची वाट पाहात शांततेने राहात होते.

मनुष्य, मोबदल्यात काही न मिळता, स्वतःला देऊन टाकतो असे म्हणणे म्हणजे एक हास्यास्पद व अचिन्त्य असे विधान करण्यासारखे आहे. समर्पणाचे हे कृत्य बेकायदेशीर आहे, ते रद्दबातल आहे, कारण जो ते कृत्य करतो त्याची मनःस्थिती ताळ्यावर नसते. एखाद्या जनसमुदायाबद्दल ते म्हटले गेले तर त्याचा अर्थ हाच होईल की तो समुदाय म्हणजे एक दुबळ्या मनाच्या लोकांचे राष्ट्र आहे. मनाच्या दुबळेपणातून हक्काचा ( Right ) उद्‌भव होत नाही.

एखाद्या माणसाने स्वतःचे दान केले ( alienate ) तरी त्याला मुलांचे दान करता येत नाही. स्वतंत्र या नात्याने ती जन्माला आली, स्वातंत्र्य हे त्यांच्या मालकीचे आहे. त्याच्याखेरीज दुसऱ्या कुणालाही त्याची विल्हेवाट करता येणार नाही. ती सज्ञान होईपर्यंत त्यांच्या संरक्षणासाठी व कल्याणासाठी बापाला काही नियम करता येतील. परंतु असे जे काही त्यांच्या वर्तनस्वातंत्र्यावर निर्बंध घालण्यात आले असतील ते बदलता येणार नाहीत अगर बिनशर्त आहेत असे मानणे योग्य होणार नाही. दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचे दान करणे हे निसर्गनियमाविरुद्ध आहे आणि तो बापाच्या हक्काचा दुरुपयोग आहे. याच्यावरून सिद्ध होते ते हे की प्रत्येक नव्या पिढीला ते स्वीकारण्याचे वा धिक्कारण्याचे स्वातंत्र्य असेल तरच जुलमी शासन कायदेशीर आहे असे म्हणता येईल आणि ते स्वातंत्र्य असेल तर शासन जुलमी राहणार नाही.

मनुष्य ज्या वेळी स्वातंत्र्याचा त्याग करतो त्यावेळी तो आपल्या अस्सल मनुष्यत्वाचा, आपल्या हक्काचा व आपल्या मानवी कर्तव्याचाही त्याग करतो. अशा संपूर्ण त्यागाची कशानेही भरपाई होणे शक्य नाही. हा त्याग माणसाच्या स्वभावाशी विसंगत आहे. माणसाचे इच्छास्वातंत्र्य ( free will ) हिरावून घेणे म्हणजे त्याच्या सर्व कृतींचा नैतिक आधार नष्ट करण्यासारखे आहे. एका बाजूला अनियंत्रित सत्ता व दुसऱ्या बाजूला निरपवाद आज्ञापालनाची जबाबदारी निर्माण करणारा संकेत निष्फळ आणि निरर्थक आहे. जिथे आपण सर्व काही मागू शकतो, तिथे कुणाचेही ऋण आपल्याला मानावे लागत नाही हे उघड नाही का ? जिथे उभयपक्षी जबाबदारी नाही, कर्तव्याची देवाणघेवाण नाही, तिथे आज्ञेनुसार केलेल्या कृत्यांना नैतिक मूल्य उरत नाही हे स्पष्ट नाही का ? माझ्या गुलामाजवळ जे जे काही आहे ते माझ्या मालकीचे असेल तर माझ्याविरुद्ध त्याला काही हक्क शाबित करणे शक्य आहे असे कसे म्हणता येईल ? त्याचा हक्क तो माझा हक्क असल्यामुळे माझ्या हिताला तो कधी बाधक होईल असे मानणे वेडेपणाचे आहे.

ग्रोशिअसने आणि त्याच्या सारखाच विचार करणाऱ्या इतरांनी युद्ध हे गुलामगिरीच्या तथाकथित हक्काचे एक वेगळे समर्थन आहे असे मानले आहे. त्यांचा युक्तिवाद आहे तो असा की ज्या अर्थी जेत्याला पराभूत शत्रूला ठार मारण्याचा हक्क असतो त्या अर्थी, त्याला तसे वाटल्यास, स्वातंत्र्याच्या बदल्यात शत्रूला जीवदान देण्याचाही हक्क असावा आणि हा जो दोघांमध्ये करार होतो तो दोन्ही पक्षांना हितकारक असल्यामुळे अधिक कायदेशीर ठरायला हवा.

शत्रूला जीवे मारण्याचा माणसाचा हा तथाकथित हक्क युद्धपरिस्थितीतून निर्माण झालेला आहे असे म्हणता येत नाही. कारण प्राथमिक अवस्थेतील स्वतंत्रपणे राहणाऱ्या माणसांमध्ये असे कोणतेही स्थिर स्वरूपाचे संबंध नसतात की ज्यांच्यातून युद्धाची अगर शांततेची परिस्थिती निर्माण व्हावी. निसर्गाने त्यांना एकमेकांचे शत्रू बनवले असे म्हणता येत नाही. माणसांमधील संबंधाऐवजी वस्तूंमधील संबंधामुळे युद्ध निर्माण होते. व्यक्तीव्यक्तीमधील साध्या संबंधामुळे युद्धपरिस्थिती निर्माण होत नाही. ती निर्माण होते ती वस्तूंमधील संबंधामुळे. त्यामुळे सर्वमान्य अशी खाजगी मालमत्तेची प्रथा नाही अशा प्राथमिक स्वरूपाच्या निसर्गअवस्थेमध्ये ( state of nature ) किंवा कायदा हीच सार्वभौम सत्ता आहे असे मानणाऱ्या समाजव्यवस्थेमध्ये माणसामाणसामध्ये खाजगी लढा निर्माण होत नाही.

वैयक्तिक लढे, द्वंद्वे अगर एकएकट्यामधील भांडणे हे वेगवेगळे प्रसंग आहेत. त्यांच्या योगाने कोणाचीही 'परिस्थिती' निर्माण होत नाही. नवव्या लुई राजाने फतवे ( Ordinances ) काढून जी खाजगी युद्धे सुरू केली आणि जी नंतर 'दैवी शांतते' ( Peace of God) मुळे विराम पावली ती म्हणजे सरंजामदारी पद्धतीच्या दुष्परिणामासारखी होती. सरंजामदारी पद्धतीची राज्यव्यवस्था ही इतर सर्व राज्यव्यवस्थेपेक्षा अधिक

मूर्खपणाची ( absurd ) होती. नैसर्गिक हक्क ( Natural Right ) आणि चांगली राजवट ( polity ) यांच्याशी ती पुरी विसंगत होती.

म्हणून युद्ध घडून येते ते माणसामाणसामध्ये घडून येत नाही तर राज्याराज्यामध्ये. ज्या व्यक्ती युद्धामध्ये ओढल्या जातात त्या एकमेकांच्या शत्रू बनतात. ते केवळ योगायोगाने. त्या युद्ध करतात, त्या माणसे किंवा नागरिक म्हणून नव्हे तर केवळ सैनिक म्हणून; या किंवा त्या राष्ट्रीय समुदायाचे घटक म्हणून नव्हे तर त्याचे बचाव करणारे ( defenders ) म्हणून.[1] एका राज्याचा शत्रू केवळ दुसरे राज्यच होऊ शकते, माणसे नव्हेत; कारण वेगवेगळ्या जातींच्या वस्तूमध्ये खरा संबंध असू शकत नाही.

अनेक कालखंडांच्या तत्त्वाशी व सर्व सुसंस्कृत समाजांच्या नेहमीच्या रिवाजाशी हे तत्त्व सुसंगत आहे. युद्धाची घोषणा ही शासनांच्या ऐवजी त्यांच्या प्रजेला दिलेली धोक्याची सूचना असते. परकीयाने—मग तो राजा असो, खाजगी व्यक्ती असो, की संबंध राष्ट्र असो—एखाद्या देशाच्या राजपुरुषाविरुद्ध युद्धाची घोषणा न करता त्या देशामध्ये चोरी केली, लूट केले, अगर लोकांची धरपकड केली, तर त्याचे वागणे शत्रूसारखे नसून लुटारूसारखे ठरते. युद्धाच्या प्रसंगीदेखील न्यायी राजपुरुष शत्रूच्या मुलखातील सर्व सार्वजनिक मालमत्ता घेईल, परंतु व्यक्तींच्या इस्टेटीला व मालमत्तेला हात लावणार नाही आणि हे करताना तो ज्या हक्कावर त्याचे स्वतःचे कायदे आधारलेले असतात त्या हक्काबद्दल कळकळ व्यक्त करत असतो. शत्रुराज्याचा विध्वंस करणे हे युद्धाचे उद्दिष्ट असल्या-कारणाने सेनापतीला त्या राज्याच्या रक्षणकर्त्यांना, जोवर शस्त्रे त्यांच्या हातात आहेत तोवर, ठार मारण्याचा अधिकार आहे. परंतु त्यांनी शस्त्रे खाली ठेवून शरणागती स्वीकारताच

१. कोणत्याही इतर राष्ट्रापेक्षा रोमन लोकांना युद्धाच्या कायद्याचे विशेष ज्ञान होते व त्याच्याबद्दल खरा आदर होता. कायद्याबद्दलचा कटाक्ष त्यांनी इतक्या थराला नेला होता की, नागरिकाला विवक्षित मोहिमेसाठी व विवक्षित शत्रूविरुद्धच लढण्यासाठी लष्करामध्ये दाखल होता येत असे. धाकट्या कॅटोने पॉपिलिअस याच्या नेतृत्वाखाली लष्करी नोकरीची पहिली मुदत संपल्यानंतर जेव्हा त्या सैन्याची पुनर्रचना झाली तेव्हा कॅटोच्या बापाने पॉपिलिअसला पत्र लिहून कळवले की कॅटोला तुला सैन्यात कायम ठेवायचे असेल तर त्याला पुन्हा शपथ घ्यायला लावली पाहिजे. कारण कॅटोची पहिली शपथ आता संपली असून त्याला शत्रूविरुद्ध लढायला त्यानंतर भाग पाडता येत नाही. त्याच वेळी त्याने मुलालाही पत्र लिहून सांगितले की पुन्हा शपथ घेतल्याखेरीज सैन्याच्या कवाईतीत सामील न होण्याची खबरदारी घे. क्लुसिअमच्या वेढ्यासारखी काही उदाहरणे माझ्याविरुद्ध दर्शविण्यात येतील हे मला माहीत आहे. त्याला माझे उत्तर हे की मला नमूद करावयाचे आहेत ते फक्त कायदे आणि रूढी. रोमन लोक फारच क्वचित आपल्या कायद्यांचे उल्लंघन करत आणि त्यांच्यासारखे चांगले कायदे फारच थोड्या लोकांना लाभले आहेत.

ते शत्रू उरत नाहीत किंवा शत्रूची साधने उरत नाहीत. ते सैनिक साधी माणसे बनतात आणि मग त्यांच्या जीवनावर कुणालाही कायदेशीर अधिकार सांगता येत नाही. कधी कधी प्रजेपैकी कुणालाही न मारता एखाद्या राज्याचा नाश करता येतो आणि जिंकणाराच्या हेतूच्या सिद्धतेसाठी कराव्या लागणाऱ्या गोष्टीखेरीज इतर कोणतीही गोष्ट युद्धाच्या काळात देखील हक्क म्हणून करता येणार नाही. ही ग्रोशिअसने सांगितलेली तत्त्वे नव्हेत किंवा कुणा कवीच्या वचनाचा त्याला आधार नाही; वस्तूंच्या स्वभावातून (The Nature of Things) ती निष्पन्न होतात आणि बुद्धी (Reason) हा त्यांचा आधार आहे.

प्रबळांचा कायदा (Law of the Strongest) हाच विजयाच्या हक्काचा (Right of Conquest) एकमेव आधार आहे. पराभूत शत्रूंचे शिरकाण करण्याचा जेत्याला युद्धामुळे अधिकार लाभत नाही हे जर खरे असेल, तर मुळातच जो अधिकार नाही त्याच्या आधाराने जेत्याला पुढचा पराभूत शत्रूंना गुलाम करण्याचा हक्क सांगता येणार नाही. शत्रूला गुलाम करता येत नसेल त्याच वेळी त्याला ठार मारण्याचा आपल्याला अधिकार आहे. ठार मारण्याच्या हक्कामुळे गुलाम करण्याचा हक्क प्राप्त होत नाही. म्हणून पराभूत शत्रूकडून जीवाच्या मोबदल्यात त्याचे स्वातंत्र्य विकत घेणे म्हणजे एक अन्याय्य देवघेव करण्यासारखे आहे, कारण त्याच्या जीवावर आपला कोणताही हक्क नसतो. गुलाम करण्याच्या हक्कावर जगवायचे की मारायचे हा हक्क आणि जगवण्याच्या किंवा मारण्याच्या हक्कावर गुलाम करण्याचा हक्क आपण आधारू लागलो की एका दुष्ट चक्रात आपण सापडतो हे सहज उघड होत नाही का? सर्वांना मारण्याचा हा महाभयंकर हक्क जरी आपण गृहीत धरला, तरी माझे असे म्हणणे आहे की युद्धामध्ये गुलाम झालेला मनुष्य व पराभूत झालेला जनसमुदाय यांच्यावर, सक्तीने आज्ञापालन घडवून आणता येईल, तोवरच आज्ञापालनाची जबाबदारी असते; त्यापलीकडे ती संपते. जेत्याने पराभूत शत्रूचे एखादा मोबदला घेऊन प्राणरक्षण केले तर त्याने शत्रूवर दया केली असे म्हणता येत नाही. दोहोपैकी कोणतीही गोष्ट त्याने केली तरी तो शत्रूचा नाश करतो; एक गोष्ट करून, म्हणजेच शत्रूला गुलाम करून, तो थोडाबहुत स्वतःचा फायदा करून घेतो; तर दुसरी गोष्ट करून, म्हणजेच त्याला ठार मारून, त्याच्या काहीच पदरात पडत नाही. परंतु त्याच्या सत्तेला आधार एकच आणि तो म्हणजे बळाचा. दोन्ही माणसांमधे युद्ध-परिस्थिती चालूच राहते आणि त्यांचे जे एकमेकाशी नाते राहते, त्याच्यावर त्या परिस्थितीचा परिणाम होतो. युद्धाच्या हक्कांचा उपभोग घेणे म्हणजे शांततेचा तह झाला नाही हे मान्य करण्यासारखे आहे. जिंकणारा आणि जिंकला गेलेला यांच्यामधे एक करार झालेला असतो हे खरे; पण त्या करारामुळे युद्धपरिस्थिती संपत नाही, उलट ती चालूच आहे असे गृहीत धरले जाते.

म्हणून कोणत्याही दृष्टीने या गोष्टीकडे आपण पाहिले तरी हे उघड होते की गुलाम करण्याच्या हक्काचे अस्तित्व सिद्ध होत नाही, त्या हक्काला कायद्याचा आधार

नाही, एवढेच नव्हे तर ती संज्ञाच मुळी मूर्खपणाची व निरर्थक आहे. गुलामगिरी व हक्क हे दोन शब्द परस्परविरोधी आहेत आणि ते एके ठिकाणी नांदू शकत नाहीत. मनुष्यामनुष्यामधील संबंध असोत किंवा एका व्यक्तीचे जनसमुदायाशी संबंध असोत त्यांच्याविषयी पुढीलप्रमाणे बोलणे वेडेपणाचे ठरेल : "तू आणि मी एक करार केलेला आहे. त्या कराराप्रमाणे सर्व नुकसान होते ते तुझे व फायदा होतो तो माझा. माझी मर्जी लागेल तोवर मी त्या कराराचे पालन करीन आणि मला तो करार गैरसोईचा आहे असे वाटत नाही तोवर तू देखील त्या कराराचे पालन केले पाहिजेस."

प्रकरण ५

# मूळ कराराकडे आपल्याला नेहमीच परत जायाला हवे

आतापर्यंत मी ज्या गोष्टींचे खंडन केले त्या सर्व मी मान्य केल्या तरी देखील जुल्मी राजवटीच्या ( despotism ) पुरस्कर्त्यांची बाजू अल्पांशानेही सुधारणार नाही. झुंड ( mob ) दडपून टाकणे आणि एखाद्या सामाजिक गटावर राज्य करणे यामधे खूप फरक आहे. एका जेत्याने लादलेल्या नियंत्रणाला कितीही वेगवेगळ्या व्यक्तींनी मान्यता दिली, तरी त्यांच्यामधे निर्माण झालेले संबंध मालक आणि गुलाम या स्वरूपाचे असतात, राज्यकर्ता आणि जनसमुदाय या स्वरूपाचे नसतात. अशा तऱ्हेने नियंत्रित केलेल्या माणसांचा ढीग ( agglomeration ) बनतो, त्यांचा संघ ( association ) बनत नाही. त्याने सार्वजनिक कल्याण साधत नाही किंवा एक राजकीय समाज ( body politic ) बनत नाही. एखाद्या माणसाने अर्धे जग जिंकले तरी तो एक व्यक्तीच राहतो. प्रजेच्या हितसंबंधापेक्षा वेगळे असे त्याचे हितसंबंध स्वतःपुरते मर्यादित असतात. तो मरतो तेव्हा त्याच्या साम्राज्याचे तुकडे पडतात आणि ते विच्छिन्न होते. आग लागताच कोसळणाऱ्या आणि भस्मीभूत होणाऱ्या ओक वृक्षासारखा तो असतो.

ग्रोशिअस म्हणतो : "एखादा जनसमुदाय राजाला आपले सर्वस्व देतो." समर्पणाचे हे कृत्य करण्यापूर्वी जनसमुदाय खरोखरच जनसमुदाय बनला होता हे त्याच्या विवेचनाचे अध्याहृत तत्त्व आहे. समर्पणाचे कृत्य केले ते एका राजकीय गटाने आणि ते करण्यापूर्वी सार्वजनिक चर्चा झाली असली पाहिजे. जनसमुदाय राजाची निवड कशी करतो याचा विचार करण्यापूर्वी, माणसांचा जनसमुदाय कसा बनतो याचा विचार करणे योग्य होईल. दुसरी गोष्ट पहिल्या गोष्टीच्या अगोदर घडून येते आणि ती दुसरी गोष्ट हाच सर्व समाजांचा ( Societies ) पाया आहे.

मूळ करार नसता तर अल्पसंख्याकांनी बहुसंख्याकांची निवड का मान्य केली असती ? निवड एकमताची असती तर गोष्ट वेगळी. धनी हवा आहे अशा शंभरांनी

ज्यांना नको आहे अशा दहांच्या वतीने मत देण्याचा काय अधिकार? मतदानाची पद्धत ही देखील एक प्रकारचा करार आहे आणि एकदा तरी एकमत होते म्हणूनच ती अस्तित्वात येऊ शकली.

## प्रकरण ६

# सामाजिक कराराविषयी

युक्तिवादासाठी मी असे धरून चालतो की मनुष्यजातीच्या इतिहासात असा एक टप्पा आला की ज्यावेळी निसर्ग-अवस्था ( state of nature ) टिकून राहावी म्हणून व्यक्तीमार्फत केलेल्या प्रयत्नापेक्षा त्या अवस्थेतील अडचणी अधिक प्रभावी ठरल्या. मुळातील निसर्ग-अवस्था त्यापुढे टिकणे शक्य नव्हते. जीवनाची पद्धत बदलली नसती तर मानववंश नष्ट झाला असता.

माणसाला नवीन शक्ती निर्माण करता येत नाही. प्रत्येक माणसाच्या ठिकाणी जी अंगभूत शक्ती आहे तीच सारी एकत्र करता येते व तिचे नीट नियंत्रण करता येते. म्हणून एकत्र येऊन व सर्व शक्तीची गोळा-बेरीज करून बाहेरच्या दडपणाला तोंड देणे याखेरीज मानवाला दुसरा मार्ग उपलब्ध नाही. माणसांना मध्यवर्ती निर्देशक यंत्रणा निर्माण करावी लागते आणि एकजुटीने काम करायला शिकावे लागते.

व्यक्ती-व्यक्तींची संमती मिळवूनच असे सत्तेचे एकत्रीकरण साधता येते. प्रत्येक माणसाला स्वसंरक्षणासाठी स्वतःच्या शक्तीवर व स्वातंत्र्यावर अवलंबून राहावे लागते. मग स्वतःचे नुकसान करून घेतल्याखेरीज व स्वतःच्या गोष्टीकडे त्याने जे लक्ष पुरवायला हवे ते कमी केल्याखेरीज स्वतःच्या शक्तीवर व स्वातंत्र्यावर मनुष्याला कशा मर्यादा लादून घेता येतील? ही जी अडचण आहे ती माझ्या विषयापुरती येणेप्रमाणे व्यक्त करता येईल :

'संघटनेचा असा एखादा प्रकार शोधायला हवा की ज्याच्या योगाने समाजाची सगळी शक्ती घटक सभासदांच्या शरीर व मालमत्ता यांच्या रक्षणासाठी वापरता येईल व प्रत्येकाला आपल्या बांधवांच्याबरोबर एकजूट केल्यानंतर स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागता येईल व पूर्वीइतकेच स्वातंत्र्य अनुभवता येईल.' हाच मूलभूत प्रश्न आहे; सामाजिक करार त्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतो.

या कराराची कलमे ठरतात ती संघ बनवण्याच्या कृतीच्या वेळी आणि ती अशा तऱ्हेने ठरवली जातात की थोडाबहुत बदल झाला की ती सर्व रद्द ठरावी. औपचारिक रीतीने त्यांचा उद्‌घोष झालेला नसला तरी सगळीकडे ती एकसारखीच असतात आणि सर्वांनी त्यांना मान्यता व संमती दिलेली असते. सामाजिक कराराचा भंग झाला की

संघात सामील झालेल्या प्रत्येक व्यक्तीला त्याचे पूर्वी जे हक्क होते ते परत मिळतात, तसेच जे स्वातंत्र्य मिळावयाचे असे ठरले म्हणून आपल्या स्वातंत्र्यावर त्याने पाणी सोडले ते जाताच त्याला त्याचे नैसर्गिक स्वातंत्र्य पुन्हा परत मिळते. या गोष्टी इतक्या स्पष्ट आहेत की कुणीही त्या अमान्य करत नाही.

तसे पाहिले तर अखेरीला करारातील महत्त्वाचे कलम आहे ते एकच. ते म्हणजे संघटित झालेल्या प्रत्येक सभासदाने आपले सगळे हक्क समाजाला संपूर्णपणे देऊन टाकणे. कारण पहिल्या प्रथम, प्रत्येकाने स्वतःला संपूर्णपणे समर्पित केल्यामुळे जी परिस्थिती निर्माण होते ती सर्वांना सारखी असते. आणि ती सर्वांना सारखी असल्याकारणाने आपल्या जोडीदाराना ती अधिक गैरसोईची करणे कुणाच्याही हिताचे नसते.

शिवाय, समर्पण ( alienation ) बिनशर्त असल्याकारणाने, व्यक्तींचा जो संघ बनतो तो अधिकात अधिक निर्दोष असतो आणि सामील झालेल्या सभासदांपैकी कुणालाही समाजाविरुद्ध कोणताही हक्क सांगता येत नाही. व्यक्तीजवळ जर काही हक्क राहिले, आणि त्या बाबतीत व्यक्ती आणि समाज यांच्यामधे निर्णय देण्यासाठी म्हणून सर्वमान्य अशी सत्ता नसली, तर प्रत्येकजण त्या बाबतीत स्वतः निर्णय देऊ लागेल आणि एका बाबतीत ते सुरू झाले की सर्व बाबतीत तो आग्रह धरला जाईल. तसे घडले तर निसर्ग-अवस्था चालू राहील आणि समाजाचे नियम एक तर जुल्मी बनतील नाहीतर परिणाम-शून्य बनतील.

थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे जो सर्वांना आपले सर्वस्व देतो तो कुणालाच काही देत नाही. समाजाच्या प्रत्येक सभासदाला इतरांना त्याने दिले तेवढे हक्क इतरांविरुद्ध मिळत असल्याकारणाने, जितके घालवले तितकेच प्रत्येकाला मिळते आणि शिवाय जे स्वतःजवळ अगाऊच आहे त्याच्या संरक्षणासाठी अधिक सत्तेचा लाभ होतो.

सामाजिक करारांपैकी अनावश्यक भाग सोडला, तर जे उरते त्याचे वर्णन पुढील प्रमाणे करता येईल, ' आपल्यापैकी प्रत्येकजण समाजामधे स्वतःची व स्वतःच्या शक्तीची भर घालतो. ही शक्ती प्रत्यकाने सर्वसाधारण इच्छेच्या ( general will ) सार्वभौम नियंत्रणानुसार वापरायची असते. आणि राजकीय समाजामधे आपण प्रत्येक व्यक्तीला समष्टीचा ( whole ) अविभाज्य भाग म्हणून सामील करून घेतो.'

एकत्र राहण्याची पद्धत अस्तित्वात आल्याबरोबर, एकत्र आलेल्या वेगवेगळ्या व्यक्तींच्या ऐवजी एक नवी नैतिक व सामुदायिक संस्था तयार होते. संघटक सभेमधे जितके मतदार असतील तितके त्या संस्थेचे सभासद होतात. संस्था बनताच तिला एक-जूट लाभते, सर्वांमधे विखुरलेले असे तिचे स्वत्व लाभते व स्वतःची अशी इच्छाशक्ती ( will ) प्राप्त होते. व्यक्तींच्या एकत्र येण्यामुळे ही जी सार्वजनिक समष्टी तयार होते तिला पूर्वीच्या काळात नगर ( city ) असे म्हणत असत; आता तिला लोकराज्य

(Republic) किंवा राजकीय समाज असे म्हणतात.[१] जेव्हा तो समाज नेहमीच्या उद्योगात गुंतलेला असेल त्यावेळी त्याचे घटक त्याला राज्य (the state) हे नाव देतात, ज्यावेळी तो अधिक क्रियाशील, त्यावेळी त्याला सार्वभौम जनसमुदाय असे म्हणतात आणि तत्ल्याच इतर समाजाबरोबरील वेगळेपणा दाखवण्यासाठी त्याचा एक समर्थ संघटना ( Power ) म्हणून उल्लेख करतात. घटक सभासदांपुरता विचार केला तर समाजाला लोक अगर जन-समुदाय ( the people ) असे सामुदायिक नाव देता येईल. तो समाज ज्या व्यक्तींचा बनलेला असतो, त्यांना सार्वभौम सत्तेत त्यांचा वाटा असतो म्हणून नागरिक असे म्हणतात. राज्याचे कायदे पाळण्याचे त्यांच्यावर जे बंधन असते त्यामुळे त्यांना प्रजाजन असे म्हणता येईल. हे वेगवेगळे शब्द पुष्कळ वेळा, विचार न करता, एक दुसऱ्यासाठी वापरला जातो आणि त्यांच्या अर्थांमधेही सरमिसळ झालेली असते. ज्यावेळी ते निश्चित अर्थाने वापरले जातात त्यावेळी त्यांच्यामधील फरक आपल्या ध्यानात आला म्हणजे पुष्कळ झाले.

१—' नगर ' या शब्दाच्या खऱ्या अर्थाचा अलीकडील मंडळींना जवळ जवळ विसर पडला आहे. त्यांच्यापैकी पुष्कळांना असे वाटते की नगर आणि मोठे गाव [ Town ] यांचा अर्थ एकच आहे आणि गावातील प्रतिष्ठित इसम [ Burgess ] बनणे हे नागरिक बनण्यासारखेच आहे. घरामुळे मोठे गाव बनते. परंतु नगर बनण्या-साठी नागरिक लागतात हे त्यांच्या ध्यानात येत नाही. कार्थेजच्या लोकांना या चुकीबद्दल जुन्या काळात खूप भुर्दंड भरावा लागला. नागरिक [ Cives ] हे अभिधान राज-पुरुषाच्या प्रजाजनाला लावता येईल असे मी कुठेही वाचलेले नाही. जुन्या काळातील मॅसिडोनिअन्स यांना ते लावता येत नाही आणि आजच्या काळातील इंग्रजांना-ते अभिधान, जरी इतर कोणत्याही जनसमुदायापेक्षा ते अधिक स्वातंत्र्य उपभोगत असले तरी, लावता येणार नाही. फक्त फ्रेंच ' नागरिक ' या शब्दाचा ओळखीचा शब्द या नात्याने वापर करतात. याचे कारण असे की त्यांना त्या शब्दाच्या खऱ्या अर्थाची कल्पना नाही. फ्रेंच शब्दकोशाकडे नजर टाकली की कोणालाही ती कल्पना येईल. तसे जर नसते, तर त्यांच्या हातून पावित्र्यविडंबनाचा [ lese majeste ] गुन्हा घडला नसता. ते तो शब्द वापरतात त्याच्यातून कायद्यावर आधारलेल्या प्रतिष्ठे [ legal standing ] ऐवजी समतेचा बोध होतो. बोडिन जेव्हा " आपले नागरिक व प्रतिष्ठित गावकरी " असा उल्लेख करतो त्यावेळी तो ते दोन शब्द एकाच अर्थाने वापरण्याची चूक करतो. एम्. द अलेंबर [ M. d'Alembert ] याची तशी फसगत झालेली नाही. जिनिव्हा [ Geneva ] शहरावरील लेखात आमच्या या शहरात राहणाऱ्या लोकांची त्याने बरोबर चार [परकी माणसे विचारात घेतली तर पाच ] गटात विभागणी केली आहे. या चार गटांपैकी दोनच गट लोकशाही राज्याचे घटक आहेत. ' नागरिक ' या शब्दाचा खरा अर्थ जाणणारा दुसरा कुणीही फ्रेंच लेखक माझ्या माहितीत नाही.

## प्रकरण ७

# राज्यकर्त्यांविषयी

वर दिलेल्या सूत्राप्रमाणे हे उघड होते की एकत्र येण्याच्या कृतीमुळे राजकीय समाज आणि त्याचे घटक सभासद यांच्यामध्ये एक उभयान्वयी करार प्रस्थापित होतो. समाज घडविणारी प्रत्येक व्यक्ती स्वतःबरोबर एक करार करते असे म्हणता येईल आणि तिचे कार्य दुहेरी स्वरूपाचे असते. सार्वभौम जनतेचा एक सभासद म्हणून आपल्या शेजाऱ्याविषयीचे त्याचे एक कर्तव्य असते व दुसरे नागरिक म्हणून सार्वभौम जनते-विषयीचे. माणसाचे स्वतःविषयीचे कर्तव्य व तो ज्याचा भाग आहे अशा समष्टीविषयीचे कर्तव्य यात खूप फरक असल्यामुळे, स्वतःबरोबर केलेला करार माणसावर बंधनकारक नसतो हा दिवाणी कायद्याचा [ Civil Law ] नियम या ठिकाणी लागू पडत नाही.

सार्वजनिक निर्णयाने राज्यकर्त्यांचे हुकूम पाळण्याचे बंधन प्रजेवर लादता येते. परंतु प्रत्येकाकडे दुहेरी दृष्टीने पाहिले जाते, त्यामुळे स्वतःशी केलेल्या व्यवहारात ते बंधन राज्य-कर्त्यांना लागू पडत नाही हे या ठिकाणी सांगणे आवश्यक आहे. म्हणून ज्याचा भंग करता येणार नाही असा कायदा राज्यकर्त्यांने स्वतःवर लादून घेणे हे राजकीय समाजाच्या स्वभा-वास धरून नाही. कारण त्याचे एकच स्वरूप असल्याकारणाने तो स्वतःशीच करार करणाऱ्या व्यक्तीसारखा आहे. यावरून सिद्ध होते ते हे की सबंध जनसमुदायावर बंधनकारक होईल असा कोणताही मूलभूत कायदा नाही व असणे शक्य नाही;सामाजिक करार देखील. याचा अर्थ असा नाही की राजकीय समाजाला दुसऱ्या समाजाबरोबर करारमदार करता येणार नाहीत. सामाजिक कराराचा भंग होणार नाही एवढी मात्र काळजी घेतली पाहिजे. कारण राजकीय समाज परकीय शक्तीशी [ Power ] करारमदार करतो, तो एक साधी व्यक्ती म्हणून.

राजकीय समाज किंवा राज्यकर्ता यांचे अस्तित्व सामाजिक करारावर अवलंबून असल्याकारणाने त्या कराराला बाध येईल असा कोणताही निर्णय राजकीय समाजाने किंवा राज्यकर्त्याने परकीय शक्तीशी संबंध ठेवताना देखील घेता कामा नये. उदाहरणार्थ, समाजाने आपल्या प्रदेशाचा कोणताही भाग सोडता कामा नये किंवा दुसऱ्या एखाद्या सार्वभौम सत्तेला शरण जाता कामा नये. ज्या कृतीमुळे राजकीय समाजाचा जन्म झाला त्या कृतीशी प्रतारणा करणे म्हणजे स्वतःचा नाश करून घेण्यासारखे आहे. नष्ट झालेली वस्तू काहीही निर्माण करू शकत नाही.

झुंडीचे ज्या वेळी राजकीय समाजात रूपांतर होते त्या वेळी समाजाच्या एका सभासदावरील हल्ला सगळ्या समाजावरील हल्ला होतो. अधिक महत्त्वाची गोष्ट आहे ती ही की समाजाविरुद्ध जेव्हा एखादा गुन्हा घडतो तेव्हा त्याचे परिणाम समाजाच्या प्रत्येक सभासदावर घडून येतात. म्हणूनच कर्तव्य व हितसंबंध या दोहोंच्या दडपणामुळे समाज

आणि सभासद दोघांनाही एकमेकांना मदत करावी लागते. समाजाच्या निर्मितीपासून होणारे फायदे, व्यक्तींनी या दुहेरी जबाबदारीत एकत्र करण्याचा प्रयत्न करावा.

ज्या व्यक्तींच्या एकत्र येण्यामुळे सार्वभौम जनसमुदाय बनतो त्या व्यक्तींच्या बाहेर त्याला अस्तित्व नसते. त्यामुळे त्या व्यक्तींच्या हिताशी विरोधी असे त्या जनसमुदायाला कोणतेही हित असणे शक्य नाही. म्हणून त्या सार्वभौम सत्तला आपल्या प्रजेला कोणतेही आश्वासन देण्याची आवश्यकता नाही. कारण आपल्या सगळ्या सभासदांचे नुकसान करावे अशी इच्छा त्या सत्तेला होणे शक्य नाही. आणि तसेच–कसे ते आपण पुढे पाहू–कुणाही व्यक्तीचे देखील ती नुकसान करणे शक्य नाही. राज्यकर्ता, केवळ तो अस्तित्वात आहे या गोष्टीमुळे, नेहमी तो हवा तसाच असतो. परंतु तो नियम प्रजा आणि राज्यकर्ता यांच्यामधील संबंधांना लागू पडत नाही. हितसंबंध समान असले, तरी देखील व्यक्ती, निष्ठा कायम राखण्यासाठी जरूर ती साधने वापरल्याखेरीज, राज्यकर्त्यांविषयीचे आपले कर्तव्य पार पाडील अशी खात्री देता येत नाही.

प्रत्येक व्यक्तीची एक मनुष्य म्हणून, जी सर्वसाधारण इच्छा ( General will ) बनण्यामधे त्याचाही हिस्सा असतो, त्या सर्वसाधारण इच्छेपेक्षा वेगळी इच्छा असणे शक्य आहे. सर्वांच्या हिताच्या दृष्टीने जे करणे आवश्यक त्याच्यापेक्षा वेगळे काही करण्याची स्वहितामुळे त्याला इच्छा होणे शक्य आहे. व्यक्ती या नात्याने त्याच्या जीवनाला निरपवाद मूल्य असल्याकारणाने व निसर्गत: तो एक स्वतंत्र जीव असल्याकारणाने, त्याला असे वाटेल की सर्वसाधारण हितासाठी आपण जे करतो ते आपल्या स्वतंत्र इच्छेप्रमाणे, आणि म्हणून सामाजिक ऋण फेडण्यासाठी जे समर्पण करावे लागते ते केल्याने इतरांचा जो फायदा होईल त्यापेक्षा स्वतःचे अधिक नुकसान होईल. राज्यसंस्था ही मनुष्य नसून विवेकबुद्धीने तयार केलेली एक नैतिक वस्तू आहे. त्या संस्थेच्या बाबतीत नागरिक म्हणून त्याचे जे हक्क आहेत त्यांचा तो उपभोग घेईल; परंतु प्रजा म्हणून त्याची जी कर्तव्ये आहेत ती मात्र पार पाडणार नाही. मनुष्याच्या या कृतीमुळे अन्याय व अनवस्था इतकी वाढेल की राजकीय समाजावर नाशाचे संकट ओढवेल.

सामाजिक करार केवळ एक निरर्थक सूत्र ठरू नये यासाठी त्याच्यामधे, अनुच्चारित का होईना, असे एक कलम असावे की ज्याच्या योगाने सर्वसाधारण इच्छेची आज्ञा न मानणाराला इतर नागरिकांच्या दडपणामुळे ती मानणे भाग पडेल. या कलमामुळेच सामाजिक कराराला सामर्थ्य प्राप्त होईल. याचाच अर्थ असा की माणसाला स्वतंत्र होणे भाग पडेल. ज्या अवस्थेत प्रत्येक नागरिक, देशाला वाहून घेतल्यामुळे, वैयक्तिक परावलंबनातून मुक्त होतो तीच स्वातंत्र्याची अवस्था आहे. राजकीय यंत्रणा याच आधारावर उभी आहे, तिच्या कार्यासाठी तिला जी चेतनाशक्ती लागते ती त्या आधारातून निर्माण होते. नागरिकांमधे जे करारमदार होतात, त्यांना कायदेशीर स्वरूप प्राप्त होते ते समुदायाच्या हक्काला व्यक्तीची मान्यता मिळते त्यामुळेच. ती मान्यता मिळाली नाही तर ते सर्व करारमदार मूर्खपणाचे व जुलुमाचे ठरतील व त्यांचा खूप दुरुपयोगही होईल.

## प्रकरण ८

# नागरी राज्यसंस्थेविषयी

निसर्ग अवस्थेतून नागरी अवस्थेत जो विकास होतो त्याच्यामुळे व्यक्तीमधे महत्त्वाचे फेरबदल घडून येतात. त्या फेरबदलामुळे व्यक्तीच्या वर्तनामधे सहज प्रवृत्तीऐवजी न्यायाला महत्त्व लाभते व तिच्या कृत्यांना पूर्वी नसलेला नैतिक आधार लाभतो. शारीरिक प्रेरणेऐवजी कर्तव्याची हाक व भुकेच्या लालसेऐवजी सत्कार्याची ओढ प्रबळ ठरते; त्यावेळी, जो मनुष्य केवळ स्वतःपुरताच विचार करत होता त्याच्या हे लक्षात येते की आता आपल्याला वेगळी तत्त्वे मान्य करायला हवीत आणि केवळ इच्छेनुसार वागण्याऐवजी विवेकबुद्धीच्या सल्ल्यानुसार वागायला हवे. निसर्गअवस्थेमधे ज्या सवलती होत्या त्या जरी नष्ट झाल्या तरी त्यांच्यापेक्षा अधिक मौल्यवान अशा इतर अनेक सवलती आपल्याला लाभल्या आहेत हे त्याच्या ध्यानात येईल. सतत वापरल्या गेल्यामुळे त्याच्या शक्तींची वाढ होईल, त्याच्या कल्पनांचा आवाका वाढेल, त्याच्या भावना उदात्त होतील, आणि त्याचे सारे जीवन उंचावेल. नवीन परिस्थितीचा दुरुपयोग केल्यामुळे कधी कधी त्याची अवनती होईल व सुरवातीला जी स्थिती होती त्याच्याही पेक्षा अधिक वाईट अवस्था त्याला प्राप्त होईल हे खरे. पण हा अपवाद सोडल्यास, ज्या दिवशी पुराण अवस्थेतून त्याची मुक्तता झाली आणि मर्यादित शक्तीच्या बुद्धिशून्य जनावरातून त्याचे बुद्धिमान् जीवात व मानवात रूपांतर झाले त्या दिवसाला सुदिन म्हणून तो सदैव गौरवत राहील.

तुलना करायला सोपे जाईल अशा शब्दांत हे सारे सांगू या. सामाजिक करारामुळे माणसाला आपल्या नैसर्गिक स्वातंत्र्याला व मन जाईल त्या वस्तूवर हात टाकण्याच्या अनिर्बंध हक्काला मुकावे लागते. वस्तूवर हात टाकता येतो; पण तिचा ताबा टिकवण्याचे सामर्थ्य हातात असावे लागते. त्याला मिळते ते नागरी स्वातंत्र्य आणि जे त्याचे असेल त्याची मालकी. हा जो फायदा मिळतो त्याच्याबद्दल मनामध्ये भ्रम निर्माण होऊ नये म्हणून, मनुष्य ते स्वातंत्र्य टिकवण्याइतका सामर्थ्यवान असेल तर लाभणारे, नैसर्गिक स्वातंत्र्य आणि सर्वसाधारण इच्छेने मर्यादित झालेले नागरी स्वातंत्र्य यांच्यातील भेद लक्षात घ्यावयास हवा. तसेच शारीरिक शक्तीच्या बळावर किंवा 'पहिला आला त्याला मिळाली' या न्यायाने प्राप्त झालेली मिळकत व कायद्यानुसार मिळालेल्या मिळकतीवरील मालकी हक्क यामध्येही फरक करावयास हवा.

नागरिकत्वाच्या दर्जामुळे मिळणाऱ्या फायद्यामध्ये माणसाला स्वतःचा मालक बनवणाऱ्या नैतिक स्वातंत्र्याचाही समावेश केला पाहिजे. कारण वासनांचे आधिपत्य मानणे म्हणजे गुलाम बनण्यासारखे आहे; उलट समाजाने घालून दिलेले कायदे मानणे म्हणजे

स्वतंत्र होणे आहे. परंतु या मुद्द्यावर मी अगोदर खूप लिहिले आहे आणि स्वातंत्र्य या शब्दाच्या तात्त्विक अर्थाशी मला या ठिकाणी कर्तव्य नाही.

## प्रकरण ९

# स्थावर मालमत्तेविषयी

समाज जेव्हा बनतो त्यावेळी त्याचा प्रत्येक सभासद स्वतःला समाजाला अर्पण करतो. त्याची जी काही मिळकत असेल, त्याची जी काही ताकत व शक्ती असेल, त्यावेळी तो जसा असेल तसा, स्वतःसहित हे सर्व तो समाजाला देतो. या दानामुळे मिळकत जरी एका हातून दुसऱ्या हाती जाऊन राज्यकर्त्यांच्या ( Sovereign ) मालकीची बनली तरी तिचे स्वरूप बदलत नाही. व्यक्तीच्या दिमतीला जी शक्ती असते तिच्या मानाने नगराच्या दिमतीला असलेली शक्ती अनेक पटींनी मोठी असते. तसेच सार्वजनिक मालमत्तेच्या पाठीशी मोठी शक्ती उभी असते. ती मालमत्ता कुणालाही परत घेता येत नाही. परकीयांच्या दृष्टीने मात्र तिला अद्याप विशेष कायदेशीर स्वरूप प्राप्त झालेले नाही हे खरे. सर्व हक्कांचा आधार असा जो सामाजिक करार त्याच्यायोगाने राज्यसंस्था समाजाच्या सर्व मालमत्तेची मालक बनते. इतर राज्यांशी जे व्यवहार होतात त्यामध्ये मात्र तिचा हक्क पहिला वहिवाटदार ( occupant ) एवढाच असतो. तो हक्क राज्यसंस्थेला समाजाच्या घटक व्यक्तीमार्फत मिळालेला असतो.

पहिल्या वहिवाटीचा हक्क जरी सर्वांत बलवानाच्या हक्कापेक्षा अधिक वास्तविक असला, तरी मालमत्तेचा हक्क जेव्हा प्रस्थापित होतो तेव्हाच त्याला खऱ्या हक्काचे स्वरूप प्राप्त होते. जीवनाला आवश्यक त्या वस्तूवर सर्व माणसांना नैसर्गिक हक्क सांगता येतो. मालमत्तेच्या एखाद्या विवक्षित वस्तूवर माणसाची मालकी प्रस्थापित करण्याच्या कृतीने त्याची मालकी त्या वस्तूपुरती मर्यादित होते आणि इतर वस्तू त्या मालकी हक्कातून वगळल्या जातात. माणसाचा हिस्सा निश्चित झाल्यानंतर त्याने त्या भागाचाच उपभोग घ्यावा; समाजाच्या इतर मिळकतीवर मग त्याचा हक्क राहात नाही. म्हणूनच पहिल्या वहिवाटीचा हक्क निसर्ग अवस्थेत कितीही कमजोर असला तरी नागरिकाचा दर्जा आहे अशा प्रत्येक माणसाच्या बाबतीत त्या हक्काची हमी दिली जाते. या हक्कामुळे त्याचा फायदा होतो. त्यामुळे तो जे दुसऱ्यांचे आहे त्यावर एवढेच नव्हे तर जे स्पष्टपणे त्याचे नाही त्यावर अधिकार सांगत नाही.

पहिल्या वहिवाटीच्या हक्काला कायदेशीर स्वरूप यावे यासाठी पुढील गोष्टींची आवश्यकता आहे : ( १ ) त्या जमिनीवर अगोदरपासून दुसरे कुणी राहात नसावे. ( २ ) स्वतःच्या जीवननिर्वाहासाठी आवश्यक तेवढ्याच जमिनीचा माणसाने ताबा घ्यावा.

( ३ ) जमिनीचा ताबा केवळ औपचारिक स्वरूपाचा असू नये; जमिनीवर प्रत्यक्षपणे काम करण्याची व तिची मशागत करण्याची इच्छा असली पाहिजे; कायदेशीर हक्क नसल्याकारणाने, या इच्छेमुळेच हक्क निर्माण होईल आणि इतर मंडळी त्याला मान्यता देतील.

खरे पाहिले तर, माणसाच्या गरजा आणि काम करण्याची त्याची इच्छा यांच्या बळावर त्याला पहिल्या वहिवाटीचा हक्क देऊन आपण ही कल्पना फार ताणत तर नाही ना ? या हक्कावर काही मर्यादा लादणे जरूरीचे नाही का ? समाजाच्या मालकीच्या जमिनीवर माणसाने पाऊल ठेवताच त्याला त्या जमिनीची मालकी मिळावी हे योग्य आहे का ? एखाद्या ठराविक वेळी इतरांना त्या जमिनीपासून दूर ठेवण्याइतका तो बलवान् असला, तरी त्या इतरांनी त्या जमिनीकडे पुन्हा कधीही परतू नये अशी त्याला मागणी करता येईल का ? माणसाने किंवा एखाद्या समुदायाने विस्तृत प्रदेशाचा ताबा घेऊन जगातील इतर माणसांना व समुदायांना त्या प्रदेशाच्या बाहेर ठेवणे कितपत योग्य होईल ? हे जमीन बळकावण्याचे कृत्य दंडनीय नाही का ? या कृत्यामुळे बाकीच्या साऱ्या मानव जातीला निसर्गाने सर्वांच्या उपभोगासाठी निर्माण केलेल्या त्या प्रदेशाचा राहण्यासाठी किंवा उदरनिर्वाहासाठी उपयोग करता येत नाही. किनाऱ्याच्या एका भागावर उतरून नुनेझ बाल्बोआने दक्षिण समुद्र ( Southern Sea ) आणि दक्षिण अमेरिका ही कॅस्टिलच्या राजाच्या मालकीची आहेत अशी घोषणा केली. अशा घोषणेने त्या प्रदेशातील जुन्या रहिवाशांचा हक्क नष्ट करण्याचा किंवा जगातील इतर राजांना त्या प्रदेशात पाऊल टाकायला बंदी करण्याचा त्याला काय अधिकार होता ? हे एक मान्य करा की अशा तऱ्हेचे बढाई-खोर समारंभ अनेक होतील. कॅथॉलिक धर्मांच्या सम्राटाला ( Catholic Majesty ) आपल्या मंत्रिमंडळाकडून ( Council Chamber ) दुसऱ्या राजांच्या ताब्यात असलेला भाग वगळून बाकीच्या सर्व जगाचा ताबा मागता येईल.

व्यक्तींच्या वेगवेगळ्या पण जवळ जवळ असलेल्या जमिनी सार्वजनिक मालकीच्या कशा झाल्या आणि सार्वभौमत्वाचा हक्क माणसावरून जमिनीवर प्रसृत झाल्यामुळे कसा परिणामकारक आणि व्यक्तिनिष्ठ झाला ते आपण समजू शकतो. जमिनीवर सार्वभौमत्व प्रस्थापित झाल्यामुळे जमिनीचे मालक अधिक परावलंबी बनतात आणि जितके ते अधिक मोठे तितके त्यांना अधिक राजनिष्ठ बनावे लागते. हा फायदा प्राचीन जगातील राजांच्या लक्षात आला नसावा. ते स्वतःला पर्शियन लोकांचे, मॅसिडोनिअन लोकांचे किंवा सिथिअन लोकांचे राजे म्हणवत असत. प्रदेशांचे स्वामी बनण्याऐवजी लोकांचे राजे बनण्याकडेच त्यांचा कल होता. आपल्या युगातील राजे अधिक हुशार आहेत. ते स्वतःला फ्रान्सचे, इंग्लंडचे किंवा स्पेनचे राजे म्हणवतात, प्रदेशावर हुकमत असल्याकारणाने प्रदेशातील जनतेला त्यांना अधिक निश्चितपणे हुकमतीखाली ठेवता येते.

या दानातील नवलाची गोष्ट आहे ती ही की सभासदाकडून त्यांच्या मालमत्तेचे समर्पण स्वीकारल्यामुळे त्यांची मालमत्ता नष्ट होत नाही, उलट समाज मालमत्तेवरील

त्यांच्या हक्काला कायदेशीर मालकीचे स्वरूप देतो आणि जे केवळ बळकावणे होते तो एक हक्क होतो व मग सभासदाला त्याचा निर्वेध उपभोग घेता येतो. मालक म्हणून ते समाज-कुटुंबाचे ( Commonwealth ) विश्वस्त बनतात. इतर नागरिक त्यांच्या हक्काला मान्यता देतात आणि समाजाची एकत्रित शक्ती मालमत्तेवर बाहेरून हल्ला झाला तर तिचे संरक्षण करते. राज्ययंत्राला, म्हणजेच स्वतःला, मालमत्ता दिल्यामुळे त्यांचा केवळ फायदाच होतो. कारण जे दिले ते सारे खरे पाहिले तर परत मिळते. एकाच मालमत्तेवरील राज्यकर्ता व मालक यांच्या हक्कात जो फरक आहे तो लक्षात घेतला की या चमत्कृतीचे स्पष्टीकरण होईल. तो फरक पुढे दाखविला आहे.

काही वेळा असा प्रकार घडतो की माणसे एकत्र येऊन समाज बनवायला सुरवात करतात. त्या वेळी त्यांच्याजवळ मालमत्ता नसते. नंतर सर्वांच्या जीवनासाठी आवश्यक अशी जमीन ते मिळवतात त्या जमिनीचा ते एकत्र उपभोग घेतात किंवा तिचे सम-समान अगर राजाने ठरविलेल्या प्रमाणात तुकडे करून ते एकमेकात वाटतात. जमीन कशीही मिळवली जावो, प्रत्येक व्यक्तीचा त्याला मिळालेल्या भागावर जो हक्क असतो त्याला समाजाचा जो उच्चतर हक्क असतो त्याची मर्यादा पडते. ते घडले नाही तर सामाजिक बंधामधे ताकत उरणार नाही आणि सार्वभौमत्वाचा वापर समर्थपणे करता येणार नाही.

हे प्रकरण व प्रस्तुत पुस्तक संपविताना मी एक विधान करतो. हरएक सामाजिक व्यवस्थेला ते विधान आधारभूत होण्यासारखे आहे. ते विधान हे की प्राथमिक सामाजिक करारामुळे नैसर्गिक क्षमता नष्ट होत नाही; उलट तिच्या जागी नैतिक व कायदेशीर समता प्रस्थापित होते आणि त्या समतेमुळे माणसामाणसात जी शारीरिक विषमता असते तिची भरपाई होते. त्यांची शारीरिक ताकत किंवा बौद्धिक देणगी कितीही विषम स्वरूपाची असली तरी कायद्याच्या दृष्टीने ते समसमान होतात आणि त्यामुळे जो करार त्यांनी केलेला असतो त्यामधेही त्याना समता लाभते.[1]

१. वाईट शासनाच्या अमलाखाली ही समता केवळ वरवरची व भ्रामक स्वरूपाची असते. गरीब माणसाला त्याच्या गरिबीच्या कुंपणात डांबून ठेवणे व श्रीमंताला त्याच्या अन्याय्य संपत्तीचा उपभोग घेऊ देणे एवढाच तिचा अर्थ होतो. खरे पाहिले तर कायदे, नेहमीच ज्यांच्याजवळ आहे ( haves ) त्यांच्या फायद्याचे असतात आणि ज्यांच्याजवळ काही नाही ( have-nots ) त्यांना तापदायक होतात. म्हणूनच असे म्हणता येईल की ज्या समाजामधे प्रत्येकाजवळ काही असेल व कुणाच्याही जवळ पुष्कळ नसेल त्या समाजातीलच जीवन समृद्ध होईल.

* * *

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्रा $\frac{90}{2}$
मंत्रालय.

# पुस्तक २

## प्रकरण १

## सार्वभौमत्व अदेय आहे

आतापर्यंत ज्या तत्त्वांचे प्रतिपादन केले त्यांचा पहिला व महत्त्वाचा निष्कर्ष हा आहे की सर्वसाधारण इच्छेनुसार ( general will ) वागले तरच सर्वांचे कल्याण, या ज्या उद्दिष्टासाठी राज्यसंस्थेची स्थापना झालेली असते त्या उद्दिष्टाच्या सिद्धतेच्या दृष्टीने राज्यसंस्थेला आपली सत्ता वापरता येईल. वेगवेगळ्या हितसंबंधांमधे जो विरोध असतो त्याच्यामुळे समाजांची संस्थापना आवश्यक होते. परंतु त्या हितसंबंधांमधे अनुकूलता ( conformity ) देखील असते, त्यामुळे समाज बनू शकतात. या वेगवेगळ्या हितसंबंधांमधे जे सर्वसामान्य आहे त्यामुळे समाजाचा बंध निर्माण होतो. आणि सर्वांना समान असा एकही मुद्दा नसता, तर समाज अस्तित्वात आला नसता. समाजाच्या सर्व घटकांमधे असलेले हितैक्य समाजाला एकत्र ठेवते. असे हितैक्य नसेल तर समाज बनणार नाही. या समान हिताच्या आधारानेच समाजाचा कारभार चालला पाहिजे.

म्हणून माझे असे म्हणणे आहे की सार्वभौमत्व म्हणजे सर्वसाधारण इच्छेनुसार वागणे असल्याकारणाने ते कधीही देऊन टाकता येत नाही आणि राज्यकर्ता ही एक सामुदायिक स्वरूपाची व्यक्ती असल्याकारणाने, दुसरा कुणीही त्याचे प्रतिनिधित्व करू शकत नाही. त्याचा प्रतिनिधी तोच. सत्ता दुसऱ्याला देता येते; इच्छा देता येत नाही. व्यक्तीची इच्छा आणि सर्वसाधारण इच्छा यामध्ये कधीकधी एकमत निर्माण होणे शक्य आहे हे खरे, परंतु हे एकमत कायम स्वरूपाचे व स्थिर असणे अशक्य आहे. व्यक्तीची इच्छा सहजपणे हक्काकडे वळते, सर्वसाधारण इच्छेला समता हवी असते. या दोन इच्छांमधील हितांचा मेळ फार काळ टिकेल अशी हमी देता येत नाही. हा मेळ असतो तेव्हा देखील तो योगायोगाने घडून आलेला असतो, तो मुद्दाम योजनेने घडवून आणलेला नसतो. राज्यकर्ता केव्हाही निश्चितपणे असे म्हणू शकेल : " या क्षणी माझ्या जे मनात आहे ते या अगर त्या व्यक्तीच्या इच्छेशी अगर जी त्याची इच्छा आहे असे तो म्हणतो तिच्याशी जुळते; " परंतु त्याला पुढे असे म्हणता येणार नाही : " उद्या त्याला जे वाटेल ते पूर्णपणे माझ्या इच्छेशी जुळते असेल. " भविष्याच्या बाबतीत इच्छेला स्वतःला बांधून घेता येईल असे मानणे वेडेपणाचे आहे. तसेच जो इच्छा करतो त्याच्या इच्छेशी विरोधी अशी कृती करण्याचे कबूल करणे हे इच्छेच्या कार्यात मोडत नाही. म्हणून जनसमुदायाने जर केवळ आज्ञाच पाळायचे ठरवले तर त्या कृतीने सामाजिक बंध नष्ट होईल आणि जनतेचे जनसमुदाय हे स्वरूप नष्ट होईल. मालक पुढे येताच, राज्यकर्ता नाहीसा होतो, आणि राजकीय समाज नष्ट होतो.

जोवर राज्यकर्ता, त्याच्या ठिकाणी जो अधिकार आहे त्याचा उपयोग करून

राजांच्या हुकमांना विरोध करत नाही, तोवर त्याच्या त्या हुकुमांना सर्वसाधारण इच्छेचे स्वरूप येण्याची शक्यता आहे हे नाकारावयाचे नाही. अशा बाबतीत सर्व मंडळी गप्प राहिली, तर जनसमुदायाची संमती आहे असा निष्कर्ष काढता येईल. हे मी विस्ताराने अधिक स्पष्ट करून सांगेन.

## प्रकरण २

# सार्वभौमत्व अविभाज्य आहे

ज्या कारणामुळे सार्वभौमत्व अदेय ( inalienable ) आहे त्याच कारणामुळे ते अविभाज्य देखील आहे. कारण इच्छा सर्वसाधारण असते किंवा नसते.[1] ती इच्छा सर्व जनसमुदायाची असते किंवा फक्त एखाद्या विभागाची असते. इच्छा पहिल्या प्रकारची असेल, तर जाहीर झालेली ती इच्छा ही एक सार्वभौमत्वाची कृती असून ती कायद्या-प्रमाणेच बंधनकारक असते. दुसऱ्या प्रकारात ती खंडित स्वरूपाची ( partial ) असते, शासनाने लादलेली अशी ती एक कृती असते; आणि फार तर ती एक हुकूम ( decree ) आहे असे म्हणता येईल.

पण आपली राजकारणी मंडळी, सार्वभौमत्वाच्या तत्त्वाचे तुकडे करता येत नाहीत, म्हणून त्याची जी उद्दिष्टे आहेत त्यांची विभागणी करतात. इच्छा आणि कायदा ( Act ) यांची ते फारकत करतात. तशीच कायदे करण्याची सत्ता व अंमलबजावणीची सत्ता यांची; कर बसवण्याचा हक्क आणि न्यायदान व युद्धाची घोषणा करणे यामध्ये फरक करतात. तसेच अंतर्गत व्यवहार चालवणे आणि परराष्ट्रांशी संबंध ठेवणे वेगळे आहे असे समजतात. शासनाच्या या वेगवेगळ्या अंगांमध्ये पुष्कळ वेळा सरमिसळ झालेली असते, तर पुष्कळ वेळा ती वेगळी असतात. जे अशा तऱ्हेची विभागणी करतात ते सार्वभौम सत्तेला चिंध्या झालेल्या व ठिगळे लावलेल्या जनावराचे ( Creature of shreds and patches ) रूप देतात. जणू काय माणसाला वेगवेगळी शरीरे असावीत; एखाद्या शरीराला डोळे असावेत; दुसऱ्याला हात, तर तिसऱ्याला पाय, पण कुणालाही एकापेक्षा अधिक इंद्रिये नसावीत. असे म्हणतात की जपानमधले जादुगार प्रेक्षकांच्या डोळ्यासमोर मुलाचे लहान लहान तुकडे करतात आणि ते हवेत वर फेकून पुन्हा ते एकत्र करतात आणि त्या जोड-लेल्या तुकड्यांतून पुन्हा परत जिवंत मूल उभे करतात. आपली नवीन राजकारणी मंडळी

१. इच्छा सर्वसाधारण होण्यासाठी ती एकमताची असली पाहिजे असे नाही. एवढे मात्र खरे की दिले गेलेले प्रत्येक मत विचारात घेतले पाहिजे. कुणाला जर मुद्दाम वगळले तर निर्णयाच्या सर्वसाधारण स्वरूपाला बाध येईल.

या किंवा अशाच तऱ्हेच्या हिकमती करत असतात. समाजकुटुंबाच्या शरीराचे अशा रीतीने खेडेगावातील जत्रेतील जादुगाराच्या निष्णातपणाला मागे टाकील अशा पद्धतीने ते तुकडे तुकडे करतात आणि मग ते एकत्र करतात, कसे कुणास ठाऊक !

ही चूक होते ती सार्वभौम सत्तेचे खरे स्वरूप न कळल्यामुळे आणि जी केवळ वेगवेगळी दर्शने ( manifestations ) आहेत त्यांना विभागता येतील असे वेगवेगळे भाग आहेत असे समजल्यामुळे. उदाहरणार्थ, युद्धाची घोषणा करणे व शांतता स्वीकारणे या सार्वभौमत्वाच्या दोन वेगळ्या कृती आहेत असा समज बराच प्रसृत आहे. पण ते तसे नाही. कारण दोन्ही गोष्टी कायदा नसून कायद्याची अंमलबजावणी आहे. कायद्याचा अर्थ कसा लावायचा ते निश्चित करणारा तो एक खास मार्ग आहे. कायद्याच्या कल्पनेचे अचूक स्पष्टीकरण झाले की ही गोष्ट पूर्णपणे ध्यानात येईल.

सार्वभौमत्वाच्या इतर विभक्त केलेल्या कार्यांकडे पाहिले तरी देखील असे आढळून येईल की एखादे कार्य जेव्हा वेगळे दिसते तेव्हा आपण त्याच्याकडे चुकीच्या दृष्टिकोनातून पाहात असतो. सार्वभौमत्वाच्या ताबेदारीखालील गोष्टींना आपण त्याचे वेगळे भाग समजतो; सार्वभौमत्वाच्या इच्छेचा तो महत्तम आविष्कार असून वेगवेगळ्या हक्कामार्फतीने त्या इच्छेची कृतीत पूर्ती होत असते.

काही ग्रंथकारांनी स्वतःच प्रस्थापित केलेल्या काही सर्वसाधारण नियमांच्या आधाराने राजांचे हक्क व लोकांचे हक्क स्वतंत्रपणे आधारित असलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रांचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. विचार स्पष्ट नसल्यामुळे त्यांच्या मनामधे जो गोंधळ उडाला आहे तो फुगवून सांगणे शक्य नाही. ग्रोशिअसच्या पहिल्या पुस्तकाच्या तिसऱ्या व चवथ्या प्रकरणाच्या वाचकाला, तो विद्वान् लेखक आणि त्याचा भाषांतरकार बार्बेरक दोघेही गोंधळले असून स्वतःच्या युक्तिवादाच्या जाळ्यात कसे अडकून पडले आहेत ते सहज दृष्टीस पडेल. स्वतःची अभ्याहृत कृत्ये आहेत, त्यांच्यापासून एक तर ते पेलणार नाहीत असे किंवा अत्यंत अपुरे असे निष्कर्ष काढतात; किंवा ज्यांचा समन्वय करण्याची त्यांची खटपट चाललेली असते त्या हितसंबंधांनाच ते विरोधी भूमिकेत उभे करतात. शरणार्थी म्हणून फ्रान्समधे राहणाऱ्या ग्रोशिअसला स्वतःच्या देशाच्या प्रेमाखातर तेराव्या लुईची मर्जी संपादन करावयाची होती. त्याने आपला ग्रंथ लुई राजाला अर्पण केलेला आहे. म्हणून लोकांपासून त्यांचे सारे हक्क छिनून घेण्यावर त्याने आपली सारी मेहनत खर्च घातली आणि ते हक्क राजाकडे सुपूर्त करण्यात आपल्या साऱ्या कौशल्याचा उपयोग केला. या कामात बार्बेरकची त्याला पूर्ण सहानुभूती होती. बार्बेरकने आपले भाषांतर इंग्लंडचा राजा पहिला जॉर्ज याला अर्पण केले. त्याच्या दुर्दैवाने इंग्लंडमधून दुसऱ्या जेम्स राजाची हकालपट्टी झालेली होती ( या हकालपट्टीला तो परित्याग-abdication-म्हणतो. ) त्यामुळे त्याला शब्द मोठ्या काळजीने वापरावे लागले आणि तिसरा विलियम हा गादी बळकावणारा होता असे दिसू नये म्हणून खूप आटापिटा करावा लागला. या दोघांनी आपले काम खऱ्या तत्त्वांच्या आधाराने केले असते, तर सगळ्या अडचणी नाहीशा झाल्या असत्या

आणि त्यांच्या युक्तिवादामधे सुसंगती राहिली असती. दुःखी चेहऱ्यांनी आपण सत्य सांगत आहो असे त्यांचे त्यांना दिसले असते, लोकांना त्यांना अभिवादन करावे लागले असते. परंतु सत्याचा मार्ग हा पैसे मिळवण्याचा राजमार्ग नाही; तसेच वकिल्यातीतील नेमणुका, प्राध्यापकांच्या जागा व निवृत्तिवेतने ही लोकांना देणगी म्हणून देता येत नाहीत.

## प्रकरण ३

# सर्वसाधारण इच्छा चुकू शकते का ?

वर जे सांगितले आहे त्यावरून हे उघड होईल की सर्वसाधारण इच्छा नेहमीच बरोबर असते आणि लोककल्याण साधण्याकडेच तिचा कल असतो. परंतु जनसमुदायाचे विचारमंथन नेहमीच अचूक असते असे यावरून सिद्ध होत नाही. माणसांना नेहमीच स्वतःचे कल्याण हवे असते, परंतु ते कल्याण कशात आहे ते त्यांना नेहमीच बरोबर कळते असे मात्र नाही. जनसमुदाय भ्रष्ट होत नाही, परंतु पुष्कळ वेळा तो फसवला जातो आणि अशी फसवणूक होते त्याच वेळी अनिष्ट ते मिळावे अशी त्याची इच्छा आहे असे दिसते.

सर्वांची इच्छा आणि सर्वसाधारण इच्छा यांच्यात पुष्कळ वेळा अंतर असते. सर्वसाधारण हितसंबंधाविषयीच उत्तरोक्त इच्छा विचार करते; पूर्वोक्त इच्छा, वैयक्तिक इच्छांची गोळाबेरीज असल्याकारणाने, लहानसहान गटागटांच्या हितसंबंधांचा विचार करते. वेगवेगळ्या इच्छांतील अस्तिपक्षी व नास्तिपक्षी, एकमेकांना छेदणाऱ्या बाबी वेगळ्या काढा; मग विशिष्ट अशा गोष्टींची गोळाबेरीज उरेल; सर्वसाधारण इच्छा अशी जी म्हणतात ती तीच होय.[१]

विचारमंथनात गुंतलेल्या जनसमुदायाला जर पुरी माहिती मिळाली आणि नागरिकांना एकमेकाशी दळणवळण ठेवण्याचे जर साधन नसेल, तर लहान लहान मतभेद

---

१. मार्किस द अर्गेंसाँ (Marquis d' Argenson) म्हणतो : "प्रत्येक हितसंबंधाची तत्त्वे वेगळी असतात. दोन माणसांमधे हितांचे ऐक्य प्रस्थापित होते ते तिसऱ्याच्या हितसंबंधाला त्यांचा जो विरोध असतो त्याच्यामुळे." प्रत्येकाच्या वेगळ्या हितसंबंधाला जो सर्वांचा विरोध असतो त्यामुळे सर्वांमधे हितैक्य निर्माण होते असे देखील त्याला आणखी लिहिता आले असते. वैयक्तिक हितसंबंध नसते, तर सामुदायिक हितसंबंधांची कल्पना निर्माण झाली नसती, कारण विरोध करण्यासाठी काही उरलेच नसते. समाज मग स्वयंचलित (automatic) बनेल आणि राजकारणामधे कार्यकौशल्य उरणार नाही.

जरी अनेक असले तरी त्यांच्यांतून सर्वसाधारण इच्छा निर्माण होईल आणि जे निर्णय घेतले जातील ते चांगलेच असतील. पण कारस्थाने करणारे गट आणि पक्षपाती स्वरूपाचे संघ जेव्हा बनतात तेव्हा प्रत्येक गटाची इच्छा गटाच्या सभासदापुरती सर्वसाधारण असते. परंतु राज्याच्या दृष्टीने ती अपूर्ण ( partial ) असते. अशा परिस्थितीत जितकी माणसे तितकी मते असे न होता, जितके गट तितकी मते असे होते. हितसंबंधाविषयीचे मत-भेद थोडे असतात आणि त्यामुळे निष्कर्ष निघतो तो कमी सर्वसाधारण असतो. शेवटी त्यांच्यापैकी एखादा गट जेव्हा खूप मोठा होतो व इतर गटांना निष्प्रभ करतो त्या वेळी निष्पन्न होते ती अनेक लहान लहान भेदांची गोळाबेरीज नव्हे तर एक मोठा भेद. सर्वसाधारण इच्छा मग अवतीर्ण होत नाही आणि प्रचलित जे मत असते त्याला व्यक्तीच्या मतापेक्षा अधिक मोल नसते.

सर्वसाधारण इच्छा खऱ्या रीतीने प्रकट व्हायची तर राज्यामधे गौण स्वरूपाचे [ subsidiary ] गट असता कामा नयेत आणि प्रत्येक नागरिकाने आपले आणि केवळ आपले मत म्हणून प्रदर्शित केले पाहिजे[१]. अशा तऱ्हेचे पूर्वी दृष्टीस न पडलेले एकमेव राज्य लायकर्गसने स्थापन केले. हे त्याचे उज्ज्वल स्वरूपाचे महत्कार्य आहे. जिथे गौण गट असतील तिथे ते शक्य तितके जास्त असावेत आणि कोणाचाही एक गट इतर गटांपेक्षा जास्त प्रबळ असू नये. सोलन, नुमा व सर्व्हिअस यांनी ही काळजी घेतली होती. ही काळजी घेतली गेली तरच सर्वसाधारण इच्छा अजमावता येईल आणि जन-समुदाय चुकीच्या मार्गाने नेला जाणार नाही अशी खात्री बाळगता येईल.

## प्रकरण ४

# सार्वभौम सत्तेच्या मर्यादांविषयी

राज्य अगर शहर ही एक नैतिक व्यक्ती ( moral person ) आहे. सभासदांचे एकत्रित जीवन हेच तिचे जीवन. स्वतःचे जीवित टिकवणे हे तिचे सर्वांत मोठे काम, हे जर खरे असेल, तर राज्याला अगर शहराला त्याच्या सर्व व्यवहारांच्या बाबतीत सक्तीने गोष्टी घडवून आणण्याची सत्ता हवी. या सत्तेचा उपयोग करून सर्वांच्या हिता-साठी म्हणून त्याला एकेका भागाला इकडे तिकडे करता यावे किंवा एकाचा दुसऱ्याशी मेळ घालता यावा. निसर्गाने ज्याप्रमाणे माणसाला त्याच्या अवयवावर पुरी सत्ता लाभते, त्याप्रमाणे राजकीय समाजाला सामाजिक करारामुळे आपल्या सभासदावर पुरी सत्ता मिळते.

---

१. मॅकिआव्हेलीच्या हिस्टरी ऑफ फ्लारेन्समधील उतारा.

सर्वसाधारण इच्छेनुसार वापरण्यात येणाऱ्या या सत्तेलाच सार्वभौमत्व असे म्हणतात हे मी पूर्वीच सांगितले आहे.

पण आपल्याला राज्याचा केवळ सार्वजनिक व्यक्ती म्हणून विचार करावयाचा नसून, राज्य ज्यांच्यामुळे बनते त्या वेगवेगळ्या व्यक्तींचाही विचार करावयाचा आहे. त्या व्यक्तींचे जीवन आणि स्वातंत्र्य निसर्गानुसार राज्यावर अवलंबून नसते. म्हणून नागरिकांचे हक्क व राज्यकर्त्यांचे हक्क आणि प्रजा म्हणून नागरिकांची कर्तव्ये आणि मनुष्य म्हणून जे नैसर्गिक हक्क ते उपभोगू शकतात त्यांच्यामधे काळजीपूर्वक फरक करणे आवश्यक आहे.[1]

समाजाच्या कल्याणासाठी जरूर तेवढीच सत्ता, मालमत्ता व स्वातंत्र्य यांचे प्रत्येक मनुष्य सामाजिक करारान्वये दान करतो हे सर्वांना मान्य आहे. पण, यापुढे हे देखील मान्य केले पाहिजे की आवश्यक म्हणजे किती हे एक राज्यकर्ताच निश्चित करू शकतो.

राज्यकर्ता हुकूम करील त्यावेळी प्रत्येक नागरिकाने राज्याची जी सेवा करावयास तो बांधलेला आहे ती राज्याला चुकती केली पाहिजे. समाजाच्या कल्याणासाठी ज्याची आवश्यकता नाही असा कोणताही बोजा राज्यकर्त्याने प्रजेवर लादता कामा नये. राज्यकर्ता तसे करू देखील इच्छिणार नाही; कारण निसर्गात जसे तसेच बुद्धीच्या व्यवहारातही कारणाखेरीज कोणतीही कृती केली जात नाही. समाजकुटुंबाविषयीच्या जबाबदाऱ्या बंधनकारक असतात त्याचे कारण हे की त्या उभयान्वयी (mutual) असतात. त्या जबाबदाऱ्यांचे स्वरूप असे असते की दुसऱ्यासाठी आपण राबतो त्यावेळी आपण स्वतःसाठीही राबत असतो. सर्वसाधारण इच्छा नेहमी खरी असते व सर्वजण नेहमी प्रत्येकाच्या सुखाची इच्छा करतात; त्याचे कारण हेच की, हरएक व्यक्ती त्या प्रत्येकामधे आपला अंतर्भाव करते आणि त्यामुळे सर्वसाधारण हितासाठी मत देताना आपल्या स्वतःच्या हितासाठीही आपण मत देतो आहो असे सर्वांना वाटते. प्रत्येकाला आपल्या कामाबद्दल जी खास कळकळ वाटते तिच्यातूनच म्हणजेच मानवी स्वभावातून हक्कांची समानता व त्यातून निर्माण होणारी न्यायबुद्धी यांचा उद्भव होतो, हे यावरून सिद्ध होते. तसेच सर्वसाधारण इच्छा, त्या नावाला ती पात्र ठरावयाची असल्यास, सर्वसाधारणच असली पाहिजे; ती ज्या पद्धतीने बनते तेवढ्यापुरतीच नव्हे, तर हेतूच्या दृष्टीने देखील; ती सर्वांना लागू असावी आणि सर्वांना तिचा उपयोग करता यावा. एखादे वैयक्तिक किंवा मर्यादित उद्दिष्ट साधण्यासाठी तिचा उपयोग होऊ लागला की निसर्गदत्त

१. काळजीपूर्वक वाचन करणाऱ्या वाचकाने मी परस्परविरोधी काही लिहितो आहे असा घाईने माझ्यावर आरोप करू नये, अशी माझी प्रार्थना आहे. मी जे शब्द वापरले आहेत त्यामुळे तो आरोप सार्थ आहे असे कुणाला वाटेल, परंतु ते भाषेचे दारिद्र्य आहे. पण थांबा.

असा जो तिचा खरेपणा असतो तो नष्ट होतो. कारण तशावेळी आपल्या बाहेरील अशा एखाद्या वस्तूबद्दल आपण निर्णय देत असल्याकारणाने आपल्या ठिकाणी मार्गदर्शक ठरणारी अशी जी न्यायबुद्धी असावी लागते ती उरत नाही.

खरोखर, एखाद्या विवक्षित मुद्द्यावरून प्रश्न उपस्थित झाला किंवा सर्वसाधारण मान्यतेनुसार अगोदरच निश्चित न झालेल्या अशा एखाद्या परिस्थितीबद्दल विचार करायाचा झाला की आपण वादविवादाच्या क्षेत्रात उतरतो. काही हितसंबंधी व्यक्ती लोकांच्या विरुद्ध उभ्या आहेत. असा तो एक वाद होतो. परंतु अशा वादात कोणता कायदा लागू आहे व कोण उत्तम प्रकारे न्यायाधीश म्हणून काम करू शकेल हे अनिश्चित असते. अशा प्रकरणी सर्वसाधारण इच्छेने सरळ धोपट ( ad hoc ) निर्णय द्यावा अशी मागणी करणे वेडेपणाचे आहे; कारण या परिस्थितीत सर्वसाधारण इच्छेचा निर्णय म्हणजे केवळ एका पक्षाचा निर्णय होईल. दुसऱ्या पक्षाला तो बाहेरच्या सत्तेची घोषणा आहे असे वाटेल; त्याला तो संकुचित आहे, विवक्षित गोष्टीबाबतीत अन्याय करणारा व चुकीचा आहे असे वाटेल. ज्याप्रमाणे वैयक्तिक इच्छा आणि सार्वजनिक इच्छा एक आहेत असे मानता येत नाही, त्याचप्रमाणे एखाद्या विवक्षित गोष्टीबद्दल निर्णय देण्यास सांगितले असता सर्वसाधारण इच्छेचेही स्वरूप बदलते. ती सर्वसाधारण असल्यामुळे तिला एखाद्या व्यक्तीबद्दल किंवा फुटकळ गोष्टीबद्दल निर्णय देता येत नाही. उदाहरणार्थ, अथेन्समधील जनता एखाद्याचा मानसन्मान करून त्याची नेमणूक करत असे किंवा ठपका देऊन एखाद्याला कामावरून काढत असे. म्हणजेच ज्यावेळी ती अनेक हुकुमांनुसार अस्तित्वात आलेल्या यंत्रणेचा उपयोग करून गोंधळलेल्या पद्धतीने शासनाची सर्व कामे करत असे; त्यावेळी, खरे बोलावयाचे म्हणजे, सर्वसाधारण इच्छेचा तिच्या ठिकाणी लोप होत असे आणि ती सार्वभौम म्हणून वागण्याच्या ऐवजी एक सरकारी अधिकारी म्हणून वागत असे. सर्वसाधारणपणे मान्य असलल्या कल्पनांशी हे विधान विसंगत आहे असे भासेल. माझी विनंती एवढीच की मला माझ्या पद्धतीने विषय विशद करण्यासाठी थोडा अवधी द्या. इच्छा सर्वसाधारण बनते ती अनेक लोकांचा तिच्याशी संबंध आहे म्हणून नव्हे, तर सर्वांना एकत्रित करणाऱ्या सामुदायिक हितसंबंधामुळे. मी ज्या तऱ्हेच्या समाजाचा विचार करतो आहे त्या समाजात प्रत्येक नागरिक ज्या अटी तो आपल्या शेजाऱ्यावर लादतो त्या स्वतःवर लादून घेण्यासही तयार असतो. या प्रवृत्तीमुळेच हितसंबंध आणि न्याय यांचा कौतुकास्पद असा एक मेळ तयार होतो. आणि त्यामुळे जनसमुदायाची सामुदायिक चर्चा समतोल व सत्प्रवृत्त बनते. विवक्षित विषयावर चर्चा सुरू होते त्यावेळी ते स्वरूप नाहीसे होते. कारण त्या चर्चेत न्यायाधीशाचा निवाडा आणि हितसंबंधी पक्ष यांना जोडणारे व एकत्रित करणारे जे समान हित त्याचे अस्तित्व नसते

कसाही विचार केला तरी, शेवटी जो निष्कर्ष निघतो तो हाच की सामाजिक करारामुळे राज्याच्या सर्व नागरिकांमध्ये समानता प्रस्थापित होते व त्या समानतेमुळे सर्वजण एकाच तऱ्हेची जबाबदारी स्वीकारावयास व एकाच तऱ्हेचा हक्क मागण्यास तयार

होतात. सामाजिक कराराच्या स्वरूपामुळेच सार्वभौमत्वाच्या प्रत्येक कृतीमुळे—म्हणजेच सर्वसाधारण इच्छेच्या प्रत्येक खऱ्याखुऱ्या कृतीमुळे सर्वांवर सारखीच जबाबदारी पडते व सर्वांचा सारखाच फायदा होतो. राज्यकर्ता ओळखतो तो फक्त देशाला. देशातील वेगवेगळ्या व्यक्तींत तो भेदभाव करत नाही.

मग सार्वभौमत्वाचे खरे दर्शन घडते ते कोणत्या कृत्यांत ? वरिष्ठ व कनिष्ठ यांच्यामधे प्रस्थापित केलेल्या संकेतात ते सापडत नाही. राजकीय समाज आणि त्याचा प्रत्येक सभासद यांच्यामधे प्रस्थापित झालेल्या नियमात ते सापडते. सामाजिक करारावर ते संकेत आधारलेले असल्याकारणाने ते कायद्यासारखेच बंधनकारक असतात; सर्वांना ते सारखेच लागू, त्यामुळे ते न्यायपूर्ण असतात; सर्वांचे कल्याण हे त्यांचे उद्दिष्ट असल्यामुळे ते उपयुक्त असतात; लोकमत आणि प्रबळ सत्ता यांचा पाठिंबा असल्यामुळे ते स्थिर असतात. राज्याचे प्रजाजन जोवर केवळ अशा तऱ्हेचेच नियम पाळतात, तोवर ते कुणाही एका व्यक्तीचे हुकूम पाळत नसून, सर्वांच्या इच्छेनुसार घेतलेल्या निर्णयाचे पालन करत असतात. राज्यकर्ता व नागरिक यांच्या वेगवेगळ्या हक्कांची मर्यादा कोणती असे विचारणे म्हणजे नागरिक आपआपसामधे कोणत्या मर्यादेपर्यंत करारमदार करू शकतात हे विचारण्यासारखे आहे. हे करारमदार प्रत्येकाने सर्वांशी व सर्वांनी प्रत्येकाशी केलेले असतात.

यावरून हे सिद्ध होते की सार्वभौम सत्ता कितीही अबाधित, पवित्र व अनुल्लंघनीय असली, तरी ती सर्वांनी मान्य केलेल्या कराराच्या मर्यादेपलीकडे जात नाही व जाऊ शकत नाही आणि त्या करारानुसार जी मालमत्ता व स्वातंत्र्य माणसाजवळ राहू देण्यात आले असतील त्यांचा उपभोग घेण्याचा त्याला पुरा हक्क आहे. राज्यकर्त्याला एका नागरिकावर इतर नागरिकांपेक्षा अधिक मोठा बोजा लादण्याचा हक्क नसतो. कारण तसे करताच ती बाब सर्वसाधारण स्वरूपाची न राहता विवक्षित स्वरूपाची बनते आणि विवक्षित स्वरूपाच्या बाबीबद्दल सार्वभौम सत्तेला निर्णय देता येत नाही.

हे फरक एकदा मान्य केले की सामाजिक करार केल्यामुळे व्यक्ती आपल्या स्वत्वावर पाणी सोडते हे म्हणणे कसे सर्वथैव चुकीचे आहे ते ध्यानात येईल. असा काही प्रकार घडण्याऐवजी सामाजिक करारामुळे व्यक्तीची परिस्थिती पूर्वीच्यापेक्षा कितीतरी अधिक सुधारते. काही देऊन टाकण्याऐवजी एक फायदेशीर सौदा त्याच्या पदरात पडतो; अनिश्चितता आणि धोका यांच्याऐवजी त्याला सुरक्षितता लाभते, नैसर्गिक स्वातंत्र्याऐवजी खरी स्वाधीनता मिळते, इतरांचे नुकसान करण्याच्या शक्तीऐवजी स्वतःचे संरक्षण, व स्वतःच्या उजव्या बाहूच्या शक्तीऐवजी—ज्या शक्तीचा इतरांना पाडाव करणे शक्य असते—सामुदायिक एकीमुळे अजिंक्य ठरणारा हक्क यांचा लाभ होतो. राज्ययंत्राच्या सेवेला सुपूर्द केलेल्या जीवनाचे राज्ययंत्र संरक्षण करते. आणि राज्ययंत्राच्या रक्षणासाठी जेव्हा तो आपले जीवन अर्पण करतो तेव्हा राज्ययंत्राच्या कृपेने जे लाभले त्याचेच तो पुन्हा दान करतो असे म्हणता येणार नाही का ? निसर्ग अवस्थेत प्राणांतिक झगड्यामधे गुंतला असताना

जीवनाच्या संरक्षणासाठी जे त्याला अनेक वेळा कितीतरी मोठे धोके सहन करून करावे लागत असत त्यापेक्षा फार वेगळे असे त्याला काही करावे लागते का? सर्व नागरिकांना, गरज पडली तर, देशाच्या संरक्षणासाठी लढावे लागते, पण कुणालाही केवळ स्वत:साठी एकेकट्याने लढावे लागत नाही. समाज बनवून त्याचा सभासद बनण्याचे भाग्य लाभले नसते, तर स्वत:च्या संरक्षणासाठी म्हणून जे धोके पत्करावे लागले असते त्यांपैकी फार थोडे सुरक्षितता नांदावी म्हणून सहन करावे लागणे अधिक श्रेयस्कर नाही का?

## प्रकरण ५

# जीवन आणि मरण या हक्काबद्दल

नागरिकाचा स्वतःच्या जीवनावर अधिकार नसतो; मग तो अधिकार तो राज्यकर्त्याला कसा देऊ शकेल असा प्रश्न विचारला जाईल. जे त्याचे नाही ते तो दुसऱ्याला कसे देऊ शकेल? हा मुद्दा नीट रीतीने न मांडल्यामुळे, तो सोडवण्यास कठीण आहे असे वाटते. जीवनाचे संरक्षण करण्याच्या हेतूने ते धोक्यात घालण्याचा प्रत्येक माणसाला अधिकार आहे. आगीतून सुटण्यासाठी खिडकीतून उडी मारणाऱ्या इसमाने आत्महत्येचा गुन्हा केला असे कधी कुणी विचारपूर्वक प्रतिपादिले आहे का? किंवा समुद्रावर प्रवास करण्यास निघण्यापूर्वी ज्या वादळाची कल्पना नव्हती त्या वादळात नाश पावणाऱ्या इसमावर आत्महत्येचा आरोप कधी कुणी केला आहे का?

सामाजिक तहनाम्याचा उद्देशच मुळी हा आहे की तहामध्ये सामील झालेल्या कुणाच्याही सुरक्षिततेला धोका पोचू नये. जो उद्दिष्ट निश्चित करतो तो साधनेही निश्चित करतो आणि प्रस्तुत बाबीमधे साधनामुळे धोके व क्वचित प्रसंगी जीवावर बेतणारे अपघात निर्माण होण्याची शक्यता आहे. दुसऱ्याच्या जीवाची किंमत देऊन जो स्वतःचा जीव वाचवू इच्छितो, त्याला जरूर पडल्यास स्वतःच्या जीवाची किंमत देऊन दुसऱ्याचा जीव वाचवण्याची जबाबदारी स्वीकारावी लागते. कायद्याप्रमाणे स्वतःच्या जीवावर कोणते संकट ओढवून घ्यावे लागेल ते नागरिकाला ठरवता येत नाही; म्हणून 'राज्याच्या हिताच्या दृष्टीने तू मरणे जरूरीचे आहे' असे राज्यकर्ता जेव्हा एखाद्या नागरिकाला म्हणतो त्या वेळी त्याला मरावे हे लागतेच; कारण त्या अटीवरच तो इतके दिवस सुरक्षित जीवन जगलेला असतो. त्याचा जीव ही आता पूर्वी एके काळी होती तशी केवळ निसर्गाची देणगी नाही. आता ती काही अटींवर राज्याने दिलेली ठेव आहे.'

गुन्हेगाराला जी देहान्ताची शिक्षा दिली जाते तिच्याकडेही याच दृष्टीने पाहता येईल. खुनी माणसाच्या सुऱ्याला नागरिकाला बळी पडावे लागू नये अशी व्यवस्था करावयाची तर जो नागरिक खुनी माणसासारखे वागायचे ठरवील त्यानेही आपल्या

प्राणांचे मोल देण्याची तयारी ठेवायला हवी. सामाजिक करारामुळे माणूस आपल्या जीवाला मुकत नाही; उलट त्या जीवांचे संरक्षण करणे हाच त्या कराराचा एकमेव हेतू आहे. करार करणारांपैकी कुणीही स्वत:च्या गळ्याभोवती फास अडकवून घेण्यासाठी म्हणून योजना आखील हे असंभवनीय आहे.

शिवाय जो पापकर्मा सामाजिक हक्कांच्या व्यवस्थेवर हल्ला करतो तो त्या गुन्ह्यामुळे बंडखोर आणि देशाचा दुश्मन ठरतो. कायद्यांचा भंग केल्यामुळे त्याचे सभासदत्वाचे हक्क नष्ट होतात आणि त्याने देशाविरुद्ध युद्ध पुकारले असे देखील म्हणता येते. म्हणून तो जिवंत राहणे देशाच्या सुरक्षिततेशी विसंगत ठरते. दोघांपैकी कुणा एकाचा तरी नाश झालाच पाहिजे आणि म्हणून गुन्हेगाराला जेव्हा ठार मारले जाते तेव्हा ते नागरिक म्हणून नव्हे तर शत्रू म्हणून. त्याची जी चवकशी होते आणि नंतर त्याला जी शिक्षा दिली जाते त्यावरून सिद्ध होते व जाहीर होते ते हे की त्याने सामाजिक तहनाम्याच्या अटींचा भंग केला असून, त्या कृत्यामुळे त्याचे राज्याचे सभासदत्व नष्ट झाले आहे. आपण राज्याचे सभासद आहो ही त्याची पहिल्यापासूनची भूमिका असल्याकारणाने व शिवाय राज्यामधे वसती करून त्याने ती गोष्ट स्पष्टपणे मान्य केली असल्याकारणाने सामाजिक कराराचा भंग करणारा म्हणून त्याची हकालपट्टी ( exile ) करून राजकीय समाजापासून त्याला अलग केले पाहिजे अगर सार्वजनिक शत्रू म्हणून त्याला देहान्त शासन दिले पाहिजे. असा शत्रू म्हणजे एक नैतिक पुरुष नसतो;; तो एक मनुष्य असतो. आणि या परिस्थितीत युद्धाचा हक्क म्हणून पराभूताचे निर्दालनही करता येते.

पण कुणी असे म्हणेल की गुन्हेगाराला शिक्षा देणे हे एक तात्कालिक [ ad hoc ] कार्य आहे. कबूल. पण मला हे देखील सांगितले पाहिजे की हे कृत्य राज्यकर्त्यांचे कृत्य नव्हे. स्वत: त्याचा वापर करण्याऐवजी त्याला हा हक्क दुसऱ्याला देता येईल. माझ्या सर्व कल्पना सुसंगत आहेत; परंतु त्या सर्व मला एकाच वेळी व्यक्त करता येत नाहीत.

शिक्षा वरचेवर द्यावी लागणे याचा अर्थ हा की शासन कमजोर अगर आळशी आहे. मनुष्य कितीही वाईट असला तरी कोणत्या ना कोणत्या तरी कामासाठी त्याचा उपयोग करून घेता येतो. एखाद्याला जीवंत ठेवणे हेच मुळी धोक्याचे आहे असे सिद्ध झाल्याखेरीज त्याला जीवे मारता कामा नये.

कायद्यानुसार न्यायाधीशाने दिलेली शिक्षा माफ करण्याचा अधिकार राज्यकर्त्यालाच आहे. कारण तोच कायदा व न्यायाधीश यांच्यापेक्षा श्रेष्ठ असतो. परंतु या हक्काची स्पष्ट व्याख्या नाही आणि त्याचा वापरही क्वचित्‌च होतो. योग्य रीतीने चाललेल्या राज्यात शिक्षा कमी असतात, त्या माफी जास्त प्रमाणावर दिली जाते म्हणून नव्हे, तर गुन्हेगार कमी असतात म्हणून. राज्य ज्या वेळी अधोगतीला जात असते त्या वेळी पुष्कळ गुन्हे घडतात आणि त्यामुळे गुन्हेगारांना एक प्रकारचे अभय लाभते. रोमन प्रजासत्ताकाच्या काळात राज्यसभेने (Senate) किंवा सर्वाधिकाऱ्याने (Consuls) गुन्हेगारांना

शिक्षेची माफी देण्याचा प्रयत्न केला नाही. जनसमुदायानेही ते केले नाही. कधीमधी तो आपला निर्णय फिरवत असे हे मात्र खरे; माफी जेव्हा मोठ्या प्रमाणावर दिली जाते तेव्हा तिची गरजच पडणार नाही, अशी वेळ लवकर येते; या घटनेचा अर्थ कुणाच्याही सहज लक्षात येईल. पण माझे हृदय धडधडू लागले असून माझी लेखणी अडखळू लागली आहे. हे सर्व प्रश्न प्रमादरहित अशा न्यायी पुरुषाकडे (the just Man who has never been at fault) सोपवू या. तोच एक असा आहे की ज्याला स्वतःपुरती माफीची गरज कधीही भासली नसेल.

## प्रकरण ६

# कायद्याबद्दल

सामाजिक करारामुळे राजकीय समाजाला अस्तित्व आणि जीवन लाभते. त्याला इच्छाशक्ती व गतिमानता देणे एवढेच फक्त बाकी उरते. त्यासाठी कायद्याची संहिता तयार होणे जरूरीचे आहे. राजकीय समाज ज्या प्राथमिक (primal) कृतीने बनतो तिच्यामुळे पुढे अस्तित्वात राहण्यासाठी काय केले पाहिजे ते निश्चित होत नाही.

सुव्यवस्था राखावयासाठी काय चांगले व हितावह ते निसर्गाने ठरते, मानवी विधिनिषेधांचा (Conventions) त्याच्याशी संबंध नसतो. न्याय येतो तो परमेश्वराकडून. तोच त्याचे एकमेव उगमस्थान आहे. परमेश्वराकडून येणारे संदेश कोणाच्याही मध्यस्थी-विना कसे स्वीकारावयाचे हे जर आपल्याला कळते, तर शासन आणि कायदे यांची गरज भासली नसती. बुद्धीतून निर्माण झालेला निर्दोष स्वरूपाचा असा एक विश्वव्यापी न्याय असतो हे खरे, पण मानवी समाजाने त्याचा अधिकार मानावयाचा तर तो दुहेरी (reciprocal) असला पाहिजे. मानवी संबंधांच्या दृष्टीने विचार केला, तर असे दृष्टीस पडते की माणसामधे कायदा व न्याय यांना नैसर्गिक दंडाची (Sanction) सोय असल्याखेरीज महत्त्व नसते. न्यायाचा व्यवहार एकतर्फी असला की दुष्ट माणसांची भर-भराट होते आणि सालस माणसांना अन्याय सहन करावा लागतो. कायद्यांची सर्वसंमत अशी संहिता असली की हक्क आणि कर्तव्ये यांची सांगड जुळते आणि न्यायाला आपले उद्दिष्ट साधता येते. नैसर्गिक अवस्थेमधे सर्व गोष्टी सर्वांच्या मालकीच्या असल्यामुळे, कबूल केले नसेल तर मी कोणाचेही काही देणे लागत नाही. स्वतःसाठी मला जे नको असेल त्यावरच शेजाऱ्याचा हक्क आहे असे मी मानेन. नागरी समाजामधे ते शक्य नसते. तिथे सारे हक्क कायद्याने निश्चित झालेले असतात.

पण शेवटी कायदा म्हणजे तरी काय? जोवर त्या शब्दाचा आपण केवळ आधि-भौतिक दृष्टीने अर्थ लावू तोवर कितीही काथ्याकूट केला तरी त्याचा खरा अर्थ ध्यानात

येणार नाही. निसर्गाच्या कायद्याचे जरी आपण नीट वर्णन केले तरी त्याच्या योगाने राज्याचा जो कायदा असतो त्याचा अर्थ समजणे सोपे जाणार नाही.

मी पूर्वीच म्हटले आहे की, तात्पुरते निर्णय घेणे हे सर्वसाधारण इच्छेचे काम नव्हे. हे निर्णय राज्याच्या कक्षेतील असतात किंवा कक्षेबाहेरील असतात. कक्षेबाहेरील असल्यास ज्या बहिर्गत इच्छेमुळे ते घडून आले तिचा सर्वसाधारण इच्छेशी संबंध असणे शक्य नाही. कक्षेतील असल्यास ते निर्णय समाजाच्या जीवनाचा एक भाग बनतात. मग समग्र ( the whole) आणि अंश (part) यांच्यामध्ये एक प्रकारचा संबंध निर्माण होतो, म्हणजेच एका बाजूला अंश असतो आणि दुसऱ्या बाजूला तो अंशविरहित समग्र. परंतु अंश वगळलेला समग्र खऱ्या अर्थाने समग्र राहूच शकत नाही. म्हणून हा संबंध निर्माण होतो तिथे आपण समग्राचा विचार करत नाही. तर दोन विषम भागांचा विचार करतो. म्हणून निष्कर्ष निघतो तो हा की एका भागाची इच्छा ही दुसऱ्या भागाची सर्वसाधारण इच्छा बनू शकत नाही.

परंतु सगळा लोकसमुदाय जेव्हा सर्वांवर बंधनकारक असा कायदा करतो, त्यावेळी तो विचार करतो, तो केवळ स्वतःपुरता. संबंध कशाही तऱ्हेचा असला, तरी दोन्ही गोष्टी एकच असतात. एका दृष्टीने पाहिलेले समग्र दुसऱ्या दृष्टीने पाहिलेल्या त्याच समग्रावर परिणाम घडवून आणत असते. त्यांच्यामध्ये भेद नसतो. हे घडते त्यावेळी कायदा निर्माण करणारी इच्छा जितकी सर्वसाधारण असते तितकाच कायद्याचा विषयही सर्वसाधारण असतो. या तऱ्हेच्या कृतीला मी ' कायदा ' हे नाव देतो.

कायद्याची बाब सर्वसाधारण असते असे मी म्हणतो त्याचा अर्थ हा की राज्याच्या सगळ्या प्रजाजनांचा मिळून कायदा विचार करतो आणि ज्या कृतीशी त्याचा संबंध येतो ती सर्वस्वी अमूर्त स्वरूपाची असते. कायदा माणसाकडे व्यक्ती या दृष्टीने पाहात नाही आणि कृती खास किंवा अपवादात्मक स्वरूपाची आहे असे मानत नाही. म्हणून कायद्याला विशिष्ट सवलती निर्माण करता येतात; पण त्या सवलती विशिष्ट स्त्रियांना किंवा पुरुषांना देता येत नाहीत. राज्यामध्ये वेगवेगळे वर्ग कायद्याला बनवता येतात व कोणत्या गुणधर्मांमुळे नागरिक या अगर त्या वर्गांत पडेल ते ठरवता येते, परंतु नागरिकांना नावे देऊन वेग-वेगळ्या वर्गांत घालता येत नाही. कायदा राजेशाही स्थापन करू शकेल व ती वंशपरंपरागत चालावी असे ठरवू शकेल. पण कायदा राजाची निवड करू शकत नाही किंवा देशातील कुटुंबांपैकी अमुक एखादे कुटुंब राजकुटुंब असावे असे ठरवू शकत नाही. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे विशिष्ट गोष्टीबद्दल विचार करणे हे विधिशक्तीच्या ( legislative power ) क्षेत्रात पडत नाही.

हे एकदा ध्यानात घेतले की कायदे करण्याचा अधिकार कुणाचा, हे विचारण्याची आवश्यकता उरणार नाही. कारण कायदे सर्वसाधारण इच्छेनुसार घडतात. तसेच राज-पुरुषाला कायदा लागू पडतो की नाही हे विचारण्याची आवश्यकता नाही: कारण तो राज्याचा एक घटक असतो. कायदा अन्यायाचा असू शकतो की नाही हा प्रश्नही उपस्थित

होत नाही कारण कुणीही स्वतःवर अन्याय करून घेत नाही. नागरिक कायद्याने बांधलेला असताना तो स्वतंत्र कसा हे विचारण्याचीही आवश्यकता नाही. कारण कायदा म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपण आपल्या इच्छेनुसार जे ठरविले त्याची नोंद असते.

कायद्यामध्ये इच्छेची सर्वव्यापकता व हेतूंची सर्वव्यापकता यांचा संगम झालेला असतो. त्यामुळे मनुष्य कुणीही असो, त्याने स्वतःच्या अधिकारात केलेल्या हुकुमाला कायद्याचे स्वरूप प्राप्त होत नाही. राज्यकर्त्याने स्वतःच्या अधिकारात आज्ञा केली, तरी ती देखील कायदा नसून केवळ एक हुकूम होतो; ते सार्वभौमत्वाचे कृत्य नसून शासन-यंत्रणेचा कारभार असतो. कायद्यानुसार चालणारे राज्य म्हणजे प्रजासत्ताक ( Republic ) अशी माझी समजूत आहे, मग त्या राज्यातील शासनपद्धती कोणतीही असो. ते असेल तरच सार्वजनिक हित वरचढ आहे, असे म्हणता येते व समाजकुटुंब या शब्दाला काही अर्थ प्राप्त होतो. कायदेशीर शासन स्वभावतःच प्रजासत्ताकाच्या स्वरूपाचे असते. शासन[१] या शब्दाचा मला अभिप्रेत असलेला अर्थ मी पुढे विशद करीन. योग्य शब्द वापरून बोलायचे झाल्यास नागरी समाजाच्या अस्तित्वासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता असते त्यांनाच कायदा असे म्हणता येईल. कायदा ज्यांच्यावर बंधनकारक आहे त्या लोकसमुदायानेच कायदा बनवला पाहिजे. कारण ज्यांनी एकत्र येऊन समाज बनवला त्यांनाच त्या समाजाची घटना ठरवण्याचा अधिकार आहे. मग हे कार्य त्यांनी कसे करावे? सगळ्यांच्या संमतीने ते करावे की तत्कालिक स्फूर्तीनुसार? इच्छेला आकार देण्यासाठी राजकीय समाजाजवळ एखादे निश्चित साधन आहे का? ज्या परिस्थितीचे नियंत्रण करणे हे त्यांचे कार्य असते ते निर्णय ती परिस्थिती उद्भवण्यापूर्वी घेण्यासाठी जी दूरदृष्टी हवी ती कोठून येते? आवश्यकता उत्पन्न होईल त्या वेळी कायदा जाहीर करता येईल अशी खात्री राजकीय समाजाला कशी देता येते? ज्या अंधसमुदायाला स्वतःच्या हिताचे काय आहे हे पुष्कळ वेळा समजत नसल्याकारणाने आपल्याला काय हवे ते निश्चित करता येत नाही, तो अंध समुदाय कायद्याची तत्त्वप्रणाली निश्चित करण्यासारखे व्यापक व कठीण काम कसे अंगावर घेऊ शकेल? कुणी ढवळाढवळ केली नाही तर जनसमुदायाला नेहमी स्वतःचे कल्याण हवे असते; परंतु त्याला तसेच मोकळे सोडले तर आपले कल्याण कशात आहे ते त्याला कळत नाही. सर्वसाधारण इच्छा नेहमीच बरोबर असते, परंतु तिला वळण लावणारी विवेकबुद्धी नेहमीच सर्व गोष्टींची चांगली जाणकार असते असे म्हणता

१. 'प्रजासत्ताक' या शब्दाचा मी वापर करतो तेव्हा उमरावशाही अगर लोकशाही मला अभिप्रेत असतेच असे नाही. मला अभिप्रेत असते म्हणजे सर्वसाधारण इच्छा, जिला दुसऱ्या शब्दात कायदा म्हणता येईल, तिच्या अनुसारे चाललेले शासन. कायदेशीरपणा म्हणजे शासन आणि राज्यकर्ता एक आहेत असे नव्हे तर शासनाने राज्य-कर्त्यांचा मंत्री म्हणून काम करणे. या अर्थाने राजेशाहीला देखील प्रजासत्ताक हे अभिधान देता येईल. पुढच्या पुस्तकात ही गोष्ट अधिक स्पष्ट होईल.

येत नाही. वस्तू जशा आहेत तशा व कधीमधी त्या जशा असाव्यात तशा विवेकबुद्धीच्या दृष्टीस पडतील अशी सोय व्हायला हवी. हवे असलेले कल्याण साधण्याचा मार्ग तिला दाखवला पाहिजे; विशिष्ट हितसंबंधामुळे निर्माण होणारे मोह टाळायला शिकवले पाहिजे; स्थान, काळ ओळखायला तयार केले पाहिजे; आणि आज प्रतीत होणाऱ्या उघड लाभा-विरुद्ध उद्याचे दूरस्थ व दडलेले धोके हिशेबात घ्यायला तिला तयार केले पाहिजे. व्यक्तींना कल्याण दिसते, पण ते त्याचा अव्हेर करतात; सर्वसामान्य जनतेला कल्याण हवे असते पण ते तिच्या दृष्टीस पडत नाही. दोघांनाही सल्लामसलतीची आवश्यकता आहे. व्यक्तींना इच्छेवर बुद्धीचे नियंत्रण ठेवायला व जनतेला आपल्याला काय हवे ते शोधून काढायला शिकवले पाहिजे. समाजामध्ये ज्ञान व इच्छाशक्ती यांचा मेळ निर्माण होतो तो जनतेच्या दृष्टिविकासामुळे; त्या मेळामुळे वेगवेगळ्या भागांमधील सहकार्य निर्माण होते आणि अखेरीस समष्टीची संपूर्ण शक्ती सर्वात मोठ्या स्वरूपात प्रगट होते. म्हणूनच कायदे करणारा असल्याखेरीज चालत नाही.

## प्रकरण ७

# कायदे करणाराविषयी

राष्ट्राला योग्य असे सामाजिक निर्बंध कोणते ते शोधून काढण्यासाठी वरिष्ठ दर्जाची बुद्धिमत्ता असलेली शक्तीच हवी. ती शक्ती माणसामध्ये असलेले सर्व विकार जाणते, पण त्या सर्वांपासून ती स्वतः निर्लेप असते. आपल्या स्वभावधर्माशी तिचा संबंध नसतो, पण त्यांची तिला पुरी माहिती असते. तिचे कल्याण आपल्या कल्याणावर अवलंबून नसते, पण आपल्या कल्याणाची तिला चिंता असते आणि शेवटी काळाचा चिरंतन ओघ लक्षात घेऊन, फार दूरच्या भाग्याच्या दिवसासाठी तयारी करीत, पुढच्या शतकात भोगावयास मिळणाऱ्या फळासाठी ती या शतकात कार्य करीत असते.[१] थोडक्यात सांगावयाचे म्हणजे देवच माणसांना कायदे देऊ शकतात.

प्लेटोने आपल्या 'धी स्टेट्स्मन'[२] या संभाषणात (dialogue) नागरी किंवा पहिल्या दर्जाच्या ( Royal ) माणसाचे वर्णन करताना कॅलिगुलाने व्यवहारात ज्या युक्तिवादाचा अवलंब केला त्याचाच तात्त्विक विवेचनात अवलंब केला आहे. महान राजपुरुष जर कचित्

१. कायद्यांचा अधःपात सुरू होतो याच वेळी राष्ट्र प्रसिद्ध होते. ग्रीसच्या सर्व सामान्य भवितव्यात भागीदार होण्यापूर्वी लायकर्गसच्या संस्थांच्या नियमाने स्पार्टाने किती शतके वैभव उपभोगले त्याची आपणास माहिती नाही.

२. पाहा प्लेटोचे संभाषण. लॅटिन भाषेतील आवृत्तीमध्ये त्याला 'पॉलिटिकस्' किंवा 'सिटिझन' असे नाव आहे. त्यालाच कभी कभी 'स्टेट्समन' हे नाव दिले जाते.

कधी जन्मास येत असेल तर महान संहिताकाराबद्दल ( Law-giver ) काय म्हणावे? दुसऱ्याने जे नियम घालून दिले, त्यांचे प्रतिपालन करणे एवढेच फक्त पहिल्याचे कार्य असते. संहिताकार यंत्र निर्माण करतो; राजपुरुष ते फक्त चालवतो. मॉंटेस्क्यू म्हणतो; " समाज जेव्हा प्रथम निर्माण होतो तेव्हा समाजाचे अग्रणी प्रजासत्ताकाच्या संस्था निर्माण करतात. मागाहून संस्था अग्रणी निर्माण करतात. "

जो लोकसमुदायासाठी संस्था निर्माण करण्याचे काम अंगावर घेतो त्याने ही गोष्ट पुरी लक्षात ठेवावयास हवी की मनुष्यस्वभावाचा गाभाच बदलायला आपण निघालो आहो; प्रत्येक व्यक्ती, अलग असताना, संपूर्ण असते पण एकटी असते. त्या व्यक्तीला तिच्यापेक्षा मोठ्या अशा समष्टीचा भाग—ज्या समष्टीमुळे तिला जीवन व अस्तित्व लाभते—बनविण्याचे कार्य आपल्याला करावयाचे आहे; निसर्गाने दिलेल्या केवळ आधिभौतिक व स्वतंत्र जीवनाऐवजी एक सामुदायिक व नैतिक जीवन निर्माण करण्याची जबाबदारी आपल्याला पार पाडावयाची आहे; मनुष्यापासून त्याच्या निसर्गदत्त शक्ती घ्यावयाच्या आणि त्याला व्यक्ती या नात्याने अपरिचित व दुसऱ्यांच्या मदतीखेरीज वापरता येणार नाहीत अशा शक्ती द्यावयाच्या हे थोडक्यात सांगावयाचे तर त्याचे कार्य असते. त्याच्या नैसर्गिक शक्तींचा अन्त व विनाश जितका अधिक परिपूर्ण तितक्या त्याला नव्याने मिळणाऱ्या शक्ती अधिक व्यापक व अधिक चिरस्थायी स्वरूपाच्या असतात आणि ज्या समाजाचा तो भाग आहे तो समाज अधिक एकसंध आणि परिपूर्ण बनतो, ही गोष्ट इतकी खरी आहे की नागरिक एकटा घेतला तर तो कःपदार्थ असतो आणि शेजाऱ्याच्या सहकार्याखेरीज तो काहीही करू शकत नाही आणि सर्व नागरिक मिळून जो समाज तयार होतो त्याची शक्ती निसर्ग-अवस्थेतील माणसे म्हणून नागरिकांच्या ठिकाणी असणाऱ्या शक्तीच्या बेरजेइत-कीच नव्हे तर त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक असते. ते घडून येते तेव्हाच आणि त्याच वेळी कायदे तयार करण्याच्या कृतीमध्ये शक्य तो पूर्णतेचा उच्चांक गाठला गेला असे म्हणता येईल.

संहिताकार ही राज्यातील प्रत्येक दृष्टीने असाधारण अशी एक शक्ती असली पाहिजे; बुद्धीच्या कुशाग्रतेमुळे जसा तो असाधारण असतो तसाच त्याच्या पदामुळेही. ( office ) तो अधिकारी ( magistrate ) नसतो आणि राजाही नसतो. राज्य निर्माण करणे हे त्याचे काम असते, तरी त्याच्या घटनेमधे त्याला स्थान नसते. त्याचे नियुक्त कार्य वेगळे असते, इतर सर्व कार्यापेक्षा ते वरच्या दर्जाचे असते. माणसावर अधिकार चालविण्याशी त्याचा काही संबंध नसतो. माणसावर हुकूमत गाजविणाराने कायदे करू नये हे जितके खरे तितकेच हे देखील खरे की जो कायदे करतो त्याच्यावर माणसावर हुकूमत गाजविण्याची जबाबदारी त्यानंतर असू नये. हे खरे नसते, तर त्याच्या भावनांचे कार्यकर्ते असे जे कायदे ते त्याच्या अन्यायांनाच चिरंतन स्वरूप देतील आणि माणूस या नात्याने त्याचे जे विचार आहेत त्यांनी त्याच्या कामाचे पावित्र्य कमी होण्याचे संकट त्याला टाळता येणार नाही.

लायकर्गसने देशासाठी कायदे बनवण्यापूर्वी स्वतःचे राजा म्हणून जे अधिकार होते त्यांचा त्याग केला. घटना बनविण्याचे काम परदेशीय माणसाकडे सोपवायचे अशी ग्रीसमधील बहुतेक सर्व नगर-राज्यांची प्रथा होती. आधुनिक काळात इटलीतील प्रजासत्ताकांनी त्या प्रथेचे बरेच वेळा अनुकरण केले आहे. जिनीव्हाच्या राज्यानेही तेच केले आणि तिथे ती पद्धत योग्य ठरली.[1] मोठ्या भरभराटीच्या काळात देखील रोमच्या साम्राज्यात देशामधे देखील जुलूमशाहीची दुष्कृत्ये वाढली आणि देश नष्ट होण्याच्या पंथाला लागला, त्याचे कारण एकच आणि ते म्हणजे सार्वभौम सत्ता आणि कायदे करण्याची सत्ता यांचे एकाच हाती एकत्रीकरण.

हे जरी खरे असले, तरी केवळ स्वतःच्या अधिकारात कायदे करण्याची सत्ता डिसेमव्हिरस् ( Decemvirs ) नी कधीही बळकावली नाही. ते जनतेला म्हणत असत : " आम्ही जे सुचवतो त्याला तुमच्या पसंतीखेरीज कधीही कायद्याचे स्वरूप प्राप्त होणार नाही. रोमन नागरिक हो, तुमच्या कल्याणासाठी म्हणून तुम्हाला जे कायदे हवेत ते तुम्हीच बनवा. "

म्हणून समाजाच्या विधिनिषेधांची जो संहिता बनवतो त्याला कायदे करण्याचा अधिकार नसतो अगर असू नये. तो अधिकार दुसऱ्याला देता येण्यासारखा नाही. जनसमुदायाला, तशी इच्छा झाली तरी, त्या अधिकाराचा त्याग करता येत नाही. सामाजिक करारानुसार सर्वसाधारण इच्छेलाच व्यक्तीवर निर्बंध लादता येतात. आणि व्यक्तीची इच्छा सर्वसाधारण इच्छेशी सुसंगत आहे अशी खात्री करून घेण्याचा जनसमुदायाला तिच्याबद्दल खुले मत द्यायला सांगण्याखेरीज दुसरा मार्ग नाही. हे मी पूर्वी एकदा सांगितले आहे; पण त्याची पुनरावृत्ती करणे चांगले होईल.

कायदे करण्याच्या कृतीमध्ये वरवर पाहता एकमेकीशी न जुळणाऱ्या दोन गोष्टी अंतर्भूत आहेत असे दृष्टीस पडते : एक ही की सर्वसाधारण माणसांच्या कुवतीपलीकडचे असे ते कार्य आहे, आणि दुसरी ही की ते करण्यासाठी कोणताही अधिकार नसलेली अशी एक शक्ती आपल्याला देण्यात आलेली आहे.

दुसरीही एक अडचण आहे आणि तिच्याकडे लक्ष पुरविले पाहिजे. अडाणी लोकांशी बोलताना त्यांची भाषा न वापरता जी शहाणी माणसे स्वतःची भाषा वापरतात त्यांच्या बोलण्याचा बोध कुणालाही होत नाही. पल्लेदार सामान्य विधाने व दूरच्या दृष्टीने

---

१. कालव्हिन केवळ धर्मशास्त्रज्ञ होता अशी ज्यांची कल्पना आहे त्यांना त्याच्या बुद्धीचे क्षेत्र किती व्यापक होते त्याची कल्पना नाही. आपले प्रगल्भ बुद्धीचे कायदे ( edicts ) बनवण्यामधे त्याचा मोठा भाग होता. इन्स्टिट्यूट ( Institute ) या ग्रंथाइतकाच त्या कायद्यामुळे त्याचा मोठेपणा सिद्ध होतो. काळामुळे आपल्या धार्मिक व्यवहारात कितीही बदल झाले, तरी जोवर देशप्रेम व स्वातंत्र्यप्रेम आपल्या ठिकाणी जिवंत आहेत तोवर त्या महनीय व्यक्तीची स्मृती आपण मोठ्या आदराने बाळगत राहू.

व्यक्त केलेले विचार दोन्हीही सर्वसाधारण माणसाच्या समजुतीच्या कक्षेबाहेर पडतात. स्वतःच्या हिताला पोषक ठरतील अशाच योजना सरकारी कामकाजाच्या बाबतीत साधारण-पणे त्याला पसंत पडतात. चांगल्या कायद्यामुळे ज्या अडचणी सतत लादल्या जातात त्यात आपला काय फायदा हा त्याला नेहमीच प्रश्न पडतो आणि फायदा ध्यानात येत नाही. राजनीतिज्ञांनी विचार करून तयार केलेल्या नियमांचा पुरा अर्थ तरुण मंडळींच्या ध्यानात येत नाही. आणि निरामय समाजजीवनासाठी व्यवहाराचे जे नियम आवश्यक असतात ते त्यांना पाळता येत नाहीत. त्यांच्या बाबतीत ती अपेक्षा करणे म्हणजे कारणाच्या अगोदर कार्य घडून यावे अशी अपेक्षा करण्यासारखे आहे. हे घडावयाचे म्हणजे जी सामाजिक भावना देशातील संस्थांच्या योगाने वाढते ती प्रत्यक्षात सुरवातीलाच हजर होती असे मानावे लागेल आणि कायद्यामुळे नागरिकांची जी जडणघडण होते ती कायदे अस्तित्वात येण्यापूर्वीच घडून आली असे समजावे लागेल. संहिताकाराला दंडाचा अगर युक्तिवादाचा उपयोग करता येत नाही; म्हणून त्याच्या ठिकाणी एक वेगळ्या तऱ्हेचा अधिकार हवा; असा अधिकार की जो हिंसेच्या उपयोगाखेरीज नेतृत्व करू शकेल आणि खात्री पटवल्या-खेरीज देखील लोकांची समजूत घालू शकेल.

म्हणून सर्व युगांमधे देशाच्या पितृस्थानी असलेल्या व्यक्तींना परमेश्वराच्या मध्यस्थीची गरज भासते, स्वतःचे शहाणपण देवांचे शहाणपण आहे असे त्यांना भासवावे लागते. हेतू हा की निसर्ग नियमांच्या बरोबरीने राज्याच्या कायद्यांनी बांधले गेलेल्या लोकांची नागरिकांना निर्माण करणारी जी शक्ती तीच शहराचीही निर्मिती करते अशी खात्री पटून त्यांनी खुषीने आज्ञापालन करावे व सार्वजनिक सुखाचे जू बिनतक्रार उचलावे. गरीब मानवजातीच्या आवाक्याबाहेरील असे उच्च विचार कायदे करणारा अमर देवतांच्या तोंडी घालतो आणि केवळ मानवी ज्ञान ज्यांना अडथळ्यासारखे वाटते त्यांच्यापुढे दैवी प्रेरणेचे निशाण उभे करून तो त्यांना पुढे नेतो.[1] परंतु प्रत्येक माणसाला देवतांना बोलके करता येत नाही आणि त्यांच्या बोलण्याचा खरा अर्थ सांगणारा असा विश्वासही संपादन करता येत नाही. स्वतःची महात्मता हाच कायदे करणाऱ्याच्या कार्यांचा खरा पुरावा आहे आणि तोच एक चमत्कार आहे. दगडावर शब्द उठवणे अगर कौल देणाराला लाच देणे अगर उच्च देवतेशी गुप्त संधान असल्याचा दावा करणे अगर कानामधे हळूच बोलण्याची पक्ष्याला शिकवण देणे या अगर या तऱ्हेच्या लोकांवर वजन मारण्याच्या गोष्टी कुणालाही करता येतात. या गोष्टी करण्यापलीकडे ज्याच्या शक्तीची पोच नाही त्याला, नशीब असेल तर, अंधश्रद्ध जमावाला काही काळ भुलवता येईल; परंतु त्याला साम्राज्य स्थापन करता येणार नाही आणि त्याने जे काही डोळ्यात भरेल असे निर्माण केले असेल ते थोड्याच काळात त्याच्याबरोबर नष्ट पावेल. खरा

१. मॅकिआव्हेलीच्या डिसकोर्सेस ऑन टायटस लिव्हिअस या ग्रंथातील अवतरण.

आधार नाही अशा सत्तेचे बंधन टिकाऊ नसते, मुबुद्धपणातच शाश्वतीची आशा असते. ज्यू कायदा आज देखील जिवंत आहे आणि तसाच अर्ध्या जगाच्या वर्तनाचे गेली दहा शतके नियंत्रण करणारा इशमेल ( Ishmail ) च्या मुलाचा कायदा. ज्या महापुरुषांनी त्यांचे संगठन केले त्यांच्या थोरवीची ती साक्षच आहे. तत्त्वज्ञानामुळे किंवा आंधळ्या पक्षनिष्ठेमुळे गर्विष्ठ बनलेल्या मंडळींच्या डोळ्यांना ते नशीबवान भोंदू मंडळीसारखे भासत असतील, परंतु राजकीय विचारवंत मात्र चिरस्थायी संस्कृतीच्या उदयकाळी तिची जोपासना करणाऱ्या महान व शक्तिशाली प्रज्ञेचा त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांमधे जो आढळ होतो त्याचे कौतुक करत राहतील.

या सर्व विवेचनावरून वारबर्टनप्रमाणे आधुनिक जगामधे राजकारण आणि धर्म यांचे उद्दिष्ट एक आहे असा मात्र आपण निष्कर्ष काढू नये. उलट असा निष्कर्ष काढावा की राष्ट्रनिर्मितीच्या कामामधे एकाचा दुसऱ्याला साधन म्हणून उपयोग होतो.

## प्रकरण ८

# लोकांविषयी

एखादी मोठी इमारत बांधण्याच्या कामास सुरवात करण्यापूर्वी वास्तुशास्त्रज्ञ ज्याप्रमाणे इमारतीचे वजन जमिनीला पेलता येईल की नाही हे अजमावण्यासाठी जमिनीची पाहणी व परीक्षा करतो त्याप्रमाणे सुबुद्ध कायदे करणारा ( Legislator ) कायदे कितीही चांगले असले तरी ते तयार करण्याच्या कामाला एकदम लागणार नाही; त्यापूर्वी ज्या लोकांच्या संस्था बनवायच्या ते त्या संस्था कितपत तगवू शकतील आणि त्यांचे हुकूम पाळू शकतील याचा शोध घेईल. या कारणामुळेच प्लेटोने अर्केडिया व सिरीन यांच्या रहिवाशांसाठी कायदे करण्याचे नाकारले. त्याला माहीत होते की हे दोन्ही समाज श्रीमंत असल्याकारणाने समतेवर आधारलेली व्यवस्था त्यांना मानवणार नाही. त्याचप्रमाणे क्रीटमधे चांगले कायदे पण वाईट नागरिक हा देखावा दृष्टीस पडतो; कारण मिनोने फक्त शिस्त लादली होती; पण लोक मात्र स्वतःच्या दुर्गुणांच्या ओझ्याखाली दबले होते.

जगामधे अशा अनेक उज्ज्वल संस्कृती होऊन गेल्या आहेत की ज्यांना चांगल्या कायद्यांच्या अमलाखाली जगणे जमले नसते; तसेच अशा काही संस्कृती होऊन गेल्या आहेत की ज्यांना एकंदर जीवनाच्या मानाने फारच थोडा काळ चांगल्या कायद्यांचा लाभ झाला. बहुतेक माणसांच्याप्रमाणे बहुतेक समाजांना शिस्त लावता येते ती त्यांच्या तरुणपणीच. वय वाढत जाते तसे त्यांच्यामधे सुधारणा करणे अशक्य होते. चालीरीती एकदा रूढ झाल्या व दुराग्रहांनी एकदा मूळ धरले की सुधारणेचा प्रयत्न करणे निष्फळ व धोकादायक काम ठरते. आपल्या राज्यातील अनिष्ट गोष्टींकडे अंगुलिनिर्देश करून त्या नष्ट करण्याचा

एखाद्या माणसाने प्रयत्न करावा, हे लोकांना रुचत नाही. या बाबतीत ते, केवळ डॉक्टरला पाहूनच घाबरणाऱ्या मूर्ख आणि म्याड रोग्यासारखे, वागतात. तरी देखील ज्याप्रमाणे काही रोगांचा मनावर परिणाम घडल्यामुळे, माणसांना पूर्वीच्या सर्व गोष्टींचा विसर पडतो त्याचप्रमाणे समुदायांच्या जीवनात हिंसेचे असे काही कालखंड निर्माण होतात की ज्या वेळी माणसाच्या आरोग्यावर आघात करणाऱ्या आणीबाणीच्या परिस्थितीप्रमाणे क्रांतीचे समुदायावर परिणाम घडून येतात. अशा वेळी गत गोष्टींच्या विस्मृतीऐवजी त्यांच्याबद्दल मनामध्ये दाट भीती निर्माण होते आणि अंतर्गत यादवीमुळे व्याधीग्रस्त झालेली राज्यसंस्था राखेतून पुन्हा जिवंत होते व मृत्यूची मगरमिठी तोडून तारुण्याच्या नवीन जाणीवेसहित जगू लागते. लायकर्गस काळात स्पार्टामधे व टार्क्विन्स (Tarquins) च्या काळा-नंतर रोममधे हे घडले. नंतरच्या काळात, जुलमी राजांना घालवून दिल्यानंतर, हॉलंड व स्वित्झर्लंडमधेही तेच घडले.

परंतु अशा घटना क्वचित घडतात. त्या अपवादात्मक स्वरूपाच्या असतात आणि त्या त्या राज्यातील विशिष्ट संविधानात्मक तरतुदींमुळे त्या घडून येणे शक्य होते आणि एका संस्कृतीच्या आयुर्मर्यादेत त्या दोन वेळा घडून येत नाहीत. रानटी अवस्थेतील लोकांना लढून झगडून स्वातंत्र्य संपादन करणे शक्य असते, परंतु राज्यव्यवस्थेची यंत्रणा जुनी झाल्यानंतर व तिच्यामधील स्थितिस्थापकता (resilience) नष्ट झाल्यानंतर ते कठीण होते. ते घडल्यानंतर अंतर्गत दंग्याधोप्यामुळे राज्यसंस्था नष्ट होण्याचीच अधिक धास्ती असते; क्रांती घडून येऊन तिचे पुनरुज्जीवन होईल अशी खात्री देता येत नाही. तिचे पाश एकदा तुटले की ती छिन्नविच्छिन्न होते, एकसंध संस्था म्हणून ती विलयाला जाते. त्यानंतर तिला गरज लागते ती स्वातंत्र्यवीराची नव्हे तर सत्ताधीशाची. जगातील स्वतंत्र समाजांनी पुढील म्हण लक्षात ठेवावी : स्वातंत्र्य मिळवता येते, ते पुन्हा संपादन करता येत नाही.

तारुण्य म्हणजे बाल्य नव्हे. माणसाप्रमाणे राष्ट्रांचाही तारुण्याचा काळ असतो; तारुण्याऐवजी वाटल्यास प्रौढत्व (Maturity) हा शब्द वापरावा. कायद्याचे बंधन स्वतःवर लादून घेण्यापूर्वी राष्ट्राने या तारुण्याची वाट पाहावी. राष्ट्र केव्हा तरुण बनते हे ठरवणे सोपे नाही आणि तो क्षण येण्यापूर्वी आपण घाई केली तर आपले सारे श्रम व्यर्थ जातील. काही समाजांना प्रथमपासूनच शिस्त लावून घेता येते; काहींना त्यासाठी दहा शतके थांबावे लागते. रशियन लोकांना खऱ्या अर्थाने कधीच सुसंस्कृत बनता येणार नाही, कारण संस्कृती त्यांच्यावर फार लवकर लादण्यात आली. पीटर धी ग्रेटची प्रतिभा अनुकरण करणारी बुद्धी होती, तिच्या ठिकाणी नवीन निर्माण करण्याची शक्ती नव्हती. शून्यातून नवे निर्माण करण्याच्या शक्तीला मी खरीखुरी प्रतिभा मानतो. त्याने केलेल्या काही गोष्टी चांगल्या होत्या, परंतु त्यापैकी पुष्कळ कालविसंगत होत्या. आपली प्रजा रानटी आहे हे त्याने ओळखले; परंतु सुसंस्कृत होण्यासारखी अद्याप तिची परिस्थिती नाही हे त्याच्या लक्षात आले नाही. ज्या वेळी त्याने त्यांना शिक्षण द्यावयास हवे होते त्या वेळी

त्याने त्यांना सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न केला. त्याने त्यांना जर्मन आणि इंग्रज बनवण्याचा प्रयत्न केला; त्याऐवजी त्याने त्यांना रशियन बनवण्याचा प्रयत्न करायला हवा होता. जे ते नव्हते ते आपण आहोत असे त्यांना मानायला लावल्यामुळे त्यांच्यातील अंगभूत गुणांचा परिपोष होण्याच्या मार्गात त्याने अडथळे निर्माण केले. फ्रेंच शिक्षकाच्या बाबतीत नेहमी हा प्रकार घडतो. आपल्या शिष्याच्या ठिकाणी बुद्धीचा झगझगाट निर्माण व्हावा म्हणून तो प्रयत्नांची पराकाष्ठा करतो; त्याचा परिणाम एवढाच होतो की क्षणभराची दीप्ती कधीमधी दृष्टीस पडते, पण फळ असे कधी पदरात पडत नाही. रशियन साम्राज्य युरप पादाक्रांत करण्याचा प्रयत्न करील, परंतु त्याचा स्वतःचाच पाडाव होईल. तार्तर जमात, प्रजाजन म्हणून किंवा शेजारी म्हणून, रशियन साम्राज्यावर आणि आपणा सर्वांवरही स्वामित्व प्रस्थापित करील अशी एखादी क्रांती मला अटळ भासते आहे. ती लवकर घडून यावी म्हणून युरपमधील सर्व राजांचे एकजुटीचे प्रयत्न चालू आहेत.

## प्रकरण ९

# लोकांविषयी ( चालू )

सुदृढ माणसाच्या वाढीवर निसर्गाने मर्यादा घातलेल्या आहेत. त्या मर्यादांचे उल्लंघन केले की राक्षस किंवा बुद्धिशून्य माणूस निर्माण होतो. त्याचप्रमाणे राज्याच्या विस्तारावरही काही मर्यादा असतात. त्या मर्यादेपलीकडे विस्तार झाल्यास त्या राज्याला चांगला घटनात्मक कारभार लाभणे शक्य नाही. राज्यकारभार चांगल्या रीतीने चालवता येणार नाही इतके ते मोठे नसावे व इतरांच्या मदतीखेरीज स्वतःचे संरक्षण करता येणार नाही इतके राज्य लहान नसावे. प्रत्येक राजकीय समाजाची शक्तीची एक मर्यादा असते; त्या मर्यादेपलीकडे त्याने जाऊ नये. पण पुष्कळ वेळा मोठे बनत असताना त्याच्याकडून तो अतिरेक घडून येतो. सामाजिक बंध जितका ताणावा जितका तो कमकुवत बनतो. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की लहान राज्य मोठ्या राज्यापेक्षा तुलनेने अधिक शक्तिशाली असते.

याला कारणे अनेक आहेत. पहिले म्हणजे अंतर जितके दूरचे तितके राज्यकारभार चालविणे कठीण जाते. तसेच, राज्यकारभाराचे घटक वाढतात तसा राज्यकारभार अधिक जुल्मी होतो. प्रत्येक शहराची एक शासनयंत्रणा असते, तिचा खर्च लोकांना द्यावा लागतो; प्रत्येक जिल्ह्याचीही शासनयंत्रणा असते, आणि तिचाही खर्च लोकांनाच द्यावा लागतो. याखेरीज प्रादेशिक यंत्रणा असतात. शासनाची वेगवेगळी खाती असतात, सुभेदाऱ्या ( Satrapies ) असतात, राजाच्या नावाने काम करणाऱ्या संघटना ( Vice-royalties ) असतात. जसजसे वरच्या श्रेणीला जावे तसतसे खर्च वाढत जातात,

हा सारा खर्च गरीब जनतेला द्यावा लागतो. आणि सर्वांच्या शेवटी कळसाला मध्यवर्ती सरकार असते. उंटाची पाठ मोडणाऱ्या गवताच्या शेवटच्या काडीसारखी त्याची गत होते. हा सर्व खर्च म्हणजे देशाच्या प्रजेच्या संपत्तीला लागलेली कायमची गळती होय. चढत्या श्रेणीच्या या यंत्रणेमुळे लोकांच्या दृष्टीने कारभार चांगला चालण्याऐवजी तो अधिकच वाईट होतो आणि एका मालकाचा अंमल अधिक चांगला असे लोकांना वाटू लागते. आकस्मिक प्रसंगासाठी खर्च करायला जवळ दमडी देखील उरत नाही आणि जेव्हा पैशाचा पुरवठा करणे भागच पडते त्यावेळी संपूर्ण विनाशाचे संकट राज्यापुढे दत्त म्हणून उभे राहते.

आणि हा पाढा इथेच संपला असे नव्हे; कायद्यांच्या अंमलबजावणीच्या बाबतीत, अन्याय थांबवण्याच्या बाबतीत, वाईट गोष्टी सुधारण्याच्या बाबतीत आणि राजधानीपासून दूर असलेल्या देशातील भागात वेळोवेळी उद्‌भवणारे राजद्रोही स्वरूपाचे कट प्रथमावस्थेतच निर्मूल करण्याच्या बाबतीत देखील शासनाला निर्धाराने व त्वरेने कार्य करता येत नाही. एवढेच नव्हे तर कधीही दृष्टीस न पडणाऱ्या राज्यकर्त्यांबद्दल लोकांना कमी प्रेम वाटते. तसेच जग जितके दूरचे तितक्याच दूरच्या वाटणाऱ्या देशाबद्दल आणि ज्यांची ओळख देखील नाही अशा बहुसंख्य नागरिक बंधूंबद्दलही त्यांना कमी प्रेम वाटते. अनेक वेगवेगळ्या प्रांतांना एकाच तऱ्हेचे कायदे सोईचे वाटणे अशक्य आहे. कारण प्रत्येक प्रांताच्या चाली-रीती वेगळ्या असतात, हवामान वेगळे असते, राज्ययंत्रणा कशी हवी याबद्दलच्या त्यांच्या कल्पना वेगळ्या असतात. बरे एकाच राज्यात वेगवेगळे कायदे असले म्हणजे अडचणी व गोंधळ निर्माण होतो. एकाच तऱ्हेच्या राज्यकर्त्यांच्या अमलाखाली राहणाऱ्या, एकमेकांशी सदोदित संबंध असणाऱ्या व आपआपसात भेटी-गाठी व लग्नसंबंध करणाऱ्या प्रजेला स्थानिक रूढी वेगळ्या असल्या म्हणजे पूर्वजांकडून जे लाभले ते खरोखरच कितपत आपले आहे, याबद्दल संशय निर्माण होतो. एकमेकांना परकी वाटणारी असंख्य माणसे जेव्हा मध्यवर्ती सरकार एकाच ठिकाणी असल्याकारणाने एकत्र आणली जातात, तेव्हा गुणांना वाव सापडत नाही, ते भूमिगतच राहतात. शीलाकडे दुर्लक्ष होते आणि दुष्कृत्यांचे शासन व्हावे तसे होत नाही. कामाच्या ओझ्याखाली दबून गेलेल्या राज्यकर्त्यांना कोणत्याही गोष्टीचे प्रत्यक्ष ज्ञान असे नसते. अशा वेळी सनदी नोकर हाच राज्याचा खराखुरा राज्य-कर्ता बनतो. सरसकट प्रयत्न चालू असतो तो एवढाच की शासकीय सत्ता टिकून राहावी; आणि त्या सत्तेचे जिकडे तिकडे पसरलेले नोकर कुठे ती सत्ता लादण्याचा प्रयत्न करतात तर कुठे ती दूर ठेवण्याचा. सार्वजनिक कल्याण वाढविण्यासाठी म्हणून मग त्या सत्तेचा थोडाच उपयोग होतो; जरूर पडेल त्यावेळी राष्ट्राचे संरक्षण देखील ती सत्ता कसेबसे करू शकते. म्हणून प्रकृतीच्या मानाने राजकीय समाज जेव्हा खूप मोठा बनतो त्यावेळी वर उभारलेल्या संस्थांच्या वजनाखाली तो कोसळून पडेल अशी परिस्थिती निर्माण होते.

उलट, राज्य चिरस्थायी व्हावयाचे तर त्याला पुरेसा आधार हवा हे देखील खरे, तसा आधार असल्याखेरीज राज्याला नेहमीच जे हादरे बसतात त्यांच्यापुढे त्याला टिकाव

धरता येणार नाही आणि स्वतःचे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी ज्या गोष्टी कराव्या लागतात त्यादेखील त्याला करता येणार नाहीत. प्रत्येक राष्ट्रामधे जिला केंद्रापसारी ( centrifugal ) असे म्हणता येईल अशी प्रवृत्ती असते; ती विशेषकरून परराष्ट्रसंबंधात दृष्टीस पडते. प्रत्येक गट आपला मोठेपणा प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करतो व त्यामुळे शेजाऱ्यांचे नुकसान होते; देकार्ते याच्या ( Vortices ) सारखे त्यांचे वर्तन असते. म्हणून दुबळी राष्ट्रे गिळंकृत केली जातील अशी मोठी धास्ती असते. आजूबाजूच्या राष्ट्रांशी सत्तेचा समतोल साधला जातो त्याच वेळी राष्ट्राला आपले अस्तित्व टिकवता येते. याचाच अर्थ हा की विवक्षित भूभागामधे सत्तेचे दडपण हे सर्वसाधारणपणे सारखे असले पाहिजे.

मी जे आतापर्यंत म्हटले आहे त्यावरून हे स्पष्ट होईल की प्रसार व एकत्रीकरण या दोन्ही गोष्टींचे समर्थन करता येते आणि त्या दोन गोष्टींचे कोणत्या प्रमाणात मिश्रण करून समाजाचे जीवन सुरक्षित करता येईल हे ठरविणे यातच मुत्सद्याचे खरे कौशल्य आहे. अंतर्गत सुव्यस्थेविषयीच्या विचारांच्या मानाने आंतरराष्ट्रीय संबंधांना दुय्यम स्थान दिले पाहिजे, हा एक सर्वसाधारण असा नियम मानता येईल. आंतरराष्ट्रीय संबंधांचे महत्त्व सापेक्ष आहे तर अंतर्गत सुस्थितीचे महत्त्व निरपवाद आहे. सुदृढ आणि निरोगी अवस्था ही पहिली गरज आहे; चांगल्या शासनामुळे जे चैतन्य निर्माण होते ते प्रदेशाच्या विस्तृत वाढीमुळे मिळणाऱ्या साधनापेक्षा जास्त उपयुक्त ठरते.

काही राज्ये अशा प्रकारची बनलेली असतात की जिवंत राहण्यासाठीच त्यांना पर-राष्ट्रावर स्वाऱ्या कराव्या लागतात. जिवंत राहावयाचे तर स्वतःच्या सत्तेच्या प्रसाराचाच त्यांना सतत विचार करावा लागतो. ही जी आनंददायक अशी आवश्यकता आहे तिच्याबद्दल त्यांनी वाटल्यास स्वतःचे अभिनंदन करावे; पण त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की, वाढ खुंटताच विनाशाचे संकट त्यांच्यापुढे अटळपणे उभे राहील.

## प्रकरण १०

# लोकांविषयी ( चालू )

राजकीय समाजाकडे दोन दृष्टींनी पाहता येईल : प्रदेशाच्या विस्ताराच्या दृष्टीने किंवा लोकांच्या संख्येच्या दृष्टीने आणि प्रदेशाचा विस्तार व लोकांची संख्या यांच्यामधील प्रमाणावर राज्याचा योग्य आकार अवलंबून असतो. लोकांनी राज्य बनते. परंतु त्यांना अन्न व इतर आवश्यक वस्तू मिळतात त्या जमिनीकडून. जमीन जेव्हा लोकांना पुरेसा खाद्यपुरवठा करू शकते आणि जमिनीच्या उत्पादनाचा पुरा उपयोग होईल एवढी लोकांची संख्या असते तेव्हा आदर्श व्यवस्था निर्माण झाली असे म्हणता येते. या दोन्ही गोष्टींचा नीट मेळ बसतो तेव्हाच अमुक एका संख्येच्या रहिवाशांना आपले अधिकात

अधिक सामर्थ्य संपादन करता आले असे सांगता येते. लोकसंख्येच्या मानाने प्रदेश मोठा असल्या तर त्याचे संरक्षण हे एक ओझेच होते; शेतजमिनीची पुरी मशागत होत नाही आणि नैसर्गिक वस्तूंचे जरूरीपेक्षा अधिक उत्पादन होते. अशा परिस्थितीत संरक्षणात्मक लढायांचे मूळ असते. याच्या उलट लोकसंख्येच्या निर्वाहाची सोय होणार नाही इतका प्रदेश लहान असतो. त्या वेळी आजूबाजूच्या लोकांच्या मर्जीवर त्या प्रदेशातील रहिवाशांना अवलंबून राहावे लागते. कारण आपल्याजवळ ज्या वस्तू नाहीत त्या त्यांना शेजाऱ्याकडूनच मिळवाव्या लागतात आणि त्यामुळेच आक्रमक लढाया घडून येतात. परिस्थितीमुळे ज्या देशाला व्यापार किंवा युद्ध यांचा अवलंब करावा लागतो तो देश खऱ्या अर्थाने दुबळाच असतो. त्याला शेजाऱ्यावर अवलंबून राहावे लागते आणि परिस्थितीवर; त्याचे अस्तित्व संकटाकुल आणि अल्प असते. त्याऱ्या करून त्याला आपली परिस्थिती तरी बदलावी लागते किंवा पराजित होऊन तो नष्ट होतो. देश योग्य तितका लहान असला किंवा योग्य तितका मोठा असला तरच तो स्वतंत्र राहू शकतो.

प्रदेशाचा विस्तार व लोकांची संख्या यांच्यामधील निश्चित प्रमाण ठरवणे अशक्य आहे. जमिनीचा मगदूर वेगवेगळा असतो, काही इतरांपेक्षा अधिक सुपीक असतात, तसेच उत्पन्नाची तऱ्हा एकच नसते आणि हवामानाचे परिणामही कायम स्वरूपाचे नसतात. तसेच पृथ्वीच्या वेगवेगळ्या भागांवर राहणाऱ्या लोकांचे स्वभावही एकसारखे नसतात. काहींना उत्तम जमिनीतून चांगले उत्पन्न काढता येत नाही, तर काही साधने हल्क्या दर्जाची असतानाही डोळ्यात भरेल अशी निर्मिती करू शकतात. स्त्रियांच्या जननक्षमतेचाही विचार करायला हवा; तसेच हवामानाचा लोकांवरील परिणाम आणि कायद्यामुळे घडून येणारा फायदा आणि तोटा यांचाही विचार करायला हवा. सुबुद्ध राज्यकर्ता एखाद्या घडीला जे दिसते त्यावरून आपले मत बनवत नाही, तो पुढे काय होईल याचा अंदाज घेऊन त्यानुसार आपले मत बनवतो. कामाला सुरवात करताना लोक ची जी संख्या असते ती तो गृहीत धरून चालत नाही; पुढच्या एखाद्या काळात ती किती होईल हे तो डोळ्यापुढे ठेवतो. अनेक वेळा असे घडून आलेले दृष्टीस पडते की प्रदेशाच्या नैसर्गिक वैशिष्ट्यामुळे त्याच्या मर्यादा सुरवातीला इष्ट वाटले त्यापेक्षा अधिक विस्तृत करणे शक्य होते एवढेच नव्हे तर आवश्यक बनते. उदाहरणार्थ, डोंगराळ मुलुखात लोकसंख्येची घनता ( Population density ) पुष्कळ कमी असू शकते, कारण तिथे लाकडे आणि कुरणे फार श्रम न करता मिळू शकतात व स्त्रियांची जननक्षमता सपाट प्रदेशातील स्त्रियांपेक्षा जास्त असते, असे अनुभव सांगतो आणि तिथे डोंगरांच्या उतारावर झाडे व पिके वाढण्यासाठी जी सपाट जमीन हवी ती फारशी आढळत नाही. याच्या उलट, खडक आणि वाळू भरपूर आहे अशा समुद्रालगतच्या बऱ्याचशा नापीक प्रदेशात लोक एकत्र येऊन राहतात. जमिनीतून मिळणाऱ्या वस्तूंची वाण मच्छीमारीने भरून काढली जाते, चाचेगिरी करणाऱ्यांचा बंदोबस्त करावयाचा तर लोकांना जवळ जवळ एकत्र येऊन राहणे आवश्यक असते, आणि वसाहतीमधे माणसे पाठवून लोकसंख्येतील वाढीचा प्रश्न सोडवता येतो.

राष्ट्राच्या उभारणीच्या वेळी ज्या गोष्टींचा विचार होतो त्यांमधे आणखी एका गोष्टीची भर टाकली पाहिजे. तिच्यामुळे इतर गोष्टींची आवश्यकता कमी होत नाही, परंतु ती नसेल तर इतर गोष्टी असून भागणार नाही. मला निर्देश करावयाचा आहे ती गोष्ट म्हणजे निश्चित असा शांततेचा काळ. प्राथमिक अवस्थेत राज्याची परिस्थिती नव्याने बनवलेल्या सैन्याच्या तुकडीसारखी असते. इतर कोणत्याही काळापेक्षा सुरवातीच्या काळात ती अधिक दुबळी असते व प्रतिकार करता येणार नाही अशी तिची अवस्था असते. जिकडे तिकडे गोंधळ असतो त्यावेळी प्रतिकार शक्य असतो, परंतु सुरवातीच्या अस्वस्थतेच्या काळात ज्यावेळी प्रत्येक मनुष्य समाजांतर्गत कार्यांत गुंतलेला असतो आणि बाहेरून येणाऱ्या संकटाबद्दल विचार करायला कुणालाही फुरसत नसते त्यावेळी प्रतिकार करणे अधिक कठीण असते. अशावेळी युद्ध, दुष्काळ अगर राजद्रोह (redition) घडून आला तर राज्य उलथून पडणे अटळ ठरते.

अशा अडचणीच्या काळात देखील शासनयंत्रणा उभारली जाते, परंतु ती शासनयंत्रणा अशी असते की जिच्यामुळे राज्यच मुळी नष्ट होते. अंतर्गत अडचणींच्या काळाचा राज्य बळकावणारे फायदा घेतात आणि शांतचित्त असताना लोकांनी ज्यांना कधीही मान्यता दिली नसती असे विध्वंसक स्वरूपाचे कायदे करण्यासाठी सार्वजनिक घबराटीचा उपयोग करून घेतात. सत्ता प्रस्थापित करण्यासाठी निवडलेल्या इतिहासातील नेमक्या क्षणांवरून खरे कायदे करणारे जे असतात त्यांचे काम आणि जुल्मी राज्यकर्त्यांचे (Tyrant) काम यांच्यामधील फरक दाखविता येतो.

मग कायदे करण्यासाठी कच्चा माल म्हणून ज्यांचा उपयोग करता येईल असे लोक कोणते ? ज्यांच्यामधे समान हितसंबंधांचा अगर सर्वमान्य संकेतांचा बंध आहे, पण शासनयंत्रणेचे जू ज्यांनी अद्याप आपल्या खांद्यावर घेतलेले नाही, ज्यांच्या चालीरीती व लोकभ्रम फार खोलवर रुजलेले नाहीत व आकस्मिक परचक्रामुळे ज्यांची दाणादाण होईल अशी धास्ती नाही. शेजाऱ्यांच्या भांडणात सामील न होता ज्यांना प्रत्येक शेजाऱ्याविरुद्ध एकट्याने उभे राहता येईल किंवा एखाद्याने हल्ला केला तर त्याच्या प्रतिकारासाठी दुसऱ्याला आपल्या मदतीला बोलावता येईल. ज्यांच्यामधे आपल्या बांधवांची प्रत्येकाला जातीने ओळख आहे आणि पेलता येणार नाही असे ओझे ज्यांनी कुणावरही लादलेले नांही. जे दुसऱ्या राष्ट्रावर अवलंबून नाहीत व ज्यांची दुसऱ्या राष्ट्रांना आवश्यकता नाही.[1]

---

१. दोन शेजारी राष्ट्रांपैकी एक दुसऱ्यावर अवलंबून राहणारे असले की एकाला फार कठीण व दुसऱ्याला मोठी धोक्याची अशी परिस्थिती निर्माण होते, अशा वेळी सुबुद्ध राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राला त्याच्या परावलंबनातून मुक्त करण्याची तावडतोब सोय करते. मेक्सिकोच्या साम्राज्यामधे श्लासकाला (Thlascala) प्रजासत्ताकाचा जो लहानसा प्रदेश होता त्याने मेक्सिकन लोकांकडून मीठ खरेदी करण्याऐवजी किंवा ते भेट म्हणून

जे गरीबही नाहीत व श्रीमंतही नाहीत, पण स्वयंपूर्ण आहेत आणि शेवटी ज्यांच्यात पुरातन समाजाचे स्थैर्य व नूतन समाजाचा सालसपणा यांचा संगम साधलेला आहे. कोणत्या नवीन संस्था स्थापन करावयाच्या याच्यापेक्षा कोणत्या जुन्या संस्था नष्ट करावयाच्या हे ठरविणे कायदे करणाराला मोठे कठीण जाते. या कामामधे यश क्वचितच लाभते. कारण सामाजिक संघटनेसाठी ज्या गोष्टी आवश्यक त्यांची आणि मनाच्या साधेपणाची जोड साधणे फार कठीण असते. या सर्व गोष्टी एकसमयावच्छेदेकरून विद्यमान असणे सोपे नाही हे कुणालाही कबूल करावे लागेल. त्यामुळेच चांगले शासन असलेली राज्ये अधिक दृष्टीस पडत नाहीत.

युरप खंडात अद्याप एक देश असा आहे की जिथे कायदे करणे शक्य आहे. तो देश म्हणजे कॉर्सिका बेट. तिथल्या शूर लोकांनी मोठ्या धैर्याने आणि निश्चयाने आपले स्वातंत्र्य परत मिळवले व त्याचे रक्षण केले. म्हणून एखाद्या सुबुद्ध माणसाने ते कायम कसे टिकवायचे याची त्यांना शिकवण देणे अगत्याचे आहे. तो मान त्यांनी मिळवला आहे. हे छोटे बेट एक दिवस युरपला आश्चर्यचकित करील अशी माझी कल्पना आहे. मला तशी पूर्वसूचना मिळाली आहे असे देखील म्हणता येईल.

## प्रकरण ११

# कायद्याच्या अनेकविध पद्धतींविषयी

कायद्याच्या प्रत्येक संप्रदायाचे उद्दिष्ट जे सर्वांचे अधिक सुख ते सुख कशात असते याचा जर आपण शोध घेतला तर त्याचे दोन मुख्य भाग आहेत असे दृष्टीस पडेल : एक स्वातंत्र्य व दुसरा समता. स्वातंत्र्य, कारण मनुष्य परतंत्र असला की राज्य त्याच्या शक्तीच्या काही एका भागाला मुकते; समता, कारण समतेखेरीज स्वातंत्र्य शक्य नाही.

नागरी स्वातंत्र्याच्या स्वरूपाचे मी अगोदरच वर्णन केले आहे. आता मी समते-कडे वळतो. हा शब्द मी वापरतो त्यावेळी सत्ता आणि संपत्ती सर्वांना अगदी सारखी असली पाहिजे असा माझा अर्थ नसतो हे प्रत्येकाने स्पष्टपणे ध्यानात ठेवावे. माझा अर्थ एवढाच की सत्तेला हिंसेचा आधार असू नये आणि ती वापरली जावी ती केवळ प्रतिष्ठा

मिळवण्याऐवजी ते साम्याचेच सोडून दिले. श्लासकालाच्या सुबुद्ध जनतेने औदार्याच्या पाठीशी दडलेला डाव ओळखला. त्यांनी आपले स्वातंत्र्य कायम ठेवले आणि मोठ्या साम्राज्याच्या कोंडीत सापडलेले लहान राज्य असतानाही अखेरीला त्या साम्राज्याचा नाश घडवून आणण्यात भाग घेतला.

( rank ) आणि कायदा यांच्या आधाराने. तसेच संपत्ती इतकी गडगंज असू नये की माणसाला आपल्या शेजाऱ्याला विकत घेता येईल आणि तिचा इतका अभाव असू नये की माणसाला स्वतःला विकावे लागेल.[१] मोठया माणसाजवळ मालमत्ता आणि पत प्रमाणशीर असावी व गरीब मंडळींच्या ठिकाणी लोभ आणि हाव नसावी.

अशी समता हे एक बाऱ्यावरील दिवास्वप्न आहे आणि ती प्रत्यक्षात नांदणे शक्य नाही असे म्हटले जाईल. असा तर याचा अर्थ नाही ना की दुराचार घडून येणार म्हणून त्यांचे नियंत्रण देखील करू नये? परिस्थितीच्या दडपणामुळे समतेचा नेहमीच नाश होण्यासारखी अवस्था असते म्हणूनच ती कायम राहावी या दिशेने कायद्याचे बळ वापरावे लागते.

चांगल्या राज्यव्यवस्थेची ही सर्वसाधारण तत्त्वे प्रत्येक देशामधे स्थानिक परिस्थिती व लोकांचे स्वभावमान पाहून बदलणे आवश्यक असते. जे भेद असतात त्यांना अनुरूप अशी व्यवस्था शोधली पाहिजे. निरपवादपणे ती उत्तम आहे असे म्हणता आले नाही तरी ज्या देशात ती उपयोगात आणली जाणार आहे त्या देशाच्या मानाने ती उत्तम असली पाहिजे. उदाहरणार्थ, जमीन खडकाळ व नापीक असेल व लोकसंख्येच्या मानाने देश लहान असेल, तर उद्योग आणि कला यांना उत्तेजन देणे योग्य ठरेल. हेतू हा की तयार केलेल्या मालाच्या बदल्यात हवे असलेले अन्नधान्य मिळवता यावे. उलट समृद्ध सपाट प्रदेश आणि डोंगरांच्या उतारावरील सुपीक जमिनी यांचा शक्य तेवढा फायदा घ्यावा. जिथे जमीन सुपीक असेल आणि लोकसंख्या कमी असेल, तिथे शेतीवर सर्व प्रयत्न केंद्रित करावे, त्या प्रयत्नामुळे जन्मांच्या प्रमाणातही वाढ होते. कलाकुसरीचे काम ( arts ) निषिद्ध मानावे; कारण त्याच्या योगाने माणसांची जी कमतरता आहे ती, माणसे ठराविक ठिकाणाकडे आकर्षित झाल्यामुळे वाढते.[२] समुद्रकाठचा जो लांबलचक व सोईचा प्रदेश असतो तिथे पुरेशी वसाहत होईल अशी सोय करावी. असा प्रदेश असेल तर जहाजांचे काफिले तयार करावे आणि व्यापार व समुद्रपर्यटण यांना उत्तेजन द्यावे. अशा समुद्रकाठच्या

१. मजबूत व टिकाऊ राज्य हवे असेल, तर संपत्तीचा अतिरेक नांदणार नाही अशी व्यवस्था केली पाहिजे. लाखोपती व भिकारी दोघेही नसावेत. दोघे अभेदाने वावरतात आणि सार्वजनिक हिताला दोघेही मारक ठरतात. राजांना जुल्मी बनवणारे एकामुळे निर्माण होतात तर दुसऱ्यामुळे जुल्मी राजेच निर्माण होतात. ते विद्यमान असतात तिथे स्वातंत्र्य ही एक देवघेवीची वस्तू बनते. श्रीमंत ते विकत घेतात, गरीब ते विकतात.

२. मौंसे द अर्गेनसन म्हणतो की, परराष्ट्रीय व्यापारामुळे होणारा फायदा वरवरचा असतो; खरा नसतो. त्याच्यामुळे काही व्यक्ती व फार फार तर काही शहरे श्रीमंत होतात. पण देशाचा असा फायदा होत नाही आणि त्याच्यामुळे लोकांची परिस्थितीही सुधारत नाही.

समाजांचे जीवन उज्ज्वल असते, पण ते थोडा काळ टिकते, समुद्राच्याभोवती खडक असले आणि जमिनीवर सहजासहजी पोचता येण्यासारखे नसले, तर प्राथमिक अवस्थेत राहून मासावर जीवननिर्वाह करणे अधिक बरे. अशा ठिकाणी राहणारांचे जीवन शांत असेल, अधिक चांगले असेल व कदाचित् इतरांपेक्षा जास्त सुखाचेही असेल. थोडक्यात म्हणजे सर्व राष्ट्रांना लागू पडतील असे काही सामान्य नियम सोडले तर प्रत्येक वेगळ्या समाजाची त्याच्या परिस्थितीमुळे जीवनाची एक वेगळा खास तऱ्हा बनते आणि त्या अवस्थेला अनुरूप असे राज्यव्यवहाराचे नियम ठरतात. हे लक्षात घेऊन जुन्या काळातील ज्यू लोकांनी आणि अलीकडे अरब लोकांनी धर्म हेच आपल्या विचाराचे मुख्य उद्दिष्ट ठरविले; अथेन्सने वाङ्मयाला मुख्य उद्दिष्ट मानले, तर टायर व कार्थेजने व्यापार, ऱ्होड्सने दर्यावर्दीपणा आणि रोमने सदाचार अशी उद्दिष्टे मानली गेली. ल् एस्प्रिट द लॉय ( L'Esprtides Lois ) च्या लेखकाने अशी अनेक उदाहरणे दिली आहेत की, ज्यांच्यावरून कायदे करणारा ही वेगवेगळी उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने आपल्या देशाला मार्गदर्शन करण्यासाठी कोणाचे कसब वापरतो ते लक्षात यावे.

काळजीपूर्वक फेरबदल केल्यामुळे नैसर्गिक परिस्थिती व माणसाने बनवलेले कायदे यांचा सर्वोदित चांगला मेळ बसतो असे असेल तरच राज्य भक्कम व चिरस्थायी आहे असे म्हणता येईल. मेळ इतका चांगला असला पाहिजे की माणसाने बनवलेले कायदे नैसर्गिक परिस्थितीचे केवळ समर्थन करत आहेत किंवा तिचे अनुकरण करून तिच्यामधे थोडा-बहुत बदल घडवून आणीत आहेत असे म्हणता यावे. परंतु याऐवजी स्वतःच्या उद्दिष्टाबद्दल साशंक असणाऱ्या कायदे करणाराने ज्यांच्यासाठी कायदे करावयाचे त्यांच्या स्वभावधर्माकडे दुर्लक्ष केले आणि गुलामगिरीला योग्य अशा परिस्थितीत स्वातंत्र्य लादण्याचा प्रयत्न केला, अगर जिथे लोकसंख्येच्या प्रभाकडे लक्ष पुरवायला हवे तिथे संपत्तीच्या वाढीला उत्तेजन दिले, अगर जिथे शांतीचे धोरण स्वीकारणे आवश्यक तिथे आक्रमक युद्धाच्या योजना आखल्या, तर कायद्यांची सत्ता न कळत कमी होईल, समाजाच्या घटनेमधे अनिष्ट फेरबदल घडून येतील आणि अस्वस्थता इतकी वाढेल की राज्याला विनाश वा परिवर्तन या दोहोंपैकी एकाची निवड करावी लागेल. निसर्गाचा कधीही पराभव करता येत नाही; त्याचे साम्राज्य पुन्हा प्रस्थापित होईल.

## प्रकरण १२

# कायद्यांचे वर्गीकरण

समाज ( Commonwealth ) चांगल्या प्रकारे संगठित करावयाचा तर अनेक संबंधांचा विचार करावा लागेल आणि सर्वांच्या हिताची जी योजना असेल तिचा स्वीकार

करावा लागेल. सुरवातीला राजकीय समाजाचे स्वतःवरच कोणते परिणाम घडून येतात त्यांचा विचार करावा लागेल. दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचे म्हणजे समग्राचे समग्राशी संबंध कोणते अगर राजाचे ( sovereign ) राज्याशी संबंध कोणते यांचा विचार करावा लागेल. या संबंधांमधे मध्यंतरीचे जे दुवे ( intermediate terms ) असतात त्यांचेही संबंध येतात. ते कसे ते पुढे दाखविले आहे.

हे संबंध निश्चित करणारे जे कायदे त्यांना राजकीय अगर मूलभूत कायदे असे म्हणतात आणि ते शहाणपणाने तयार केले गेलेले असतील तर ते वर्णन योग्य आहे असे म्हणता येते. प्रत्येक राज्यामधे नियमनाचा जर एकच चांगला मार्ग असेल, तर ज्या लोकांनी तो शोधून काढला त्यांनी तोच कायम ठेवावा. परंतु प्रस्थापित व्यवस्था जर वाईट असेल, तर ज्या कायद्यामुळे ती व्यवस्था चांगली होण्याच्या मार्गात अडथळे निर्माण होतात ते कायदे मूलभूत स्वरूपाचे आहेत असे आपण का मानावे ? खेरीज, प्रत्येक समुदायाला कायदे, ते चांगले असले तरी, बदलण्याचा अधिकार हा केव्हाही असतोच. कारण, स्वतःला इजा करून घ्यावी असे जर त्यांना वाटत असेल तर ते त्यांनी करू नये असे बंधन त्यांच्यावर कोणत्या अधिकाराने घालता येईल ?

राज्याचे घटक यांच्यामधील आपआपसातील संबंध किंवा ते आणि राजकीय समाज यांच्यामधील संबंध हा संबंधांचा दुसरा गट. पहिल्या तऱ्हेचे संबंध शक्य तेवढे संकुचित असावे व दुसऱ्या तऱ्हेचे संबंध शक्य तेवढे व्यापक असावेत. प्रत्येक नागरिक शेजाऱ्यांशी असलेल्या संबंधात पुरा स्वतंत्र असावा, पण नगरावर ( City ) मात्र तो पुरा अवलंबून असावा. हे घडून येते ते एकाच पद्धतीने. राज्य बलवान असते तेव्हाच नागरिक स्वतंत्र असतात. हा जो दुसऱ्या तऱ्हेचा संबंध आहे त्यातून नागरी कायदा ( Civil law ) निर्माण होतो.

व्यक्ती आणि कायदा यांच्यामधे एक तिसऱ्या प्रकारचा संबंध असतो असे प्रतिपादिता येईल. हा संबंध म्हणजे दंडाई आज्ञाभंगाचा. त्यामुळे फौजदारी कायदा निर्माण होतो. काटेकोरपणे बोलावयाचे म्हणजे फौजदारी कायदा हा कायद्याचा वेगळा स्वतंत्र भाग नसून इतर सर्व कायद्यांतील दंडयोजनेचा भाग आहे.

कायद्यांचे हे जे तीन भाग आहेत त्यांमधे एका चवथ्या भागाची भर घातली पाहिजे; आणि तो भाग इतरांपेक्षा जास्त महत्त्वाचा आहे. तो कायदा संगमरवरी खांबावर किंवा ब्रॉंझच्या पटावर कोरलेला नसतो; तो कोरलेला असतो नागरिकांच्या हृदयावर. राज्य उभारले जाते त्याचा खरा पाया असतो तो कायदा. दिवसागणिक त्याचे महत्त्व वाढत जाते. इतर कायदे जेव्हा जुने व दुबळे बनतात त्या वेळी तो त्यांना नवीन जीवन देतो आणि त्यांनी ठेवलेली पोकळी तो भरून काढतो. ( Fills the gaps they have untenanted ) राज्याच्या निर्मात्याची भावना तो लोकामधे जिवंत ठेवतो आणि कुणाच्याही न कळत सत्तेच्या वापराऐवजी सवयीने लोकांना नियम पाळायला शिकवतो. रीतीभाती, रूढी आणि लोकमत यांचा मी निर्देश करीत आहे. राजकारणी पुरुषांना या

सूत्राची माहिती नसते; परंतु इतर गोष्टींचे यश अवलंबून असते ते या गोष्टीवर. केवळ फुटकळ गोष्टींचाच विचार करतो आहे असे दृष्टीस पडले तरी, मोठा कायदे करणारा या गोष्टींचाच नेहमी खाजगी रीतीने खूप विचार करत असतो. फुटकळ गोष्टी या कमानी-सारख्या असतात; रीतीभाती हळूहळू बनत जातात; पण कमानीच्या मध्य दगडा-( Key-stone ) सारख्या त्या असतात आणि तो मध्य दगड नसला तर कमान उभी राहू शकत नाही.

कायद्याच्या या वेगवेगळ्या भागांपैकी, शासनाचे स्वरूप निश्चित करणारे जे राजकीय कायदे त्यांचाच माझ्या विषयाशी संबंध आहे.

* * *

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/१०/२
मंत्रालय.

# पुस्तक ३

## प्रकरण १

## सर्वसाधारण शासनाविषयी

शासनाच्या वेगवेगळ्या पद्धतीविषयी ( Forms ) बोलण्यापूर्वी शासन या शब्दाचा निश्चित अर्थ ठरवण्याचा आपण प्रयत्न करू या, कारण अद्यापपावेतो त्याचे चांगले स्पष्टीकरण कुणीही केलेले नाही.

वाचकाने या प्रकरणाचा सावकाश आणि मनःपूर्वक विचार केला पाहिजे अशी मी सूचना देऊन ठेवतो. एकचित्ताने या विषयाचे मनन करणाराखेरीज इतरांना माझा अर्थ स्पष्ट करून सांगण्याइतके कौशल्य माझ्याजवळ नाही.

स्वतंत्र कृती घडण्यासाठी दोन कारणे एकत्र यावी लागतात. एक नैतिक, म्हणजेच इच्छा, जिच्यामुळे कृती घडून येते; आणि दुसरे शारीरिक, म्हणजेच शक्ती, जी कृती प्रत्यक्षात घडवून आणते. एखाद्या इच्छित स्थळाकडे मी जेव्हा चालत जातो, तेव्हा प्रथमतः मी तिकडे जाण्याचे मनाशी ठरवतो आणि त्यानंतर मला तिकडे घेऊन जाण्याची शक्ती माझ्या पायांत असली पाहिजे. अर्धांगाने आजारी असलेला मनुष्य धावू इच्छील व निरोगी मनुष्याला धावावे असे वाटणार नाही. दोन्ही बाबतींत परिणाम एकच येईल आणि तो म्हणजे दोन्ही माणसे आहेत तिथेच राहतील. राजकीय समाजामधे त्याच तऱ्हेच्या कृतीच्या प्रेरणा असतात आणि त्याच्याबद्दल बोलत असताना तशाच तऱ्हेचा शक्ती आणि इच्छा यामधील फरक करता येईल. इच्छेला कायदे करणारी सत्ता मानता येईल तर शक्ती म्हणजे कार्यकारी सत्ता. दोघांचा मेळ झाल्याखेरीज कोणतीही गोष्ट करता येणार नाही व करू नये.

कायदे करण्याची सत्ता लोकांच्या हाती असते व ती दुसऱ्या कुणाच्याही हाती असू नये हे आपण पूर्वीच पाहिले आहे. आतापर्यंत जी तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत त्यांच्यावरून हे ध्यानात येईल की, कार्यकारी सत्ता ही कायदे करणाऱ्या व वरिष्ठ स्वरूपाच्या सर्वसाधारण जनतेच्या ठिकाणी ठेवता येत नाही. तिचे कार्यक्षेत्र असते ते विवक्षित कृती-पुरते. त्या कृती कायद्याच्या कार्यक्षेत्रात घडत नाहीत म्हणूनच कायदे करणे हेच ज्या सार्वभौम सत्तेचे कार्य त्याच्याही कार्यक्षेत्रात त्या पडत नाहीत.

म्हणूनच राजकीय समाजाची जी शक्ती असते ती योग्य तो प्रतिनिधी ( agent ) नेमूनच वापरता येते. तो प्रतिनिधी सर्वसाधारण इच्छेच्या आज्ञांच्या अनुसारे त्या शक्तीचे कृतीमधे रूपांतर करतो, राज्य आणि सार्वभौम सत्ता यांच्यामध्ये त्याच्या मार्फतीने परस्पर संवाद घडून येतो आणि माणसामधे मन आणि शरीर यांच्या संयोगाने जे कार्य घडून येते ते तो सार्वजनिक हितासाठी राजकीय समाजामधे करत असतो. म्हणूनच राज्याला शासनाची

आवश्यकता असते. शासन शब्दाचा चुकीने सार्वभौम सत्ता असा अर्थ केला जातो. खरे पाहिले तर शासनाला सार्वभौम सत्तेचा केवळ मंत्री म्हणून काम करावयाचे असते.

मग, शासन म्हणजे काय ? प्रजा आणि राजा यांच्यामधे संवाद घडवून आणण्यासाठी निर्माण केलेली ती एक मधली ( intermediate ) संस्था आहे. कायद्यांची अंमलबजावणी व नागरी आणि राजकीय स्वातंत्र्याचे संरक्षण हे काम तिच्याकडे सोपवलेले असते.

शासनाच्या कार्यकर्त्यांना मॅजिस्ट्रेटस् किंवा राजे ( Kings ) किंवा राज्यकर्ते ( Governors ) असे म्हणतात. आणि त्या संस्थेला राजपुरुष [1] ( Prince ) असेही नाव दिले जाते. म्हणून जी मंडळी असे म्हणतात की लोकांचे राज्यकर्त्यांला मान्यता देण्याचे कृत्य म्हणजे करार नव्हे; त्यांच्या म्हणण्यात बरेच सत्य आहे. खरे म्हणजे ते कृत्य म्हणजे एक सोपवलेले काम ( Commission ) आहे. ती म्हणजे एक नोकरी आहे. ज्या नोकरीत सार्वभौम सत्तेचे सरळ अधिकारी म्हणून राज्यकर्ते त्या सत्तेच्या नावाने सोपवलेल्या अधिकारांचा उपयोग करत असतात. सार्वभौम सत्ता मर्जीस येईल त्याप्रमाणे त्या अधिकारावर मर्यादा घालू शकते. ते बदलू शकते किंवा ते परत घेऊ शकते. समाज ज्या कारणासाठी प्रस्थापित झाला त्या कारणाशी विसंगत होईल म्हणून, सार्वभौम सत्तेला तो अधिकार कुणालाही कायमचा देऊन टाकता येत नाही.

म्हणून शासन अगर उच्चतम राज्यव्यवहार म्हणजे कार्यकारी शक्तीचा कायदेशीर वापर असे मी मानतो. आणि राजपुरुष ( Prince ) किंवा ( magistrate ) म्हणजे त्या व्यवहाराची जबाबदारी ज्याच्यावर टाकली आहे तो मनुष्य किंवा ती संस्था.

मधले ( Intermediate ) जे अधिकारी असतात ते शासनाच्या ठिकाणी सापडतात. त्या अधिकाऱ्यांचे जे संबंध असतात त्यांनी पूर्णाचे पूर्णाशी व सार्वभौमाचे राज्याशी नाते जुळते. सार्वभौमाकडून मिळणारे हुकूम शासन लोकांपर्यंत पोचवते. राज्यातील समतोल ( balance ) कायम ठेवायचा, तर बाकीच्या गोष्टी सारख्या आहेत असे गृहीत धरता, शासनाची सर्व मिळून जी सत्ता व कार्य आहे ते लोकांची सत्ता व कार्य यांच्या बरोबरीचे असले पाहिजे. लोक हे एकाच वेळी सार्वभौम असतात आणि प्रजाजनही असतात.

याखेरीज या तीन गोष्टींपैकी कोणतीही एक गोष्ट बदलता येत नाही. कारण समतोल तावडतोब नष्ट होतो. सार्वभौमाने राज्यकारभार चालविण्याचे ठरवले किंवा राजपुरुषांनी कायदे करण्याचे मनात आणले किंवा प्रजाजनांनी हुकूम मानायचे नाकारले तर कायद्याच्या राज्याऐवजी अंदाधुंदी माजेल, इच्छा व शक्ती यांचा मेळ बंद पडेल आणि राज्य विघटनाच्या पंथाला लागून जुलूमशाही सुरू होईल अगर अराजक माजेल. संबंधांच्या

१. जसे व्हेनिसमधे डोज ( Doge ) हजर नसताना मंडळाला ( College ) सेरेनिसिम प्रिन्स ( Serenissime Prince ) असे म्हणतात.

प्रत्येक गटाची स्थापना केवळ एकाच त्या सर्वसामान्य पातळीवर करता येते आणि म्हणून कोणत्याही राज्यात फक्त एकाच तऱ्हेचे चांगले शासन संभवते. परंतु हजारो घटनांमुळे राष्ट्रातील समतोल बदलतो. त्यामुळे वेगवेगळ्या राज्यांना वेगवेगळ्या तऱ्हेची शासने योग्य ठरतात आणि एकाच राज्यामधे देखील वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या तऱ्हेचे शासन योग्य ठरते.

दोन टोकांवरील गोष्टींमधे भिन्न भिन्न तऱ्हेचे संबंध कसे नांदू शकतात, हे मी लोकसंख्येच्या प्रमाणाचे उदाहरण घेऊन दाखवण्याचा शक्य तो प्रयत्न करतो. हे उदाहरण घेण्याचे कारण असे की त्याबद्दल सहज लिहिता येते.

वादासाठी आपण असे गृहीत धरू या की राज्याची लोकसंख्या दहा हजारांची आहे. सार्वभौम पुरुषाचा ( Sovereign ) विचार करावयाचा तो एक सामुदायिक वस्तू, एक दृश्य स्वरूप ( embodiment ) म्हणूनच केला पाहिजे. उलट नागरिकांचा प्रजाजन या नात्याने व्यक्तिशः विचार केला पाहिजे. म्हणून प्रजाजनाला सार्वभौम पुरुष हा दहा हजाराला एक या प्रमाणात असतो. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे राज्यातील प्रत्येक व्यक्तीला सार्वभौमत्वाचा एक-दहा हजारांश भाग लाभतो. सार्वभौमाच्या आज्ञा पाळण्याची जबाबदारी मात्र संपूर्ण असते. लोकांची संख्या एक लाखाची झाली तरी प्रजाजनांच्या परिस्थितीत काहीही फरक पडत नाही. कारण कायद्यांची सत्ता सर्वांवर सारखीच चालते. कायदे बनविण्याच्या कार्यातील व्यक्तीचा हिस्सा मात्र दसपटीने कमी होतो; कारण तिचा भाग आता फक्त एक-लक्षांशाचा असतो. प्रजाजन ही फक्त एक व्यक्ती असते आणि त्यामुळे लोकसंख्या जशी वाढते तसे सार्वभौम पुरुष आणि प्रजाजन यांच्यामधील प्रमाण त्याच हिशेबाने अधिक होते. यावरून निष्कर्ष निघतो तो हा की जितके राज्य मोठे तितके स्वातंत्र्य कमी.

प्रमाण वाढते असे मी म्हणतो त्याचा अर्थ हा की समतेपासून ते दूर जाते. भूमितीच्या दृष्टीने प्रमाण जितके अधिक तितके सर्वांनी मान्य केलेल्या अर्थाच्या दृष्टीने ते कमी असते.

वैयक्तिक नागरिकांच्या इच्छा व सर्वसाधारण इच्छा यांमधील प्रमाण जितके कमी असेल म्हणजेच रूढी आणि कायदा यांच्यामधील प्रमाण जितके कमी असेल त्या प्रमाणात दंडशक्तीचे कार्य वाढत जाते. याचाच अर्थ हा की लोकसंख्या अधिक असेल त्या प्रमाणात शासनाचे कार्य व्यवस्थित रीतीने चालावयाचे तर ते अधिक बलिष्ठ बनावे लागते.

उलट राज्याच्या अधिकारात वाढ झाली की ज्यांच्या हाती विश्वस्त म्हणून सार्वजनिक सत्ता असते त्यांना आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करण्याचा मोह अधिक पडतो आणि तशी संधीही अधिक लाभते. म्हणून नियम असा असावा की ज्या प्रमाणात लोकांना नियंत्रित करण्याचा शासनाला जास्त अधिकार असेल त्या प्रमाणात सार्वभौम

सत्तेला शासनाच्या नियंत्रणाचा अधिकार असावा. निरंकुश सत्ता मला सुचवावयाची नाही; पण शासनाच्या वेगवेगळ्या भागांत जशी सत्ता असेल त्या मानाने.

सार्वभौम सत्ता, शासनप्रमुख ( Prince ) आणि जनता यांच्यामधील सत्तेचे अतूट विभाजन जे या दुहेरी प्रमाणावरून निश्चित होते ते स्वच्छंदी कल्पनेवरून ठरत नाही तर राजकीय समाजाच्या स्वभावधर्मानुसार ठरते. एका कडेची वस्तू जी जनता ती स्थिर आणि एकात्म असल्याकारणाने दुहेरी प्रमाण जेव्हा कमी किंवा अधिक होते त्या वेळी एकेरी प्रमाण तितकेच कमी किंवा अधिक होते आणि त्यामुळे मधली जी वस्तू आहे ( Middle screu ) ती बदलते हे क्रमाक्रमाने येतेच. यावरून हे स्पष्ट व्हावे की राज्यघटनेचा कोणताही एक व निरपवाद असा नमुना असत नाही; राज्याच्या आकारानुसार शासनाचे स्वरूप वेगवेगळे होते.

या पद्धतीला हास्यास्पद ठरविण्यासाठी कुणी असे म्हणण्याचा संभव आहे की योग्य ते प्रमाण शोधून काढून शासनाची यंत्रणा बनवण्यासाठी लोकसंख्येचे ( Square root ) घेतले की काम भागते असे मला म्हणावयाचे आहे. त्याला माझे उत्तर हे की ही संख्यात्मक रीत मी केवळ एक उदाहरण म्हणून सुचवली आहे. ज्या प्रमाणाबद्दल मी बोलतो आहे ते केवळ संख्येवरून ठरवायचे नसून, सर्वसाधारणपणे अनेक कारणांमुळे घडून येणाऱ्या कृतींच्या समुच्चयावरून ठरवायचे असते. हे देखील अधिक सांगितले पाहिजे की शक्य तितक्या कमी शब्दांत माझा आशय व्यक्त करण्यासाठी मी जरी भूमितीतील संज्ञांचा तात्पुरता उपयोग केला असला, तरी नैतिक गोष्टींचा विचार करताना गणिती अनुरूपतेची अपेक्षा ठेवता येत नाही याची मला पुरी कल्पना आहे.

राजकीय समाज मोठ्या प्रमाणावर जसा असतो तसेच शासन लहान प्रमाणावर असते. शासन म्हणजे काही शक्ती अंगी असलेला नैतिक पुरुष. सार्वभौम म्हणून विचार करता ते क्रियाशील असते, राज्य म्हणून विचार करता ते निष्क्रिय असते, एकाच तऱ्हेच्या वेगळ्या संबंधामध्ये त्याची विभागणी करता येते. त्या विभागणीमुळे एक अत्यंत वेगळे प्रमाण ( proportion ) तयार होते, आणि त्यामध्ये आणखी विभागणी करता येते, जसे न्यायदानाचे कार्य इत्यादि इत्यादि. आणि शेवटी एक अविभाजनीय अशी मध्यवर्ती वस्तू उरते, जिला आपण अतिश्रेष्ठ प्रमुख किंवा दंडाधिकारी ( Magistrate ) म्हणू शकू. पूर्णांकांच्या व अपूर्णांकांच्या या श्रेणीमधे एकीकरण घडवून आणणारी अशी वस्तू असते.

संज्ञांच्या अनेकत्वामध्ये गुंतून न पडता राज्यामधील शासन ही एक नवीन संस्था आहे असे आपण धरून चालू. हे शासन जनता व सार्वभौम सत्ता या दोघांहीपासून वेगळे असते आणि त्याचे स्थान दोघांमधले असते.

दोन संस्थांमधील महत्त्वाचा फरक आहे तो हा की राज्य स्वयंसिद्ध असते तर शासनाला आपल्या अस्तित्वासाठी सार्वभौमावर अवलंबून राहावे लागते. जसे कृतीमध्ये व्यक्त होणारी राज्याधिकाऱ्याची इच्छा सर्वसाधारण इच्छेपेक्षा म्हणजेच कायद्यापेक्षा वेगळी नसते व नसावी. त्याच्या हाती जी सत्ता असते ती समाजाची; त्याच्या ठिकाणी एकत्रित झालेली

सत्ता असते. एखादे स्वतंत्र आणि अनियंत्रित असे कृत्य तो करू लागला की राज्य एकत्रित ठेवणारे जे बंध असतात ते सुटू लागतात. आणि शेवटी सार्वभौम सत्तेच्या इच्छेपेक्षा व्यक्ती या नात्याने राज्याधिकाऱ्याची इच्छा अधिक परिणामकारक ठरू लागली आणि त्या वैयक्तिक इच्छेचे पालन होणे भाग पडावे म्हणून तो जर त्याच्या हुकमतीखालील सार्वजनिक शक्तींचा वापर करू लागला तर समाजामधे एकाच वेळी दोन सार्वभौम सत्ता, एक कायदेशीर व दुसरी प्रत्यक्षात विद्यमान असलेली, अस्तित्वात येतील. त्याच्या योगाने सामाजिक एकता आपोआप नष्ट होईल आणि राजकीय समाजाचे विसर्जन होईल.

तरीदेखील, शासनाला एक वेगळी संस्था म्हणून अस्तित्व असावे, राज्यापासून निराळे असे जीवन असावे, शासनाच्या सर्व अधिकाऱ्यांनी आपली कामे एक-मनाने पार पाडावी. आणि जे कार्य करण्यासाठी त्याची स्थापना झाली ते कार्य पुरे व्हावे यासाठी त्याला एक स्वतंत्र व्यक्तित्व असले पाहिजे, सर्व अधिकारी जिच्यामधे सहभागी आहेत अशी एक जाणीव असली पाहिजे आणि ते कायम टिकून राहील अशा तऱ्हेची त्याच्या ठिकाणी सत्ता व स्वतःची अशी इच्छाशक्ती असली पाहिजे. या वैयक्तिक अस्तित्वामुळे परिषदा, मंडळे, प्रश्नांचा विचार करून त्यांच्याविषयी निर्णय घेण्याची पात्रता इत्यादींची आवश्यकता निर्माण होते. तसेच केवळ राज्याधिकाऱ्याच्या अधिकारातील अशा हक्कांची, सन्मानांची आणि सवलतींची आवश्यकता निर्माण होते. आणि जितके ओझे मोठे तितका मोठा मान दंडाधिकाऱ्याला देण्याचीही सोय हवी. खरी अडचण निर्माण होते ती ही की मोठया पूर्णतेमधे ( totality ) ही कनिष्ठ दर्जाची पूर्णता बसवावयाची कशी. आणि ती अशा रीतीने बसवली पाहिजे की सर्वसाधारणपणे घटनेला धक्का न पोचवता तिच्या ठिकाणी जरूर तेवढे सामर्थ्य राहावे आणि तिला जीवंत व वर्धिष्णु राखील अशी जी सत्ता ती तिला कायम ठेवता यावी. ही जी सत्ता आहे ती राज्य कायम ठेवणाऱ्या सार्वजनिक सत्तेपेक्षा वेगळी, म्हणजेच एकाच शब्दात सांगावयाचे तर जनतेच्या हितासाठी शासनाचा बळी देण्याची नेहमी तयारी हवी. शासनाच्या हितासाठी जनतेचा बळी मात्र कधीही दिला जाऊ नये.

अधिक म्हणजे, दुसऱ्या एका कृत्रिम संस्थेने शासन ही कृत्रिम संस्था जरी घडवली असली आणि तिचे जीवन जरी एका तऱ्हेने साधित किंवा परावलंबित व कनिष्ठ दर्जाचे असले, तरी देखील शासनाने आपले कार्य कमीअधिक जोमाने व त्वरेने करू नये आणि त्याने सुदृढ व निरोगी अवस्थेत राहू नये, असे कुणालाही म्हणता येणार नाही. शेवटी, ज्या उद्दिष्टासाठी म्हणून ते स्थापन झाले त्याच्याकडे पुरती पाठ न वळवता त्याला ज्या पद्धतीने ते उभारले गेले ती विचारात घेऊन, त्या उद्दिष्टापासून थोडेफार इकडे तिकडे करता येईल.

राज्याशी शासनाचे जे वेगवेगळे संबंध असतात ते या भिन्नतेतून उद्भवतात. राज्य ज्या नैमित्तिक व विशिष्ट संबंधांमुळे बदलते त्यांच्याशी ते संबंध संवादी असले पाहिजेत. ज्या राजकीय समाजामधे राज्य वाढते त्या समाजातील दोषांनुसार राज्य आणि

शासन यांच्यामधील संबंध बदलले गेले नाहीत तर वस्तुतः उत्तम असलेले शासन देखील अत्यंत दुष्ट ठरण्याची शक्यता आहे.

## प्रकरण २

# राज्याचे वेगवेगळे प्रकार घडविणाऱ्या तत्त्वाविषयी

या भेदांचे कारण स्पष्ट करण्यासाठी जसा मी पूर्वी राज्य आणि सार्वभौम सत्ता यांच्यामधील फरक स्पष्ट केला तसा शासन आणि राज्याधिकारी ( Prince ) यांच्यामधील फरक स्पष्ट केला पाहिजे.

दंडाधिकाऱ्यांची संख्या कमी किंवा जास्त असू शकते. लोकसंख्येच्या वाढीबरोबर सार्वभौम आणि प्रजाजन यांच्यामधील प्रमाण वाढते हे आम्ही पूर्वीच सांगितले आहे. उघड दिसणाऱ्या साम्यावरून असे म्हणता येते की शासन आणि दंडाधिकारी यांच्यामधील प्रमाणाला तोच नियम लागू पडेल.

आता, शासनाची पुरी सत्ता ही राज्याची सत्ता असल्याकारणाने ती बदलत नाही. यावरून असे म्हणता येते की ज्या प्रमाणात शासन आपल्या अधिकाऱ्यावर अधिक सत्ता गाजवील त्या प्रमाणात लोकांवर गाजवण्यासाठी त्याच्याजवळ कमी सत्ता शिल्लक राहील.

परिणामतः दंडाधिकाऱ्यांची संख्या जितकी अधिक तितकी शासनाची सत्ता कमी हा नियम मूलभूत स्वरूपाचा असल्याकारणाने, माझा अर्थ अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो.

दंडाधिकाऱ्याच्या व्यक्तित्वामधे तीन मूलतः भिन्न इच्छांचे प्रकार दाखवता येतात. पहिला प्रकार म्हणजे व्यक्ती या नात्याने त्याच्या ठिकाणी नांदणारी इच्छा. ही इच्छा त्याच्या स्वतःच्या हिताकडेच पाहील. दुसरा प्रकार म्हणजे सर्व दंडाधिकाऱ्यांना समान असलेली इच्छा. ही इच्छा फक्त राजप्रमुखाच्या हिताचाच विचार करील. तिला प्रतिष्ठित ( Corporate ) शासनाची इच्छा म्हणता येईल. शासनाच्या दृष्टीने तिला सर्वसाधारण इच्छा मानता येईल; परंतु ज्या राज्याचा शासन हा भाग आहे त्या राज्याच्या दृष्टीने तिला विवक्षित ( particular ) इच्छा हेच स्थान द्यावे लागेल. तिसरा प्रकार म्हणजे लोकांची इच्छा किंवा सार्वभौम इच्छा. राज्याचा सामग्र्याने विचार करता आणि त्या समग्राचा एक भाग म्हणून शासनाचा विचार करता ही इच्छा सर्वसाधारण इच्छा असते.

उत्तम म्हणजे, विशिष्ट, वैयक्तिक इच्छेचा कायदे करण्यामधे मुळीच भाग असू नये. तसेच शासनाचे कार्य हीच ज्यांची सामुदायिक जबाबदारी त्यांच्या म्हणजेच प्रतिष्ठित शासनसंस्थेच्या इच्छेचाही कायदे करण्यामधे फारच थोडा भाग असावा. परिणामतः

सर्वसाधारण इच्छा हीच प्रभावी राहिली पाहिजे आणि तिचाच इतर सर्वांवर एकमेव अंमल चालला पाहिजे.

नैसर्गिक व्यवस्थेनुसार या वेगवेगळ्या इच्छा जेव्हा एकत्रित झालेल्या असतात तेव्हा त्या अधिक क्रियाशील असतात आणि म्हणून सर्वसाधारण इच्छा सर्वांत अधिक दुबळी असते, शासनसंस्थेची इच्छा त्यानंतर येते आणि व्यक्तींची इच्छा पहिली जागा पटकावते. त्यामुळे शासनात प्रत्येक सभासद प्रथमतः स्वतः म्हणून असतो. दुसऱ्या जागी तो दंडाधिकारी आणि केवळ तिसऱ्या जागी नागरिक म्हणून असतो. सामाजिक व्यवस्थेच्या ज्या गरजा आहेत त्यांना विरोधी अशी ही पद्धत आहे.

शासन एका व्यक्तीच्या हाती असते त्या वेळी व्यक्तीची इच्छा आणि शासन-संस्थेची इच्छा यांच्यामधे पुरा मेळ असल्याचे उत्तम उदाहरण सापडते. याचाच अर्थ हा की शासनाची इच्छा जास्तीत जास्त प्रकर्षाने व्यक्त झालेली अशा वेळी दृष्टीस पडते. इच्छा ज्या प्रमाणात अंतर्भूत झाली असेल त्याच प्रमाणात सत्तेचा वापर होऊ शकतो व शासनाची अनियंत्रित सत्ता बदलत नाही, त्यामुळे शासनाचे सर्वांत अधिक क्रियाशील स्वरूप दृष्टीस पडते ते शासन जेव्हा एका राज्यकर्त्याच्या हाती असेल तेव्हा.

याच्या उलट, कार्यकारी सत्ता आणि कायदे करण्याची सत्ता जिथे एक जागी असते, सार्वभौम आणि राज्यप्रमुख यांचे एकीकरण झालेले असते आणि प्रत्येक नागरिक दंडाधिकारी असतो, अशा वेळी शासनसंस्थेची इच्छा आणि सर्वसाधारण इच्छा यांची गल्लत होते आणि मग पहिल्या इच्छेची कृती दुसऱ्या इच्छेच्या कृतीपुरतीच मर्यादित होते. अशा परिस्थितीत वैयक्तिक इच्छा पुरी बलवान् राहते आणि, शासनाच्या हातात कितीही अनियंत्रित सत्ता असली, तरी त्याची क्रियाशीलता अतिशय कमी होते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे शासनाला कमीत कमी काम उरते.

या गोष्टी नाकारता येणे शक्य नाही आणि इतर विचारांनी माझ्याच निर्णयाचा पाठपुरावा होतो. उदाहरणार्थ, राजकीय समाजात एखादा नागरिक जितका क्रियाशील असतो त्याच्यापेक्षा आपल्या कार्यक्षेत्रात दंडाधिकारी अधिक क्रियाशील असतो. याचा परिणाम असा होतो की व्यक्तीच्या इच्छेचा सार्वभौम सत्तेच्या कृतीपेक्षा शासनाच्या कृती-वर कितीतरी अधिक परिणाम घडून येतो. कारण प्रत्येक दंडाधिकाऱ्यावर शासनाचे एखादे विवक्षित काम सोपवलेले असते, उलट नागरिक व्यक्तिशः सार्वभौम सत्तेचे कोणतेही काम करीत नाही. पुन्हा राज्य जितके मोठे तितकी त्याची खरी सत्ता अधिक असते, ती सत्ता राज्याच्या आकाराच्या प्रमाणात वाढली नाही तरी देखील राज्य आहे तसेच राहिले तर दंडाधिकाऱ्यांची संख्या वाढली तरी बिघडत नाही. अधिकाऱ्यांची संख्या वाढली म्हणून राज्याची खरी सत्ता वाढत नाही, कारण सत्ता ही राज्याची सत्ता असते आणि ती बदलत नाही. म्हणजेच राज्याची कृतिशीलता किंवा सापेक्ष सत्ता वाढते वा कमी होते; त्याची निरपेक्ष किंवा खरी सत्ता मात्र वाढू शकत नाही.

हे देखील खरे की राज्यकारभारात भाग घेणाऱ्या मंडळींची संख्या वाढते त्या

प्रमाणात कारभाराची गती कमी होते. सावधपणाकडे जास्त लक्ष पुरवले की साहसाला महत्त्व दिले जात नाही, येणाऱ्या संधींचा उपयोग केला जात नाही आणि चर्चा खूप झाल्याकारणाने चर्चेचे फळ पदरात पडत नाही.

दंडाधिकाऱ्यांची संख्या वाढते तसे शासन अधिक दुबळे होते हे मी आताच सिद्ध केले. यापूर्वीच मी हे सिद्ध केले आहे की राष्ट्राची लोकसंख्या वाढते तशी शासनाची दमनशक्ती वाढते. प्रजाजन आणि सार्वभौम यांच्यामधे जे प्रमाण असते त्याच्या उलट प्रमाणात शासनामधे दंडाधिकाऱ्यांची संख्या असावी असे यावरून सिद्ध होते. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे असे की राज्य जसे मोठे होते तसे त्याचे शासन अधिक एकसूत्री असावे; म्हणजेच लोकसंख्या जशी वाढेल तशी राज्यकर्त्यांची संख्या कमी व्हावी.

मी इथे शासनाच्या प्रामाणिकपणाबद्दल बोलत नसून, त्याच्या सापेक्ष सत्तेबद्दल बोलत आहे. कारण उलट पक्षी विचार केला तर असे म्हणता येईल की जितके दंडाधिकारी अधिक तितकी शासनाची इच्छा सर्वसाधारण इच्छेशी अधिक जुळती राहील. परंतु जिथे दंडाधिकारी एकच असतो तिथे, मी पूर्वी दाखविल्याप्रमाणे, शासनाची इच्छा एका व्यक्तीच्या इच्छेमधे मिळून जाते. म्हणजेच एका दिशेला जे मिळवले ते दुसऱ्या दिशेला हरवले जाते. राज्याचा जास्तीत जास्त फायदा होईल तो शासनाची शक्ती आणि इच्छा यामुळे; ज्यांचे कमीजास्त होणे नेहमीच एकमेकावर अवलंबून असते, त्यांच्या संयोगाचे प्रमाण साधण्याची अचूक जागा हुडकून काढण्यातच कायदे करणाराचे खरे कौशल्य आहे.

## प्रकरण ३

# शासनाचे वर्गीकरण

गेल्या प्रकरणामधे व्यक्तींच्या संख्येवरून शासनाचे वेगवेगळे प्रकार कसे ठरवता येतात ते आपण पाहिले आहे. हा भेद कसा केला जातो ते या ठिकाणी पाहावयाचे आहे.

पहिल्या प्रकारामधे सार्वभौम सत्ता शासनाची यंत्रणा सर्व लोकांच्या किंवा बहुतेक लोकांच्या हाती सोपवू शकते. या प्रकारामधे राज्याच्या साधारण सभासदापेक्षा दंडाधिकारी म्हणून वावरणाऱ्या नागरिकांची संख्या अधिक असते. शासनाचा हा प्रकार लोकशाही या नावाने ओळखला जातो.

याउलट थोड्याच मागसांच्या हाती शासन असू शकते. या प्रकारामधे राज्याच्या साधारण सभासदांची संख्या दंडाधिकाऱ्यांच्या संख्येपेक्षा अधिक असते. या प्रकाराला उमरावशाही ( aristocracy ) असे म्हणतात.

आणि शेवटी एकाच दंडाधिकाऱ्याच्या हाती सर्व शासन असू शकते. इतर सर्व अधिकाऱ्यांना सत्ता लाभते ती त्याच्यापासून. इतर सर्वांपेक्षा अधिक रूढ असलेल्या या प्रकाराला राजेशाही अगर राजाचे शासन असे म्हणतात.

हे लक्षात ठेवले पाहिजे की हे सर्व प्रकार, विशेषेकरून पहिले दोन प्रकार, बहुविध स्वरूपाचे असतात आणि खरे पाहता ते फार लवचिक असतात. लोकशाही सर्वच जनतेला लागू असते किंवा निम्म्यापुरतीच मर्यादित असते. उमरावशाही निम्म्याइतकी विस्तार पावू शकते किंवा दुसऱ्या पक्षी एखाद्या लहान आणि अनिश्चित संख्येच्या गटापुरती मर्यादित असू शकते. राजेशाहीमधे देखील भागीदारी असू शकते. स्पार्टाच्या राज्यघटनेत दोन राजे नेहमी पदाधिकारी असावेत अशी तरतूद होती आणि रोमन साम्राज्यात काही काही वेळा आठ सम्राटांचे एकाच वेळी राज्य चालू असे आणि त्यामुळे तिथे दुही माजली होती असे म्हणता येत नाही. म्हणजेच शासनाचा प्रत्येक प्रकार एखाद्या क्षणी दुसऱ्या एखाद्या प्रकारात मिसळून जातो आणि उघड होते की शासनाचे जरी केवळ तीनच प्रकार असले तरी प्रत्यक्ष कार्याच्या बाबतीत राज्यामधील नागरिकांच्या संख्येइतकी भिन्न रूपे त्याला स्वीकारावी लागतात.

एवढेच नव्हे. एकाच शासनाचे काही कामासाठी अनेक वेगवेगळे भाग होतात. कारभाराच्या बाबतीत प्रत्येक भागाची वेगवेगळी तऱ्हा असू शकते. तीन मुख्य प्रकारांच्या मिश्रणातून अनेक मिश्र प्रकार निर्माण होऊ शकतात आणि त्या प्रत्येक मिश्र प्रकाराचे मुख्य प्रकाराशी पुन्हा गुणाकार होऊन आणखी अनेक बहुविध प्रकार होऊ शकतील.

शासनाचा उत्तम प्रकार कोणता याबद्दल युगानुयुगे खूप चर्चा झालेली आहे. जे या चर्चेत भाग घेतात त्यांच्या हे नीट लक्षात येत नाही की कोणताही एखादा प्रकार विवक्षित परिस्थितीत उत्तम असेल, पण तोच वेगळ्या परिस्थितीत अतिशय वाईट ठरू शकेल.

वेगवेगळ्या राज्यांत वरिष्ठ दंडाधिकाऱ्यांची संख्या नागरिकांच्या संख्येच्या उलट प्रमाणात असावी हे जर खरे असेल तर निष्कर्ष निघतो तो हा की सर्वसाधारणपणे लहान राज्यांना लोकशाही चांगली ठरावी, मध्यम राज्यांना उमरावशाही व मोठ्या राज्यांना राजेशाही. सर्वसाधारण तत्त्वापासून स्पष्टपणे निष्पन्न होतो तो हा नियम. परंतु अपवाद निर्माण करणाऱ्या ज्या बहुविध घटना आहेत त्यांची नोंद कशी करता येईल?

### प्रकरण ४

## लोकशाहीविषयी

जो कायदा करतो त्यालाच त्याची अमलबजावणी कशी करायची व अर्थ कसा लावायचा ते इतरांपेक्षा अधिक कळते. म्हणून असे दिसते की प्रत्येक चांगल्या राज्य-

घटनेने कार्यकारी-सत्ता व कायदे करण्याची सत्ता यांची सांगड घालवयाची सोय करावी. परंतु अशी सांगड घातल्याने शासनाची कार्यक्षमता कमी होते, कारण ज्या बाबीमधे फरक करायला हवा तो केला जात नाही आणि राज्यप्रमुख आणि सार्वभौम एक झाल्याकारणाने जिथे शासन नाही असे शासन निर्माण होते.

जो कायदा करतो त्यानेच त्याची अंमलबजावणी करणे इष्ट नाही. तसेच लोक-समुदायाचे लक्ष सार्वत्रिक नियमांच्या ऐवजी विवक्षित उदाहरणावर लागून राहणेही इष्ट नाही. खासगी हितसंबंधांचा सार्वजनिक व्यवहारावर दबाव पडावा यापेक्षा अधिक धोक्याची गोष्ट कोणतीही नसेल. कायदे करणाराच्या भ्रष्टाचारापेक्षा शासनाने केलेला कायद्याचा दुरुपयोग कमी आक्षेपार्ह असतो. खासगी हितसंबंधांची जपणूक सुरू झाली की भ्रष्टाचार हा येतोच. ते घडते त्यावेळी राज्याच्या मूलभूत स्वरूपात फरक पडतो व सुधारणा अशक्य होते. शासनाच्या सत्तेचा जे लोक दुरुपयोग करत नाहीत ते आपल्या स्वातंत्र्याचाही कधी दुरुपयोग करणार नाहीत. जे नेहमी उत्तम रीतीने राज्यकारभार चालवतात त्यांना शासनाची गरज भासणार नाही.

शब्दाचा काटेकोर अर्थ लक्षात घेतला, तर खरी लोकशाही कुठेही अस्तित्वात नव्हती आणि असणार नाही. खूप लोकांनी राज्य करावे आणि थोड्या लोकांवर राज्य चालावे हे नैसर्गिक व्यवस्थेच्या विरुद्ध आहे. सार्वजनिक व्यवहारांच्या नियमनासाठी लोक कायमची बैठक भरवून हजर राहतील ही गोष्ट असंभवनीय आहे. आणि त्या कामासाठी, राज्यकारभाराची पद्धत बदलल्याखेरीज, मंडळे स्थापन करणेही शक्य होणार नाही, हे उघड आहे.

खरोखर, मला असे वाटते की जिथे शासनाची कामे वेगवेगळ्या शासकीय संस्थां-मधे वाटली जातात तिथे लहान संस्था आज ना उद्या अधिक सत्ताधारी बनतात असा सामान्य नियम सांगता येईल. त्या अधिक सत्ताधारी बनण्याचे कारण असे की साहजिक-पणेच त्यांना आपले काम जास्त लवकर संपवता येते.

लोकशाही पद्धतीच्या शासनामुळे वेगवेगळ्या घटकांना एकत्र आणणे जरूरीचे असते, ते काम देखील किती कठीण असते. प्रथम म्हणजे सर्व लोकांना विनासायास एकत्र बोलवता येईल एवढे राज्य लहान असले पाहिजे; आणि प्रत्येक नागरिकाला आपल्या सर्व शेजाऱ्यांना ओळखता येईल अशी परिस्थिती असली पाहिजे. दुसरे म्हणजे काम अतिशय कमी निघेल इतक्या चालीरीती सरळ असल्या पाहिजेत आणि कठीण प्रश्न बाजूला ठेवले गेले पाहिजेत. याखेरीज संपत्ती आणि दर्जा या बाबतींत बरीचशी समानता हवी. कारण ती समानता नसेल तर हक्क आणि सत्ता यांच्यामधील समानता फार काळ टिकणार नाही. आणि शेवटी चैनबाजी मुळीच असता कामा नये किंवा फार कमी असली पाहिजे; कारण चैनबाजी श्रीमंतीतून निर्माण होते किंवा तिच्यासाठी श्रीमंतीची आवश्यकता भासते. चैन-बाजीमुळे श्रीमंत आणि गरीब दोघेही भ्रष्ट होतात; श्रीमंत मालमत्तेमुळे आणि गरीब मालमत्तेच्या हव्यासामुळे. डामडौल व आरामाची राहणी यासाठी चैनबाजी देश देखील

विकते. एकाने दुसऱ्याचे गुलाम बनावे व सर्वांनी प्रचलित रूढीचे गुलाम बनावे यासाठी राज्यातील सर्व नागरिकांना ती राज्यापासून हिरावून नेते.

म्हणूनच सदाचार राज्याचा मुख्य आधार आहे असे एका प्रख्यात ग्रंथकाराने म्हटले आहे. कारण जिथे सदाचार असेल तिथेच वर उल्लेख केलेल्या सर्व गोष्टी नांदू शकतात. परंतु जरूर ते भेद लक्षात न घेतल्यामुळे त्या अत्यंत हुशार ग्रंथकाराच्या हातून बऱ्याच चुका झाल्या आहेत आणि काही वेळा त्याचे विचार गोंधळलेल्या स्वरूपाचे झाले आहेत. प्रत्येक ठिकाणी सार्वभौम सत्ता सारखीच असल्याकारणाने चांगला राज्यकारभार असणाऱ्या सर्व राज्यांत शासनाच्या प्रकाराप्रमाणे थोडासा फरक करून एकच तत्त्व लागू केले पाहिजे हे त्याच्या लक्षात येत नाही.

लोकशाहीच्या किंवा लोकांच्या शासनाच्या प्रकारामध्ये नागरी भांडणे किंवा आप-आपसातील तंटे इतर प्रकारांपेक्षा अधिक वाढतात या गोष्टीचीही इथे भर टाकली पाहिजे. दुसऱ्या कोणत्याही प्रकारामध्ये स्थित्यंतर घडवून आणण्याचा मोह इतक्या वेळा आणि इतक्या हिंसाचारासहित प्रगट होत नाही; तसेच तो प्रकार टिकवण्यासाठी इतक्या जागरूकतेची व धैर्याची गरज भासत नाही. इतर सर्व राज्यघटनांच्यापेक्षा या राज्यघटनेतच नागरिकांनी शक्ती आणि स्थैर्य आपल्या अंगी बाणवण्याची अतिशय आवश्यकता आहे. तसेच एका सदाचारी राज्यप्रमुखाने पोलंडमधील लोकसभेत ( Diet ) बोलताना सांगितलेले पुढील सत्यही त्यांनी मनात बाळगले पाहिजे. तो[1] म्हणाला, "देवांचे राज्य असते तर तिथे लोकशाही असती." शासनाचा इतका उत्कृष्ट प्रकार साधारण मानवांना सोईचा ठरणार नाही.

## प्रकरण ५

# उमरावशाहीविषयी

इथे आपल्यापुढे दोन विभिन्न नैतिक व्यक्ती (Persons) उभ्या आहेत; एक शासन आणि दुसरी सार्वभौम सत्ता. याचाच अर्थ हा की दोन सर्वसाधारण इच्छा, एक सर्व नागरिकांची व दुसरी राज्यव्यवहारामध्ये भाग घेणाऱ्या लोकांची. शासनाने स्वतःचे अंतर्गत धोरण कसेही ठरविले तरी जनतेशी बोलावयाचे म्हणजे सार्वभौम सत्तेच्या नावानेच-म्हणजेच लोकांच्या नावानेच बोलावे लागते, हे कधीही विसरू नये.

प्राथमिक अवस्थेतील समाजांचे शासन उमरावशाही पद्धतीचे होते. कुटुंबप्रमुख एकमेकांशी सार्वजनिक व्यवहाराबद्दल विचारविनिमय करत, अनुभवाच्या सत्तेला तरुण

१. पोलंडच्या राजाचा बाप व लोरेनचा ड्यूक, पॉस्नेनियाचा राजा.

मंडळी विनतकार मान देत, म्हणून उपाध्याय ( priests ), पूर्वज ( Ancients ) वरिष्ठ सभा ( Senate ) व गेरोंटिज ( Gerontes ) अशी नावे प्रचारात आली. उत्तर अमेरिकेतील रानटी लोकांची राज्ये याच पद्धतीने चालतात आणि प्रजेवर त्यांचे राज्य चांगल्या तऱ्हेने चाललेले असते.

परंतु नैसर्गिक विषमतेपेक्षा संस्थांनी निर्माण केलेली विषमता जेव्हा वरचढ ठरली, तेव्हा श्रीमंती व सत्ता यांना वयापेक्षा अधिक महत्त्व लाभले.[1] मग उमरावांची निवड होऊ लागली. शेवटी मालमत्तेप्रमाणे सत्ता बापाकडून मुलाकडे जाण्याचा काळ आला आणि काही कुटुंबे वरिष्ठ दर्जाची ( Patrician ) असे मानण्यात आले. शासन वंशपरंपरागत झाले व वीस वर्षांचे तरुण देखील पुष्कळ वेळा वरिष्ठ सभेचे ( senate ) सभासद म्हणून दृष्टीस पडू लागले.

म्हणून उमरावशाही तीन प्रकारची असते. नैसर्गिक, निवडलेली व वंशपरंपरागत. पहिली प्राथमिक अवस्थेतील लोकांमध्ये आढळते. शासनाच्या सर्व प्रकारांमधे तिसऱ्या प्रकारची उमरावशाही अत्यंत निकृष्ट. दोन नंबरची उत्तम. उमरावशाही असे खरोखर तिलाच म्हणता येईल.

ती दोन सत्तांमधे फरक करते एवढेच नव्हे, तर तिला आपले सभासद निवडता येतात हा मोठा फायदा आहे. लोकशासनामधे सर्व नागरिक जन्माच्या हक्काने दंडाधिकारी बनतात, तर निवडलेल्या उमरावशाहीमधे दंडाधिकार फारच थोड्या व्यक्तींच्या हाती असतो आणि त्यांना तो निवडणुकीने लाभतो.[2] निवडणुकीच्या पद्धतीमधे लोकांचा आदर व निवड मिळवण्यासाठी प्रामाणिकपणा, सुबुद्धपणा व इतर गुण अंगी असावे लागतात आणि त्यांच्यामुळे राज्याचा कारभार चांगल्या रीतीने चालेल अशी पुन्हा खात्री पटते. खेरीज, मंडळाच्या सभा अधिक सहज रीतीने बोलावता येतात. सभेपुढील कामकाजाची जास्त चांगली चर्चा होते आणि शासनाचे कार्य अधिक तत्परतेने व अधिक सुव्यवस्थेने आणि काळजीपूर्वक केले जाते. राज्याची ख्याती परदेशी पसरते ती कुणाला माहीत नसलेल्या व नगण्य अशा लोकांच्या समुदायामुळे नव्हे तर आदरणीय अशा वरिष्ठ सल्लागारांच्या (senators ) अस्तित्वामुळे.

---

१. पुराणकालीन जगात ऑप्टिमेट ( optimate ) चा शब्दार्थ उत्तम असा नव्हता तर अतिशय शक्तिमान असा होता.

२. दंडाधिकाऱ्यांच्या निवडणुकीची पद्धत कायद्याने ठरली जाणे फार महत्त्वाचे आहे. त्यांची निवड राज्यप्रमुखाच्या मर्जीवर अवलंबून राहिली, तर व्हेनिसच्या व बर्नच्या प्रजासत्ताकामधे घडले त्याप्रमाणे वंशपरंपरागत उमरावशाही अस्तित्वात येईल. व्हेनिस बराच काळ विघटनाच्या अवस्थेत आहे. बर्न अद्याप टिकून आहे पण ते वरिष्ठ सभेच्या मोठ्या शहाणपणामुळे. नेहमीच्या नियमाला तो एक जितका सन्माननीय तितकाच संकटग्रस्त असा अपवाद आहे.

सुबुद्ध मंडळींनी लोकसमुदायावर राज्य करावे आणि ते राज्य स्वार्थीबुद्धीने नव्हे तर लोकहितासाठी चालावे हीच उत्तम व सर्वांत अधिक नैसर्गिक व्यवस्था आहे, असे एका शब्दात सांगता येईल. शासनाची यंत्रणा कधीही निष्कारण वाढवू नये आणि नीट रीतीने निवडलेली पाचशे माणसे जे काम जास्त चांगले करू शकतील ते करण्यासाठी वीस हजार माणसे कधीही नोकरीत ठेवू नयेत. पण हे लक्षात ठेवले पाहिजे की अशा वेळी कार्यकारी सत्ता सार्वजनिक अधिकाराचा उपयोग करताना सर्वसाधारण इच्छेकडे कमी लक्ष पुरवते आणि त्यामुळे कार्यकारी सत्तेचा काही भाग कायद्याच्या नियंत्रणाबाहेर जाण्याची अपरिहार्य अशी प्रवृत्ती सुरू होते.

परंतु काही खास मुद्यांवर जोर दिला पाहिजे. राज्य फार लहान असता कामा नये आणि जनता फार प्राथमिक अवस्थेतील आणि फार सरळ असता कामा नये. तसे असेल तर सुनियंत्रित लोकशाहीतल्याप्रमाणे जनतेची इच्छा व्यक्त होताच त्यानुसार आपोआप कायद्याची अंमलबजावणी होईल. तसेच राज्य इतके मोठे नसावे की राज्यभर पसरलेल्या अधिकाऱ्यांना सार्वभौम सत्तेच्या क्षेत्रावर आपापल्या प्रदेशात अतिक्रमण करता येईल आणि स्वातंत्र्य मिळवून त्या प्रदेशांचे अधिपती बनता येईल.

लोकसत्ताक राज्यापेक्षा उमरावशाहीत जरी कमी चांगले गुण लागत असले, तरी उत्तम उमरावशाहीत जे गुण आढळतात, ते इतरत्र आढळत नाहीत. उल्लेख करता येईल म्हणजे श्रीमंतामधील नेमस्तपणाचा आणि गरिबामधील समाधानीपणाचा. समतेबद्दलचा कट्टर आग्रह या व्यवस्थेत अस्थानी दिसेल, स्पार्टामधे तो आग्रह धरला गेला नव्हता. अखेरीस, या व्यवस्थेत विषमता अंतर्भूत आहे ती याच उद्देशाने की ज्यांना आपला सगळा वेळ सार्वजनिक व्यवहारांच्या कारभाराला देता येईल त्यांच्याच हाती तो कारभार असावा. ॲरिस्टॉटलने सांगितल्याप्रमाणे गरीबापेक्षा श्रीमंतांना बरवे मानावे हे त्यातील तत्त्व नव्हे. उलट, एखाद्या गरीब माणसाची कधीमधी निवड झाली तर लोकांच्या हे लक्षात येईल की केवळ श्रीमंतीमुळेच माणसांचा पुरस्कार होतो हे खरे नव्हे.

## प्रकरण ६

# राजेशाहीविषयी

आतापर्यंत राज्यप्रमुखाविषयी आपण एक नैतिक व सामुदायिक व्यक्ती म्हणूनच विचार केला. कायद्याच्या शक्तीमुळेच एकत्रित होणारा आणि राज्याची कार्यकारी सत्ता विश्वस्त म्हणून धारण करणारा असा तो असतो. आता आपल्याला अशा परिस्थितीचा विचार करायचा आहे की ज्या परिस्थितीत ही सारी सत्ता एका चालत्या-बोलत्या माणसाच्या हाती एकत्रित झालेली असते आणि कायद्याप्रमाणे त्या एका

माणसालाच ती सत्ता वापरण्याचा अधिकार असतो, अशा माणसाला राजा किंवा राजपुरुष असे म्हणतात.

कारभाराच्या इतर पद्धतींत आढळणाऱ्या परिस्थितीपेक्षा ही परिस्थिती वेगळी असते. त्या परिस्थितीत एक सामुदायिक शक्ती व्यक्तीचे काम करते तर या ठिकाणी व्यक्ती सामुदायिक शक्तीचे काम करत असते. त्यामुळे राज्यप्रमुखाच्या ठिकाणी आढळणाऱ्या नैतिक एकतेचा शारीरिक एकतेशी समागम होतो आणि इतरत्र एका माणसाच्या ठिकाणी मोठया कष्टाने एकत्रित केलेल्या शक्ती निसर्गनियमानुसार सहज रीतीने एकत्रित होतात.

अशा रीतीने जनतेची इच्छा आणि राज्यप्रमुखाची इच्छा, राज्याची सर्वंकश सत्ता आणि शासनाचे विवक्षित अधिकार ह्या सर्व गोष्टी प्रेरणेच्या एकाच यंत्रणेवर अवलंबून राहतात. यंत्रणेची सर्व सूत्रे एकाच हाती राहतात, एकाच उद्दिष्टासाठी सर्वांची हालचाल होते आणि विरोधी व परस्परविनाशक वृत्ती उरत नाहीत. इतक्या थोड्या प्रयत्नाने इतके मोठे परिणाम घडवून आणणारी दुसरी राज्यघटना तयार करणे शक्य नाही. मंत्रालयात बसून विस्तृत प्रदेशावर राज्य करणाऱ्या कर्तबगार राज्याची समुद्रकाठावर बसून सहज रीतीने मोठे जहाज समुद्रावर सोडणाऱ्या आर्किमेडिजशी तुलना करता येईल. राजा सर्वांना गतिमान बनवतो, स्वतः मात्र स्थिर राहतो.

शासनाच्या इतर सर्व प्रकारांपेक्षा राजेशाही अधिक जोमदार असते. विस्तृत साम्राज्यावर एका माणसाच्या इच्छेचा अंमल चालणे व इतरांच्या इच्छेवर सहज रीतीने प्रभाव गाजविणे ही गोष्ट इतर प्रकारांमधे इतक्या चांगल्या रीतीने घडून येत नाही. एका उद्दिष्टासाठी सर्व गोष्टी घडत असतात हे खरे; परंतु सार्वजनिक सुख हे ते उद्दिष्ट नसते आणि कार्यकारी सत्तेच्या शक्तीमुळे आणि राज्याचे हित साधण्याऐवजी सारखे नुकसानच होत असते.

राजांना अनियंत्रित सत्ता हवी असते आणि पूर्वजांकडून ते शिकतात की ती इच्छा सफल होण्याचा उत्तम मार्ग म्हणजे लोकांचे प्रेम संपादन करणे. हे सारे चांगले व उदात्त आहे; काही अंशी ते खरे देखील आहे. परंतु दुर्दैवाने जगातील राजदरबारात या उत्तम उक्तीची बहुशः हेटाळणी होते. लोकांच्या प्रेमातून जी सत्ता उद्भवते ती इतर प्रकारच्या सत्तेपेक्षा निःसंशय अधिक चांगली; परंतु ती अनिश्चित असते आणि अटी पुऱ्या झाल्या, तरच ती टिकते. अशा सत्तेमुळे राज्यप्रमुखांचे समाधान होत नाही, उत्तमातील उत्तम राजालाही असे वाटते की मनात आले तर आपल्याला वाईट रीतीनेही वागता यावे आणि तेवढ्यासाठी आपल्या घरातील आपली सत्ता नष्ट होण्याची पाळी येऊ नये. राजाची सत्ता ही लोकांची सत्ता, म्हणून लोकांची भरभराट होणे, त्यांची संख्या वाढणे व ते शक्तिशाली बनणे राजाच्या हिताचे असते ही गोष्ट त्याला पुनःपुनः पटवून देण्याचा त्याच्या सल्लागारांचा प्रयत्न व्यर्थ ठरतो. ती गोष्ट खरी नाही आणि लोक दुबळे, दरिद्री व प्रतिकारहीन राहण्यातच आपले वैयक्तिक हित आहे अशी त्याची पुरेपूर समजूत असते. लोक

नेहमी दबून राहतील अशी खात्री असेल तरच त्यांची शक्ती वाढणे राजाच्या हिताचे असते. कारण त्यांची शक्ती ही त्याची शक्ती असल्याकारणाने आपल्या शत्रूंना तो अधिक परिणामकारक रीतीने घाबरवू शकतो. परंतु हा फायदा दुय्यम व गौण स्वरूपाचा असल्यामुळे व वर दिलेली दोन गृहीतकृत्ये परस्परविरोधी असल्यामुळे राजे तत्काळ उपयोगाची जी उक्ती आहे तिलाच अधिक महत्त्व देतात. हे तत्त्व सॅम्युएलने ज्यू लोकांना शिकवले आणि मॅकिआव्हॅलीने उदाहरणे देऊन त्याचा पाठपुरावा केला. वरवर असे दिसते की राजांना तो उपदेश करत होता, परंतु ते करताना त्याने प्रत्यक्षात त्यांच्या जनतेलाही सल्ला दिलेला आहे. त्याचे राजपुरुष ( prince ) हे पुस्तक लोकशाहीवाद्यांनाही उपयोगी पडणारे आहे. [1]

फक्त मोठ्या राज्यांनाच राजेशाहीची पद्धत सोईची ठरते असा सर्वसाधारण निष्कर्ष आपण अगोदरच काढला आहे आणि खुलासेवार छाननी केली तर तोच बरोबर आहे हे उघड होईल. सार्वजनिक कामांच्या अंमलबजावणीत जितके अधिक नागरिक सहभागी होतील तितके राज्यप्रमुख आणि जनता यांच्यामधील प्रमाण कमी होईल आणि ते समतेकडे झुकेल. लोकशाहीमध्ये हे प्रमाण समतेचे किंवा एकतेचे असते. कार्यकारी सत्ता थोड्या लोकांच्या हाती एकत्रित होते त्या वेळी हे प्रमाण वाढते; शासन एका व्यक्तीच्या हाती सोपविले जाते, त्या वेळी हे प्रमाण सर्वांत अधिक होते. तसे घडते त्या वेळी राज्यप्रमुख आणि लोक यांना विभागणारे अंतर खूप वाढते आणि राज्याला आपले विचार व्यवस्थित रीतीने व्यक्त करता येत नाहीत. एकत्र राखणारी संघटना असावी म्हणून श्रेणीबद्ध रचना ( hierarchy ) निर्माण करावी लागते. राजेरजवाडे, मंत्री, सरदार वगैरे जिच्यात आहेत अशी व्यवस्था तयार झाली तरच शासनाच्या हुकमांची अंमलबजावणी होऊ शकेल. लहान राज्यांना अशी व्यवस्था मुळीच योग्य नसते. सत्तेच्या अशा तऱ्हेच्या गुंतागुंतीच्या विभागणीमुळे त्यांचा नाश झाल्यावाचून राहणार नाही.

१. मॅकिआव्हॅली प्रामाणिक मनुष्य आणि उत्तम नागरिक होता. परंतु मेडिसींच्या परिवारात जीवन काढावयाचे; त्यामुळे जुलूमजबरदस्तीच्या त्या परिस्थितीत त्याला आपले स्वातंत्र्यावरील प्रेम बुरख्याआड ठेवावे लागले. सीझर–बोर्गियासारख्या दुष्ट माणसाला त्याने नायक बनवले ही गोष्ट देखील त्याच्या लपवून ठेवलेल्या हेतूंची चांगली साक्ष देते. 'थ प्रिन्स' या पुस्तकात त्याने जे लिहिले आहे, त्याची डिसकोर्सेस ऑन टायटस लिव्हिअस ( Discourses on Titus Livius ) व हिस्टरी ऑफ फ्लॉरेन्स ( History of Florense ) या त्याच्या पुस्तकातील मजकुराशी तुलना केली, तर त्याच्या गाढ राजकीय विद्वत्तेकडे आतापर्यंत फारच उथळपणे आणि पूर्वग्रहदूषित दृष्टीनेच लक्ष दिले गेले आहे हे उघड होईल. रोमच्या राजदरबाराने त्याच्या पुस्तकाचा प्रसार होऊ नये असे बंधन घातले आहे आणि त्याचे नवल वाटू नये, कारण त्याच्या पुस्तकाने तेथील परिस्थितीवर जो प्रकाश टाकला आहे तो फार विदारक स्वरूपाचा आहे.

मोठ्या राज्यात शासन चांगले राहील अशी दक्षता घेणे सोपे नसते; विशेषेकरून शासनाचे कार्य एक व्यक्ती चालवते त्या वेळी ते फारच कठीण होते. राजा आपल्या प्रतिनिधीमार्फत काम करू लागतो त्या वेळी काय घडते ते सर्वांना माहिती आहे.

राजेशाहीमधे एक मूलभूत आणि अटळ असा दोष आहे; त्या दोषामुळे ती लोकशाही पद्धतीच्या शासनापेक्षा कमी दर्जाची ठरते. लोकशाहीमधे लोकांच्या मतानुसार राज्यकारभाराची जबाबदारी केवळ कार्यक्षम आणि हुशार माणसांच्या अंगावर टाकण्यात येते. याच्या उलट राजेशाहीमधे सत्तेच्या आणि अधिकाराच्या जागा नेहमीच लुडबूड करणाऱ्या कारस्थानी आणि नीच माणसांना मिळतात; राजदरबारी वशिले लावण्याच्या कामात ते यशस्वी ठरतात, परंतु सत्तेच्या जागेवर बसल्यानंतर त्यांचे खरे स्वरूप उघड होते. कारभाऱ्यांची निवड करण्यामधे राजांच्यापेक्षा जनतेच्या चुका कमी होतात, आणि लोकशाहीचा प्रमुख म्हणून मूर्ख माणूस आढळणे जितके विरळा तितकेच राजाच्या मंत्रिमंडळात चांगला मनुष्य आढळणे विरळा असते. म्हणूनच बेजबाबदार व अप्रामाणिक मंत्र्यांनी धुळीला मिळवलेल्या राजाच्या राज्याला सुदैवाने जन्मतःच राज्यनीतिविशारद असा पुरुष राज्यशकट चालवण्यासाठी प्राप्त होतो त्यावेळी त्याच्या कौशल्याने जनता आश्चर्यचकित होते आणि त्याच्या कारकीर्दीला त्याच्या देशाच्या इतिहास महत्त्वाचे स्थान लाभते.

राजेशाहीचे राज्य चांगल्या रीतीने चालवयाचे तर राजाच्या कुवतीनुसार त्याच्या राज्याचा मोठेपणा व विस्तार असला पाहिजे. शासन चालविण्यापेक्षा विजय संपादन करणे सोपे असते. योग्य जागी तरफ ( Lever ) लावता आली तर माणसाला एका बोटाचा उपयोग करून जगाला पायापासून हलवता येईल; परंतु त्या जगाचा सारा भार आपल्या खांद्यावर पेलता येतो तो एकट्या हरक्युलसलाच. राज्याच्या सीमा कितीही मर्यादित असल्या तरी सर्वसाधारणपणे राज्याच्या दृष्टीने त्या मोठ्याच असतात. उलट राजाच्या मानाने राज्य लहान असले, आणि तसे क्वचितच घडते–तरी ते अव्यवस्थित रीतीने चालवले जाणार नाही अशी खात्री देता येत नाही. कारण मोठ्या योजनांच्या नादी लागलेल्या राजाला जनतेच्या हिताचा विसर पडतो आणि, अंगी गुणवत्ता नसल्यामुळे ज्याच्या कार्यशक्तीला मर्यादा पडतात अशा राजापेक्षाही, आपल्या गुणवत्तेचा दुरुपयोग करून तो लोकांना अधिक दुःख देतो. राजाच्या कार्यनैपुण्यानुसार राज्य प्रत्येक राजाच्या अमदानीत वाढावे किंवा कमी व्हावे असे मला म्हणावेसे वाटते. उलट, वरिष्ठ लोकसभा ( Senate ) अधिक चिरस्थायी असलेल्या लोकशाहीमध्ये, सीमा कायम राहून देखील, त्या राज्याचा कारभार चांगल्या रीतीने चालू शकतो.

एक-व्यक्ति-शासनाचा अत्यंत ढोबळ असा दोष हा की त्या शासनामधे सातत्य नसते. दुसऱ्या दोन तऱ्हेच्या शासनांमधे सातत्य असल्यामुळे एकत्व अखंड राहते. राजाचा मृत्यू होतो त्या वेळी त्याच्या जागी दुसरा राजा बसवावा लागतो. निवडणूक

चालू असताना धोक्याचे मध्यंतर निर्माण होते आणि निवडणूक देखील वादळी ठरण्याची शक्यता असते. लोक अगदीच बेफिकीर असले आणि, अशा शासनपद्धतीत अनपेक्षित असा, प्रामाणिकपणा त्यांच्या ठिकाणी असला तर गोष्ट वेगळी. नाही तर वशिलेबाजी व भ्रष्टाचार यांचे तिथे प्राबल्य माजेल. राज्याने स्वतःला ज्या व्यक्तीला विकून टाकले तिने ते पुनः विकून टाकणे साहजिकच आहे आणि ती व्यक्ती प्रबळांनी तिच्याकडून जे पैसे काढले त्यांची भरपाई दुबळ्याकडून पैसे काढून करते हे देखील तितकेच साहजिक आहे. राजेशाहीमधे आज ना उद्या सर्व गोष्टींना पैशांचे स्वरूप येते आणि ते घडते त्या वेळी राजाच्या अंमलाखालील शांततेपेक्षा मध्यंतरीच्या गोंधळाच्या काळातील बंडाळी बरी ठरते.

ही दुरवस्था दूर करण्यासाठी कोणत्या उपायाचा अवलंब केला जातो ? राज्याधिकार काही कुटुंबांमधे वंशपरंपरागत ठरविला आहे आणि वारसांची मालिका निश्चित केली आहे. त्यामुळे राजाच्या मृत्यूनंतर तंटे उपस्थित होत नाहीत. याचाच अर्थ हा की निवडणुकीऐवजी राज्यप्रतिनिधिमंडळ ( regency ) स्वीकारले जाते, सुयोग्य राज्य-कारभारापेक्षा वरवरच्या शांततेला अधिक मूल्य दिले जाते आणि त्यामुळे अज्ञानी, दुष्ट अगर बुद्धिमंद पुरुष आपल्यावर राजा म्हणून लादून घेण्याचा धोका माणसे पतकरतात व चांगला राजा निवडण्यासाठी जी चर्चा हवी तिच्यापेक्षा तो धोका ते पसंत करतात. हा धोका पतकरल्यास डाव आपल्यावर उलटण्याचीच अधिक शक्यता आहे हे त्यांच्या ध्यानात येत नाही. धाकट्या डायोनिससला मानहानी होईल असे कृत्य केल्याबद्दल रागावून त्याचा बाप जेव्हा म्हणाला की " असे वागण्याचे उदाहरण मी काही तुला घालून दिलेले नाही," त्या वेळी तरुण डायोनिससने त्याला मोठ्या हुषारीने उत्तर दिले की, " पण तुमचा बाप काही राजा नव्हता. "

दुसऱ्यांना हुकूम सोडण्याच्या दर्जाला माणसाला चढवले की न्यायाची भावना आणि चांगली बुद्धी त्याच्या ठिकाणी उरणार नाही अशीच एकंदर परिस्थिती घडून येते. तरुण राजपुत्रांना राज्यकारभाराचे शिक्षण देण्याची खूप खटपट होते असे आपल्याला सांगण्यात येते. शिक्षणापासून त्यांचा फार फायदा होतो असे मात्र दिसत नाही. त्यांना अगोदर हुकूम पाळायला शिकविले असते तर अधिक बरे झाले असते. इतिहासामधे मोठे राजे म्हणून जे प्रसिद्ध आहेत त्यांना राजाची कर्तव्ये कधी कोणी शिकविली नव्हती. दुसऱ्यावर अंमल गाजविण्याचे शास्त्र जितके जास्त शिकावे तितके ते कमी अवगत होते, हुकूम देण्याऐवजी हुकमाची अंमलबजावणी करून ते अधिक चांगले शिकता येते.

चांगला मेळ न झाल्यामुळे राजांच्या राज्यकारभारात सुसंगतपणा नसतो. राजाच्या मर्जीनुसार किंवा राजाच्या नावाने सत्ता गाजवणाऱ्या मंत्र्याच्या मर्जीनुसार एका वेळी एका योजनेनुसार तर दुसऱ्या वेळी दुसऱ्या योजनेनुसार कारभार चालत असल्या-कारणाने त्याचे फार काळ एक उद्दिष्ट नसते किंवा एखादे सुसंगत धोरण नसते. दिशेमधे

होणाऱ्या या नेहमीच्या बदलामुळे राज्य सदोदित अनेकविध सर्वसाधारण तत्त्वे आणि विशिष्ट कार्ये यामधे हेलकावे खात असते. इतर शासनपद्धतींमधे राज्यप्रमुख नेहमी एकच असतो त्यामुळे तसे घडत नाही. अनुभव देखील सर्वसाधारणपणे असा आहे की राजदरबारी जर धूर्तपणा अधिक आढळला तर वरिष्ठ लोकसभेत ( Senate ) शहाणपणा अधिक आढळतो. तसेच लोकशाहीला आपले धोरण राजेशाहीपेक्षा कमी वेळा दृष्टी बदलून व कमी वेळा अनिश्चिततेच्या आहारी जाऊन चालवता येते. कारण राजेशाहीमधे राज्यकारभारात बदल झाला की राज्यामधेही बदल होतो. पूर्वीच्या धोरणाच्या बरोबर उलट धोरण स्वीकारणे हा जणू सर्व मंत्र्यांचा आणि जवळजवळ सर्व राजांचा नियमच बनलेला आहे.

असा हा मेळ नसल्याकारणाने राजेशाहीचा कारभार चालवणाऱ्यांच्या तोंडी नेहमी जे एक वाक्य आढळते ते देखील खोटे ठरते. त्या वाक्याचा अर्थ असा की देशाच्या शासनाची कुटुंबाच्या कारभाराशी तुलना करावी आणि राजाला बापाच्या जागी मानावे. ( त्या चुकीच्या समजुतीचे अगोदरच निराकरण केलेले आहे ) एवढेच नव्हे तर मुख्य राज्यसत्ताधाऱ्याच्या ठिकाणी जे सर्व गुण असायला हवेत ते सर्व त्याच्या ठिकाणी आहेतच व ज्या तऱ्हेचा मनुष्य तो असावयास हवा तसा तो आहेच असे समजून चालावयाचे. हे जर खरे असते तर राजाचे शासन इतर सर्व शासनपद्धतींपेक्षा जास्त श्रेयस्कर ठरले असते. कारण ते इतरांपेक्षा अधिक शक्तिशाली असते हे निर्विवाद आहे; आणि राज्यसंस्थेची सर्वसाधारण इच्छा व राज्यकारभाराची इच्छा यांच्यामधे खराखुरा मेळ असेल तर ते इतरांपेक्षा अधिक उत्कृष्टही ठरेल.

पण, प्लेटो म्हणतो त्याप्रमाणे, राजाचे गुण जन्मतःच अंगी असलेला मनुष्य सापडणे जर फार कठीण असेल तर जन्मजात गुण आणि दैवाची अनुकूलता यांचा मेळ जडून राजमुकुट धारण करणारा पुरुष डोळ्यामधे भरतो आहे असे प्रसंग निर्माण होणे अधिकच कठीण आहे. आणि राजांना जे शिक्षण दिले जाते त्याने जर ते बिघडतच असले तर पिढ्यानपिढ्या ज्यांना दुसऱ्यावर अंमल कसा गाजवावा याचे शिक्षण दिले गेले त्यांच्याकडून अपेक्षा अशा काय बाळगायच्या ? राजेशाहीच्या सर्वसाधारण शासनाची एखाद्या चांगल्या राजाच्या शासनाशी गल्लत करणे म्हणजे जाणूनबुजून आंधळ्यासारखे वागणे आहे. राजेशाहीच्या शासनाचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी आपण चांगल्याच्या बरोबरीने वाईट राजांचाही विचार केला पाहिजे. कारण वाईट माणसेही सिंहासनावर अधिष्ठित होतात, किंवा कदाचित् सिंहासनच त्यांना वाईट बनवत असेल.

आपल्या ग्रंथकारांना या अडचणी माहीत आहेत. पण त्यांच्यामुळे ते पेचात पडले आहेत, असे मात्र दिसत नाही.त्या अडचणींविरुद्ध इलाज एकच आणि तो म्हणजे हूं की चूं न करता आज्ञांचे पालन करणे, असे ते म्हणतात.परमेश्वर कोपला म्हणजे एखाद्या देशावर राज्य करण्यासाठी तो वाईट राजे पाठवितो आणि दैवी अरिष्ट म्हणून त्यांचे राज्य सहन केले

पाहिजे. अशा भावनांनी नीतिबोध होतो हे खरे; पण, मला वाटते राज्यशास्त्रावरील पुस्तका-पेक्षा त्या हरिकथेत अधिक शोभून दिसतील. चमत्कार करतो असे सांगणाऱ्या एखाद्या वैद्याने रुग्णाला केवळ सहनशीलतेचे धडे दिले तर त्या वैद्याबद्दल आपण काय म्हणू ? वाईट शासन ज्यांच्यावर लादले जाते त्यांना ते सहन करावे लागते हे प्रत्येकाला माहीत आहे. चांगले शासन कसे हुडकून काढावे हा आपण विचार करीत असलेला प्रश्न आहे.

## प्रकरण ७

# संमिश्र शासनाविषयी

नेटके बोलायचे तर, साधे शासन अशी वस्तूच मुळी नसते. त्याच्या प्रमुखपदी जरी एक व्यक्ती असली तरी तिच्या हाताखाली अनेक राजपुरुष असतात. लोकशाहीचे शासन असले तरी त्याचा प्रमुख असा कुणी असतोच. म्हणून कार्यकारी सत्तेच्या विभागणीचा प्रश्न येतो तेव्हा राज्यकारभाराच्या अनेक श्रेणी कल्पाव्या लागतात. कारभार पुष्कळांच्या हाती आहे या श्रेणीपासून, तो थोड्यांच्या हाती आहे या श्रेणीपर्यंत. त्यामधे फरक आहे तो एवढाच की काही वेळा पुष्कळांना थोड्यांच्यावर आणि काही वेळा थोड्यांना पुष्कळांच्यावर अवलंबून राहावे लागते.

काही ठिकाणी विभागणी समान स्वरूपाची असते. कारण इंग्लंडमध्ये घडले आहे त्याप्रमाणे वेगवेगळे घटक परस्परावलंबी अवस्थेत असतात, किंवा पोलंडमधे आहे त्याप्रमाणे घटक स्वतंत्र असले तरी त्यांची सत्ता अपूर्ण असते. दुसरी अवस्था सदोष मानावी लागते; कारण त्या अवस्थेमधे शासनात एकसूत्रीपणा नसतो आणि त्यामुळे राज्यसंस्थेमधे फार विस्कळितपणा येतो.

साधे शासन हाच शासनाचा उत्तम पर्याय. त्याचा साधेपणा हेच त्याचे एकमेव आणि पर्याप्त कारण आहे. परंतु जिथे कार्यकारी सत्ता कायदे करण्याच्या सत्तेवर पुरेशी अवलंबून नसते, म्हणजेच जनता आणि राज्यातील अधिकारी ( Prince ) यांच्यातील संबंधापेक्षा सार्वभौम सत्ता आणि राज्यातील अधिकारी यांच्यामधील संबंध अधिक घनिष्ट असतात, त्यावेळी शासनाचे विभक्तीकरण करून ही सदोष विभागणी बदलावी लागते. कारण त्या अवस्थेत सर्व घटकांना नागरिकांच्यावर सारखाच अधिकार चालविता येतो आणि विभागणी झाल्यामुळे सार्वभौम सत्तेपुढे सर्वांची ताकत कमी पडते. मध्यंतरीचे राज्यातील अधिकारी ( intermediate magistrates ) निर्माण करून हा दोष दूर करता येईल. या अधिकाऱ्यांनी शासन एकत्रित ठेवून सत्तेच्या दोन प्रकारांमधे समतोल राखण्याचा प्रयत्न करावा आणि त्यांचे जे वेगवेगळे अधिकार आहेत त्यांचे रक्षण करावे

अशा ठिकाणी संमिश्र शासनाऐवजी फेरबदल केलेले ( modified ) शासन आहे असे आपल्याला म्हणावे लागेल.

यासारख्या योजनांनी विरुद्ध स्वरूपाचा जो दोष आहे तो देखील दूर करता येईल आणि जेव्हा शासन फार विस्कळित असेल त्यावेळी एकसूत्रीपणा आणण्यासाठी निःपक्षपाती स्वरूपाच्या नवीन संस्था ( tribunals ) निर्माण करता येतील. सर्व लोकशाही राज्यांमधे हे केले जाते. एक तर शासन कमजोर व्हावे म्हणून ते विभागले जाते; आणि दुसरे म्हणजे ते मजबूत व्हावे म्हणून तेच केले जाते. साध्या शासनामधे मजबुतीची आणि तशीच दुबळेपणाचीही परिसीमा ( maximum ) आढळते; संमिश्र शासनामधे मात्र मजबुतीची सर्वसाधारण सरासरी आढळते.

## प्रकरण ८

# शासनाचा प्रत्येक प्रकार प्रत्येक देशाला सोईचा ठरणार नाही याविषयी

स्वातंत्र्याचे फळ सगळ्याच हवामानात सारखेच वाढत नाही; त्यामुळे सर्व लोकांना ते सारखेच उपभोगता येत नाही. मॉंटेस्क्यूने ( Montesquieu ) प्रतिपादन केलेल्या या तत्त्वाचा जितका विचार करावा तितका त्याचा प्रबुद्धपणा अधिक लक्षात येतो. त्या तत्त्वाला विरोध करण्याचा जितका प्रयत्न करावा तितकी नवनवीन पुराव्यांनी खरेपणा प्रस्थापित करण्याची त्याला अधिक संधी लाभते.

जगातील कोणतेही शासन असो, प्रत्येक शासनामधे सार्वजनिक व्यक्ती ( public person ) उत्पादन करत नाही, उपभोग मात्र घेते. उपभोग करावयाच्या वस्तू मग तिला मिळतात तरी कुठून ? समाजातील इतर व्यक्तींच्या श्रमामुळे व्यक्तीजवळ गरजेपेक्षा अधिक जे उरते त्याने सार्वजनिक व्यक्तीची गरज भागते. याच्यावरून हे सिद्ध होते की माणसे जेव्हा श्रमशक्तीचा उपयोग करून स्वतःच्या गरजेला आवश्यक असेल त्यापेक्षा अधिक उत्पादन करतात त्याच वेळी नागरी समाज ( civil state ) निर्माण होतो. हे जे अतिरिक्त उत्पादन आहे ते जगातील सर्व देशांत सारखे नसते. पुष्कळ देशांत ते भरपूर असते. काही देशांत ते जेमतेम असते, काही देशांत ते नसते, तर काही थोड्या देशांत प्रत्यक्षात ते उथळ स्वरूपाचे ( minus quantity ) असते. हे प्रमाण हवामानाच्या म्हणजेच जमिनीच्या सुपीकपणावर अवलंबून असते. तसेच ते जमिनीला कोणत्या तऱ्हेची मशागत हवी आहे, पिके कोणती होतात, लोकांची ताकत कितपत आहे, जीवनासाठी कमी अगर अधिक वस्तूंचा उपयोग करावा लागतो या व यांसारख्या इतर अनेक गोष्टींवर अवलंबून असते.

उलट पक्षी सर्व शासने एकाच तऱ्हेची नसतात; काही इतरांपेक्षा अधिक अधाशी असतात. त्यांच्यामधील फरक दुसऱ्या एका तत्त्वावर आधारलेला आहे. ते तत्त्व हे की सार्वजनिक कर आणि त्यांचे उगमस्थान यांच्यामधील अंतर जितके अधिक तितके ते अधिक तापदायक असतात. करांचे हे जे ओझे आहे त्याचा विचार करण्यासाठी त्याची रक्कम विचारात घेऊन भागत नाही, ज्यांनी ते दिले त्यांच्याकडे परत येण्यासाठी त्या करांना किती प्रवास करावा लागतो त्याचाही विचार करावा लागतो. जेव्हा हा प्रवास जलद गतीचा आणि सुव्यवस्थित असतो तेव्हा कराच्या रूपाने द्यावी लागणारी रक्कम कमी आहे की जास्त आहे या गोष्टीला विशेष महत्त्व नसते; जनता सधन असते आणि सार्वजनिक व्यवस्था निरामय असते. याच्या उलट, लोकांनी द्यावयाच्या कराची रक्कम कितीही कमी असो, ती जर त्यांच्याकडे परत आली नाही आणि त्यांना जर सदोदित द्यावेच लागले तर त्यांच्याजवळ असलेला साठा संपण्याची वेळ लवकर येते. असे जिथे घडते तिथे राज्य कधीही श्रीमंत होत नाही आणि लोक नेहमीच गरीब राहतात.

याच्यावरून निष्कर्ष निघतो तो हा की जनता शासनापासून जितकी दूर असते तितके करांचे ओझे वाढते. लोकशाहीमधे जनतेवरील बोजा सर्वांत कमी असतो, उमरावशाहीमधे तो वाढतो आणि राजेशाहीमधे तो सर्वांत अधिक होतो. खूप श्रीमंत देशांना राजेशाही सोईची होते, श्रीमंतीच्या व विस्ताराच्या दृष्टीने मध्यम अशा देशांना उमरावशाही आणि गरीब व लहान देशांना लोकशाही योग्य होते.

वस्तुतः विचार करावा तसे हे अधिक स्पष्टपणे लक्षात येते की स्वतंत्र राज्ये आणि राजेशाह्या यांच्यामधील फरक आहे तो हा की पूर्वोक्त देशांत प्रत्येक गोष्ट सार्वजनिक कल्याणासाठी वापरली जाते तर उत्तरोक्त देशांत सार्वजनिक व खाजगी साधनसंपत्तीमधील संबंध पूरक स्वरूपाचा ( reciprocal ) असतो, एकाची शक्ती वाढली तर दुसऱ्याची कमी होते. अखेरीला निष्कर्ष निघतो तो हा की माणसांना सुखी करण्यासाठी त्यांच्यावर राज्य करण्याऐवजी जुलमी राजे त्यांच्यावर राज्य करता यावे या हेतूने त्यांना दुःखी बनवतात.

हवामानाच्या वेगवेगळ्या परिस्थितीतदेखील, काही नैसर्गिक कारणे अशी आहेत की, ज्यांच्यामुळे अमुक देशाला अमुक राज्यपद्धत सोईची होईल असे म्हणता येते, एवढेच नव्हे तर कशा तऱ्हेचे नागरिक त्या देशात असावेत हे देखील सांगता येते.

ज्या नापीक व पडित जमिनीतून उत्पादन काढण्यासाठी कराव्या लागणाऱ्या श्रमांची भरपाई होईल असे उत्पन्न निघत नाही त्या जमिनींची मशागत होऊ नये; तिथे फक्त रानटी लोकांचीच वस्ती असावी. ज्या जमिनीतून माणसांच्या श्रमाने केवळ जीवनाला अत्यंत आवश्यक एवढ्याच वस्तूंची पैदास होऊ शकेल तिथे फक्त असंस्कृत ( barbarous ) लोकांचीच वस्ती व्हावी; त्या ठिकाणी राजकीय समुदाय ( body politic ) खऱ्या अर्थाने निर्माण होणे अशक्य असते. ज्या जमिनीतून उदरनिर्वाहाला आवश्यक त्यापेक्षा थोडे अधिक उत्पन्न निघते त्या जमिनी स्वतंत्र माणसांच्या वसाहतीला

उत्तम. ज्या जमिनी सुपीक आहेत व जिथे थोड्या श्रमांनी पुष्कळ उत्पन्न निघते, तिथे राजेशाही नांदावी हे इष्ट; राजेशाही असली म्हणजे प्रजाजनांच्याजवळ जे अतिरिक्त धन साचते ते राजांच्या चैनीमधे खर्च होऊ शकते; व्यक्तींनी त्या धनाची उधळपट्टी करण्याऐवजी शासनाच्या हाती ते एकत्रित होणे श्रेयस्कर. या नियमांना अपवाद आहेत हे मला माहीत आहे; ते अपवाद नियम सिद्ध करतात; अपवादभूत देशात त्वकर किंवा उशीरा क्रांती घडून येते आणि मग निसर्गनियमानुसार समाजाची घडी पुन्हा परत बसवली जाते.

सर्वसाधारण नियम आणि त्या नियमांच्या परिणामात फेरबदल घडवून आणतील अशी विशिष्ट कारणे यांच्यामधे आपण भेद केला पाहिजे. दक्षिणेकडील सर्व देशांत लोकशाही प्रस्थापित झाली व उत्तरेकडील सर्व देशांत जुलमी राजवट रूढ झाली, तरी देखील हवामानामुळे उष्ण देशांना जुलमी राजेशाही, थंड देशांना असंस्कृत राजवट ( barbarism ) व मध्यम हवामानाच्या देशांना चांगला राजकीय समाज जास्त मानवतो हा जो नियम आहे त्याला बाधा येत नाही. सर्वसाधारण तत्त्व जरी मान्य झाले तरी ते कसे लावावे याबद्दल वाद निर्माण होतील असे मला दिसते. काही थंड देश खूप सुपीक असतात आणि दक्षिणेकडील काही देश अत्यंत नापीक आहेत असा युक्तिवाद लढवला जाईल. जे या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करीत नाहीत त्यांनाच या गोष्टींची अडचण भासेल. मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे श्रमशक्ती, ताकत, उपभोग इत्यादि गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे.

वादासाठी आपण असे गृहीत धरू या की विस्ताराने समसमान अशा दोन प्रदेशांपैकी एकात पाच मणांचे उत्पादन होते तर दुसऱ्यात दहा मणांचे. पहिल्या प्रदेशातील रहिवाशांनी चार व दुसऱ्यातील रहिवाशांनी नऊ उपभोगासाठी वापरले तर पहिल्यांनी एकपंचमांशाची व दुसऱ्यांनी एकदशांशाची बचत केली असे होईल. बचतीचे प्रमाण उत्पादनाशी व्यस्त असल्याकारणाने, पाच उत्पन्न करणारा प्रदेश दहा उत्पन्न करणाऱ्या प्रदेशापेक्षा दुप्पट बचत करू शकेल.

दुप्पट उत्पन्न निघते हा खरा मुद्दा नाही. तसेच थंड प्रदेशातील उत्पादनक्षमता उष्ण प्रदेशातील उत्पादनक्षमतेच्या सर्वसाधारणपणे बरोबरीची आहे असे म्हणणारा मनुष्य अविचारी आहे असेच मी म्हणेन. तरी देखील, वादासाठी, अशी बरोबरी वस्तुतः आहे असे मी मान्य करतो. तुमची इच्छा असेल तर इंग्लंड व सिसिली आणि पोलंड व इजिप्त यांना आपण एका पारड्यात घालू या. पलीकडे दक्षिणेला आफ्रिका व इंडिज आहेत, उत्तरेला मात्र पुढे काही नाही. एकाच परिमाणाचे उत्पादन, पण त्यासाठी जे श्रम करावे लागतात त्यामधे किती तफावत आहे! सिसिलीमधे माणसांना जमिनीचा वरचा भाग नुसता ओरखडावा लागतो, इंग्लंडमधे जमिनीची कष्टपूर्वक नांगरट करावी लागते. जिथे उत्पादन तेवढेच, पण ते मिळविण्यासाठी जास्त माणसांना काम करावे लागते तिथे साहजिकपणेच बचत कमी होते.

उष्ण प्रदेशात माणसे तितकीच असली तरी त्यांना वस्तूंचा उपयोग कमी करावा लागतो, याचाही विचार करावा. तिथे निरोगी राहावयाचे तर अतिरेक टाळावा लागतो. जी युरपिअन माणसे स्वदेशातल्याप्रमाणे उष्ण प्रदेशात वागू लागतात ती आव आणि अजीर्ण यांच्यामुळे नष्ट होतात. चार्डिन म्हणतो : " एशियातील लोकांशी तुलना करता आपण सर्व मांसभक्षक आणि खादाड आहो. देशातील जमिनीची कमी प्रमाणात मशागत होते म्हणून पर्शियातील लोक मिताहारी आहेत असे म्हणणारी काही मंडळी आहेत. पण मी उलट असे म्हणेन की रहिवाशांना कमी लागते म्हणून तिथे कमी पिके काढली जातात. " तो पुढे म्हणतो : " त्यांच्या मिताहाराचे कारण नैसर्गिक दुर्भिक्षता असती तर केवळ गरिबांनाच अन्नाचा तुटवडा भासला असता; परंतु प्रत्यक्षात मिताहाराची रूढी सर्व वर्गांत दृष्टीस पडते; वेगवेगळ्या प्रदेशातील माणसे प्रदेश गरीब किंवा श्रीमंत असेल त्याप्रमाणे कमी किंवा जास्त खातात, परंतु सबंध देशाचा विचार केला तर त्याचा नेमस्तपणा नवल वाटावे अशा तऱ्हेचा आहे. आपल्या जीवनाच्या पद्धतीबद्दल पर्शिअन लोकांना अभिमान वाटतो; त्यांचे म्हणणे असे की आमच्या अंगकांतीकडे पाहा म्हणजे आमची जीवनपद्धत खिश्चन देशातील लोकांच्या जीवनपद्धतीपेक्षा कशी श्रेष्ठ आहे ते स्पष्ट होईल. आणि खरोखरच, त्यांचा रंग कसा एकसारखा असतो, आणि त्यांची कातडी कशी रम्य नितळ ( fine grained ) आणि मुलायम असते. उलट, त्यांचे प्रजाजन आर्मेनिअन्स, जे युरपिअन पद्धतीने राहतात, त्यांची कातडी निबर असते व तिच्यावर डाग असतात आणि त्यांची शरीरे स्थूल आणि बेढब असतात.

भूमध्यरेषेच्या आपण जसे जवळ जातो तशी जीवननिर्वाहासाठी लोकांना कमी वस्तूंची आवश्यकता भासते. लोक मांस क्वचित्‌च खातात; त्यांचे नेहमीच्या खाण्यातील अन्न असते ते तांदूळ, मका, डाळी यासारखे. इंडिजमधे लाखो लोक असे आहेत की ज्यांच्या दररोजच्या जेवणाचा खर्च दोनचार पैशांपेक्षा अधिक नसतो. युरपमधे देखील दक्षिणेकडील लोक आणि उत्तरेकडील लोक यांच्या भुकेत लक्षात भरेल असा फरक असतो. जर्मन माणसाला एका वेळेला लागेल तेवढ्यावर स्पेनमधील माणूस एक आठवडा गुजराण करू शकेल. ज्या देशातील लोक खूप खादाड असतात तिथे चैन खाद्यपदार्थांच्या रूपाने व्यक्त होत असते. इंग्लंडमधे टेबलावर मांसाची जी रेलचेल होते आणि इटलीमधे पाहुण्यांची साखर व फुले यांनी जी सरबराई होते तिच्यावरून ही गोष्ट सिद्ध होते.

कपड्यांच्या बाबतीत जी सापेक्ष चैन होते तिच्यामधेही हा स्पष्ट फरक आहे. ऋतुमानामुळे होणारे फेरबदल जिथे जलद व तीव्र असतात तिथे कपडे साधे आणि चांगले असतात; जिथे कपडे केवळ दाखवण्यासाठी म्हणून वापरले जातात तिथे उपयुक्ततेपेक्षा देखावा अधिक दृष्टीस पडतो. कपडे असणे हीच मुळी एक चैन असते. नेपल्समधे सोनेरी जरीने शृंगारलेले कोट घालून दररोज पॉसिलिपोकडे पायी चालत जाणारी माणसे दृष्टीस पडतात, पण त्यांच्या पायात मोजे नसतात. इमारतींच्या बाबतीतही तोच प्रकार दृष्टीस पडतो. हवामानापासून जिथे धास्ती बाळगण्याचे कारण नसते तिथे थाटमाटापुढे सारे

तुच्छ ठरते. पॅरिस व लंडनमधे पहिले लक्ष पुरवावे लागते ते उबदारपणा आणि आराम यांच्याकडे. माद्रिदमधे जिथे लोकांच्या गाठीभेटी घ्यायच्या असतात ते दिवाणखाने अप्रतिम असतात, पण खिडक्या बंद होत नाहीत आणि शयनगृहे उंदरांच्या बिळासारखी असतात.

उष्ण देशात खाद्यपदार्थ अधिक कसदार असतात आणि त्यांच्यामधे मसालाही अधिक असतो. या तिसऱ्या फरकाचा दुसऱ्यावरही परिणाम घडून येतो. इटलीमधे लोक इतक्या भाज्या का खातात ? कारण त्या चांगल्या व आरोग्यवर्धक असतात आणि त्यांची चवही चांगली असते. फ्रान्समधे त्या केवळ पाण्यावर वाढतात आणि त्यामुळे जे त्या खातात त्यांना पौष्टिक आहार मिळत नाही व म्हणून खाद्यपदार्थांमधे त्याना कुणी महत्त्व देत नाही. भाजीमळ्यांना तितकीच जागा लागते आणि श्रमदेखील तितकेच करावे लागतात. बर्बरी कोस्टवर होणारा गहू फ्रान्समधील गव्हापेक्षा कमी दर्जाचा असला तरी त्याचे पीठ अधिक पडते आणि उत्तरेकडील गव्हाच्या जातींच्या मानाने फ्रान्समधील गव्हाच्या बाबतीतही तेच म्हणता येईल. म्हणूनच असे अनुमान काढता येईल की जस-जसा मनुष्य भूमध्यरेषेपासून ध्रुवाकडे जाईल तसतशी वर उल्लेखिलेल्या श्रेणीसारखी श्रेणी नियम म्हणून अस्तित्वात असलेली दृष्टीस पडेल. परंतु निसर्गदत्त वस्तूंचा साठा सारखाच पण त्यांच्यापासून मिळणारा पौष्टिक आहार मात्र कमी असे घडणे हे निश्चितपणे गैर-फायद्याचे नाही का ?

या विचारामधे मी आणखी एका विचाराची भर घालू शकतो. हा नवा विचार जुन्या विचारातूनच वाढलेला आहे आणि त्याच्या योगाने त्याचे समर्थनही होते. तो विचार हा की उष्ण प्रदेशांना कमी लोकसंख्येची आवश्यकता असते व आहे:त्या लोक-संख्येपेक्षा कितीतरी अधिक लोकांची तिथे गुजराण होऊ शकते. या गोष्टीमुळे एक दुहेरी अतिरेक ( superfluity ) निर्माण होतो; आणि जुल्मी राजवटीच्या ती गोष्ट पथ्यावर पडते. स्थिर लोकसमुदाय असला तर, जिथे लोक मोठ्या प्रदेशामधे तुरळक तुरळक असे विखुरलेले असतात तिथे बंड उभारणे इतर ठिकाणापेक्षा अधिक कठीण असते, कारण अशा परिस्थितीत माणसांना एकत्र जमून एकमेकांशी गुप्तपणे वाटाघाटी करणे कठीण असते; आणि त्या मानाने शासनाला त्यांच्या योजनांची माहिती मिळवून त्यांचे एकमेकांशी दळणवळण बंद पाडणे सोपे असते. पण जिथे लोकसमुदाय मोठा असेल आणि लहान प्रदेशात तो एकत्रित झाला असेल तिथे शासनाला सार्वभौम सत्तेचे कार्य स्वतःकडे घेणे कठीण जाते. राजपुरुषांना जसे राजमंडळात तसेच पुढाऱ्यांना आपआपल्या घरात एकत्र जमून विचारविनिमय करता येतो आणि सैनिकांना जसे त्यांच्या बराकीत जमता येते तितक्याच त्वरेने लोकांच्या झुंडी मोकळ्या मैदानावर जमू शकतात. खूप लांब लांब ठिकाणी देखील हुकुमाची अंमलबजावणी करता येते, हा एक जुलमी राज्यपद्धतीचा विशेष गुण आहे. ठिकठिकाणी कायमची शक्तिस्थाने निर्माण करून बाहेरच्या भागातही त्या राजवटीला आपले वर्चस्व प्रस्थापित करता येते, जसे तरफ ( lever )

जितकी अधिक लांब तितकी तिची शक्ती अधिक.[1] लोकांची शक्ती मात्र ते एकत्रित असतील तिथेच परिणामकारक ठरते. जिथे ती विखुरली जाते तिथे ती दिसेनाशी होते आणि नष्ट होते. बंदुकीची दारू जमिनीवर पडली तर ती जशी कणाकणाने पेट घेते व निष्फळ ठरते, तसाच हा प्रकार आहे. लोकांची वस्ती विरळ आहे असे देश म्हणूनच जुल्मी राजवटीला अधिक सोईचे. हिंस्र श्वापदे जंगलातच ( desert ) राज्य करतात.

## प्रकरण ९

# चांगल्या शासनाची चिन्हे

चांगल्या परिस्थितीत व सर्व ठिकाणी उत्तम शासन कोणते असे जो विचारतो तो उत्तर देता येणार नाही असा प्रश्न विचारत असतो. कारण या प्रश्नाचे उत्तर अनिश्चित आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे म्हणजे त्याची अनेक चांगली उत्तरे देता येतील. वेगवेगळ्या लोकसमुदायांच्या सापेक्ष व निरपेक्ष परिस्थितींचे जितके वेगवेगळे समुच्चाय कल्पिता येतील तितकी त्या प्रश्नाची उत्तरे देता येतील.

एखाद्या लोकसमुदायाचे शासन चांगले की वाईट हे ठरविण्याची चिन्हे कोणती असा प्रश्न विचारला तर गोष्ट वेगळी; वस्तुस्थितीविषयीचा हा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर देता येईल.

परंतु, एकच निश्चित उत्तर देता येत नाही, कारण प्रत्येक माणसाला आपल्या विचारानुसार उत्तर द्यावेसे वाटते, अंकित प्रजा ( the subject ) सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था यांच्याबद्दल फुशारकी मारते, तर व्यक्तीला उपभोगता येणाऱ्या स्वातंत्र्याचा विचार नागरिक करतो. पूर्वोक्ताला मालमत्तेचे संरक्षण हवे असते तर उत्तरोक्ताला शरीराचे ( the person ). अत्यंत कडक शासन उत्तम असे पूर्वोक्ताला वाटेल, तर अत्यंत सौम्य शासन चांगले असे उत्तरोक्त म्हणेल, पहिल्याला दुष्कृत्यांचे शासन व्हावे

---

१. वरती ( पुस्तक २ प्रकरण ९ ) मोठ्या राज्यांच्या अंगभूत वैगुण्याबद्दल मी जे लिहिले आहे त्याच्याशी याचा विरोध नाही. तिथे मी शासन आपल्या सभासदांवर जी सत्ता गाजवते तिच्याबद्दल विचार करत होतो; इथे शासनाला अंकित प्रजेवर जी सत्ता गाजवता येते तिच्याबद्दल विचार चालू आहे. राज्याचे अधिकारी दूरवर पसरले असले म्हणजे प्रजेवर दडपण आणण्यासाठी त्यांचा सत्तास्थानासारखा उपयोग होतो. पण स्वतःच्या अधिकाऱ्यावर हुकुमत गाजवण्यासाठी जे सत्तास्थान हवे ते त्याच्याजवळ नसते. म्हणून एका ठिकाणी तरफेच्या लांबीमुळे दुबळेपणा येतो तर दुसऱ्या ठिकाणी तिच्यामुळे शक्ती वाढते.

असे वाटते तर दुसऱ्याला वाटते दुष्कृत्ये बहुच नाहीत. आपल्या देशाची शेजाऱ्यांना धास्ती वाटावी असे पहिल्याला वाटते, तर आपल्या देशाकडे त्यांनी दुर्लक्ष करावे असे दुसऱ्याला वाटते. पैसा खेळत राहिला की पहिल्याला आनंद होतो, उलट दुसऱ्याची मागणी असते की लोकांना अन्नधान्य मिळावे. या व अशाच तऱ्हेच्या इतर प्रश्नांवर एकमत झाले तरी देखील उत्तराच्या आपण जवळ आलो का ? नैतिक गुणांचे मोजमाप करता येईल अशी फूटपट्टी नाही. दंडकाबद्दल ( signs ) एकमत होऊ शकेल, परंतु त्यांच्या सापेक्ष मूल्याबद्दल एकमत होऊ शकेल का ?

एक उघड चिन्ह आहे, त्याचा चुकीचा अर्थ लावला जावा आणि त्याच्या अर्थाबद्दल एकमत होऊ नये इतकी दुर्बुद्धी माणसामधे असावी याचे मला नेहमी नवले वाटते. सर्व राजकीय संस्था आपल्या डोळ्यापुढे ठेवतात ते ध्येय कोणते ? खात्रीने, नागरिकांचे संरक्षण आणि त्यांची भरभराट. आणि लोकांचे संरक्षण होते आहे व त्यांची भरभराट होते आहे याचे सर्वात निश्चित गमक कोणते ? लोकसमुदायची संख्या. शोध घेण्यासाठी जास्त पुढे जाण्याची आवश्यकता नाही. इतर गोष्टी सारख्या आहेत असे मानले तर ज्या शासनाच्या अमदानीत, नवीन लोकसमुदायाला देशामधे आणणे किंवा त्यांना नागरिकत्वाचे हक्क देणे यासारखे असाधारण उपाय न योजता, नागरिकांची संख्या अधिक वाढते आणि त्यांच्यामधे सारखी भर पडते ते शासन निर्विवाद उत्कृष्ट. तसेच ज्या शासनाच्या अमदानीत लोकांची संख्या घटते आणि त्यांचा विनाश होतो ते शासन अत्यंत निकृष्ट. गणना करण्यातील निपुणांनो, गणना करण्याचे, मोजमाप घेण्याचे, तुलना करण्याचे हे काम मी तुमच्यावर सोपवतो. [1]

---

१. ज्या शतकामधे मनुष्यजातीची भरभराट अधिक बहून आली ती शतके निश्चित करण्यासाठी आपण एकच एक मानदंड वापरला पाहिजे. ज्या शतकामधे कला आणि वाङ्मय यांची वाढ झाली त्यांचा खूप गौरव झालेला आहे. तो गौरव करताना त्या संस्कृतीच्या गुप्त उद्दिष्टांची खरीखुरी जाणीव किंवा तिचे घातक परिणाम झाले त्यांचा खरा विचार केला गेलेला दिसत नाही. ग्रंथकाराच्या सर्वसाधारण विधानांच्या मागे त्याला खरी प्रेरणा देणारा जो त्याचा असंस्कृत स्वार्थ दडलेला असतो तो पाहायला आपण कधीच शिकणार नाही का ? ग्रंथकार काहीही म्हणोत, ज्यावेळी एखाद्या देशाची जननसंख्या घटते त्यावेळी देशाची संस्कृती कितीही उज्ज्वल असो, त्या देशामधे सर्व काही नीट चालले आहे असे म्हणता येणार नाही. तसेच कवीचे उत्पन्न एक लाख फ्रँक्सचे आहे यावरून तो विद्यमान होता ते शतक इतर सर्व शतकांपेक्षा श्रेष्ठ होते असे मानता येत नाही. देशाच्या राज्यकर्त्यांच्या वरवर दिसणाऱ्या शांततेकडे व स्वस्थतेकडे सारे लक्ष न देता आपण देशाची सर्वसाधारण सुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. विशेषतः देश मोठा असेल आणि रहिवाशांनी गजबजलेला असेल तर त्या सुस्थितीकडे अधिक लक्ष पुरवायला हवे, गारांच्या वर्षावामुळे काही ग्रामसमुदायांचे खूप नुकसान होईल, पण त्याच्यामुळे दुष्काळ पडला आहे असे

## प्रकरण १०

# शासनाचा दुरुपयोग आणि ऱ्हास होण्याची त्याची प्रवृत्ती याविषयी

विशिष्ट इच्छा व सर्वसाधारण इच्छा यामधे नेहमी जसा विरोध असतो तसाच शासनाचाही सार्वभौम सत्तेशी अविरत विरोध चालू असतो. हा विरोध जसा अधिकाधिक स्पष्ट होतो तसा राज्यघटनेत अनिष्ट फेरफार घडत जातो. राजा ( The prince ) च्या इच्छेला विरोध करून समतोल स्थापन करणारी दुसरी संघटित ( corporate ) इच्छा नसल्याकारणाने शेवटी, लवकर किंवा उशीरा, राजा सार्वभौम सत्तेला छळतो आणि सामाजिक करार मोडतो. म्हातारपण व मृत्यू जसे मनुष्याचे शरीर नष्ट करतात, तसाच राजकीय समाजाचा देखील त्याच्यातील अंगभूत व अटळ दोषामुळे नाश होतो. हा दोष समाजाच्या जन्मापासूनच त्याचा नाश घडून येण्यासाठी कार्य करत असतो.

शासनाच्या अधोगतीचे दोन सर्वसाधारण प्रकार आहेत; एक म्हणजे शासन संकुचित होणे आणि दुसरा म्हणजे राज्यसंस्था विरघळून जाणे म्हणजेच नष्टप्राय होणे.

---

क्वचितच घडते. दंगलीचे उद्रेक व यादवी युद्धे यांनी राज्यकर्ते विवंचनेत पडतात; परंतु लोकांच्या दुःस्थितीची ती खरी कारणे नव्हेत. काही एका मर्यादेपर्यंत, ती खरे म्हणजे उपकारकही ठरतात. कारण देशावर जुलूमजबरदस्ती कुणी करावयाची हे ठरेपर्यंत देशाला थोडा विसावा लाभतो. देशामधे जी कायमची परिस्थिती असते तिच्यामुळे सुबत्तेचा आणि संकटाचा काळ येतो. सर्व लोक शांतपणे जेव्हा जोखडाखाली मान देऊन उभे असतात तेव्हा मरण जवळ येते आणि राज्यकर्त्यांना विनासायास त्यांचा नाश करता येतो. फ्रान्सच्या राज्यामधे मोठ्या मंडळीमधील भांडणामुळे अशांतता निर्माण झाली होती आणि पॅरिसच्या मुख्य अधिकाऱ्याला ( co-adjectors ) देखील खिशात खंजीर बाळगून लोकसभेला हजर राहावे लागत असे, त्यावेळी देखील लोक आनंदात राहात होते आणि सभ्य, स्वतंत्र व भरभराटीच्या परिस्थितीत प्रजोत्पादन करत होते. जुन्या काळी निर्घृण लढाया चालू असताना देखील ग्रीसची भरभराट होत होती; रक्ताच्या नद्या वाहात होत्या, तरी देखील देशामधे खूप लोकांची वस्ती होती. मॅकिआव्हेलीने म्हटले आहे, " खून, हद्दपारी आणि यादवी झगडे घडत होते तरी देखील आमचे प्रजासत्ताक राज्य पूर्वीपेक्षा अधिक शक्तिशाली झाले. नागरिकांचे सद्गुण, त्यांच्या चालीरीती आणि त्यांचे स्वातंत्र्य यामुळे त्याचे सामर्थ्य वाढले; दुहीमुळे ते फारसे कमी होऊ शकले नाही. " थोडीशी गडबड झाली तर तिच्यामुळे आत्मविकास होतो; देशाची खरीखुरी भरभराट होते ती स्वातंत्र्यामुळे, शांततेमुळे नव्हे.

पुष्कळांच्या हातून शासन जेव्हा थोड्यांच्या हाती जाते तेव्हा ते संकुचित होते. म्हणजेच जेव्हा त्याचे लोकशाहीतून उमरावशाहीत व एक पुढचे पाऊल टाकून राजेशाहीत रूपांतर होते तेव्हा त्याचा संकोच होतो. सहजगत्याच शासनाला त्या दिशेने गती लाभते.[1]

---

१. व्हेनिसचे लोकराज्य भोवतालच्या खाड्यांच्या प्रदेशात (lagunes) मंद गतीने बनले व विकास पावले हे या प्रक्रियेचे डोळ्यात भरण्यासारखे उदाहरण आहे. बाराशे वर्षांनंतरदेखील व्हेनिसमधील रहिवाशांनी दुसऱ्या टप्प्यापलीकडे प्रगती केली नाही, ही एक उल्लेखनीय अशी गोष्ट आहे. दुसरा टप्पा सेतार दी कॉन्सिग्लियो (Serrar di Consiglio) बरोबर ११९८ मधे सुरू झाला. त्यांच्या जुन्या सरदाराबद्दल (Doges) त्यांना पुष्कळ वेळा हिणवले जाते. पण आता हे सिद्ध झाले आहे की–एखादा इतिहास (Squittini della liberta veneta) काहीही म्हणो–सार्वभौम अधिकार असा त्यांनी खऱ्या अर्थाने कधीच बजावला नव्हता. रोमन लोकराज्याचे उदाहरण कुणीतरी माझ्या विरुद्ध जरूर वापरील. असे सांगण्यात येईल की, त्या लोकराज्यातील घटनांची दिशा अगदीच वेगळी होती. तिथे राजेशाहीची उमरावशाहीत व उमरावशाहीची लोकशाहीत परिणती झाली असे सांगण्यात येईल. परंतु मला हा विचार मुळीच मान्य नाही. रोम्युलसने स्थापन केले ते मिश्र स्वरूपाचे शासन होते व त्याची झपाट्याने जुलूमशाहीत (despotism) अवनती झाली. मूल जसे मोठा मनुष्य होण्यापूर्वी मरावे तसे ते राज्य, त्यालाच लागू पडतील अशा काही कारणांमुळे, अकाली विलयाला गेले. तारक्विन्सची (Tarquins) हकालपट्टी झाली तेव्हापासूनच लोकराज्याच्या जन्माची कालगणना करावयास हवी. त्या राज्याचे पहिले स्वरूप अस्थायी होते, कारण जरूर ते काम अर्धेच केले गेले होते आणि उच्चपदस्थांची श्रेणी (Patrician Order) नष्ट करण्यात आली नव्हती. त्यामुळे घडले असे की लोकशाहीला विरोध करणारी वंशपरंपरागत उमरावशाही कायम राहिली. वंशपरंपरागत उमरावशाही म्हणजे राज्यकारभाराच्या ज्या अनेक कायदेशीर पद्धती आहेत, त्यांतील अत्यंत निकृष्ट दर्जाची पद्धती. त्यामुळे शासन नेहमीच अनिश्चित आणि डळमळीत राहिले. मॅकिआव्हेलीने दाखवल्याप्रमाणे, ट्रायब्युनेट (Tribunate) स्थापन झाले त्याच वेळी त्याला कायमचे स्वरूप लाभले. ते स्थापन होईपर्यंत खरेखुरे शासन नव्हते व खरीखुरी लोकशाही देखील नव्हती. त्यानंतरच लोकसमुदाय सार्वभौम बनला, एवढेच नव्हे तर राज्याधिकारी (magistrate) व न्यायाधीशही बनला. सेनेट (Senate) म्हणजेच वरिष्ठ लोकसभा दुय्यम दर्जाचे न्यायालय म्हणून शासनावर देखरेख ठेवण्याचे व त्याला एकसूत्रीपणा देण्याचे काम करत होती. उच्च कुटुंबात जन्मलेले (Patricians) असले तरी व लोकराज्याचे पहिल्या दर्जाचे अधिकारी असतानाही व युद्धाच्या वेळी सेनापती म्हणून जीवन-मरणाचे अधिकार हाती असतानाही कौन्सल्सना (Consul) शहराच्या हद्दीत लोकसमुदायाने नियुक्त केलेले अध्यक्ष म्हणून वागावे लागे.

हा क्रम उलटा झाला आणि राज्ये लहानऐवजी मोठी होत गेली तर शासनाला स्वस्थ चित्ताने नांदता येईल. पण असा उलटा क्रम अशक्य आहे.

अतिवापरामुळे दुबळ्या झालेल्या यंत्रणेला जुनी व्यवस्था टिकवणे जेव्हा अशक्य होते तेव्हाच शासन आपले रूप ( form ) बदलते. शासनाने एका बाजूने सत्तेचा विस्तार केला आणि दुसऱ्या बाजूने तिचा कडकपणा कमी केला तर त्याचा अधिकार शून्यत्वाला पोचेल व स्वतःचे अस्तित्व टिकवणे त्याला पूर्वीपेक्षा अधिक कठीण जाईल. म्हणून ज्या प्रमाणात विस्तार होईल त्या प्रमाणात शासनाने यंत्रणा घासूनपुसून मजबूत बनविली पाहिजे. ते केले नाही तर ज्या राज्याचे ओझे शासन वाहात असते ते राज्यच मुळी कोलमडून पडेल.

राज्याचे विसर्जन ( dissolution ) दोन प्रकारे होऊ शकते. एक प्रकार म्हणजे ज्या वेळी राजपुरुष ( prince ) राज्याचा कारभार कायद्यानुसार चालवत नाही आणि स्वतःच सार्वभौम सत्ता बळकावतो. ते घडते तेव्हा एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट घडून येते. ती म्हणजे शासनाचा संकोच होण्याऐवजी राज्याचा संकोच होतो. माझे म्हणणे असे की मोठे राज्य विसर्जन पावते आणि त्याच्या ठिकाणी एक लहान, शासनात सहभागी होणाऱ्या लोकांपुरते मर्यादित, असे राज्य निर्माण होते. बाकीच्या जनतेशी त्याचा नंतर जो संबंध असतो तो केवळ धनी आणि नोकर या स्वरूपाचा. म्हणून शासनाने सार्वभौम सत्तेचा अपहार करताच सामाजिक कराराचा भंग होतो आणि सामान्य नागरिकांना त्यांचे नैसर्गिक स्वातंत्र्य मिळाल्याकारणाने शासनाचे हुकूम पाळण्याचे त्यांच्यावर बंधन नसले तरी देखील ते पाळण्याची त्यांच्यावर जबरदस्ती होते.

~~~~~~~~~~

त्या वेळेपासून शासनाला नैसर्गिक वळण लागल्याचे दृष्टीस पडते. उमरावशाहीकडे त्याचा स्पष्ट कल वळू लागला. परंतु उच्च पदस्थांच्या श्रेणीने स्वतःचा जवळजवळ आत्मघात करून घेतल्यामुळे व्हेनिस किंवा जिनोआ इथे घडल्याप्रमाणे अमीर–उमराव शासनाशी समरस झाले नाहीत. उच्च कुळात जन्मलेले आणि सर्वसाधारण माणसे ( Plebians ) यांची मिळून बनलेली समिती, म्हणजेच सिनेट किंवा वरिष्ठ लोकसभा हीच मुळी उमरावशाही बनली आणि ट्रायब्युनेटने स्वतःच्या हाती कारभार घ्यायला सुरवात केली तेव्हा त्या संस्थेसाठी ती उमेदवार पुरवू लागली. शब्दामुळे वस्तुस्थिती बदलत नाही आणि लोकांच्या नावाने राज्य करणारे राज्यकर्ते निर्माण झाले की, कोणत्याही नावाने तुम्ही त्यांना संबोधा, त्यांचे राज्य उमरावशाहीचे राज्य बनते.

उमरावशाहीच्या दुष्कृत्यांमुळे यादवी युद्धे आणि ट्रायमव्हिरेट ( त्रिमूर्तींचे राज्य ) उद्भवले. सला, ज्युलिअस सीझर व ऑगस्टस यांनी जवळ जवळ राजासारखे राज्य केले आणि शेवटी टायबेरिअसच्या जुलमी अमलाखाली राज्य नष्ट झाले. रोमच्या इतिहासाने माझ्या सिद्धांताचे खंडन होण्याऐवजी त्याने त्याला उलट पुष्टीच मिळते.
~~~~~~~~~~

एक संघटित समुदाय ( corporate body ) म्हणून वापरावयाची सत्ता शासनाच्या घटकांनी वेगवेगळी वापरण्यासाठी हस्तगत केली म्हणजेदेखील तोच प्रकार घडतो. ही देखील कायद्याची एक पायमल्लीच आहे व तिच्यामुळे अधिकच गोंधळ माजतो. कारण राज्याला त्यामुळे जितके दंडाधिकारी तितक्या राजपुरुषांना तोंड द्यावे लागते आणि शासनाइतकीच राज्यामधेही दुही माजल्यामुळे ते नष्ट होते अगर त्याला आपले रूप बदलावे लागते. राज्याचे विसर्जन झाल्यानंतर, शासन कोणत्याही प्रकारचे असो त्याची जी दुष्कृत्ये घडतात त्यांना अराजक असे सर्वसाधारण नाव आहे. जास्त अचूकपणे बोलावयाचे म्हणजे लोकशाहीची झुंडशाहीमधे, उमरावशाहीची सामंतशाहीमधे व मी भर घालून म्हणतो की राजेशाहीची जुल्मशाहीमधे अवनती होते. जुल्मशाही हा जो शेवटचा शब्द आहे त्याचा अर्थ संदिग्ध असून त्याचे अधिक स्पष्टीकरण करणे अवश्य आहे.

सर्वसाधारणपणे असे समजले जाते की जुल्मशहा ( tyrant ) म्हणजे न्यायाची व कायद्याची पर्वा न करता जबरदस्तीने राज्य करणारा राजा. खऱ्या अर्थाने जुल्मशहा म्हणजे अधिकार नसताना राज्याची सत्ता बळकावणारी खाजगी व्यक्ती. ग्रीक लोकांनी टायरंट ( tyrant ) हा शब्द वापरला आहे तो या अर्थाने. म्हणूनच ते ज्यांचा अधिकार कायदेशीर नाही अशा राजपुरुषांच्या बाबतीत तो शब्द वापरत असत, मग ते राजपुरुष चांगले असोत की वाईट असोत.[1] म्हणजेच जुल्मशहा आणि सत्ता बळकावणारा ( userper ) हे शब्द पूर्णतः समानार्थी आहेत.

वेगवेगळ्या गोष्टींना वेगवेगळी नावे द्यावी म्हणून राजाचा अधिकार बळकावणाऱ्याला टायरंट ( tyrant ) हे नाव व सार्वभौम सत्ता बळकावणाऱ्याला डेस्पॉट ( despot ) हे नाव देतो. कायदे डावलून टायरंट सत्ता मिळवतो, पण ती कायद्यानुसार राज्य चालविण्यासाठी. डेस्पॉट ( despot ) आपण कायद्यापलीकडचे आहो अशी भूमिका घेतो. म्हणून टायरंट डेस्पॉट नसतो, पण डेस्पॉट हा नेहमी टायरंट असतोच.

---

१. ॲरिस्टॉटल जुल्मशहा व राजा यांच्यामधे फरक करतो हे खरे आहे ( Eth. Nic, Book VIII ch. X ). तो फरक हा की जुल्मशहा स्वार्थासाठी राज्य करतो तर राजा प्रजेच्या हितासाठी राज्य करतो. परंतु सर्वसाधारणपणे सर्व ग्रीक ग्रंथकारांनी टायरंट ( tyrant ) या शब्दाचा वेगळ्या अर्थाने उपयोग केला आहे. विशेषेकरून झेनोफनच्या ( Xenophon ) हायरो ( Hiero ) या ग्रंथाकडे पाहिले की ते स्पष्ट होते. ॲरिस्टॉटलने जो फरक दाखवला आहे त्यावरून असे दिसते, की जगाच्या सुरुवातीपासून खरेखुरे राज्य ( kingdom) असे कुठे कधी निर्माण झालेलेच नाही.

## प्रकरण ११

# राजकीय समाजाच्या अंगाविषयी

अतिशय चांगल्या रीतीने बनलेले शासन देखील साहजिकपणे व टाळता येणार नाही अशा पद्धतीने उतरंडीवर उभे असते. स्पार्टा आणि रोम यांचा जिथे नाश झाला तिथे कोणते राज्य आपण कायम टिकू अशी आशा बाळगून राहू शकते? टिकाऊ स्वरूपाचे शासन बनवले तरी आपण ते अनंत आहे असे मानू नये. अशक्य ते साधण्याची आपण खटपट केली नाही व मानवी प्रयत्नांना जे स्थैर्य लाभत नाही ते आपल्या कृतीला आपण प्राप्त करून देऊ अशी खोटी आशा बाळगली नाही तरच आपण यशस्वी होऊ शकू.

मनुष्यशरीराप्रमाणेच राजकीय समाजदेखील जन्माच्या क्षणापासून मरायला सुरुवात होते आणि स्वतःच्या अंतर्गत अवस्थेत नाशाची कारणे त्याने बरोबर बाळगलेली असतात. परंतु मानवी शरीर व राजकीय समाज दोघांचीही प्रकृती कमी अगर अधिक तगडी व कमी अगर अधिक टिकाऊ असते. मनुष्याच्या शरीराची ठेवण निसर्ग बनवतो; राज्याची घटना मनुष्याच्या कौशल्याचे कार्य आहे. आपले आयुष्य माणसांना फार वाढवता येत नाही, पण राज्याचे आयुष्य मात्र त्याला उत्तमातील उत्तम रूप देऊन त्यांना वाटेल तितके वाढविता येते. अत्युत्कृष्ट घटनेचा देखील एक दिवस अंत होतो, परंतु तितकी चांगली नसलेल्या घटनेपेक्षा ती अधिक टिकते. एखादे अनपेक्षित संकट कोसळून तिचा अकाली अंत झाला तर मात्र गोष्ट वेगळी.

सार्वभौम सत्ता हे राजकीय जीवनाचे प्रधान तत्त्व आहे. कायदे करण्याची सत्ता हे राज्याचे हृदय तर कार्यकारी सत्ता ही त्याची बुद्धी; बुद्धीमुळेच सर्व भागांना चलनवलन करता येते. बुद्धीला अर्धांगाचा झटका आला तरीदेखील रोगी मरत नाही. मनुष्य अपंग होतो तरी देखील तो मरत नाही. परंतु हृदयाची क्रिया बंद पडली म्हणजे मात्र माणसाचा अवतार संपतो.

राज्य जगते ते कायद्यामुळे नव्हे तर कायदे करण्याच्या सत्तेमुळे. कालच्या कायद्याचा अधिकार आज चालत नाही; परंतु मौन म्हणजे संमती असे समजण्यात येते आणि जे कायदे रद्द केले जात नाहीत त्यांना सार्वभौमाने मान्यता दिली आहे असे गृहीत धरले जाते. सार्वभौमाला तो अधिकार आहे, या कल्पनेने एखाद्या विशिष्ट गोष्टीबद्दल सार्वभौमाने आपली इच्छा ( will ) जाहीर केली की ती रद्द करीपर्यंत कायमची अंमलात राहते.

मग पुराणकाळातील कायद्याबद्दल माणसांना इतका आदर का वाटतो? इतकी वर्षे ते कायदे कायम राहिले म्हणजेच ते बनविणारी जी इच्छा ती उत्कृष्ट स्वरूपाची होती हे सिद्ध होते हे ते कारण असावे. ते कायदे राज्याला आवश्यक आहेत असे सार्वभौमाला वाटले नसते तर त्याने एकदाच नव्हे तर अनेकदा ते रद्द केले असते. त्यामुळेच काळ जातो

तसे कायदे क्षीणशक्ती होण्याऐवजी सुसंघटित राज्यामधे त्यांची शक्ती सारखी वाढत जाते. पुराणकाळातील म्हणून त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या अनुकूल भावनेमुळे त्यांच्याबद्दलचा आदर दिवसेदिवस वाढत जातो. उलट, काळाबरोबर कायद्यांची पकड कमी होणे हे कायदे करण्याची सत्ता नष्ट होत चालली आहे याचे लक्षण असून राज्यातून जीवनाचा अंश निघून गेल्याचे ते प्रत्यंतर आहे.

## प्रकरण १२

# सार्वभौम सत्ता कशी टिकवली जाते त्याविषयी

कायदे करण्याची सत्ता याखेरीज दुसरी सत्ता जवळ नसल्यामुळे सार्वभौमाला नेहमी कायद्यानुसारच वागावे लागते आणि कायदे म्हणजे सर्वसाधारण इच्छेचे खरेखुरे दर्शन; त्यामुळे लोक एकत्र जमतात त्याच वेळी सार्वभौम कार्य करू शकतो. पण, मला असे सांगण्यात येईल की सर्व लोकांनी एकत्र जमणे ही एक भ्रामक कल्पना आहे. आज ती जरूर भ्रामक आहे; पण दोन हजार वर्षांपूर्वी ती तशी नव्हती. मग मनुष्यस्वभाव बदलला आहे का?

नीतीच्या क्षेत्रातील शक्यतेच्या मर्यादा आपल्याला वाटते तितक्या संकुचित नसतात. आपले दोष, आपले दुर्गुण आणि आपले दुराग्रह यांमुळे आपण कोंडले जातो. क्षुद्र मनांना मोठ्या माणसांची कल्पना देखील करता येत नाही. निकृष्ट दर्जाचे गुलाम स्वातंत्र्य या शब्दाचा उच्चार करताच हेटाळणीचा आविर्भाव करून हसतात.

पूर्वीच्या काळी जे घडले त्याच्यावरून आज काय करता येईल याबद्दल विचार केला तर बरे होईल. रोमचे लोकराज्य हे एक मोठे लोकराज्य होते व रोम हे एक मोठे शहर होते असे मी म्हटले तर कोणाचा विरोध होईल असे वाटत नाही. शेवटची जी खानेसुमारी घेतली तिच्याप्रमाणे शस्त्रे धारण करू शकतील असे चार लाख नागरिक होते आणि साम्राज्यामधे शेवटच्या गणतीप्रमाणे चाळीस लाखांहून अधिक नागरिक होते. चाळीस लाखांच्या या संख्येत परतंत्र लोक, परके लोक, बायका, मुले व गुलाम यांचा समावेश नव्हता.

राजधानीतील व शेजारच्या जिल्ह्यातील या प्रचंड लोकसमुदायाला एकत्र एका अमलाखाली आणणे किती कठीण आहे असे कुणालाही वाटेल. तरी देखील राज्यकारभाराचे काम करण्यासाठी रोमन जनता एकत्र आली नाही असा एक आठवडाही क्वचित कधी गेला असेल, पुष्कळ वेळा एकापेक्षा अधिक वेळा ते जमत. सार्वभौम सत्तेचे हक्क ते बजावीत असत आणि अंशतः शासनाचे देखील. काही गोष्टींचा ते निकाल लावीत, काही गोष्टीं-

बद्दल ते मते प्रदर्शित करत आणि एकंदर सर्व लोक सार्वजनिक ठिकाणी नागरिक म्हणून व तितक्याच वेळा दंडाधिकारी म्हणून जमा होत असत.

राष्ट्रांच्या इतिहासातील पहिल्या काळाचा अभ्यास केला की असे दृष्टीस पडते की प्राथमिक अवस्थेतील शासनाचे कार्य अशा परिषदांमार्फत चालविले जात असे. मॅसिडोनिअन्स आणि फ्रॅंक्स यांच्यासारख्या राजेशाही स्वरूपाच्या शासनाचे कार्य देखील त्याच पद्धतीने चाले. ते कसेही असो, रोममधे जो प्रघात निर्विवादपणे चालू होता तो सर्व विरोधकाना उत्तर म्हणून पुरेसा आहे. जे आहे त्याच्यावरून जे पुढे व्हायचे आहे त्याच्याबद्दल तर्क बांधणे ही मला वाटते योग्य पद्धत आहे.

## प्रकरण १३

# सार्वभौम सत्ता कशी टिकवली जाते त्याविषयी (पुढे चालू)

लोकांच्या परिषदेने ( असेंब्ली ) एकदा सर्व काळासाठी राज्याचे संविधान निश्चित करून व कायद्याला मंजूरी देऊन कार्य पुरे होत नाही. कायमचे शासन प्रस्थापित करून अगर राज्याधिकाऱ्यांच्या निवडणुकीची योजना आखून भागत नाही. विशिष्ट प्रश्नांचा विचार करण्यासाठी भरवलेल्या खास सभांखेरीज परिषदेच्या निश्चितपणे व ठराविक वेळी सभा भरल्या पाहिजेत. या सभा कधीही रद्द होता कामा नये. किंवा लांबणीवर टाकल्या जाता कामा नये. म्हणजेच योजना अशी असावी की लोकसमुदायाची ठराविक दिवशी निश्चितपणे कायद्यानुसार सभा भरवली जाईल आणि ती भरवण्यासाठी वेगळ्या खास निमंत्रणाची गरज भासणार नाही.

निश्चित वेळी कायद्याप्रमाणे भरणाऱ्या अशा सभांखेरीज सभा बोलावण्याचे काम ज्या अधिकाऱ्याकडे सोपवलेले आहे त्या अधिकाऱ्यानी न बोलवता भरलेल्या सभा कायदेशीर नाहीत असे समजले पाहिजे. त्या सभामधे घडलेले काम बेकायदेशीर म्हणजेच रद्दबातल समजले जावे. कारण सभेच्या निमंत्रणाला देखील कायद्याचा आधार हवा.

परिषदेच्या सभा किती वेळा व्हाव्या याबद्दल काटेकोरपणे नियम तयार करणे अशक्य आहे. कारण सभा भरवण्याच्या बाबतीत अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. पण सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की शासन जितके अधिक समर्थ तितक्या सार्वभौमत्वाच्या निदर्शनासाठी या सभा अधिक वेळा भरवल्या जाव्या.

ही योजना एका शहरापुरती ठीक आहे, पण राज्यामधे जेव्हा अनेक शहरे असतात तेव्हा काय असा युक्तिवाद लढवण्यात येईल. अशा वेळी सार्वभौम सत्तेची विभागणी

करावी का की एकाच शहरात ती केंद्रित करून त्या शहराला इतर शहरांवर कुरघोडी करण्याची संधी द्यावी ?

मला दोन्ही उत्तरे पसंत नाहीत. पहिल्या उत्तराच्या बाबतीत हे लक्षात ठेवले पाहिजे की सार्वभौम सत्ता एकच आणि अविभक्त असते; तिचा नाश केल्याखेरीज तिची विभागणी करता येत नाही. दुसऱ्या उत्तराच्या बाबतीत ध्यानात घेतले पाहिजे ते हे की जसे एक राष्ट्र कायद्याप्रमाणे दुसऱ्याचे अंकित होऊ शकत नाही तसेच एक शहर दुसऱ्याचे अंकित होऊ शकत नाही. राजकीय समाजाचे खरे तत्त्व जे आहे ते आज्ञापालन आणि स्वातंत्र्य यांच्या योग्य मिश्रणात प्रजा ( subject ) व सार्वभौम हे शब्द निखालस ( strictly ) परस्परपूरक आहेत; त्या शब्दांतून व्यक्त होणाऱ्या कल्पनांची युती नागरिक ( citizen ) या एका शब्दात आढळते.

मला पुढे असे म्हणावयाचे आहे की पुष्कळ गावांना ( towns ) एका शहरामधे एकत्रित करणे अनिष्ट आहे आणि जो असा समावेश घडवून आणील त्याने त्या युतीपासून उद्भवणारे साहजिक गैरफायदे आपण टाळले अशी फुशारकी मारू नये. ज्याला लहान लहान राज्ये हवी आहेत त्या माणसाविरुद्ध मोठ्या राज्यामधे निर्माण होणारे दोष युक्तिवाद म्हणून वापरू नये. पण शेजारच्या मोठ्या राज्याविरुद्ध प्रतिकार करता येईल असे सामर्थ्य लहान राज्यामधे कसे निर्माण करता येईल ? ग्रीसमधील नगर राज्यांमधे मोठ्या राजाला ( great king ) प्रतिकार करण्याचे जे सामर्थ्य होते तसले किंवा अलिकडच्या काळात ऑस्ट्रिअन राजघराण्याविरुद्ध उभे राहण्यात हॉलंड व स्विट्झरलंड यानी जे सामर्थ्य व्यक्त केले ते लहान राज्यात कसे वाढवता येईल ?

राज्य योग्य त्या सीमांपुरते मर्यादित ठेवता आले नाही तर लोकाना एक मार्ग नेहमीच स्वीकारता येतो, तो मार्ग हा की एकच राजधानी असावी या गोष्टीला त्यानी मान्यता देऊ नये आणि शासनाचे कार्य क्रमशः वेगवेगळ्या शहरांतून चालावे आणि राज्याच्या अधिकार मंडळांच्या ( estates ) सभा एकामागून एक त्या निरनिराळ्या शहरांमधे भराव्या.

राज्य समर्थ बनावयाचे व त्याचा कारभार चांगल्या रीतीने चालवयाचा तर लोक संबंध प्रदेशामधे समसमान प्रमाणात विभागले जातील व प्रत्येक भागाला जीवन व वैपुल्य लाभेल अशी योजना आखली पाहिजे. खेडेगावातील घरांच्या अवशेषांवर शहरांच्या तटबंद्या उभ्या रहतात हे ध्यानात ठेवले पाहिजे. राजधानीमधे एक राजवाडा उभा राहण्यासाठी खेड्यातील अनेक समाजांची राखरांगोळी होत आहे हे कल्पनाशक्तीने चितारलेले चित्र मी पाहात असतो.

## प्रकरण १४

# सार्वभौम राज्य कसे टिकवले जाते त्याविषयी

## ( पुढे चालू )

लोकसमुदाय सार्वभौम संस्था म्हणून एकत्रित झाला की शासनाचा अधिकार संपतो. कार्यकारी सत्तेचे कार्य तात्पुरते स्थगित होते आणि नीचातील नीच नागरिकालाही प्रमुख राज्याधिकाऱ्याइतके महत्त्व प्राप्त होते आणि कुणालाही त्याच्या केसालाही धक्का लावता येत नाही. मनुष्य जेव्हा स्वतः हजर असतो तेव्हा दुसऱ्या कुणालाही त्याचे प्रतिनिधित्व करता येत नाही. रोममधील परिषदांमध्ये दंगाधोप्याचे प्रसंग उद्भवले ते हा नियम माहीत नसल्याकारणाने किंवा माहीत असला तरी त्याच्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे. कौन्सल्स याना अशा वेळी लोकनियुक्त अध्यक्ष एवढाच अधिकार असतो. ट्रिब्युन्स म्हणजे केवळ अधीक्षक[1] ( speakers ) आणि वरिष्ठ लोकसभा म्हणजे तर काहीच नव्हे.

सत्ता स्थगित होण्याचा हा जो काळ मधून मधून येतो त्या वेळी राज्याधिकाऱ्यांना आपल्यापेक्षा कुणी तरी अधिक कार्यक्षम अशी शक्ती श्रेष्ठ आहे या गोष्टीला मान्यता द्यावी लागते अगर देणे इष्ट ठरते. म्हणूनच अशा काळांची राज्याधिकाऱ्यांना नेहमी धास्ती वाटते. लोकांच्या परिषदा राजकीय समाजाला आधारभूत अशा असतात आणि शासनावर त्यांचे नियंत्रण पडते. म्हणूनच राज्यकर्त्यांना त्यांची फार धास्ती वाटते. त्यामुळे लोकांना त्यांच्याबद्दल प्रेम वाटू नये म्हणून राज्यकर्ते प्रलोभने, आश्वासने, हरकती, अडथळे इत्यादि अनेक साधनांचा उपयोग करून प्रयत्न करतात. लोक लोभी, नेभळट व भ्याड असले की शासनाच्या या पद्धतशीर प्रयत्नांना त्यांना फार काळ विरोध करता येत नाही. आणि विरोधाची शक्ती सारखी वाढत गेल्यामुळे सार्वभौम सत्ता अखेरीस पुरी लुप्त होते आणि बहुसंख्य शहरे त्यांची वेळ येण्यापूर्वी पडतात व नष्ट होतात.

सार्वभौम सत्ता आणि अनियंत्रित शासन यांच्यामधे कधीकधी एक मधली शक्तीसंस्था निर्माण होते. आता तिच्याबद्दल बोलण्याची वेळ आलेली आहे.

---

१. इंग्रजी पार्लमेंटमधे या पदाला जो अर्थ प्राप्त झाला आहे जवळ जवळ तोच अर्थ याठिकाणी अध्याहृत आहे. ट्रिब्युन्स व कौन्सल्स यांच्या अधिकारात इतके साम्य आहे की त्याच्यामुळेच त्यांच्यामधे, त्यांचे कार्य तात्पुरते स्थगित केले गेले असले तरी देखील, विरोध निर्माण झाला असता.

## प्रकरण १५

# नियुक्त (Deputies) अगर प्रतिनिधी यांच्याविषयी

सार्वजनिक सेवा आपले प्रधान कार्य नाही असे जेव्हा नागरिकाना वाटू लागते आणि राज्याची अंगमेहनतीने सेवा करण्याऐवजी पैशाने सेवा करणे जेव्हा त्याना अधिक सोईचे वाटते त्यावेळी विनाश जवळ येतो. लढाईवर चला असे जेव्हा त्याना आवाहन होते त्यावेळी स्वतःऐवजी सैनिकाना पाठवण्यासाठीं ते पैसे देतात आणि स्वतः घरी राहतात. सल्लागार मंडळाच्या सभेला त्याना बोलवले तर स्वतः जाण्याऐवजी ते प्रतिनिधी नियुक्त करतात आणि स्वतः घरी राहतात. परिणाम असा होतो की आळशीपणा आणि पैसा यांच्यामुळे देशाला गुलामगिरीत ठेवण्यासाठी ते एक सैन्य उभे करतात आणि देशाची विक्री करण्यासाठी प्रतिनिधींची निवड करतात.

व्यापार आणि कला आणि पैशाचा हव्यास यामधे गुंतून पडल्यामुळे आणि निःसत्व व सुखलोलुप बनल्यामुळे माणसे स्वतः काम करण्याऐवजी पैसे देऊ लागतात. आपल्याला मिळणाऱ्या फायद्यापैकी काही भाग आरामाने अधिक फायदा मिळविण्यासाठी मोकळीक लाभावी म्हणून नागरिक देऊन टाकतो, एकदा सेवेऐवजी तुम्ही पैसे देऊ लागलात की त्वकरच तुम्ही शृंखलात पडता. पैशाची व्यवस्था ( finance ) हा शब्दप्रकार गुलामांच्या भाषेतील आहे. खऱ्याखुऱ्या शहरात तो आढळत नाही. खऱ्या अर्थाने स्वतंत्र असलेल्या देशात नागरिक सर्व गोष्टी स्वतःच्या समर्थ हातांनी करतात, पैशानी विकत घेतलेल्या भाडोत्री हाताने नव्हे. काम करण्याची माफी लाभावी म्हणून पैसे देण्याऐवजी, काम करण्याची संधी लाभावी म्हणून ते पैसे देतात. माझे मत नेहमीचे, लोकांच्या सरावाचे नाही. माझे असे मत आहे की कायद्याने काम करण्याची सक्ती कर देण्याच्या सक्तीएवढी स्वातंत्र्यविरोधी नाही.

राज्य सुसंघटित असले की खासगी व्यवहार बाजूला राहून सार्वजनिक कार्यांमधे माणसांची मने अधिक गुंतलेली असतात. खासगी व्यवहार असे प्रत्यक्षात थोडेच उरतात, कारण व्यक्तीच्या सुखामधे, सार्वत्रिक सुखाची जी गोळाबेरीज असते तिचाच, मोठा भाग असतो. त्यामुळे माणसाला स्वतःच्या प्रयत्नांनी मिळवायचे असे थोडेच उरते. व्यवस्थित कारभार चालला आहे अशा नगरात प्रत्येक नागरिक जनपरिषदेला हजर राहण्यासाठी उत्सुक असतो; शासन जर वाईट असले तर परिषदेला हजर राहण्यासाठी कुणी पाऊल देखील उचलणार नाही. कारण सर्वसाधारण इच्छेचा परिषदेत प्रभाव पडेल अशी खात्री नसते आणि शेवटी घरच्या विवंचनामुळे इतर सर्व दूर राहतात. चांगल्या कायद्यामुळे अधिक चांगल्या कायद्यांची वाढ होते; वाईट कायद्यामुळे वाईट कायदे वाढतात. राज्याच्या कारभाराबद्दल, मला त्याच्याशी काय करायचे आहे, असे मनुष्य म्हणायला लागला की ते राज्य संपले असा निष्कर्ष काढण्याची वेळ येते.

देशभक्तीची उत्कटता कमी होणे, खाजगी हितसंबंधाची कारवाई, राज्याचा प्रचंड आकार, परदेशावरील आक्रमणे, शासनाने स्वतःच्या अधिकारांचा दुरुपयोग करणे या सर्व कारणांमुळे राष्ट्राच्या परिषदांमधे नियुक्तानी ( Deputies ) किंवा प्रतिनिधींनी लोकांच्या नावाने काम करण्याची नवीन प्रथा वाढत चालली असून तिला उत्तेजन मिळत आहे. या नियुक्तांना किंवा प्रतिनिधींना काही देशात मंडळींनी तिसरी सत्ता ( Third Estate ) असे अभिधान देण्याचे धाष्टर्य केलेले आहे. याचा अर्थ असा होतो की समाजातील पहिल्या व दुसऱ्या वर्गांचे जे हितसंबंध आहेत त्याना पहिले व दुसरे स्थान प्राप्त होते व सर्वसाधारण जनतेचे जे हितसंबंध आहेत त्याना तिसरे म्हणजे कमी दर्जाचे स्थान दिले जाते.

सार्वभौमत्व जसे देऊन टाकता येत नाही तसे त्याचे प्रतिनिधित्वही करता येत नाही. सार्वभौमत्व म्हणजे मुख्यत्वेकरून सर्वसाधारण इच्छा आणि इच्छेचे प्रतिनिधित्व करता येत नाही. इच्छा आत्मस्वरूपात वावरते किंवा ती दुसरीच एखादी वस्तू असते. मधली कोणतीही अवस्था असू शकत नाही. जनतेचे नियुक्त जनतेचे प्रतिनिधी असत नाहीत व होऊ शकत नाहीत. तिचे अधिकारी ( commissioners ) म्हणूनच केवळ त्याना काम करता येईल. त्याना कोणतेही निर्णय घेता येणार नाहीत. लोकांनी स्वतः हजर राहून ज्याना मान्यता दिलेली नाही असे कायदे रद्दबातल स्वरूपाचे असतात. म्हणजे ते मुळी कायदेच नव्हेत. आपण स्वतंत्र आहो असे इंग्रजी जनतेला वाटते पण तो तिचा मोठा भ्रम आहे. लोकसभेच्या ( Parliament ) सभासदांची निवड करतानाच फक्त ती स्वतंत्र असते. एकदा निवडणूक आटोपली की तिची गुलामी पुन्हा सुरू होते. मग तिला काही महत्त्व उरत नाही. स्वातंत्र्याच्या काही क्षणांमधे ती आपल्या स्वातंत्र्याचा असा उपयोग करते की ते नष्ट झाले ते योग्यच झाले असे म्हणावे लागते.

प्रतिनिधित्वाची कल्पना आधुनिक आहे. सरंजामदारी पद्धतीतून ती आपल्याला मिळाली. सरंजामदारी पद्धत ही एक शासनाची अन्याय्य आणि विक्षिप्त पद्धत होती. त्या पद्धतीमुळे मनुष्य जातीची अवनती झाली आणि माणसाला माणूस म्हणून मान राहिला नाही. जुन्या जगातील लोकराज्यात आणि राजेशाहीत देखील लोकांना प्रतिनिधी पाठवण्याची पद्धत नव्हती. तो शब्ददेखील कुणाला माहीत नव्हता. रोममधे लोकपालाना ( Tribunes ) खूप मानमान्यता होती तरी देखील त्यानी लोकांचा कार्य करण्याचा अधिकार बळकवावा असे कुणाला स्वप्नातही वाटले नाही. त्या मोठ्या समुदायात स्वतःच्या इच्छेने एखादा कायदा ( plebiscitium ) मंजूर करून घ्यावा असा त्यानी कधी प्रयत्नही केला नाही. ग्राची ( Grachi ) च्या काळात लोकांचा मेळावा एवढा मोठा भरला होता की नागरिकांच्या सबंध एका गटाला घरांच्या छपरावर उभे राहून मतदान करावे लागले. त्या वेळी जे घडले त्यावरून लोक लोकपालाला कसे बेजार करत असत त्याची चांगली कल्पना येईल.

हक्क आणि स्वातंत्र्य यानाच सारे महत्त्व दिले जाते तिथे गैरसोईकडे कुणी लक्ष देत नाही. त्या शहाण्या देशामधे प्रत्येक गोष्टीला योग्य ते महत्त्व दिले जात असे. लोकपालानी जे करण्याचा कधी प्रयत्नही केला नसता ते लिक्टर्स ( Lictors ) करत असत. लिक्टर्स ( Lictors ) आपले प्रतिनिधित्व करू लागतील अशी लोकाना कधी धास्ती वाटली नाही. लोकपाल ( Tribunes ) कधीमधी लोकांचे प्रतिनिधित्व कसे करत असत हे समजण्यासाठी शासन सार्वभौमाचे कसे प्रतिनिधित्व करते त्याचा विचार केला पाहिजे. कायदा म्हणजे सर्वसाधारण इच्छेची घोषणा असल्याकारणाने कायदे करण्याच्या सत्तेच्या बाबतीत जनतेचे प्रतिनिधित्व कधीही शक्य होत नाही. कार्यकारी सत्तेच्या बाबतीत मात्र प्रतिनिधित्व शक्य आहे व इष्ट आहे. कारण कार्यकारी सत्ता म्हणजे कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शक्तीचा वापर. किती थोड्या देशांमधे कायदे असतात ते यावरून सूक्ष्म विचाराअंती ध्यानात येईल. ते कसेही असो, कार्यकारी सत्तेच्या कार्यात लोकपालांचा ( Tribunes ) हिस्सा नव्हता, त्यामुळे अधिकारपदामुळे त्याना जे हक्क प्राप्त झाले त्यांचा उपयोग करून रोमन जनतेचे प्रतिनिधित्व करणे त्याना शक्य नव्हते, ते प्रतिनिधित्व करावयाचे म्हणजे वरिष्ठ लोकसभेचे हक्क हस्तगत करणे अवश्य होते.

ग्रीक लोकांमधे जनतेला जे जे करणे अवश्य असे ते ते जनताच करत असे, जनतेचे सार्वजनिक मेळावे वरचेवर भरत असत. तेथील हवा सौम्य होती. लोक अधाशी नव्हते. जरूरीची सर्व कामे गुलाम करत असत. लोकांचे लक्ष केंद्रित झालेले असे ते मुख्यत्वेकरून स्वातंत्र्यावर. त्या अनुकूल गोष्टी जवळ नसताना तुम्ही त्याच हक्काचे संरक्षण कसे करणार? हवामान जास्त कडक असल्यामुळे तुमच्या गरजा अधिक.[१] वर्षांतून सहा महिने सार्वजनिक जागांचा उपयोग करता येत नाही; आणि उघड्या हवेत घोगरे आवाज कुणाला ऐकूही जाणार नाहीत; तुम्ही स्वातंत्र्यापेक्षा पैसे मिळवण्यासाठी अधिक वेळ खर्च करता; आणि गुलामीपेक्षा तुम्हाला गरीबीची अधिक धास्ती वाटते.

काय, स्वातंत्र्य टिकवायचे म्हणजे ते गुलामगिरीच्या आधारावरच टिकवावे लागते का? कदाचित् तसेही असेल. दोन टोके पुष्कळ वेळा एकत्र येतात. नैसर्गिक अवस्थेचा भाग नसलेल्या प्रत्येक वस्तूमधे काही दोष असतात; नागरी समाजामधे ते इतरांपेक्षा अधिक आहेत. काही परिस्थिती अशा दुःखाच्या असतात की त्या परिस्थितीत राहणाऱ्या लोकाना आपले स्वातंत्र्य टिकवण्यासाठी इतरांच्या स्वातंत्र्याचा बळी द्यावा लागतो आणि गुलाम कायमचा गुलाम म्हणून राहिला तरच नागरिकांचे स्वातंत्र्य कायम राहते. स्पार्टाचा

१. थंड देशात पूर्वेकडील ऐषआराम व जीवनाची सौम्य तऱ्हा स्वीकारणे म्हणजे जाणूनबुजून पूर्वेकडील गुलामांची जी गत होते तिला आवाहन करण्यासारखे आहे. वस्तुतः त्यांच्यावर कोसळले त्याच्याहीपेक्षा अधिक अवश्यमेव पद्धतीने ते भवितव्य आपल्याला पत्करावे लागेल.

इतिहास याला साक्ष आहे. आधुनिक जगातील लोक हो, तुमच्याजवळ तुमच्यासाठी काम करणारे गुलाम नाहीत; पण तुम्ही स्वतःच गुलाम आहात. तुमच्या स्वातंत्र्याचे मोल देऊन त्यांचे स्वातंत्र्य विकत घेतले गेले. मर्जी लागेल तर या व्यवहाराबद्दल फुशारकी मारा. मला त्या व्यवहारात माणुसकीपेक्षा भ्याडपणाच अधिक दृष्टीस पडतो.

गुलामीची प्रथा आवश्यक आहे अगर दुसऱ्यांना गुलाम बनवण्याचा अधिकार कायदेशीर आहे असा, मी जे म्हणतो त्याचा अर्थ नव्हे. खरे पाहता मी सिद्ध केले आहे ते बरोबर त्याच्या उलट आहे. आधुनिक मंडळी जी स्वतःला स्वतंत्र समजतात त्यांचे प्रतिनिधी का असतात आणि जुन्या काळातील लोकांचे का नव्हते तेवढेच स्पष्ट करून दाखवणे हा माझा हेतू आहे, ते कसेही असो, लोक प्रतिनिधीमार्फतीने काम करू लागले की त्यांचे स्वातंत्र्य संपते. ते त्यानंतर उरत नाही.

सर्वच प्रश्नाचा सांगोपांग विचार केल्यानंतर, यापुढे नगर खूप लहान असल्याखेरीज सार्वभौमाला आपल्यामधे आपल्या अधिकाराचा वापर कसा टिकवता येईल ते मला दिसत नाही. परंतु, तुम्ही विचाराल, ते खूप लहान असले तर ते शेजाऱ्यांच्या आक्रमणाला बळी पडणार नाही का? माझे उत्तर आहे, नाही. लहान राज्याची मजबूत व्यवस्था व सोईस्कर असा राजकीय समाज यांचा पराक्रमी लोकसमुदायाच्या परराष्ट्रविषयक सामर्थ्याशी कसा मेळ घालता येतो ते मी पुढे दाखवीन.[१]

## प्रकरण १६

# शासनाची प्रस्थापना हा करार नव्हे

कायदे करण्याची सत्ता एकदा सुप्रतिष्ठित झाली की नंतर जे करावयाचे असते ते म्हणजे कार्यकारी सत्ता तशीच सुप्रतिष्ठित करण्याचे. उपरोक्त सत्ता विशिष्ट कृतीमधूनच व्यक्त होत असल्या कारणाने व पूर्वोक्त सत्तेच्या अंगभूत नसल्याकारणाने वेगळी असते. सार्वभौमाला स्वतःलाच कार्यकारी सत्तेचा वापर करता येत असता तर कायदा आणि वस्तु-स्थिती यांच्यामधे इतका न सोडवता येण्यासारखा गोंधळ माजला असता की कायदेशीर व बेकायदेशीर याच्यामधे कुणालाही फरक करता आला नसता. राजकीय समाजामधे त्यामुळे

१. या ग्रंथाच्या पुढच्या भागामधे मी हा विषय विशद करण्याचे योजिले होते. परराष्ट्रीय ( external ) संबंधांचा विचार करताना राष्ट्रांच्या संयुक्त संघटनांच्या ( confederations ) स्वरूपाचे मी विवेचन केले असते. हा विषय नवीन आहे, त्याची तत्त्वे अद्याप निश्चित झालेली नाहीत.

असे परिवर्तन घडून येते की ज्या हिंसाचाराला प्रतिकार करण्यासाठी म्हणून सुरवातीला समाजाचा जन्म झाला त्यालाच तो बळी पडतो.

सामाजिक करारानुसार सर्व नागरिक समान असतात. त्यामुळे सर्वांनी काय करावे हे सर्वांना ठरवता येते, परंतु स्वतः जे करत नाही ते दुसऱ्याने केले पाहिजे असा आग्रह धरण्याचा अधिकार मात्र कुणालाही नसतो. शासन प्रस्थापित होते त्यावेळी नेमका हा अधिकार सार्वभौम राज्यकर्त्यांकडे सुपूर्त करतो. या अधिकारावरच राज्याचे निरामय जीवन व कार्य अवलंबून असते.

शासन प्रस्थापित करण्याची कृती म्हणजे जनता आणि जे पुढारी निवडले जातील ते यांच्यामधील करार होय असा पुष्कळांचा युक्तिवाद आहे. या करारामधे काही जणांनी हुकूम करावयाचे व इतरांनी त्या हुकूमांची अंमलबजावणी करावयाची. हे कोणत्या अटीवर घडावयाचे ते दोन्ही पक्षामार्फतीने नमूद केले जाते. हा युक्तिवादाचा पुढचा भाग आहे. करार करण्याची ही पद्धत मोठी विचित्र आहे हे, मला वाटते, बहुसंख्य मंडळींना पटेल. पण हा विचार टिकण्यासारखा आहे का हे आपण पाहू या.

प्रथमतः सार्वभौम सत्ता जशी देऊन टाकता येत नाही तशीच ती बदलताही येत नाही. तिला मर्यादा घालणे म्हणजे तिचा नाश करण्यासारखे आहे. सार्वभौम स्वतःवर एखादी वरिष्ठ सत्ता लादून घेऊ शकतो असे म्हणणे मूर्खपणाचे व परस्परविरोधी स्वरूपाचे आहे. एखाद्या धन्याचा हुकूम मानण्याची जबाबदारी पतकरणे म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्याच्या परिस्थितीकडे परत जाण्यासारखे आहे. शिवाय लोकसमुदाय आणि वेगवेगळ्या व्यक्ती यांच्यामधील करार म्हणजे एक विशिष्ट कृती होते व त्यामुळे ती कायदा अगर सार्वभौमत्वाचे कार्य होऊ शकत नाही व तिला कायद्याचे हे अधिष्ठान लाभत नाही हे अगदी उघड आहे.

करार करणाऱ्या पक्षांमधे आपआपसात केवळ नैसर्गिक कायदाच लागू पडतो आणि त्यामुळे दोघांनीही एकमेकांच्या बाबतीत स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या जातील अशी खात्री देता येत नाही हे देखील स्पष्ट आहे. नागरी समाजाला सर्वस्वी निषिद्ध अशी ही परिस्थिती आहे. सत्तेचा वापर करण्याचा प्रश्न आला की ज्याच्या हाती सत्ता तोच नेहमी वरचढ ठरतो. म्हणून एखाद्या माणसाने दुसऱ्याला म्हटले की "मी तुला माझी सर्व मालमत्ता देतो. अट एकच आणि ती ही की तुला वाटेल तेवढा तिच्यातील भाग तू मला परत दे." अशा वर्तनाला देखील करार हे नाव द्यावे लागेल.

राज्यामधे एकच करार असतो आणि तो म्हणजे एकत्र राहण्याबद्दलचा प्राथमिक स्वरूपाचा करार. त्या एका कराराच्या अस्तित्वामुळे पुढे इतर कोणतेही करार होऊ शकत नाहीत. सुरवातीला जो करार केला त्याचा नवीन सार्वजनिक करारामुळे भंग होतो. भंग करणार नाही अशा तऱ्हेच्या नवीन सार्वजनिक कराराची कल्पना करणेही शक्य नाही.

## प्रकरण १७

# शासनाच्या प्रस्थापनेविषयी

शासन प्रस्थापित करण्याच्या कृतीकडे आपण मग कसे पहावे? ही कृती गुंतागुंतीची असते व तिच्या पोटी कायद्याची प्रस्थापना व त्याची अंमलबजावणी या दोन कृती असतात हे मला सुरवातीलाच सांगितले पाहिजे.

पहिली कृती ही की सार्वभौम अशा तऱ्हेचे शासन स्थापन झाले पाहिजे असा आदेश देतो आणि ही कृती म्हणजे एक कायदा आहे हे स्पष्ट आहे.

दुसरी कृती ही की ज्या पुढाऱ्यांच्यावर कायद्याने प्रस्थापित झालेल्या शासनाच्या कारभाराची जबाबदारी सोपवायची असते ते पुढारी लोकांनी नियुक्त करणे. ही नियुक्ती एक विशिष्ट कृती असते, तिच्यामुळे दुसरा कायदा निर्माण होत नाही; पहिल्या कायद्याचाच तो एक परिणाम असतो आणि शासनाचे ते एक कार्य असते.

शासन अस्तित्वात येण्यापूर्वीच शासनाचे असे कार्य कसे घडू शकते एवढेच समजणे कठीण आहे. तसेच जनता, जी एकतर सार्वभौम असते किंवा परतंत्र असते, ती विशिष्ट परिस्थितीत राज्यकर्ती किंवा राज्याधिकारी कशी बनते हे देखील समजणे कठीण आहे.

राजकीय समाजाच्या ठिकाणी दर्शनी विरोधी स्वरूपाच्या वाटणाऱ्या कृतींमध्ये मेळ घालणारे विस्मयचकित करणारे जे गुण आहेत ते या बाबतीत उघडकीस येतात. ही जी परिस्थिती घडून येते ती सार्वभौमत्वाचे लोकशाहीत एकाएकी परिवर्तन घडून आल्यामुळे. हे परिवर्तन असे असते की लक्षात येईल असा कोणताही फेरबदल घडून न येता आणि सर्वांचे एकमेकांशी नवे संबंध प्रस्थापित झाल्यामुळेच केवळ नागरिक राज्याधिकारी ( magistrate ) बनतात आणि सार्वत्रिक कृतींऐवजी विशिष्ट कृती करतात व कायदे करण्याऐवजी कायद्यांची अंमलबजावणी करू लागतात. संबंधातील हा बदल म्हणजे काही प्रत्यक्षात आधार नसलेला विचाराच्या भरारीतील चारकावा नाही. इंग्रजी लोकसभेत हे दररोज घडते. काही काही वेळा एखाद्या गोष्टीची विस्तृत चर्चा करण्यासाठी कनिष्ठ सभा ( Lower House ) स्वतःचे मोठ्या समितीत ( Grand committee ) रूपांतर करते. या रूपांतरामुळे पूर्वी जी सभा सार्वभौम संस्था ( Sovereign Court ) होती ती एक साधी समिती बनते. समिती म्हणून जे काम केले असेल ते नंतर स्वतःकडेच लोकसभा ( House of commons ) या नात्याने कळवले जाते आणि लोकसभा एकदा एका रूपाने निश्चित केलेल्या विषयाची पुन्हा परत दुसऱ्या रूपाने चर्चा करते.

लोकशाही शासनाचा म्हणूनच हा एक विशिष्ट गुण आहे की सर्वसाधारण इच्छेची साधी कृती म्हणून ते प्रत्यक्षात स्थापन करता येते. हे झाले की जे तात्पुरते शासन

प्रस्थापित झालेले असते ते ठरले असेल तसे त्याचे स्वरूप असेल तर कायम राहते. तसे नसेल तर कायद्याने निर्दिष्ट केलेला शासनाचा प्रकार प्रस्थापित करण्याचे कार्य ते सार्वभौमाच्या नावाने हाती घेते. शासन प्रस्थापित करण्याचा हाच एक कायदेशीर मार्ग आहे. दुसरा एखादा मार्ग स्वीकारणे म्हणजे वर प्रस्थापित केलेल्या तत्त्वांचा अव्हेर करण्यासारखे आहे.

## प्रकरण १८

# शासन बळकावले जाऊ नये यासाठी उपयोगात आणावयाच्या साधनाविषयी

सोळाव्या प्रकरणात जे सांगितले त्याच्या स्पष्टीकरणावरून हे सिद्ध होते की ज्या कृतीमुळे शासनाची स्थापना होते तो करार नसून कायदा असतो; ज्यांच्या हाती एक ठेव म्हणून कार्यकारी सत्ता दिलेली असते ते जनतेचे धनी नसतात तर तिचे अधिकारी असतात, जनता त्याना नेमू शकते व मर्जीस येईल त्यावेळी दूर करू शकते. अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रश्न असतो तो कराराचा नसतो तर आज्ञापालनाचा असतो; तसेच राज्य त्याना जी कामे नेमून देते ती करताना नागरिक म्हणून जी कर्तव्ये आहेत ती ते पार पाडत असतात, आणि म्हणूनच अटीबद्दल वाद घालण्याचा त्याना अधिकार नसतो.

जनता जेव्हा वंशपरंपरेने चालणारे शासन–मग ते एकाच घराण्यात चालणारे राजेशाहीचे शासन असो अगर समाजाच्या एखाद्या वर्गापुरते मर्यादित राहणारे उमरावशाहीचे शासन असो—निर्माण करते तेव्हा ती कोणताही कायम स्वरूपाचा करार करत नाही. राज्यकारभाराचे एक तात्पुरते स्वरूप ती निश्चित करते व दुसरे एखादे स्वरूप अस्तित्वात आणण्याचे ती ठरवीपर्यंत ते कायम राहावयाचे असते.

अशा तऱ्हेचे बदल घडवून आणणे नेहमीच धोक्याचे असते हे खरे आणि म्हणून प्रस्थापित शासनामुळे सार्वजनिक हित साधत नाही असे सिद्ध झाल्याखेरीज ते बदलण्यासाठी जबरदस्तीचे प्रयत्न होऊ नयेत. सावधगिरीची ही वृत्ती हा राजकारणाचा नियम आहे; हा हक्काचा प्रश्न नाही. लष्करी अधिकार सेनापतींच्या हाती ठेवण्याचे जसे राज्यावर बंधन नसते तसेच दिवाणी अधिकार राज्यकर्त्यांच्या हाती ठेवण्याचेही बंधन नसते. अशा वेळी जरूर ते सारे विधिनिषेध लोकानी अत्यंत काळजीपूर्वक पाळले पाहिजेत हे देखील खरे आहे. ते केले नाही तर नियमबद्ध आणि कायदेशीर कृती व राजद्रोही उठाव यांच्यामधे फरक करता येणार नाही; तसेच सर्वांची इच्छा आणि एखाद्या लहानशा गटाची ओरड यामधेही फरक करता येणार नाही. अप्रिय अशा त्या घटनेला कायद्याने दिल्या

पाहिजेतच त्यापेक्षा अधिक सवलती दिल्या जाणार नाहीत हे पाहणे महत्त्वाचे आहे. ही जी लोकांवर जबाबदारी असते तिच्यामुळे लोकांच्या मनाविरुद्ध आपली सत्ता कायम ठेवण्याच्या कामी राज्यकर्त्यांना चांगली मदत होते व पुन्हा सत्तेचा अपहार केल्याचा आरोप कुणाला करता येत नाही. राज्यकर्ता उघड उघड आपले हक्क बजावण्याचा प्रयत्न करत असतो, पण प्रत्यक्षात ते हक्क वाढवण्याचे त्याचे प्रयत्न चालू असतात; तसेच सार्वजनिक शांतता कायम ठेवण्याच्या नावाने वेगळी व्यवस्था निर्माण करण्यासाठी भरवण्यात येणाऱ्या मेळाव्यांनाही तो प्रतिबंध करणे शक्य आहे. अशा रीतीने ज्या शांततेचा तो भंग होऊ देत नाही त्याच शांततेचा तो स्वतःच्या हितासाठी उपयोग करून घेतो व तसाच स्वतः घडवून आणलेल्या नियमविरोधी घटनांचा. भीतीमुळे जे गप्प बसतात त्यांची संमती त्याला सहज गृहीत धरता येते आणि बोलण्याचे जे धाडस करतील त्यांना शिक्षा करता येते. या पद्धतीनेच डिसेमव्हीअर्स ( Decemviers ) एक वर्षासाठी सुरवातीला निवडणूक झाली असताना दुसऱ्या वर्षीही अधिकारपदावर राहिले व कॉमिटिया ( comitia ) च्या सभेवर बंदी घालून सत्ता आपल्या हातात कायमची राहावी अशी त्यानी खटपट केली. जगातील सर्व शासनेसुद्धा एकदा सार्वजनिक सत्ता हाती आली, की याच सोप्या पद्धतीने, लवकर किंवा उशीरा, सार्वभौम सत्तेचा अपहार करतात.

वेळोवेळी भरणाऱ्या ज्या परिषदांबद्दल मी वर बोललो आहे त्या हे अरिष्ट टाळण्याचे किंवा पुढे ढकलण्याचे उत्तम साधन आहे; विशेषेकरून त्यांची सभा भरवण्यासाठी वेगळ्या विनंतीपत्रकाची आवश्यकता नाही अशी योजना असते, तेव्हा त्या परिस्थितीत राज्यकर्त्याला परिषदेची सभा भरवण्याच्या मार्गात अडथळे निर्माण करता येत नाहीत. त्याने अडथळे निर्माण केले तर तो उघड उघड कायद्याचे उल्लंघन करतो आहे व राज्याचा शत्रू आहे असे म्हणता येते.

परिषदेचा उद्देश एकच असतो आणि तो म्हणजे सामाजिक करार निर्वेध राखणे. म्हणून परिषदेच्या कामाची सुरवात दोन ठरावांनी व्हावी. हे ठराव कुणालाही दडपून टाकता येऊ नयेत व त्यांच्यावर वेगवेगळे दोनदा मतदान व्हावे.

पहिला ठराव असा असावा : " सध्याच्या शासनाचे स्वरूप कायम ठेवावे अशी सार्वभौमाची मर्जी आहे. "

दुसरा ठराव असा असावा : " राज्याचा कारभार सध्या ज्यांच्या हाती आहे त्यांच्याच हाती तो राहावा अशी लोकसमुदायाची मर्जी आहे. "

राज्याचा असा कोणताही कायदा नाही, सामाजिक करार देखील, की जो रद्द करता येणार नाही, हे जे मी पूर्वी सिद्ध केलेले आहे ते मी या ठिकाणी गृहीत धरतो. कारण सर्व नागरिक तो करार रद्द करण्याच्या स्पष्ट हेतूने जर एकत्र जमा झाले तर योग्य त्या तऱ्हेचा कायदा करून त्यांना तो रद्द करता येईल. ग्रोशिअसने तर असे म्हटले आहे की मनुष्य ज्या राज्याचा सभासद असतो त्या राज्याबद्दलची आपली निष्ठा विसर्जित करण्याचा त्याला अधिकार आहे. ते करतानाच त्याला त्याचे नैसर्गिक स्वातंत्र्य पुन्हा परत मिळेल आणि

राज्याचा प्रदेश सोडून जाताना त्याला त्याची मालमत्ताही परत मिळेल [1] प्रत्येकाला वेगवेगळे जे करता येते ते सर्व नागरिकांना एकत्र जमून करता येणार नाही असे म्हणणे वेडेपणाचे ठरेल.

* * *

१. आपले कर्तव्य चुकवण्यासाठी किंवा जेव्हा अत्यंत गरज आहे अशावेळी काम करण्याचे टाळण्यासाठी तो मनुष्य देश सोडून जात नाही हे याठिकाणी गृहीत धरले पाहिजे. अशा तऱ्हेचा पळपुटेपणा असेल तर तो गुन्हा ठरेल आणि कायद्याप्रमाणे त्याबद्दल शिक्षा केली जाईल. ते कृत्य म्हणजे निवृत्ती नसून फरारी होणे आहे.

# पुस्तक ४

## प्रकरण १

## सर्वसाधारण इच्छा अविनाशी आहे

परिषदेत एकत्र जमा झालेली माणसे जोवर स्वतःला एक समाज म्हणून मानतात तोवर त्या सर्वांची मिळून एकच इच्छा असते आणि ती इच्छा सर्वांचे संरक्षण आणि कल्याण कसे साधता येईल याबद्दलची असते, असे असते तोवर राज्याची यंत्रणा जोरदार व साधी असते आणि त्याची तत्त्वे सरळ व स्पष्ट असतात. गोंधळलेल्या अगर परस्पर-विरोधी अशा हितसंबंधांचे ओझे त्याच्यावर पडलेले नसते. सर्वांच्या हिताची साक्ष जिकडे तिकडे विद्यमान असते आणि सद्भावना असली तर ती तावडतोब डोळ्यात भरते. शांतता, एकी आणि समानता हे राजकीय डावपेचांचे शत्रू आहेत. प्रामाणिक व सरळ माणसाना, ती सरळ असल्यामुळे, फसवणे कठीण असते. प्रलोभने आणि वरवर सरळ भासणारा वितंडवाद यांचा त्यांच्यावर परिणाम होत नाही; आणि दुसऱ्याच्या हातातील बाहुले बनण्यासाठी जो बारकावा लागतो तो देखील त्यांच्याजवळ नसतो. जगातील अत्यंत सुखी देशांमधे एखाद्या वट वृक्षाखाली शेतकऱ्यांचे गट राज्याच्या व्यवहाराबद्दल निर्णय घेताना आणि सदोदित सुबुद्ध रीतीने वागताना दृष्टीस पडतात त्या वेळी इतर राष्ट्रांच्या सुधारणांबद्दल तिरस्कार वाटणे साहजिक नाही का? कारण कौशल्य व घोटाळ्यात पाडणारा गूढपणा यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून ती राष्ट्रे साधतात काय तर एकाच वेळी प्रसिद्धी आणि विपन्नावस्था.

अशा तऱ्हेने ज्याचा कारभार चाललेला आहे त्या राज्याला फारच थोड्या कायद्यांची गरज भासते; जेव्हा नवीन कायदे करावे लागतात तेव्हा त्यांची आवश्यकता सर्वांना स्पष्ट झालेली असते. जो ती सूचना करतो तो सर्वांना प्रतीत झालेल्या गोष्टीला फक्त शब्दस्वरूप देत असतो आणि त्या कायद्याला मान्यता मिळवण्यासाठी कारस्थाने किंवा वक्तृत्व यांची गरज पडत नाही. प्रत्येकाला त्या कायद्याची आवश्यकता पटलेली असते आणि इतर सर्वांची संमती मिळताच ते करावयाचे असे त्याने अगोदरच ठरवलेले असते.

सिद्धान्तवादी ( theorists ) चुकीच्या मार्गाने जातात त्याचे कारण हे की सुरवातीपासूनच ज्यांची संघटना चांगली झालेली नसते अशा राज्यांचाच ते विचार करतात आणि त्याना ही पद्धत लागू करणे अशक्य आहे हे त्यांच्या ध्यानात येते. हुशार, लबाड मनुष्य आपल्या मिष्ठास वाणीचा उपयोग करून लंडन किंवा पॅरिसमधील लोकांना किती मूर्खपणाच्या कृती करायला लावील त्याच्या विचाराने त्याना हसू येते. त्याना माहीत नाही ते हे की बर्नेच्या लोकांनी क्रॉमवेलला बेड्या घातल्या असत्या व जिनिव्हाच्या

लोकांनी डक द बुफोर्टला (Duce de Beaufort) सश्रम कारावासाची शिक्षा दिली असती.

परंतु सामाजिक बंध जेव्हा ढिला होऊ लागतो व राज्य अधिक दुबळे बनते, जेव्हा वैयक्तिक हितसंबंधांचा प्रभाव पडू लागतो आणि जेव्हा राज्यातील लहान लहान गटांचे सबंध राज्यावर दडपण पडू लागते त्यावेळीं सर्वसाधारण हितामधे अनिष्ट बदल घडून येतो आणि विरोधाला सुरवात होते. सर्व लोक एका आवाजात बोलत नाहीत व सर्वसाधारण इच्छा सर्वांची इच्छा उरत नाही. विसंगती निर्माण होतात, वादविवाद वाढतो आणि उत्तम सल्ल्यालाही विरोध झाल्यावाचून रहात नाही.

आणि शेवटी विनाशाच्या जवळ पोचलेले राज्य जिवंत राहते ते फक्त एखाद्या निष्फळ व फसव्या स्वरूपात. माणसांच्या मनातील समाजाचा बंध त्यावेळी तुटलेला असतो; त्यावेळी अत्यंत नीच असा स्वार्थ मुद्दामपणे सर्वसाधारण हिताच्या पवित्र नावाने वावरतो; आणि त्यावेळी सर्वसाधारण जनता मुकी बनते. आपल्या मनातील हेतू स्पष्ट न करता सर्वजण अशा पद्धतीने बोलतात की राज्य जणू अस्तित्वातच नाही आणि ते जणू नागरिक नाहीत. अशा परिस्थितीत खाजगी हितसंबंधाना पोषक असे अन्याय्य हुकूम कायदे म्हणून मंजूर केले जातात.

सर्वसाधारण इच्छा नष्ट झाली अगर दूषित झाली असे यावरून समजावयाचे का? नाही; ती अचल, अपरिवर्तनीय व शुद्ध राहते, घडते ते एवढेच की तिच्यावर अतिक्रमण करणाऱ्या इतर इच्छा तिच्यावर कुरघोडी करतात. प्रत्येक जण आपला हितसंबंध इतरांच्या हितसंबंधापासून वेगळा करतो; हा वेगळेपणा पुरता नाही हे प्रत्येकाला कळते; तरी देखील स्वतःपुरते वेगळे हित जे त्याला साधायचे असते त्याच्या मानाने सर्वसाधारण स्वरूपाचे नुकसान घडवून आणण्यात जो त्याचा हिस्सा असतो तो काहीच नाही असे त्याला वाटते. जे एखादे विशिष्ट खाजगी हित त्याला साधायचे असते ते सोडले तर त्याला देखील सर्वसाधारण हित हवे असते, कारण इतरांच्या इतकाच आपलाही त्याने फायदा होईल अशी त्याची खात्री असते. आपले मत तो पैशासाठी विकतो त्यावेळी देखील आपल्या मनातील सर्वसाधारण इच्छा तो नष्ट करत नाही; तिला हुलकावणी दाखवतो एवढेच. त्याचा दोष आहे तो हा की तो प्रश्नाचे स्वरूप बदलतो आणि जो प्रश्न कुणी विचारला नाही त्याचे तो उत्तर देतो. म्हणजेच आपल्या मताच्या रूपाने "हे राज्याच्या फायद्याचे आहे" असे म्हणण्याऐवजी "अमुक अमुक सूचना कायदा म्हणून मंजूर व्हावी हे या अगर त्या व्यक्तीच्या हिताचे आहे" असे तो म्हणतो. आणि म्हणून प्रतिनिधी सभेतील सार्वजनिक व्यवस्थेचा कायदा सर्वसाधारण इच्छा कायम रहावी असा नसतो तर तिला प्रश्न विचारले जावे आणि तिने त्यांची उत्तरे द्यावी असा असतो.

या ठिकाणी सार्वभौमत्वाच्या प्रत्येक कृतीतील साध्या मतदानाच्या हक्काबद्दल नागरिकाचा जो हक्क कुणीही काढून घेऊ शकत नाही. मी पुष्कळ बोलू शकलो असतो. तसेच भाषणाबद्दल, सूचना करण्याबद्दल, मतविभागणीबद्दल व चर्चेबद्दल हा हक्क शासन

स्वतःच्या सभासदापुरता मर्यादित ठेवण्याची खूप काळजी घेते. मी पुष्कळ बोलू शकलो असतो. परंतु या महत्त्वाच्या गोष्टीबद्दल वेगळा स्वतंत्र प्रबंध लिहावा लागेल. या पुस्तकात त्याची सांगोपांग चर्चा करता येणार नाही.

## प्रकरण २

# मतदानाबद्दल

आताच जे सांगितले त्यावरून हे स्पष्ट होईल की सार्वजनिक कार्ये ज्या पद्धतीने केली जातात त्यावरून समाजाची मानसिक अवस्था व सर्वसाधारण आरोग्य याबद्दल चांगली कल्पना येऊ शकते. नागरिक एकत्र जमल्यानंतर त्यांच्यामध्ये ज्या प्रमाणात एकमेळ अधिक असेल त्या प्रमाणात सर्वसाधारण इच्छेचा प्रभाव अधिक पडेल. परंतु लांबलचक वादविवाद, मतभेद आणि आरडाओरडा ही सर्व खाजगी हितसंबंध वरचढ ठरल्याची चिन्हे आहेत आणि त्यावरून राज्य अवनतीच्या मार्गाला लागले आहे असा निष्कर्ष काढता येतो.

समाजामधे दोन अगर अधिक वर्ग असले म्हणजे ही गोष्ट तितकी स्पष्ट होत नाही. रोममधे श्रीमंत कुटुंबात जन्मलेले ( Pratricians ) आणि गरीब व कामकरी ( Plebs ) असे दोन वर्ग होते; त्या दोघामधील भांडणामुळे लोकराज्याच्या उत्तम काळामधेही लोकसभेत ( comet'a ) पुष्कळ वेळा अडचणी निर्माण होत. पण हा अपवाद खरा असण्यापेक्षा वरवरचा अधिक आहे. अशा परिस्थितीत खरे म्हणावयाचे म्हणजे, राजकीय समाजातील अंगभूत दोषामुळे, एका राज्यात दोन राज्ये असतात. दोघांच्या एकत्रित अवस्थेत जे खरे नसते ते दोघांचा वेगवेगळा विचार केला तर खरे असते. भांडणे अगदी खूप जोरात असतानाही, वरिष्ठ लोकसभेने ( senate ) ढवळाढवळ केली नाही तर, रोमन जनतेला आपले सर्वसाधारण ठराव ( plebiscita ) शांतपणे आणि मोठ्या बहुमताने मंजूर करता येत असत. नागरिकांचे हितसंबंध एकच असत आणि त्यामुळे जनतेची इच्छाही एकच असे.

समाजव्यवस्थेच्या दुसऱ्या टोकालाही पुन्हा एकमत दृष्टीस पडते. ते टोक म्हणजे जेव्हा लोक दास्यात पडल्यामुळे त्यांना स्वातंत्र्यही नसते व इच्छाशक्तीही नसते. ते घडते त्यावेळी भीती व लांगूलचालन यांच्यामुळे मतांचे जयघोषात रूपांतर होते. माणसे त्यानंतर विचार करत नाहीत; ते पूजा करतात अगर शिव्याशाप देतात. सम्राटांच्या अमदानीत वरिष्ठ लोकसभा या निंदनीय पद्धतीने व काही वेळा हास्यास्पद स्वरूपाची सावधगिरी ठेवून आपले विचार व्यक्त करीत असे. टॅसिटसने लिहिले आहे की ऑथोच्या ( Otho ) कारकीर्दीत वरिष्ठ लोकसभेचे सभासद व्हायटेलिअस ( Vitellius ) वर

शिष्यांची लाखोली वाहताना खूप आरडाओरडा करत असत; हेतू हा की यदाकदाचित् तो सत्ताधारी ( master ) बनला तर कोण काय बोलला ते त्याला सांगता येऊ नये.

या सर्व गोष्टींचा विचार करून काही सर्वसाधारण नियम बनवण्यात आले आहेत. मते मोजण्याची पद्धत व विचारांची तुलना करणे याबद्दलचे ते नियम असतात. सर्वसाधारण इच्छा कमी अगर अधिक स्पष्टपणे दृष्टीस पडते व राज्याची कमी अगर अधिक अवनती झालेली आहे त्यावर ते नियम अवलंबून असतात.

एकच कायदा असा आहे की त्याच्या स्वरूपामुळे तो मंजूर होण्यात सर्वांच्या एकमुखी अनुमतीची आवश्यकता असते. तो कायदा म्हणजे सामाजिक करार. सर्व कृतींपेक्षा नागरी समाजामध्ये एकत्र राहण्याच्या ठरावाची जी कृती आहे ती विचारपुरस्सर केलेल्या इच्छेची ( deliberately willed ) कृती असते. प्रत्येक मनुष्य जन्मतः स्वतंत्र असतो व स्वतःचा मालक असतो, त्यामुळे कुणालाही कोणत्याही कारणासाठी त्याच्या संमतीविना त्याला परतंत्र बनवता येत नाही. गुलामाचा मुलगा गुलाम म्हणून जन्माला येतो असे म्हणणे म्हणजे तो मनुष्य म्हणून जन्मलाच नाही असे म्हणण्यासारखे आहे.

म्हणून सामाजिक करार घडण्याच्या वेळी काही मंडळींनी त्याला विरोध केला तर करार बेकायदेशीर ठरत नाही; विरोध करणारी मंडळी करारातून वगळली जातात आणि नागरिकांच्या समुदायामध्ये त्याना परके म्हणून राहावे लागते. राज्याची उभारणी झाल्यानंतर राज्यामध्ये राहणे म्हणजे त्याला मान्यता देणे. एखाद्या देशात राहणे याचा अर्थ त्याचे सार्वभौमत्व पतकरणे असा आहे. [1]

या मूलभूत कराराच्या बाबीखेरीज इतर सर्व बाबींत बहुमताचा ठराव सर्वांवर बंधनकारक असतो. कराराचा हा परिणाम आहे. पण कुणी असा प्रश्न विचारील की स्वतःची इच्छा नाही ती मानण्याचे मनुष्यावर बंधन पडल्यानंतर तो कितपत स्वतंत्र राहू शकतो? विरोधी गटातील मंडळी स्वतंत्र आहेत असे म्हणावयाचे आणि तरी देखील ज्या कायद्यांना त्यानी संमती दिलेली नाही ते कायदे त्याना मान्य करायला लावायचे हे कसे?

प्रश्नाला माझे उत्तर आहे ते हे की प्रश्न चुकीचा विचारला गेला आहे. नागरिकांची सर्व कायद्यांना मान्यता असते. काही कायदे त्यांच्या मर्जीविरुद्ध मंजूर झालेले असले तरी व त्या कायद्याचा भंग करण्याचे एखाद्याने धाडस केले तर त्याला शिक्षा होणार असली तरी राज्याच्या सभासदांची चिरकालिन इच्छा हीच सर्वसाधारण इच्छा.

---

१. स्वतंत्र राज्यानाच हे लागू आहे हे नेहमी ध्यानात ठेवले पाहिजे. इतरत्र, कौटुंबिक हितसंबंध, मालमत्ता, परदेशी राहण्याची सोय होण्याची अशक्यता, जुलूमजबरदस्ती अगर आवश्यकता या कारणामुळे सोडून जाण्याची इच्छा असतानाही माणसाला एखाद्या देशात राहावे लागते. अशा परिस्थितीत केवळ तो मनुष्य देशात राहतो आहे यावरून त्याची कराराला संमती आहे असे धरून चालता येणार नाही किंवा त्याला तो मोडायचा आहे असेही समजता येणार नाही.

आणि त्या इच्छेमुळेच ते नागरिक व स्वतंत्र माणसे बनतात.[1] लोकांच्या परिषदेत एखादा कायदा जेव्हा सुचविला जातो त्यावेळी ती सूचना पसंत आहे अगर नापसंत आहे हे विचारले जात नाही; विचारले जाते ते हे की सूचना त्यांची सर्वांची मिळून जी सर्व-साधारण इच्छा असते तिला अनुरूप आहे की प्रतिकूल आहे. नागरिक जेव्हा मत देतो तेव्हा या प्रश्नावरील मत तो व्यक्त करत असतो, आणि मतगणनेनंतर सर्वसाधारण इच्छा काय आहे ते निश्चित होते. म्हणून मला पसंत नाही अशा मताचा विजय होतो त्यावेळी माझी फसवणूक झालेली होती व मला जी सर्वसाधारण इच्छा आहे असे वाटत होते ती तशी नव्हती हे सिद्ध होते. माझ्या मताचा जय झाला असता, तर जे करावे असे माझ्या मनात होते त्यापेक्षा काही तरी वेगळे असे मी केले असते आणि मग मी स्वतंत्र राहिलो नसतो. सर्वसाधारण इच्छेचे सर्व गुण बहुमतात आहेत, हे या ठिकाणी गृहीत धरले जाते, हे खरे. तसे नसेल तर मात्र, आपली बाजू कोणतीही असो, स्वातंत्र्य अस्तित्वात उरले नाही असे म्हणावे लागेल.

सार्वजनिक चर्चेमधे वैयक्तिक इच्छा सर्वसाधारण इच्छांची जागा कशा घेतात, हे मी वर दाखविले त्यावेळी ही आपत्ती टळावी म्हणून कोणते कार्यक्षम उपाय योजले पाहिजेत ते मी खुलासेवार सांगितले आहे. या मुद्यावर मी नंतरही अधिक सांगणार आहे. इच्छे-बद्दल निर्णय देण्यासाठी किती प्रमाणात मते पडावी लागतात हे ठरविण्याची जी तत्त्वे आहेत, त्याबद्दलही मी विवेचन केले आहे. एखाद्या मताचा फरक पडला तरी समानता नष्ट होते; विरोधी बाजूने एखादा आवाज निघाला तरी एकमत अशक्य होते. परंतु एक-मत आणि समानता या दोन टोकांमधे अनेक प्रकारची असमान विभागणी होऊ शकते आणि कोणत्या प्रसंगी ती किती असमान असावी, हे राज्याने आणि राजकीय समाजाच्या गरजांनी ठरवायचे असते.

हे प्रमाण ठरवण्याच्या बाबतीत दोन सर्वसाधारण नियमांचा उपयोग होऊ शकेल. एक नियम असा की चर्चेचा विषय जितका महत्त्वाचा व गंभीर असेल तितके मतदान एकमताच्या जवळचे असावे. दुसरा नियम असा की प्रश्नाचा निकाल सत्वर लागणे जितके जरूरीचे असेल तितकी अनुकूल व प्रतिकूल मतांची तुलना करताना कमी फरकाला परवानगी दिली जावी. जेव्हा एकाच सभेत निर्णय घेणे आवश्यक असेल, तेव्हा एकाचे मताधिक्यही पुरेसे समजले जावे. कायदे मंजूर करण्याच्या कामी पहिला नियम अधिक योग्य वाटतो, नेहमीच्या कामकाजासाठी दुसरा नियम ठीक आहे. ते कसेही

---

१. जिनोआमधे तुरुंगांच्या भिंतीवर व जहाजावर काम करणाऱ्या गुलामांच्या ( galley–slaves ) शृंखलावर लिबर्टस ( liburtas ) हा शब्द कोरलेला असतो. या योजनेचा ( device ) वापर उत्तम आहे व न्यायाचा आहे. सर्व राज्यांत जे दुष्कृत्ये करणारे असतात तेच नागरिकांना स्वातंत्र्य उपभोगू देत नाहीत. त्या सर्व मंडळींना जर जहाजावर डांबून ठेवता आले तर इतराना पुरे स्वातंत्र्य उपभोगणे शक्य होईल.

असले तरी बहुमत ठरवण्यासाठी दोन्ही नियमांची मिळवणी करून प्रमाण निश्चित करणे उत्तम ठरेल.

## प्रकरण ३

# निवडणुकीविषयी

राज्यकर्ता आणि दंडाधिकारी यांच्या निवडणुका, मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे, गुंतागुंतीच्या असतात. त्या निवडणुकांच्या बाबतीत दोन मार्ग शक्य आहेत. एक निवड आणि दुसरा चिठ्ठी टाकणे. लोकराज्यात दोन्ही मार्गांचा अवलंब झालेला आहे. व्हेनिसच्या डॉज ( Doge ) च्या निवडणुकीच्या बाबतीत सध्या देखील दोन्ही पद्धतींच्या गुंतागुंतीच्या मिश्रणाचा उपयोग केला जातो. मॅंटेस्क्यू म्हणतो, " चिठ्ठ्या टाकून निवड करणे यातच लोकशाहीचे सार आहे. " ( Esprit des lois, पुस्तक २, प्रकरण २ ) मला हे मान्य आहे, पण हे कसे घडते ? तो म्हणतो; " चिठ्ठ्या टाकून निवड केल्याने कोणावरही अन्याय होत नाही. त्या पद्धतीमुळे प्रत्येक नागरिकाला आपल्या देशाची सेवा करायला मिळेल, अशी अगदीच अनाठायी न ठरणारी आशा बाळगता येते. " परंतु हे खरे कारण नव्हे.

राज्यकर्त्यांची निवडणूक हे शासनाचे कार्य आहे, सार्वभौमत्वाचे नव्हे; हे जर आपण ध्यानात ठेवले तर चिठ्ठ्या टाकण्याच्या पद्धतीमधे लोकशाहीचे तत्त्व अधिक का आढळते, ते स्पष्ट होईल. लोकशाहीमधे जितकी कार्ये कमी तितका कारभार अधिक चांगला असतो.

प्रत्येक खऱ्या लोकशाहीमधे अधिकारपद ही लाभाची गोष्ट नसते, तर ती एक मोठी जबाबदारी असते; आणि म्हणून एकाला सोडून दुसऱ्याच्या शिरावर ते लादणे म्हणजे त्याच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. चिठ्ठ्या टाकून ज्याचे नाव आले त्याच्यावर कायदाच ते लादू शकतो. कारण त्या परिस्थितीत सर्वांना सारखी संधी असते. निवड मानवी इच्छेवर अवलंबून नसते, आणि कायद्याचे सार्वत्रिक स्वरूप विशिष्ट गोष्टीला तो लागू केल्याने बदलत नाही.

उमरावशाहीमधे राज्यकर्ताच राज्यकर्त्यांची निवड करतो, शासन स्वयंतंत्र असते आणि इतरापेक्षा त्या पद्धतीला मताने निर्णय घेण्याचा मार्ग फार योग्य असतो.

व्हेनिसचा डॉज ( Doge ) निवडण्याची जी पद्धत आहे, तिच्या उदाहरणाने हा फरक नष्ट होण्याऐवजी तो सिद्ध होतो. त्या पद्धतीचा संमिश्रपणा संमिश्र शासनाला चांगला शोभतो. व्हेनिसची पद्धत खरीखुरी उमरावशाही आहे असे मानणे चुकीचे आहे. लोकांचा शासनात काही भाग नसतो हे खरे, पण उमरावांनी लोकांची जागा घेतलेली आहे. हजारो

गरीब लोकांना ( Barnabotes ) कधीही अधिकाराचे पद लाभत नाही. एक्सलन्सी या अर्थशून्य उपाधीपलिकडे व वरिष्ठ समितीत भाग घेण्याच्या हक्कापलिकडे सरदारकीचे दुसरे काहीही त्यांच्याजवळ नसते. ही वरिष्ठ समिती आपल्या जिनिव्हातील सर्वसाधारण समितीइतकी मोठी असल्याकारणाने तिच्या नामवंत सभासदांना जिनिव्हातील सामान्य नागरिकापेक्षा अधिक हक्क नसतात. व्हेनिस व जिनिव्हा या दोन लोकराज्यांतील कमालीचे फरक जर क्षणभर बाजूला ठेवले तर जिनिव्हातील व्यापारी वर्ग व्हेनिसमधील उच्च दर्जाच्या कुटुंबासारखा ( Patrician order ), आपल्या येथील स्थानिक माणसे व रहिवासी, व्हेनिसमधील शहरी माणसे व नागरिक यांच्यासारखे आणि आपले शेतकरी व्हेनिसच्या आजूबाजूच्या प्रदेशात राहणाऱ्या अंकित जनतेसारखे आहेत, असे खात्रीने म्हणता येते. व्हेनिसच्या लोकराज्याकडे कोणत्याही दृष्टीने पाहा, त्याचा आकार दृष्टीआड केला तर, तेथील शासन आपल्यापेक्षा अधिक उमरावशाही पद्धतीचे आहे, असे म्हणता येणार नाही. फरक आहे तो एवढाच की, आपल्या इथे जन्मभर अधिकार गाजवील असा राज्यप्रमुख नसल्यामुळे, चिठ्ठया टाकून निवड करण्याची व्हेनिसला वाटते तशी गरज आपल्याला भासत नाही.

खऱ्या लोकशाहीमधे चिठ्ठया टाकून निवड करण्याने कोणतीही अडचण उपस्थित होत नाही. जिथे प्रामाणिकपणा व कर्तबगारी या बाबतींत आणि तत्त्वे व वैभव या बाबतीतही सर्वजण समसमान असतात, तिथे निवडीकडे विशेष लक्ष दिले नाही तरी चालते. पण मी पूर्वीच सांगितले आहे की खरी लोकशाही ही वस्तू कुठेही आढळत नाही.

जिथे निवडणूक आणि चिठ्ठया टाकणे अशी संमिश्र पद्धत स्वीकारली जाते तिथे सेनापतीसारख्या खास गुण लागणाऱ्या जागा भरण्यासाठी निवडणुकीची पद्धत स्वीकारावी व न्यायदानाच्या कार्यासारखी जी केवळ सद्भावना, न्यायबुद्धी व प्रामाणिकपणा यांची गरज भासणारी कार्ये आहेत त्यांच्यासाठी दुसऱ्या पद्धतीचा स्वीकार करता येईल. कारण सुव्यवस्थित राज्यात हे गुण सर्व नागरिकांच्या ठिकाणी आढळून येतात.

राजेशाहीच्या शासनात चिठ्ठया टाकणे काय किंवा निवडणूक काय दोन्ही गोष्टींना जागा नसते. राजा हाच राजपुरुष व राज्याधिकारी असल्यामुळे मदतनीसांची निवड फक्त त्याच्यावरच अवलंबून असते, आबे द सें प्येरने ( Abbe de Saint–Pierre ) राजाच्या सल्लागार मंडळाची संख्या वाढवावी व सभासदांची निवड मतदानाने व्हावी, असे सुचविले त्यावेळी आपल्या सूचनेमुळे शासनाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल घडून येईल हे त्याच्या ध्यानात आले नाही.

लोकांच्या परिषदेत मते देण्याच्या व त्यांची गणना करण्याच्या पद्धतीबद्दल मी आता माहिती द्यावी. परंतु रोममधे या बाबतीत कोणती पद्धत होती व तिचे काम कसे चालत असे याचे वर्णन केले तर सर्वसाधारण तत्त्वांचे, मी करू शकेन त्यापेक्षा अधिक, चांगले स्पष्टीकरण होईल. दोन लक्ष सभासद असलेल्या परिषदेत सार्वजनिक व खाजगी कामे कशी उरकली जात असत हे खुलासेवार रीतीने पाहणे सुज्ञ वाचकाला योग्य वाटेल.

## प्रकरण ४

# रोममधील जनपरिषदेविषयी

रोमच्या इतिहासातील अगदी जुन्या काळाविषयी आपल्याजवळ निश्चित साधने नाहीत. त्या काळाबद्दल आपल्याला जे सांगण्यात येते ते बहुतांशी दंतकथांच्या[1] रूपाचे आहे असे मानणे युक्त होईल; सर्वसाधारणपणे, राष्ट्र कसे स्थापन झाले हा जो राष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत बोधप्रद असा भाग तो बहुतेक वेळा आपल्याला आढळत नाही. साम्राज्यांचा उत्कर्ष आणि अधःपात घडून येण्याची कारणे आपल्याला दैनंदिन अनुभवावरून कळतात; परंतु सध्याच्या काळात नवीन राष्ट्रे उदयाला येत नाहीत त्यामुळे असे समुदाय कसे अस्तित्वात येतात ते समजावून घेण्यासाठी आपल्याला केवळ तर्कावरच अवलंबून राहावे लागते.

राष्ट्राचा ऐतिहासिक काळ सुरू होतो त्यावेळी अस्तित्वात असलेल्या प्रथा पूर्वी केव्हा तरी सुरू झालेल्या असाव्यात आणि त्या कशा सुरू झाल्या याबद्दलच्या ज्या दंतकथा असतील त्यांच्यापैकी ज्याना उत्तम आधार असेल आणि ज्यांचे इतर अधिक बलवत्तर कारणानी समर्थन होते त्या खऱ्या असाव्यात. अत्यंत स्वतंत्र व सामर्थ्यवान् अशा लोकानी आपली अधिसत्ता गाजविण्यास कशी सुरवात केली असावी हे जाणण्यासाठी मी त्या आधाराचा उपयोग करणार आहे.

रोमच्या स्थापनेनंतर, बाल्यावस्थेतील लोकराज्याची म्हणजेच संस्थापकाच्या सैन्याची —सैन्यामधे अल्बन्स, सबाइन्स व परकी मंडळी होती —तीन गटांत विभागणी झाली. विभागणीनंतर त्याना जमाती हे अभिधान प्राप्त झाले. एका जमातीत दहा कुरिए ( curiae ) होते व प्रत्येक कुरिएचे ( curiae ) द-कुरिए ( decuriae ) नावाचे लहान विभाग होते. ते एका प्रमुखाच्या नेतृत्वाखाली असत. त्या प्रमुखाना कुरिओन्स ( cureones ) व द-कुरिओन्स ( decereones ) म्हणत असत.

खेरीज प्रत्येक जमातीतून शंभर घोडेस्वारांचे एक पथक वेगळे काढले जात असे. त्याला सेंतरी ( Century ) असे म्हणत. शहराच्या राज्यकारभारासाठी या विभागणीची आवश्यकता नव्हती. म्हणजेच विभागणी करण्याचा हेतू लष्करी स्वरूपाचा होता.

---

१. रोम हे नाव रोम्युलस ( Romulus ) पासून आले असे काही जण आपल्याला मानायला सांगत असले तरी, तो शब्द ग्रीक भाषेतील आहे आणि सामर्थ्य हा त्याचा अर्थ आहे. नुमा ( Numa ) हा देखील ग्रीक शब्द असून कायदा हा त्याचा अर्थ आहे. रोम शहराच्या पहिल्या दोन राजांची नावे त्यांच्या भावी काळातील कृतीशी संलग्न होती ही आनंदाची गोष्ट, काही नाही तरी, अचंबा वाटण्यासारखी आहे.

मोठेपणाच्या साहजिक प्रवृत्तीमुळे छोटेखानी रोम शहराने जगाच्या राजधानीला शोभेल अशी यंत्रणा पहिल्यापासून स्वतःसाठी निर्माण केली होती असे दिसते.

या प्राथमिक स्वरूपाच्या विभागणीचा एक दोष लवकरच लक्षात आला. अल्बान्स रामनेंसीस ( Ramnenses ) व सबाइन्स तातिंतिस ( Tatientes ) या जमातींच्या संख्येत वाढ झाली नाही, पण बाहेरून सारखी भर पडत गेल्यामुळे परकीयांची जमात लुसरिस ( Luceres ) सारखी वाढत गेली. म्हणून तिसऱ्या जमातीने संख्येच्या बाबतीत पहिल्या दोन जमातीना लवकरच खूप मागे टाकले. हा जो धोकादायक दोष होता तो दूर करण्यासाठी सर्व्हिअसने ( Servius ) उपाय शोधून काढला. त्याने विभागणीचा पाया बदलला. वंशभेदाऐवजी शहराच्या जमातींची वस्तीच्या भागानुसार त्याने विभागणी केली. वंशभेद हा पाया त्याने नष्ट केला. तीन जमातींऐवजी रोमच्या वेगवेगळ्या टेकड्यांवर राहणाऱ्या व त्या टेकडीच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अशा त्याने चार जमाती केल्या. प्रचलित असमानता तर त्याने दूर केली पण भविष्यातही अशी असमानता उत्पन्न होऊ नये असा मार्ग त्याने शोधून काढला. ही विभागणी स्थानाबरोबर माणसांचीही व्हावी या हेतूने माणसानी एका भागातून दुसऱ्या भागात राहायला जाऊ नये असा त्याने निर्बंध घातला आणि त्याच्या योगाने वेगवेगळ्या वंशातील लोकांचे एकमेकात मिसळणे बंद झाले.

घोडेस्वारांची शंभराची जी पूर्वीची तीन पथके त्यांची संख्या त्याने दुप्पट केली आणि शिवाय त्या पथकांत बारा नव्या पथकांची भर घातली. नावे मात्र पूर्वीची जी होती ती कायम ठेवली. या साध्या व सुबुद्ध उपायाने, लोकाना विरोध करण्याची संधी न देता त्याने घोडदळाला लोकांपासून वेगळे केले.

शहरातील चार जमातींमधे सर्व्हिअसने पंधरा नव्या जमातींची भर घातली. खेडेगावात जमिनीवर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांच्या त्या जमाती होत्या. म्हणून त्यांना गावकरी जमाती असे म्हणत. जमातीची तितक्या कँटन्स ( Catons ) मधे विभागणी केली. काही काळानंतर आणखी पंधरा जमातींची भर पडली. रोमन लोकांची येणेप्रमाणे पस्तीस जमातीमधे विभागणी झाली आणि लोकराज्याच्या अंतापर्यंत जमातींचा तोच आकडा कायम राहिला.

शहरी व गावकरी या भेदाच्या एका परिणामाकडे लक्ष दिले पाहिजे. अशा तऱ्हेच्या संघटनांच्या इतिहासात अशा भेदाचे दुसरे उदाहरण आढळत नाही आणि त्या भेदामुळेच रोमला आपली नीतिमत्ता टिकवता आली व आपले साम्राज्य वाढवता आले. शहरी जमाती सर्व सत्ता व सवलती लवकरच गिळंकृत करून टाकतील व गावकरी जमातीना खालचा दर्जा घ्यायला लावतील असे कुणालाही वाटले असते. परंतु झाले ते उलटेच. पूर्वावस्थेतील रोमन लोकांची खेडेगावातील जीवनाबद्दलची आवड सर्वांच्या परिचयाची आहे. त्यांच्या शहाण्या संस्थापकाने त्यांच्यामधे ही आवड निर्माण केली होती. खेडेगावातील कामकाज आणि लष्करी सेवा याना त्याने स्वातंत्र्याचा महत्त्वाचा भाग म्हणून

मान दिला होता. उलट, कला, धंदे, जगातील उचापती, पैसा कमावणे, गुलामांची प्रथा यांना शहरी ठरवून त्याने कमी लेखले होते.

रोमला ज्यानी लौकिक मिळवून दिला, ते सर्व खेडयात राहून आपली जमीन कसणारे होते. त्यामुळे लोकराज्याचे आधारस्तंभ अशी माणसे त्यांच्यामधूनच शोधण्याची पद्धत पडली. सन्माननीय प्रतिष्ठित शेतकरी कुटुंबातील मंडळी ( Patricians ) त्या राज्यात पुढारीपणाने काम करत होती; आणि म्हणून सबंध जगभर त्या राज्याला मान-मान्यता लाभली. शहरी लोकांच्या आळशी, सुस्त जीवनापेक्षा खेडेगावातील साधी राहणी आणि कष्टाचे काम लोकाना आवडत असे. शहरामधे जो मनुष्य दरिद्री कामगार म्हणून राहिला असता तो खेडेगावात शेतीवर काम करणारा मनुष्य म्हणून माननीय नागरिक बनत असे. व्हॅरोने ( Varro ) म्हटले आहे : “लढाईच्या काळात देशाचे रक्षण करणाऱ्या व शांततेच्या काळात अन्नाचा पुरवठा करणाऱ्या शूर व शक्तिशाली माणसांची खेडेगावात जोपासना व्हावी अशी आपल्या महान् पूर्वजानी जी योजना आखली ती निष्कारण नव्हती.” प्लिनी आपल्याला स्पष्टपणे सांगतो की जमातींमधे जी माणसे होती त्यांच्यामुळे गावकरी जमातीना मान दिला जात असे आणि ज्याना भ्याड म्हणून खाली खेचायचे असे त्याना दुर्लौकिकाचे लक्षण म्हणून शहरी जमातीत सामील केले जात असे. सबाइन वंशातील ॲपिअस क्लॉडिअस रोममधे स्थाईक झालेला होता; तिथे त्याचा खूप मानसन्मान झाला आणि नंतर त्याचे नाव एका गावकरी जमातीत दाखल केले गेले; त्या जमातीने नंतर त्याच्या कुटुंबाचे नाव घेतले. आणि शेवटी मुक्त केलेल्या गुलामाना शहरी जमातींचे सभासद करून घेतले जात असे, गावकरी जमातींचे नव्हे. लोकराज्याच्या सबंध इतिहासात मुक्त गुलामांना नागरिक म्हणून मान्यता मिळाली तरी देखील त्यान अधिकारपद मिळाल्याचे एकही उदाहरण आढळत नाही.

हे तत्त्व अतिशय चांगले होते, पण ते इतके ताणले गेले की अखेरीस त्याच्यामुळे राजकीय व्यवस्थेत बदल घडून आला आणि एक दोषदेखील निश्चितपणे निर्माण झाला.

पहिली गोष्ट ही की निरीक्षकानी ( censor ) बरेच दिवसांपासून नागरिकाना या जमातीतून त्या जमातीत मर्जीस येईल त्याप्रमाणे वर्ग करण्याचा अधिकार बळकावला होता; त्या अधिकाराचा उपयोग करून ते नागरिकाना हव्या त्या जमातीत जाऊ देऊ लागले; या सवलतीचा चांगला परिणाम झाला नाही आणि निरीक्षकांचे मुख्य कामच मुळी संपुष्टात आले. खेरीज सर्व मोठी आणि वजनदार माणसे स्वतःची नावे या नाही त्या गावकरी जमातीमधे सभासद म्हणून नोंदवत असत, त्यामुळे शहरी जमातीतील जनतेमधे केवळ मताचा हक्क प्राप्त झालेली गुलामीतून मुक्त झालेली माणसेच उरत. या प्रकारामुळे जमातीना प्रादेशिक पाया उरला नाही व माणसे इतकी एकमेकात मिसळून गेली की याद्या तपासल्याखेरीज कोण कोणत्या जमातीचा आहे हे निश्चितपणे सांगणे अशक्य झाले. याचा परिणाम असा झाला की जमात या शब्दाला राहण्याच्या जागेवरून

खराखुरा अर्थ प्राप्त होण्याऐवजी तो व्यक्तीवरून प्राप्त होऊ लागला. म्हणजेच तो शब्द केवळ काल्पनिक स्वरूपाचा बनला.

शहरी जमाती केंद्रस्थानाच्या जवळ असल्यामुळे जनपरिषदेतील त्यांचे महत्त्व वाढले हा देखील एक प्रकार घडला. आणि त्यामुळे परिषदेमध्ये ज्या बाजारबुणग्यांची गर्दी झाली होती त्यांची मते खरीदणाऱ्या कुणाही माणसाला राज्य विकण्यापर्यंतही त्यांची पाळी गेली. संस्थापकाने प्रत्येक जमातीमधे दहा पोटजमाती ( curiae ) असाव्यात असे ठरविले होते; त्या काळी रोमच्या तटबंदीच्या भिंतीआतील रोमन जनतेच्या तीन पोट-जमाती होत्या; प्रत्येक पोटजमातीची वेगळी देवळे व देव होते, त्यांचे वेगळे अधिकारी व पुजारी होते, कॉंपिटॅलिआ नावाचे वेगळे उत्सव होते; त्या उत्सवांचे गावकरी जमातींनी नंतर पेगनेलिया ( Paganalia ) नावाचे उत्सव साजरे करायला सुरवात केली त्यांच्याशी खूप साम्य होते.

सर्व्हिअसने विभागणीमधे फेरबदल केला, तेव्हा तीस या संख्येमधे त्याने बदल केला नाही. कारण त्याने ज्या चार नवीन जमाती निर्माण केल्या, त्यांच्यामधे तिघांची सम-विभागणी करता येत नव्हती. त्यामुळे पोटजमाती जमातीपेक्षा वेगळ्या झाल्या आणि शहरी मंडळींचा तो आणखी एक भाग झाला. पोटजमातींचा हा प्रश्न गावकरी जमाती-मधे किंवा त्या जमातींच्या जनतेमधे निर्माण झाला नाही. जमात ही एक नागरी संघटना बनली होती, सैनिकांच्या पुरवठ्यासाठी एक वेगळीच पद्धत अंमलात आणली गेली होती. रोम्युलसने प्रस्थापित केलेली लष्करी स्वरूपाची विभागणी आता अनावश्यक ठरली होती. म्हणून जरी प्रत्येक नागरिकाचे नाव कुठल्या ना कुठल्या तरी जमातीच्या यादीमधे दाखल केलेले असले तरी प्रत्येकाने पोटजमातीचे सभासद झालेच पाहिजे असे बंधन नव्हते.

सर्व्हिअसने तिसराही एक विभाग केला. त्याचा दुसऱ्या दोघांशी काहीही संबंध नव्हता. परंतु त्याचे जे परिणाम घडले त्यामुळे तो सर्वांत अधिक महत्त्वाचा ठरला. त्याने सगळ्या रोमन जनतेची सहा वर्गांत विभागणी केली. विभागणीचे स्वरूप राहण्याच्या जागेवर अवलंबून नव्हते किंवा ते वर्गांमधे पडणाऱ्या मंडळींच्या वैयक्तिक गुणावर अवलंबून नव्हते. ते अवलंबून होते ते फक्त मालमत्तेवर. याचा परिणाम असा झाला की, अगदी वरच्या वर्गात श्रीमंत मंडळी होती व अगदी खालच्या वर्गात गरीब मंडळी होती; आणि मधल्या वर्गात मध्यम स्थितीतील नागरिकांचा समावेश झाला. या सहा वर्गांची एकशेत्र्याण्णव पोटविभागांमधे विभागणी झाली. प्रत्येक पोटविभागाला सेंचरी असे म्हणत. निम्म्याहून अधिक पोटविभाग पहिल्या वर्गात पडले; तर अगदी खालच्या वर्गात एकच पोटविभाग पडला. त्यामुळे असे घडले की सर्वांत कमी सभासद असलेल्या वर्गाला सेंचरीज-मधे बहुमत मिळाले व रोमची निम्म्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या सर्वांत खालच्या वर्गाला एकच पोटविभाग म्हणून एकाच पोटविभागाइतके महत्त्व प्राप्त झाले.

या नवीन योजनेचा परिणाम लोकांच्या ध्यानात येऊ नये म्हणून सर्व्हिअसने तिचे उद्दिष्ट लष्करी स्वरूपाचे आहे, असा आभास निर्माण केला. दुसऱ्या वर्गात त्याने चिलखते तयार करणारांच्या ( armourers ) दोन सेंतरी घातल्या, तर चवथ्या वर्गांमधे लढाईची साधने तयार करणारांच्या दोन घातल्या. अगदी खालच्याखेरीज इतर वर्गांमधे त्याने तरुण व वृद्ध असा भेद केला. म्हणजेच लष्करी नोकरी ज्यांच्यावर बंधनकारक आहे असे व वयामुळे ज्यांची कायद्यानुसार मुक्तता झाली आहे असे. या भेदामुळे व मालमत्ता-विषयक नियमामुळे खानेसुमारीच्या यादींची नेहमी फेरतपासणी करावी लागे. शेवटी त्याने असा नियम केला की परिषद मार्शिअस मैदानावर ( Campus Martius ) भरावी आणि लष्करी नोकरी करण्याच्या वयाचे जे असतील त्यांनी शस्त्रे धारण करून परिषदेला हजर राहावे.

तरुण व वृद्ध हा भेद त्याने सर्वांत खालच्या वर्गात केला नाही, त्याचे कारण हे की, त्या वर्गात समाविष्ट झालेले कामकरी लोक होते. त्यांना देशाच्या सेवेसाठी शस्त्रे धारण करण्याचा अधिकार नव्हता. माणसाला स्वतःचे घर असेल तरच त्याला घराचे संरक्षण करण्याचा हक्क मिळतो. ज्या काळात सैनिक स्वातंत्र्याचे संरक्षक होते त्या काळातील रोमन सेनेमध्ये हल्लीच्या राजांच्या सेनेमधील, त्या सेनांना खोटा लखलखाट प्राप्त करून देणाऱ्या, फाटक्या कपड्यांच्या बदमाष सैनिकांपैकी एकालाही प्रवेश मिळाला नसता. त्या सर्वांची तिरस्कारपूर्वक हकालपट्टी झाली असती.

खालच्या वर्गांमध्येही गरीब ( Proletarians ) आणि कंगाल ( capite censi ) यांच्यामधे फरक केला जात असे. पूर्वोक्त मंडळी दारिद्र्याच्या अगदी हलाखीच्या स्थितीला पोचलेली नसत. त्यांच्यातून राज्याला नागरिक मिळत आणि अत्यंत आणीबाणीच्या काळात ते सैनिकांचाही पुरवठा करत. परंतु उलट पक्षी स्वतःचे असे ज्यांच्याजवळ काहीच नसे आणि डोकी मोजूनच ज्यांची गणना करावी लागे, ते सगळ्या गोष्टींसाठी अस्तित्वातच नाहीत, असे समजले जात असे. मेरिअसनेच (Marius) पहिल्या प्रथम त्यांची यादी करायला सुरुवात केली.

लोकांची गणना करण्याचे हे तिसरे तत्त्व मूळात चांगले की वाईट हे ठरवण्याच्या भानगडीत न पडता, जुन्या काळातील रोमन लोकांच्या साध्या सवयी, त्यांची निरपेक्ष देशभक्ती, त्यांची शेतीची आवड आणि व्यापार व पैशाचा हव्यास याबद्दलचा त्यांचा तिरस्कार-यामुळेच ते तत्त्व अमलात येऊ शकले, असे बिनधोक म्हणता येईल. आधुनिक जगातील कोणत्याही लोकांमध्ये त्यांच्यामध्ये प्रचलित असलेल्या पैशाची अनावर हाव, नैतिक स्थैर्याचा अभाव, कारस्थानांची आवड, अशांती व गडगंज संपत्ती मिळवण्याची व घालवण्याची अव्याहत प्रवृत्ती यामुळे ही योजना राज्य उलथून पाडल्याखेरीज वीस वर्षे तरी टिकली असती का ? तसेच हे देखील ठेवले पाहिजे की, रोमन लोकांची नीति-मत्ता व निरीक्षकांचे कार्य इथे वर्णन केले आहे, त्यापेक्षा अधिक बलवत्तर असल्यामुळे योजनेतील दोष लक्षात येताच दूर होत असत आणि पुष्कळ वेळा श्रीमंत मंडळींना

आपल्या संपत्तीचे गैर रीतीने सार्वजनिक प्रदर्शन केल्याबद्दल खालच्या वर्गात ढकलले जाई.

रोमच्या इतिहासात प्रत्यक्षात सहा वर्ग अस्तित्वात असताना पाचपेक्षा अधिक वर्गाचा उल्लेख का नसतो ते मी वर जे लिहिले आहे, त्यावरून लक्षात येण्यास जड जाऊ नये. सहावा वर्ग सैन्याला सैनिक पुरवत नसे व मार्शस मैदानावर मतदार म्हणून हजर रहात नसे. त्यामुळे लोकराज्यात त्याला खरेखुरे काम नसे. या कारणामुळे त्याला क्वचित्च कुणी महत्त्व दिले असेल.[1]

रोमन लोकामधे भेदभाव करण्याच्या ज्या पद्धती प्रचलित होत्या, त्या वर उल्लेखिलेल्या. लोकांच्या मेळाव्यात त्यांचे परिणाम काय होत त्यांचा आता आपण अभ्यास करू या. कायद्यानुसार जेव्हा सभा बोलावली जाई तेव्हा तिला जनपरिषद म्हणत. ती रोमच्या सार्वजनिक चौकोनात ( square ) अगर मार्शस मैदानावर भरे. तिथे ज्या पद्धतीने ती बोलावली जाई त्या पद्धतीवरून त्रिबुता जनपरिषद ( Comitia Tributa ), कुरिएता जनपरिषद ( Comitia Curiata ) व सेंतुरिता जनपरिषद ( Comitia Centuriata ) असे तीन प्रकार असत. कुरिएता जनपरिषद ( Comitia Curiata ) रोम्युलसने स्थापन केली, सेंतुरिता जनपरिषद ( Comitia Centuriata ) सर्व्हिअसने स्थापन केली व त्रिबुता जनपरिषद ( Comitia Tributa ) लोकपालानी ( Tribunes of people ) निर्माण केली. परिषदेमधे एकत्रित झालेल्या लोकांच्या संमतीखेरीज कोणताही कायदा मंजूर होत नसे आणि कोणताही दंडाधिकारी नेमला जात नसे आणि ज्या अर्थी प्रत्येक नागरिकाचे नाव कुरिआ ( curia ), संतरी ( century ) किंवा जमात ( Tribe ) यामधे दाखल केलेले असे त्या अर्थी मतदानाच्या अधिकारातून कुणालाही वगळले जात नसे आणि त्यामुळे रोममधील जनता कायद्याने व प्रत्यक्षात देखील खरोखरी सार्वभौम होती.

जनपरिषदेची सभा कायदेशीर रीतीने सुरू होण्यासाठी व तिथे जे ठरेल त्याला कायद्याचे स्वरूप येण्यासाठी तीन गोष्टींची अवश्यकता असे. पहिली गोष्ट ही की जो दंडाधिकारी किंवा इतर संस्था सभा बोलवते त्यांना ती बोलवण्याचा अधिकार असला पाहिजे. दुसरी गोष्ट ही की कायद्याने सभेसाठी निश्चित केलेल्या दिवशी ती भरली पाहिजे व तिसरी गोष्ट ही की शकुनाची चिन्हे अनुकूल असली पाहिजेत.

पहिल्या नियमाच्या हेतूचे स्पष्टीकरण करण्याची अवश्यकता नाही. राज्याला हितावह म्हणून दुसरा नियम बनवला गेला. परिषद सुट्टीच्या किंवा बाजाराच्या दिवशी भरवता

( १ ) मार्शस मैदान ( Campus martius ) असे मी म्हणतो, कारण त्या मैदानावरच सेंतरिज ( centuries ) जनपरिषदेची सभा भरवत असत. दुसऱ्या दोन स्वरूपात जेव्हा जनता एकत्रित होत असे, त्यावेळी फोरम ( forum ) अगर दुसऱ्या एखाद्या सभास्थानाचा उपयोग केला जाई. त्यावेळी प्रमुख नागरिकाइतकेच कंगाल मंडळींना ( capite censi ) महत्त्व व अधिकार असे.

येत नसे. कारण त्या दिवशी कामकाजासाठी रोमला आलेल्या गावकरी मंडळींना सार्वजनिक सभेला हजर राहायला वेळ सापडत नसे. तिसऱ्या नियमाच्या योगाने वरिष्ठ लोकसभेला अभिमानी आणि मनोवृत्ती लवकर प्रक्षुब्ध होणाऱ्या लोकांवर अंकुश ठेवण्याचे व उलथा-पालथ करू इच्छिणाऱ्या लोकपालांच्या उत्साहावर नियंत्रण राखण्याचे चांगले साधन प्राप्त झाले. लोकपालांनी मात्र या नियंत्रणातून मुक्त होण्याचे बरेच मार्ग शोधून काढले.

जनपरिषद कायदे आणि राज्याधिकाऱ्यांची नेमणूक एवढ्याच गोष्टींचा विचार करत असे, असे नव्हे. रोमन लोकांनी शासनाची महत्त्वाची बहुतेक कामे हाती बळकावल्या-मुळे युरपचे भवितव्य परिषदेच्या या सभांमध्ये निश्चित होत असे. सार्वजनिक काम-काजाच्या वेगवेगळ्या प्रकारानुसार परिषद वेगवेगळ्या पद्धतीने बोलवली जाई आणि ज्या तऱ्हेच्या कामाचा विचार व्हायचा असेल, त्याला अनुरूप अशा पद्धतीने परिषद आमंत्रित केली जात असे.

वेगवेगळ्या प्रकारांची नीट माहिती मिळावी म्हणून आपण त्यांची एकमेकांशी तुलना करू या. रोम्युलसने कुरिए ( Curiae ) स्थापन केली त्यावेळी वरिष्ठ लोकसभेवर लोकांचे व लोकांवर वरिष्ठ लोकसभेचे नियंत्रण असावे असा त्याचा हेतू होता; या हेतूने दोन्ही संस्थांवर सर्वोच्च सत्ता गाजवण्याचा अधिकार त्याने स्वतःच्या हाती ठेवला. या योजनेने संख्येमुळे जो अधिकार प्राप्त होतो तो त्याने लोकांना दिला. संपत्तीची सत्ता गाजवण्याचा अधिकार मात्र त्याने प्रतिष्ठित कुटुंबांच्या ( Patricians ) हाती ठेवला. पहिला अधिकार मिळाल्यामुळे दुसरा मिळाला नाही त्याची भरपाई होईल अशी त्याची कल्पना होती. परंतु राजेशाहीच्या प्रवृत्तीनुसार त्याने खरे पाहता प्रतिष्ठित कुटुंबांच्या हाती अधिक सत्ता ठेवली, कारण त्यांच्यावर जे अवलंबून असत ते मतदानाच्या वेळी प्रतिष्ठित कुटुंबांना अनुकूल असे भरघोस बहुमत नेहमी उभे करतील अशी खात्री वाटत येत असे. आश्रयदाते व आश्रयार्थी ही कौतुकाई संस्था राजकीय धूर्तपणा व दयाबुद्धी यांच्या अपूर्व विजयाचे प्रतीक आहे. या संस्थेखेरीज, लोकराज्याच्या कल्पनेशी पूर्णतया विसंगत अशी, प्रतिष्ठित कुटुंबांची राजवट टिकली नसती. जगापुढे हा उत्कृष्ट आदर्श उभा करण्याचा मान केवळ रोमकडे जातो; त्याच्यामुळे कोणतेही अनिष्ट परिणाम घडून आले नाहीत, पण त्या आदर्शांचे कुठे अनुकरणही झाले नाही.

कुरिए ( Curiae ) चा हा प्रकार राजांच्या अमदानीत सर्व्हिअसच्या काळापर्यंत टिकला; टार्क्विन्स ( Tarquins ) घराण्यातील शेवटच्या राजाचे राज्य कायदेशीर नव्हते असे ठरल्यामुळे राजाच्या कायद्यांना लेगस कुरिआते ( leges curiatae ) असे नाव देण्यात आले. लोकराज्यामध्ये चार शहरी जमातीपुरती मर्यादित असलेली व रोम शह-राच्या रहिवाशांनी भरलेली कुरिए ( Curiae ) वरिष्ठ लोकसभेला व लोकपालांना सोईची वाटली नाही. वरिष्ठ लोकसभा त्यावेळी प्रतिष्ठित कुटुंबांचे पुढारीपण करत होती व लोकपाल जरी जन्माने गरीब असले तरी सर्व सुखवस्तू मंडळी त्यांच्या पाठीशी

होती. त्यामुळे त्यांची खूप नाचक्की झाली, इतकी नाचक्की की सगळया कुरिएत जनपरिषदेने ( Comitia Curiata ) जे करावयाचे ते तीस लिक्टर्स ( lictors ) करू लागले. सेंतरी ( Centuries ) ही विभागणी उमरावांना इतकी फायदेशीर होती की त्या रूपाने जमलेल्या जनपरिषदेमधे वरिष्ठ लोकसभेचा नेहमीच आपली मर्जी का करून घेता आली नाही हे प्रथमदर्शनी समजणे कठीण आहे. त्या परिषदेलाच सर्वाधिकारी ( Consuls ) निरीक्षक ( Cencors ) व दुसरे कुरूल ( Curule ) दंडाधिकारी निवडण्याचा अधिकार होता. प्रत्यक्षात रोममधील सगळया जनतेचे जे सहा वर्ग होते व त्यांच्या ज्या एकशेत्र्याण्णव सेंतरिज ( Centuries ) होत्या त्यांच्यापैकी अठयाण्णव सेंतरिज ( Centuries ) पहिल्या वर्गातील होत्या. मतदान सेंतरिज ( Centuries ) प्रमाणे असल्यामुळे या एका वर्गाजवळ इतर सर्वांपेक्षा अधिक मते होती. या सर्व सेंतरीजचे ( Centuries ) जेव्हा एकमत असे तेव्हा इतर मतांची गणना देखील होत नसे आणि अल्पमताने जे ठरविले ते सगळया सभेचे मत असे समजले जात असे. जनपरिषद सेंतरिज ( Centuries ) च्या रूपाने भरत असे त्यावेळी मतांच्या ऐवजी पैशाच्या बळावर सर्व कामकाजाचा निर्णय होई असे म्हणता येते.

सत्तेच्या गैरवाजवी उपयोगावर दोन तऱ्हेचे नियमन होते. पहिले नियमन हे की लोकपाल नियमानुसार आणि पुष्कळ गरीब मंडळी बहुतेक वेळा श्रीमंत वर्गात मोडत. त्या वर्गातील प्रतिष्ठित कुटुंबांच्या वजनामधे समतोल राखण्याच्या कामी त्यांचा चांगला उपयोग होई. दुसरे नियमन हे की सेंतरिज ( Centuries ) ना नंबराप्रमाणे मतदान करायला नेहमीच सांगण्यात येत नसे. तसे असते तर एक नंबरापासून नेहमीच सुरवात झाली असती. पण तसे न करता चिठ्ठया टाकण्यात येत असत; त्यामुळे जिच्या नंबराची चिठ्ठी निघेल तिला एकटीला निवडणुकीचे मतदान करायला जावे लागे. इतर सेंतरिजना ( Centuries ) वेगळया दिवशी त्यांच्या दर्जानुसार एकत्र बोलावले जाई. त्यानंतर पुन्हा निवडणूक करत आणि सर्वसाधारणपणे पहिल्याप्रथम घडलेल्या निवडणुकीवर शिक्कामोर्तब करत.[१] येणेप्रमाणे उदाहरण घालून देण्याची सत्ता वरिष्ठांच्या हातून काढून लोकशाहीच्या तत्त्वानुसार चिठ्ठया टाकून ज्याची पाळी येईल त्याच्या हाती रोखठोक सोपवण्यात येत असे.

या पद्धतीमुळे दुसरा एक फायदा झाला. दोन निवडणुकांच्या दरम्यान गावकरी मतदारांना त्या वेळेपुरता निवडलेल्या उमेदवारांबद्दल माहिती मिळवता येत असे आणि सर्व प्रश्नाबद्दल पुरा विचार करून आपला निर्णय देता येत असे. शेवटी मात्र झटपट काम उरकता यावे म्हणून ही पद्धत बंद झाली आणि दोन्ही निवडणुकी एकाच दिवशी

---

( १ ) ज्या सेंतरी ( Century ) च्या नावाने चिठ्ठी निघाली असेल तिला 'प्रेरोगेटिव्हा' ( Prerogativa ) म्हणत कारण ती प्रथम मतदान करत असे. त्यावरून आजचा आपला प्रेरॉगेटिव्ह ( Prerogative ) हा शब्द निघाला आहे.

धरून येऊ लागल्या.

त्रिबुता जनपरिषद ( Comitia Tribuate ) ही काटेकोरपणे बोलायचे तर रोमन जनतेची समिति ( council ) होती. लोकपालानाच ( Tribunes ) ती बोलावता येत असे, त्यांची निवड तीच करी आणि तिच्या निर्णयानुसार ते आपले हुकूम ( plebiscita ) जारी करत. वरिष्ठ लोकसभेला तिथे स्थान नसे आणि तिच्या सभासदाना चर्चा चालू असे त्यावेळी तिथे हजरही राहता येत नसे. ज्यावर मत देण्याची संधी लाभली नाही असे कायदे त्या सभासदाना मान्य करावे लागत आणि त्या बाबतीत गरीबातील गरीब नागरिकापेक्षाही ते कमी स्वतंत्र होते. हा अन्याय हे एक अयोग्य रीतीने बनवलेल्या यंत्रणेचे फळ होते; नागरिकांच्या एका विभागाला जिच्यातून वगळले आहे अशा संस्थेचे कायदे त्या कारणामुळे बेकायदेशीर देखील ठरले असते. या जनपरिषदेच्या कामात प्रतिष्ठित कुटुंबातील सर्व मंडळीनी आपल्या नागरिक हक्कानुसार भाग घेतला असता तर केवळ डोकी मोजून घेण्यात येणाऱ्या निर्णयावर ते विशेष प्रभाव पाडू शकले नसते. त्या सभेत अत्यंत क्षुद्र असा गरीब मनुष्य आणि वरिष्ठ लोकसभेचा पुढारी दोघांचेही महत्त्व सारखेच होते.

याच्यावरून आपल्या हे लक्षात यावे की मतगणनेसाठी जे वेगवेगळे विभाग करण्यात आले होते त्यामुळे एक सुव्यवस्था निर्माण झाली होती; उपयोगात आणलेल्या पद्धती निष्कारण व एक दुसरीची जागा घेईल अशा नव्हत्या; विशिष्ट तऱ्हेच्या ज्य कामाचा विचार व्हायचा असेल त्या कामाला अनुरूप अशी विचारपूर्वक तयार केलेली प्रत्येक पद्धत होती.

या बाबीचा अधिक खुलासेवार विचार न करताही वर जे लिहिले आहे त्यावरून हे स्पष्ट होईल की त्रिबुता जनपरिषद (Comitia Tributa) लोकशाही शासनाला अधिक अनुकूल होती; व सेंतुरिता जनपरिषद (Comitia Centuriata) उमरावशाहीला जास्त सोईची होती. कुरिएता जनपरिषद (Comitia Curiata) मधे शहरातील लोकांचे बहुमत असे आणि तिचा उपयोग झाला तो फक्त जुलूमशाहीला आणि उत्पाती योजनांना. तिचा लौकरच दुर्लौकिक होणे साहजिकच होते. कारण राजद्रोही मंडळीनी देखील त्यांचे उद्देश इतक्या गैरसोईच्या रीतीने उघड करणाऱ्या यंत्रणेचा उपयोग करण्याचे टाळले. रोमन जनतेचा खरा मोठेपणा दृष्टीस पडतो तो फक्त सेंतुरिया जनपरिषद ( Comitia Centuriata ) मधे; तीच एक अशी परिषद होती की जिच्यामधे सर्वांना भाग घेता येत असे; कुरिएता जनपरिषदे ( Comitia Curiata ) मधून गावकरी जमातीना वगळले होते व त्रिबुता जनपरिषदे ( Comitia Tributa ) मधून प्रतिष्ठित कुटुंबाना व वरिष्ठ लोकसभेला वगळले होते.

पूर्वावस्थेतील रोमन लोकामधे मते दाखल करण्याची पद्धत त्यांच्या चालीरीतीप्रमाणेच साधी होती; तरी देखील ती स्पार्टामधील पद्धतीइतकी साधी नव्हती. प्रत्येक मनुष्य आपले मत मोठ्या आवाजात जाहीर करत असे, कारकून त्याची लेखी नोंद करत

असे. प्रत्येक जमातीतील बहुमतानुसार जमातीचे मत ठरत असे आणि कुरिअ (curiae) व संतरी (Centuries) बाबतीतही तीच पद्धत होती. नागरिकांमधे प्रामाणिकपणा होता व प्रत्येकाला अन्यायी निर्णयाला किंवा अयोग्य उमेदवाराला उघड-पणे स्वतःचे मत देणे लज्जास्पद वाटत होते तोवर ही पद्धत चांगली होती. पण लोकांमधे भ्रष्टाचार वाढला आणि मतांची खरेदी-विक्री होऊ लागली त्यावेळी मतदान गुप्त पद्धतीने व्हावे हेच योग्य ठरेल. गुप्त मतदान पद्धतीमधे मते विकत घेणारावर अनिश्चिततेमुळे बंधन पडते व दुराचारी मंडळीना देशद्रोहापासून परावृत्त होण्याची संधी सापडते.

हा बदल सिसरोला दोषार्ह वाटला व लोकराज्याच्या विनाशाला तो थोडाबहुत कारणीभूत ठरला असे त्याचे मत होते हे मला माहीत आहे. यासारख्या मुद्यावरील सिसरोच्या मताला खूप मान द्यायला हवा याची मला जाणीव आहे; तरी देखील त्याचे मत मला मान्य नाही. उलट माझे असे मत आहे की असा फरक घडवून आणला नाही तर त्याच्या योगाने राज्याचा विनाश जवळ आणल्यासारखे होईल. चांगल्या तब्येतीच्या माणसाला योग्य होईल असे खाणे जसे आजारी माणसाला देता येत नाही तसेच प्रामाणिक लोकांसाठी तयार केलेले कायदे भ्रष्ट लोकांच्या शासनासाठी उपयोगी पडत नाहीत. व्हेनिसच्या लोकराज्याच्या उदाहरणावरून या न्यायाचा खरेपणा सिद्ध होतो. व्हेनिसचे लोकराज्य अस्तित्वात आहे, पण ते केवळ दिखाऊ स्वरूपाचे व ते देखील नालायक माणसांना लागू पडतील असे कायदे आहेत म्हणून.

नागरिकांना तबकड्या (tablets) देण्यात येत; तबकड्यांवर नागरिकाला आपले मत, ते त्याने कसे दिले आहे हे इतरांना न कळता, देता येत असे. तबकड्या गोळा करण्याबद्दलचे, मते मोजण्याबद्दलचे, बेरजा तपासून पाहण्याबद्दलचे वगैरे नवीन नियम अंमलात आणले गेले. या कामासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल संशय येणे मात्र त्या नियमांनी दूर झाले नाही. आणि अखेरीस, दडपण आणले जाऊ नये व मतांची विक्री होऊ नये म्हणून वेगवेगळे कायदेही करण्यात आले; कायद्यांच्या संख्येवरूनच ते किती निष्फळ होते ते चांगले सिद्ध होते.

लोकराज्याचा अंत जवळ येत चालला होता त्या काळात कायद्याचा अपुरेपणा भरून काढण्यासाठी म्हणून रोमन लोकांना पुष्कळ वेळा खास योजना अंमलात आणाव्या लागत. काही वेळा चमत्कारांचा उपयोग करण्यात येत असे. चमत्कारांचा लोकांवर प्रभाव पडत असे, पण शासनाधिकारी त्यांच्यामुळे फसत नसत. कधी कधी परिषदेच्या सभा घाईने भरवल्या जात, उद्देश हा की उमेदवारांना स्वतःसाठी प्रचार करण्याला वेळ मिळू नये. लोकांना अगोदरच वश करण्यात आले आहे व अनिष्ट गोष्टींना त्यांचा पाठिंबा मिळेल असे दिसताच सभेचा सर्व वेळ भाषणातच खर्च केला जाई. परंतु शेवटी महत्त्वाकांक्षेवर नियंत्रण घालण्याचे सर्व प्रयत्न फसले. तरी देखील आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट ही की तो महान् जनसमुदाय, त्याच्या जुन्या संस्थांच्या पुण्याईमुळे वरिष्ठ लोकसभेने प्रकट केले असते तेवढ्या कौशल्याने, दंडाधिकाऱ्यांच्या नेमणुका करत राहिला, कायदे

मंजूर करत गेला, न्यायदानाचे काम करत राहिला व खाजगी व सार्वजनिक दोन्ही तऱ्हेचे कामकाज पार पाडत गेला.

म.रा.सा.सं.मं. ग्रंथालय
प्र/१०/२

## प्रकरण ५

# लोकपालसंस्थेविषयी

राज्यातील विविध घटकांमध्ये खरा समतोल साधणे अशक्य होते त्यावेळी, किंवा त्यांच्यामधील प्रचलित संबंध अपरिहार्य कारणामुळे सारखे बदलत जातात त्यावेळी एक तात्पुरते अधिकारपद स्थापन करणे हितावह ठरते. त्या पदाचा अस्तित्वात असलेल्या पदाशी काहीही संबंध नसावा. ते पद जुने प्रमाण फिरून प्रस्थापित करते; व शिवाय राज्यप्रमुख आणि जनता किंवा राज्यप्रमुख आणि सार्वभौम यांच्यामधील दुवा किंवा उभयान्वयी संज्ञा म्हणून कार्य करते. जरूर तेव्हा ते पद दोन्ही कार्ये एकाच वेळी करते.

जिला मी लोकपाल संस्था असे नाव देतो, ती ही संस्था कायद्यांचे व कायदे करण्याच्या सत्तेचे संरक्षण करते. रोममधील लोकपालानी केले तसे ही संस्था कधी कधी सार्वभौमाचे शासनापासून संरक्षण करते, कधी कधी आजच्या आपल्या काळात व्हेनिसमधील दहांची समिती ( Council of Ten ) देते तसा लोकाविरुद्ध शासनाला पाठिंबा देते, व कधी कधी पुरातन स्पार्टामधील एफर्स ( Ephors ) प्रमाणे राज्यामधे समतोल राखण्याचे कार्य करते.

लोकपाल संस्था शहरी राज्यव्यवस्थेचा भाग नसतो व त्याने कायदे करण्याच्य किंवा अंमलबजावणी करण्याच्या कार्यांत कोणताही भाग घ्यावयाचा नसतो. असा भाग घेत नाही म्हणूनच तिची सत्ता वाढते; तिला कोणत्याही गोष्टीची सुरवात करता येत नाही, पण एखादी गोष्ट होऊ नये असा प्रतिबंध करता येतो. कायद्यांची अंमलबजावणी करणाऱ्या राज्यप्रमुखापेक्षा किंवा कायद्यांची घोषणा करणाऱ्या सार्वभौमापेक्षा कायद्यांचा संरक्षक म्हणून तिला अधिक पवित्र मानले जाते व अधिक मान दिला जातो. रोमच्या इतिहासाचा विचार केला की या गोष्टीचा खरेपणा अधिक स्पष्टपणे लक्षात येतो. रोममधे प्रतिष्ठित कुटुंबातील मंडळीना सामान्य लोकांबद्दल खूप तिरस्कार वाटे, तरी देखील कुणाचा फायदा करून देण्याचा अगर कुणावर सत्ता गाजवण्याचा अधिकार नसलेल्या लोकांच्या प्रतिनिधीपुढे त्याना नतमस्तक व्हावे लागे.

सुबुद्ध रीतीने काम करणारी लोकपाल संस्था (Tribunate) चांगल्या राज्यघटनेचा मोठा आधारस्तंभ असतो; परंतु तिचा अधिकार योग्य मर्यादेपलीकडे थोडा जरी वाढला तरी सर्व गोष्टी उलटसुलट होतात. ती स्वभावतःच दुबळी राहू शकत नाही. तिच्यामधे

जर सत्त्व असेल तर कार्यांसाठी म्हणून जेवढी सत्ता आवश्यक त्याच्यापेक्षा कमी सत्ता तिच्या ठिकाणी असूच शकत नाही. कार्यकारी सत्तेवर निर्बंध ठेवण्याऐवजी ती तिने हस्तगत केली किंवा कायद्याचे संरक्षण करण्यापुरते स्वतःचे कार्य मर्यादित न ठेवता ती स्वतःच कायदे करण्याचा प्रयत्न करू लागली की तिची अवनती होऊन तिची जुलूनशाही बनते. एफर्स (Ephors) च्या हाती जी अबाधित सत्ता होती तिचे स्पार्टाचे नैतिक आदर्श कायम होते तोवर दुष्परिणाम घडून आले नाहीत. परंतु भ्रष्टाचाराला सुरवात होताच तिच्यामुळे भ्रष्टाचार वाढत गेला. जुलमी एफर्सनी एगिस (Agis) चा खून केला; त्याच्या वारसदारानी खुनाचा बदला घेतला. एफर्स (Ephors) यांचे पाप आणि त्या पापाबद्दलची शिक्षा यांच्या योगाने लोकराज्याचा विनाश जवळ आला. आणि क्लिओमिन्स (Cleomenes) नंतर स्पार्टाचे काही महत्त्व उरले नाही. लोकशाही राज्याचा रोममधे जो अखेरीस अस्त झाला तो देखील जवळजवळ याच मार्गाने; वटहुकूम काढून लोकपालानी जी अबाधित सत्ता हस्तगत केली होती तिचा व स्वातंत्र्य सुरक्षित राहावे या मूळ हेतूने जे कायदे बनवण्यात आले त्यांचा स्वातंत्र्य नष्ट करणाऱ्या सम्राटाना पाठिंबा देण्यासाठी उपयोग करण्यात आला. व्हेनिसमधील दहांच्या समितीचा विचार केला तर ते एक रक्तलांछित असे न्यायालय आहे; प्रतिष्ठित कुटुंबे व सामान्य जनता दोघानाही तिच्याबद्दल सारखीच मोठी भीती वाटत असे. कायदे उत्तम स्थितीत ठेवण्याऐवजी, त्यांचे अवमूल्यन करून गुप्तपणे नागरिकावर प्रहार करण्यापलीकडे आता त्या समितीला दुसरे काम उरले नाही; आणि ते प्रहार असे असतात की कुणीही त्यांच्यावर प्रकाशाचा झोत टाकायला धजत नाही.

खूप सभासद झाले की शासनाप्रमाणेच लोकपाल संस्था (Tribunate) देखील दुबळी बनते. रोममधील लोकपालांची संख्या सुरवातीला दोन होती, नंतर ती पाच झाली. आणि नंतर ती संख्या दुप्पट व्हावी अशी त्यानी इच्छा प्रदर्शित केली त्यावेळी वरिष्ठ लोकसभेने तिला विरोध केला नाही. कारण तिला माहीत होते की संख्या वाढली की लोकपालाना एकमेकाविरुद्ध खेळवता येईल; आणि वरिष्ठ लोकसभा तेच त्यानंतर करत राहिली.

इतक्या प्रचंड शक्तीच्या संस्थेने सत्ता गिळंकृत करू नये यासाठी एक उत्तम उपाय योजता येईल; कोणत्याही शासनाने अद्याप त्याचा विचार केलेला दिसत नाही; तो उपाय हा की ती संस्था कधीही स्थाई स्वरूपाची असू नये, आणि असा नियमच मुळी असावा की नेहमी विशिष्ट वेळी ठराविक मुदतीसाठी तिचे पुरे विसर्जन व्हावे. ती मुदत कायद्याने ठरवली जावी; दुराचार बळावतील इतकी ती कधीही दीर्घ असू नये. आणि खास हुकूम काढून ती जरूर पडेल तेव्हा वाढवण्याची किंवा संपवण्याची सोय असावी.

ही जी यंत्रणा सुचविली आहे तिच्यामधे दोष नाहीत असे मला वाटते.

लोकपाल संस्था ही राज्यघटकेचा भाग नसल्यामुळे ती काढून टाकल्यामुळे राज्ययंत्राला धोका पोचत नाही. ही यंत्रणा परिणामकारक मात्र जरूर ठरेल (निदान मला तसे

वाटते ) कारण जे पद नष्ट केले जाते व पुन्हा निर्माण केले जाते त्याच्या ठिकाणी जुन्या पदाधिकाऱ्यानी उपभोगिलेली सत्ता उरत नाही; कायद्याने दिली असेल तेवढीच सत्ता उरते.

## प्रकरण ६

# हुकूमशाहीविषयी

कायदे करडे असतात व परिस्थिती बदलेल त्याप्रमाणे ते बदलत नाहीत. त्यामुळे काही वेळा त्यांचे परिणाम घातक होण्याची शक्यता असते; आणीबाणीच्या काळात ते राज्याच्या विनाशालाही कारणीभूत होतात. प्रस्थापित समाजामधे योग्य प्रकारे कोणतीही गोष्ट करावयाची म्हणजे ती मंदगतीने होते; त्यामुळे कायद्याची चांगली अंमलबजावणी व्हावयाची म्हणजे त्याला अवधी लागतो; परंतु विशिष्ट परिस्थितीत तो अवधी मिळेलच अशी खात्री देता येत नाही. कायदे करणाराला अगाऊ तजवीज करता आली नाही अशा हजारो गोष्टी असतात आणि काही गोष्टींचा अगाऊ अंदाज घेता येत नाही, हे जाणण्याची दूरदृष्टी असणे अत्यंत आवश्यक आहे.

राज्यातील राजकीय संस्था म्हणूनच अशा अपरिवर्तनीय स्वरूपाच्या नसाव्यात की त्यांचे परिणाम काही काळ स्थगित करता येणार नाहीत. स्पार्टामधे देखील कायदे सुमावस्थेत ठेवण्याची सोय होती.

समाजव्यवस्थेमधे मूलगामी बदल करणे मात्र मोठ्या संकटाच्या काळीच समर्थनीय ठरू शकेल; राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल त्याच वेळी कायद्यांच्या अंमलबजावणीच्या पवित्र कार्यात हस्तक्षेप करणे उचित ठरेल. अशा क्वचित उद्भवणाऱ्या, सर्वांना दृग्गोचर होणाऱ्या प्रसंगी, तात्पुरत्या निर्णयाने सार्वजनिक सुरक्षिततेचे कार्य त्या कामाला अत्यंत लायक अशा व्यक्तीच्या हाती सोपवावे. संकटाच्या स्वरूपाप्रमाणे हे कार्य दोन पद्धतींनी करता येईल. संकटाला तोंड देण्यासाठी शासकीय कामकाजाचे क्षेत्र वाढवून भागत असेल तर शासनाच्या एक-दोन सभासदांच्या हाती कार्यकारी सत्ता एकत्रित करून तो उद्देश साधता येईल. या पद्धतीने कायद्यांच्या अधिकारात बदल होत नाही, फक्त त्यांच्या अंमलबजावणीची रीत बदलते. परंतु कायद्याची यंत्रणाच मुळी संकटनिवारणाच्या कार्यात अडथळा करील असे जर संकटाचे स्वरूप असेल तर एकच एक राज्यकर्ता नेमणे जरूरीचे ठरते. तो राज्यकर्ता सर्व कायद्यांना गप्प बसवतो आणि काही काळ सार्वभौम सत्ता स्थगित करतो. अशा वेळी सर्वसाधारण इच्छा काय आहे याबद्दल संशय नसतो आणि राज्य नष्ट होऊ नये हीच लोकांची पहिली निकड असते. म्हणून कायदेशीर अधिकार स्थगित करणे म्हणजे तो नष्ट करणे नव्हे. दंडाधिकाऱ्याला मौन प्रस्थापित करता येते, त्याला बोलायला

लावता येत नाही. तो त्याच्यावर सत्ता गाजवू शकतो, प्रतिनिधित्व करू शकत नाही. कायदे ही एकच अशी गोष्ट आहे की जी त्याला करता येत नाही.

लोकराज्याच्या रक्षणासाठी परंपरेने पवित्र ठरलेल्या रूढीनुसार रोममधील वरिष्ठ लोकसभा सर्वाधिकारी ( consuls ) बदलत असे, त्यावेळी ती पहिल्या पद्धतीचा अवलंब करत असे. दोन सर्वाधिकारी ( consuls ) एका हुकूमशहाची (dictator) नेमणूक करत ती दुसऱ्या पद्धतीनुसार. रोमने अल्बा ( Alba ) कडून ही पद्धत उचलली.[१]

लोकराज्याच्या प्राथमिक अवस्थेत हुकूमशहाची नेमणूक वरचेवर होत असे. कारण त्या काळात केवळ घटनेच्या बळावर राज्य टिकेल इतके ते सुप्रतिष्ठित झालेले नव्हते.

त्या काळात उच्च दर्जाची नीतिमत्ता प्रचलित होती; त्यामुळे वेगळ्या काळात ज्या सावधगिरीच्या योजना आखाव्या लागल्या असत्या त्यांची त्या काळात गरज नव्हती. हुकूमशहा सत्तेचा दुरुपयोग करील अशी धास्ती नव्हती; किंवा आपली एकतंत्री सत्ता निश्चित मुदतीपलीकडे वाढवण्याचा त्याला मोह पडेल अशीही धास्ती नव्हती. उलट, असे दिसे की एकतंत्री सत्तेचे हुकूमशहावर एवढे मोठे ओझे पडे की ते ओझे शक्य तितक्या लवकर खाली ठेवावे असे त्याला वाटे; जणू काय, कायद्यांच्या जागी काम करणे ही एक मोठी संकटपरिपूर्ण अशी जबाबदारी होती.

प्राथमिक अवस्थेत सर्वश्रेष्ठ दंडाधिकाऱ्याची विशेष विचार न करता नेमणूक] होत असे, त्यामध्ये मला दोष आढळतो तो सत्तेच्या दुरुपयोगाचा नव्हे तर त्या नेमणुकीचे महत्त्व कमी होत असे हा. कारण निवडणुकांच्या वेळी, अर्पणाच्या समारंभांच्या वेळी किंवा अशाच केवळ औपचारिक प्रसंगांच्या वेळी नेमणूक होत गेली तर नेमणूक करण्याचा खरा प्रसंग जेव्हा उद्भवेल त्यावेळी तिचे लोकांना फारसे महत्त्व वाटणार नाही, हा मोठा धोका होता. केवळ पोकळ देखाव्यासाठी म्हणून ज्या पदाचा अनेक वेळा उपयोग झाला ती एक अर्थशून्य उपाधी आहे, असे मानण्याची लोकांना सवय लागणे हा देखील एक धोका होता.

लोकराज्याच्या शेवटच्या काळात रोमन लोक अधिक सावध बनले; पूर्वीच्या काळात हुकूमशहांच्या नेमणुका करण्याच्या बाबतीत ते फार सैल होते, तर आता मूर्खपणाने ते फार काटेकोर बनले. त्यांचा भित्रेपणा साधार नव्हता हे सहज दृष्टीस पडते; राजधानीमध्ये जो दुबळेपणा नांदत होता त्याच्यामुळे शहरातील दंडाधिकाऱ्याला जास्त काही करणेच मुळी शक्य नव्हते; विवक्षित परिस्थितीमध्ये हुकूमशहा सार्वजनिक

१. ही नेमणूक रात्रीच्या वेळी व गुप्तपणे होत असे; जणू काय, माणसाला कायद्यापेक्षा वरचढ बनवणे या गोष्टीची त्यांना लाज वाटत असे.

स्वातंत्र्य गोत्यात आणण्याऐवजी त्याचे संरक्षण करतो; रोमच्या पायामधे ज्या शृंखला पडायच्या होत्या त्यांची घडण शहरात घडत नव्हती, ती सैन्यामधे घडत होती. मेरिअसने त्याला केलेला प्रतिकार व पांपीने सीझरला केलेला प्रतिकार दोन्ही दुबळे होते आणि त्यांच्यावरून बाहेरून हल्ला झाला तर अंतर्गत सत्ता काय करू शकेल ते उघड झाले.

या चुकीमुळे रोमन लोकांच्या हातून अनेक गंभीर स्वरूपाची चुकीची कृत्ये घडली. कॅटिलिन ( Catiline ) प्रकरणाच्या वेळी हुकूमशहा नेमला नाही हे एक त्या स्वरूपाचे कृत्य आहे. बाहेरच्या मुद्याची राजधानीच्या तटबंदीपलीकडे पोच नव्हती; जास्तीत जास्त काही इटालिअन प्रदेशाचाच त्याच्याशी संबंध येत होता; कायद्यानुसार हुकूमशहाची अमर्याद सत्ता त्याला मिळती तर सहज रीतीने त्याने कटाचा बंदोबस्त केला असता; काही काळानंतर प्रत्यक्षात त्या कटाचा बीमोड झाला, पण तो केवळ काही योगायोग चांगले जुळून आले म्हणून; असा योगायोग घडून येईल हे मानवी दूरदृष्टीला कितीही केले तरी सांगता आले नसते.

हुकूमशहाची नेमणूक करण्याऐवजी वरिष्ठ लोकसभेने आपली सर्व सत्ता सर्वाधिकाऱ्यां-(consuls) च्या हाती दिली. त्याचा परिणाम असा झाला की, परिणामकारकरीतीने वागता यावे म्हणून सिसरोला एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीच्या बाबतीत कायद्याने दिलेल्या सत्तेपेक्षा अधिक सत्ता वापरावी लागली. आनंदाच्या पहिल्या उत्साहात त्याच्या कृत्याची वाहवा झाली; परंतु मागाहून नागरिकांनी बेकायदेशीरपणे जो रक्तपात केला होता, त्याबद्दल साह-जिकपणेच त्याला जाब द्यावा लागला; हुकूमशहाची सत्ता ज्याला दिली आहे, अशा माणसाला असा ठपका देता आला नसता; परंतु सर्वाधिकाऱ्याने ( consul ) आपल्या वक्तृत्वाने सर्व विरोधकांना हरवले; सिसरो, जरी रोमन होता तरी, देशाच्या कल्याणापेक्षा स्वतःच्या कीर्तीकडे त्याचे अधिक लक्ष होते; आणि त्यामुळे राज्याच्या संरक्षणाचा सर्वात अधिक खात्रीचा व कायदेशीर मार्ग शोधण्याऐवजी प्रकरण यशस्वी रीतीने तडीस नेल्याचा मान आणि वैभव स्वतःला मिळावे म्हणूनच त्याने जास्त खटपट केली.[1] म्हणून रोमचा मुक्तिदाता म्हणून त्याचा सन्मान झाला ते योग्य झाले, आणि कायदे मोडले म्हणून त्याला जी शिक्षा झाली ती देखील योग्य होती. त्याला परत बोलवाले हा त्याचा डोळ्यात भरेल असा वैयक्तिक विजय होता, परंतु त्याला माफी देण्याचाही निःसंशय तो एक प्रकार होता.

इतर गोष्टी बाजूस ठेवता, हे मात्र जरूरीचे होते की, कोणत्याही रीतीने ही मह-

---

१. एखाद्याचे हुकूमशहा म्हणून नाव सुचवले असते तर हा मान व वैभव त्याला लाभलेच असते असे म्हणता येत नाही; त्याला स्वतःचे नाव सुचवण्याचे धाडस झाले नाही; आणि आपले सहकारी आपले नाव सुचवतील अशीही त्याला खात्री नव्हती.

त्याची नेमणूक होवो, ती नेहमीच शक्य तितक्या अल्प मुदतीची असावी व मुदतवाढ अशी कधीही दिली जाऊ नये. ही नेमणूक ज्यावेळी करावी लागते त्यावेळी राज्याचे रक्षण किंवा नाश काही दिवसांत घडेल अशी परिस्थिती असते; आणि ती निकडीची गरज एकदा संपली की, हुकूमशहा एकतर जुलमी बनतो किंवा निरर्थक ठरतो. रोममध्ये हुकूमशहाची मुदत फक्त सहा महिन्यांची असे आणि पुष्कळ हुकूमशहांनी मुदत संपण्यापूर्वीच सत्तेचा त्याग केला होता. मुदत अधिक मोठी असती तर ती जास्त वाढावी अशी खटपट करण्याचा त्यांना मोह झाला असता; डिसेम्व्हीरना ( Decemvers ) फक्त एक वर्षाची मुदत दिली होती, पण त्यांनी ती वाढवण्याचा प्रयत्न केला, तसे झाले असते. ज्या गरजेमुळे नेमणूक झाली तिच्यासाठी काम करण्यापुरतीच मुदत हुकूमशहाला मिळावी, इतर योजना आखण्यासाठी त्याला वेळ लागू नये.

## प्रकरण ७

# निरीक्षकाच्या कामाविषयी

कायदे जशी सर्वसाधारण इच्छेची घोषणा करतात, तशी लोकमताची घोषणा निरीक्षकामार्फतीने होते. लोकमत हा एक कायदा असतो आणि निरीक्षकाने (Censor) त्याची अंमलबजावणी करावयाची असते. राज्यप्रमुखाप्रमाणे ( Prince ) त्याने तो कायदा विवक्षित गोष्टींना लावावयाचा असतो.

लोकमत ठरवणे हा निरीक्षकाचा अधिकार नव्हे, ते काय आहे त्याची घोषणा करणे हे त्याचे कार्य. या कक्षेपलीकडे त्याचे जे निकाल असतील ते रद्द असतात आणि त्यांची अंमलबजावणी होऊ शकत नाही.

एखाद्या देशाचे नैतिक आदर्श आणि त्याच्या आवडीच्या गोष्टी यांमध्ये फरक करता येत नाही; कारण दोन्ही एकाच सर्वसाधारण तत्त्वावर आधारलेल्या असतात आणि म्हणून त्यांची सरमिसळ झालेली असते. जगातील सर्व देशांमध्ये माणसे सुखाची निवड करतात ती निसर्गनियमानुसार करत नाहीत, तर मतानुसार. त्यांची मते सुधारा म्हणजे त्यांची नीतिमत्ता आपोआप सुधारेल. रमणीय जे आहे किंवा जे आहे असे त्यांना वाटते, ते सर्व माणसांना आवडते; परंतु त्या वाटण्याच्या बाबतीतच त्यांची चूक होण्याची शक्यता आहे. शिष्टाचारांचा जो विचार करतो तो मानमान्यतेचाही विचार करतो आणि मानमान्यतेचा जो विचार करतो तो मतालाच मानदंड समजतो.

राष्ट्राची मते त्याच्या संविधानातून निर्माण होतात. कायदा शिष्टाचार ठरवत नाही, पण शिष्टाचारांचा उगम होतो तो कायद्यातून. कायदे दुबळे होतात तेव्हा शिष्टाचाराचाही

अध:पात होतो. आणि ते जेव्हा घडते तेव्हा कायदे जे करू शकले नाहीत ते निरीक्षकांना आपल्या विचारांनी घडवून आणता येत नाही.

यावरून निष्कर्ष निघतो तो हा की, शिष्टाचाराच्या संरक्षणाचे कार्य जरी निरीक्षणामुळे होत असले तरी निरीक्षण शिष्टाचार पुन्हा प्रस्थापित करू शकत नाही. कायदे जोरदार आहेत, तोवरच निरीक्षक नेमला पाहिजे. ती वेळ गेली की, निराशाच फक्त बाकी राहते. कायद्याचे सामर्थ्य नष्ट झाल्यानंतर कायद्यावर आधारलेली कोणतीही गोष्ट सत्ता चालवू शकत नाही.

मते भ्रष्ट होणार नाहीत अशी काळजी घेऊन निरीक्षण शिष्टाचार कायम ठेवते; तसेच ती योग्य मार्गावर राहावीत म्हणून हस्तक्षेप करून आणि कधी कधी वरचेवर बदलणाऱ्या आदर्शांना स्थैर्य देऊन ज्या द्वंद्वयुद्धातील सहाय्यकांच्या पद्धतीने फ्रान्समध्ये अतिरेकी स्वरूप धारण केले ती पद्धत राजाज्ञेच्या काही शब्दांनिशी नाहीशी करण्यात आली. राजाज्ञेमधे वापरण्यात आलेले शब्द हे : " सहाय्यक बोलावण्याइतका भ्याडपणा ज्यांच्या ठिकाणी आहे त्यांच्याबद्दल." या वर्णनामुळे ही पद्धत तावडतोब बंद पडली; काही दिवसांनंतर लोकमतानेही तोच निर्णय दिला. परंतु कोणत्याही तऱ्हेचे द्वंद्वयुद्ध तितकेच भ्याडपणाचे आहे, हे सर्वस्वी खरे आहे; परंतु सर्वसाधारण लोकमताच्या ते विरुद्ध आहे, असे आदेश निघाले त्यावेळी लोक नुसते हसले; कारण त्या विषयावरील त्यांचे मत अगोदरच बनलेले होते.

दुसरीकडे[1] मी असे म्हटले आहे की ज्या अर्थी लोकमतावर निर्बंध घालता येत नाही, त्या अर्थी त्या मताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी म्हणून व्यासपीठ स्थापन झाले तिथे निर्बंधाची सावली देखील पडू नये. ही निर्बंधयंत्रणा आधुनिक काळात उपयोगात आणली जात नाही; पण रोमन लोकांनी तिचा उपयोग करण्यात जे कौशल्य दाखविले आणि त्याच्याहीपेक्षा जास्त लॅसिडिमोनिअन्सनी (Lacedaemonians) तिचा जो अत्यंत कौशल्यपूर्ण उपयोग केला त्याबद्दल त्या दोघांचेही कौतुक करावे तेवढे थोडे होईल.

स्पार्टाच्या समितीत एका वाईट लौकिकाच्या माणसाने एक चांगली सूचना केली, तिच्याकडे एफर्सनी दुर्लक्ष केले, पण एका सद्गुणी माणसाला तीच सूचना पुढे मांडायला त्यांनी सांगितले. केवढा हा एकाचा मान आणि दुसऱ्याचा अपमान! आणि ते सर्व दोघांना उद्देशून स्तुतीचा किंवा निंदेचा एक शब्दही न बोलता! सॅमोसमधील[2] (Samos) काही दारुड्यांनी एकदा एफर्स व्यासपीठावर घाण केली. दुसऱ्याच दिवशी एक जाहीर

---

१. माझ्या Letter to M. L. Alembert या निबंधात मी जे विस्ताराने लिहिले आहे, त्याचा मी या प्रकरणात फक्त उल्लेख करत आहे.

२. खरे पाहता ते दुसऱ्या बेटावरचे होते; भाषेच्या सौंदर्याला गालबोट लागू नये म्हणून त्या बेटाचे नाव मी देत नाही.

हुकूम काढून सॅमिअन लोकाना गलिच्छ रीतीने राहण्याची परवानगी देण्यात आली. ही जी परवानगी देण्यात आली त्याच्यापेक्षा अधिक कडक शिक्षा देता आली नसती. स्पार्टाने एकदा एखादी गोष्ट शिष्टसंमत अगर अशिष्टसंमत ठरविली की, त्या निकालाविरुद्ध ग्रीसमध्ये इतर कुठेही आवाज उठत नसे.

## प्रकरण ८

# नागरी धर्माबद्दल

माणसांचे राजे म्हणजे देवता होत्या असा एक काळ होता. दैवतनिष्ठ राज्य हाच एक शासनाचा प्रकार त्याना माहीत होता. कॅलिगुलाची ( Caligula ) विचारपद्धती त्यानी स्वीकारली होती आणि त्या काळात ती योग्य होती. भावना आणि विचार यांची दीर्घ काळपर्यंत अवनती झाल्यानंतरच माणसे सर्व बाबतीत स्वतःसारखेच असलेल्यांचे प्रभुत्व मानायला तयार होतात आणि मग त्यांना त्या गोष्टीचा अभिमानही वाटायला लागतो.

प्रत्येक वेगळ्या राजकीय समाजासाठी वेगळा देव असल्यामुळे जितके लोकसमुदाय तितके देव हे क्रमाने आलेच. एकमेकाविषयी माहिती नसलेल्या आणि बहुतेक वेळा एकमेकाशी भांडण असलेल्या दोन समाजाना एकाच धन्याचे स्वामित्व फार काळ मानणे शक्य नव्हते. लढाईमध्ये एकमेकासमोर उभे ठाकलेल्या दोन सैन्याना एकाच सेनापतीचे हुकूम मानणे शक्य नसते. राष्ट्रीय भेदामुळे अनेक देवांची पद्धत ( polytheism ) निघाली आणि त्यातूनच पुढे आधिदैविक ( theological ) आणि नागरी असहिष्णुता निर्माण झाली; पुढे स्पष्ट केले आहे त्याप्रमाणे या दोन्ही गोष्टी स्वभावतः एकच आहेत.

असंस्कृत लोकांच्या देशामध्ये आपले देव शोधण्याची ग्रीक लोकाना जी कल्पना सुचली तिचे कारण हे की त्या देशावर आपले निसर्गतःच प्रभुत्व आहे असे त्याना वाटत होते. वेगवेगळ्या लोकांचे देव एकसारखे होते असे सांगणारे पांडित्य मूर्खपणाचे आहे असे आपण आता शिकलो आहो. जणू मोलक, सॅटर्न आणि क्रोनो हे देव सारखेच होते; जणू फिनिशिअन लोकांचा बाल, ग्रीक लोकांचा झ्युस आणि लॅटिन लोकांचा ज्युपिटर हे देव एकसारखेच होते. जणू वेगवेगळ्या नावाच्या काल्पनिक व्यक्तींमध्ये समान गुणधर्म शोधून काढणे शक्य होते.

प्रत्येक राज्याचा वेगळा देव आणि वेगळी उपासनेची पद्धत आहे अशा ख्रिस्त-पूर्व जगात धर्मावरून युद्धे कशी झाली नाहीत, या प्रश्नाला मी उत्तर देईन ते असे की, प्रत्येक राज्याचे धार्मिक आचार आणि शासनाची पद्धत स्वतःपुरती वेगळी असल्याकार-णाने देव आणि कायदे यामध्ये तिथे भेद केला जात नसे. राजकीय आणि दैवतविषयक युद्धे एकच असत. देवांच्या सार्वभौमत्वाची मर्यादा देशाच्या सीमेपलीकडे जात नसे.

एका देशाच्या देवाचा दुसऱ्या देशावर अधिकार चालत नसे. देव मत्सरी देव नव्हते; जगाचे साम्राज्य त्यांनी आपसात वाटून घेतले होते. मोझेस ( Moses ) आणि ज्यू जमातीचे लोक यांना देखील हा विचार मधून मधून पटत असे. इस्राएलचा परमेश्वर याच्याबद्दल ते याच दृष्टीने बोलत असत. कॅननाइटस ( cananites ) च्या देवाचे काही महत्त्व नाही असा त्यांचा समज होता, कारण ती एक बहिष्कृत जमात होती; तिचा नाश होणार होता; आणि तिची जागा ते घेणार होते. परंतु ज्यांच्यावर हल्ला करण्याची त्यांना बंदी होती, त्या शेजारच्या राष्ट्रांच्या देवतांबद्दल ते काय म्हणत असत ते लक्षात घेण्यासारखे आहे. जेप्ता ( Jeptha ), ॲमनाइटस ( Ammonites ) ना म्हणाला, " तुमचा देव कामस ( Chamos ) याच्या मालकीचे जे आहे ते कायद्या-प्रमाणे तुम्हाला घेण्याचा अधिकार नाही का ? आमच्या परमेश्वराने जो प्रदेश जिंकला त्याचा आम्ही त्या न्यायाने ताबा घेतला आहे."[1] यावरून मला असे वाटते की कामसचा व इस्राएलच्या परमेश्वराचा दोघांचाही हक्क सारखाच न्याय्य आहे, असे मानले जात होते.

परंतु बाबिलोनच्या राजांचे आणि नंतर सीरियाच्या राजांचे स्वामित्व मान्य केल्यानंतर जेव्हा स्वतःच्या देवाखेरीज इतर देव मान्य न करण्याचा हट्ट ज्यू लोकांनी धरला, त्या वेळी मात्र ते विजेत्याविरुद्ध बंड आहे, असे समजण्यात आले आणि त्यामुळे त्यांच्या इतिहासात आपण वाचतो तसा त्यांचा छळ झाला. अशा तऱ्हेच्या छळाचे ख्रिश्चन धर्माच्या उदयापूर्वी दुसरे उदाहरण आढळत नाही.[2]

राज्य जो धर्म मानत असेल तो धर्म त्या राज्याच्या कायद्याचा मूलभूत भाग असल्याकारणाने एखाद्या जनसमूहाला धर्मपरिवर्तन करायला लावायचे म्हणजे लढाईमध्ये त्याचा पाडाव करायचा. विजयी वीर हेच त्या काळातील धर्मप्रचारक. त्यांच्याखेरीज दुसऱ्या कुणाला ते काम करणे शक्य नव्हते. लढाईमध्ये पाडाव झाल्यानंतर धर्म बदलणे पराजिताना

---

१. येथेप्रमाणे व्हलगेट ( Vulgate ) चे विधान आहे. पेर द कॅरिए ( Pere de Carriers ) ने त्याचे पुढीलप्रमाणे भाषांतर केले आहे, "तुमचा देव कामस (Chamos) याच्या मालकीचे जे आहे त्याचा ताबा घेण्याचा तुम्हाला हक्क आहे असे तुम्हाला वाटत नाही का ?" हिब्रूतील या वचनाचा पुरा अर्थ मला माहीत नाही. पण मला असे दिसते की, व्हलगेट-मध्ये जेप्ताने कामस देवाचा हक्क स्पष्टपणे मान्य केलेला आहे. फ्रेंच भाषांतरकाराने लॅटिनमध्ये नसलेले "तुम्हा वाटत नाही का ?" हे शब्द घालून त्या मान्यतेचा जोर थोडा कमी केला आहे.

२. पवित्र लढाई या नावाने परिचित असलेली फोसिअन्स यांची लढाई धार्मिक युद्ध मुळीच नव्हते हे दाखविणारा खूप सबळ पुरावा आहे. काही धर्मविरोधी कृत्यांबद्दल शासन करणे हा त्या युद्धाचा उद्देश होता; पाखंडी लोकाना दडपून टाकणे हा त्याचा उद्देश नव्हता.

भाग पडत होते; त्यामुळे विजय मिळाल्याखेरीज त्याबद्दल बोलण्यात अर्थ नसे. माणसांनी देवतांच्यासाठी लढण्याऐवजी देवता होमरने वर्णन केल्याप्रमाणे माणसासाठी लढत असत. आपल्या अधिष्ठात्री देवतेने आपल्याला विजय द्यावा अशी प्रत्येक बाजूची इच्छा असे आणि त्याच्या बदल्यात ते तिची मंदिरे बांधत असत. वेढा घातलेल्या शहरावर चाल करण्यापूर्वी रोमन लोक तेथील देवताना शहर सोडून जाण्याची विनंती करत. तारेनतम ( Tarentum ) च्या लोकाना त्यांची रुष्ट देवता ठेवण्याची रोमन लोकानी परवानगी दिली ती आपल्या देवतानी त्या देवतांचा पराभव करून त्याना स्वतःची पूजा करायला लावले आहे या कल्पनेने. पराजिताना त्यांच्या कायद्याबरोबर रोमन लोकानी त्यांच्या देवता दिल्या. ज्युपिटर कॅपिटोलिनस या आपल्या देवाला राजमुकुट वहावा एवढीच खंडणी ते पुष्कळ वेळा वसूल करत असत.

पुढच्या काळात रोमन लोकानी आपले देव आणि धार्मिक उपचार आपल्या दूर-दूरच्या प्रदेशात नेले; आणि कधीमधी जिंकलेल्या लोकांचे देव आपलेसे करून त्यानी त्या परक्या देवाना नागरिकत्वाचे हक्क दिले; त्याचा परिणाम असा झाला की त्यांच्या विस्तीर्ण साम्राज्यातील अनेकविध लोकांचे त्याना न कळत बहुविध देव झाले आणि ते कमी-अधिक प्रमाणात सगळीकडे एकसारखे होते. जगातील बहुदेवता मानण्याच्या प्रवृत्तीला जो एकसारखेपणा आला आणि ती सगळीकडे एकाच तऱ्हेची दिसू लागली ती या कारणामुळे.

या असल्या परिस्थितीमध्ये जीझसने पृथ्वीतलावर दैवी शक्तीचे राज्य स्थापन केले. त्यामुळे आधिदैविक व्यवस्था आणि राजकीय व्यवस्था यांच्यामध्ये भेद निर्माण झाले; आणि राज्याचे एकच एक व अविभाज्य स्वरूप राहिले नाही; आणि ख्रिश्चन लोकाना सदोदित तंग करणारी अंतर्गत भांडणे निर्माण झाली. वेगळ्या जगातील राज्याची ही कल्पना देवांचे अनेकत्व मानणाऱ्या (pagons) जुन्या संस्कृतीच्या लोकांच्या मनात कधीही उद्भवली नव्हती. म्हणून ख्रिश्चनेतराना ख्रिश्चन लोक बंडखोर आहेत असेच नेहमी वाटायचे; त्यांना असे वाटायचे की नम्रतेचा खोटा बुरखा पांघरून ख्रिश्चन लोक स्वतःला स्वतंत्र आणि प्रभावी बनवण्याची संधी शोधत आहेत, आणि धूर्तपणाचा उपयोग करून कमजोर असताना ज्या सत्तेला मान देण्याचे ते सोंग करत असत ती सत्ता हस्तगत करण्याचे त्याचे प्रयत्न चालू आहेत.

ख्रिश्चन लोकांचा छळ झाला तो या कारणामुळे. ख्रिश्चनेतरांना जे घडेल अशी धास्ती वाटत होती ते घडले. सर्वच परिस्थिती पालटली. नम्र ख्रिश्चन आता वेगळ्या तऱ्हेने बोलू लागले; वेगळ्या जगातील म्हणून ज्या राज्याचा नेहमी पुकारा होत असे, ते या जगातील राज्य ठरले; हाडामासाचा एक मनुष्य त्यांचा पुढारी होता आणि अत्यंत हिंसाचारी अशी ती एक जुलूमशाही होती.

पण राज्यप्रमुख आणि दिवाणी कायदे हे दोन्ही नेहमी असतातच, त्यामुळे या दोन सत्तास्थानांमध्ये कायमचा संघर्ष निर्माण झाला, कारण त्यांची अधिकार-क्षेत्रे परस्पर-विरोधी स्वरूपाची होती. ख्रिश्चन धर्म मानणाऱ्या राज्यांमध्ये जीवनाची व्यवस्थित घडण

अशक्य झाली आहे; तसेच राजा आणि पाद्री यांपैकी कुणाची आज्ञा अखेर मानायची ते देखील अद्याप निश्चितपणे ठरलेले नाही.

युरपमधील व जवळच्या प्रदेशातील अनेक लोकसमुदायांनी पुरातन व्यवस्था कायम रहावी किंवा पुन्हा प्रस्थापित व्हावी म्हणून प्रयत्न केले. पण ते यशस्वी झाले नाहीत. ख्रिश्चन धर्माची भावना सगळीकडे विजयी ठरली. पवित्र धर्म सार्वभौमापासून वेगळा स्वतंत्र राहिला अगर पुन्हा परत तसा बनला, आणि राज्यसंस्थेशी त्याला जोडणारा खरा बंधही निर्माण झाला नाही. महमदाने अत्यंत शहाणपणाने आपल्या राजकीय व्यवस्थेचे मजबूत एकत्रीकरण केले आणि त्याने प्रस्थापित केलेली शासनाची पद्धत जोवर त्याचे वारस जे खलीफ, त्यांच्या अमदानीत चालू होती, तोवर ती पूर्णपणे एकसूत्र होती व एकसूत्र होती म्हणूनच चांगली होती. परंतु अरब श्रीमंत, शिक्षित, सभ्य, सुखासीन आणि भ्याड बनल्याबरोबर रानटी लोकांनी त्यांचा पाडाव केला. मग दोन सत्तांमधील विभागणी पुन्हा परत सुरू झाली. ख्रिश्चन लोकांमध्ये आहे त्यापेक्षा मुसलमान लोकांमध्ये ती वरकरणी कमी दृष्टीस पडत असेल, परंतु ती आहे आणि विशेषेकरून अलीसारख्या संप्रदायामध्ये आणि पर्शियासारख्या काही राज्यांत ती आपले अस्तित्व गाजविल्यावाचून कधीही राहिली नाही.

आपल्यामध्ये इंग्लंडचे राजे आपण धर्मपीठाचेही प्रमुख आहोत असे मानतात; रशियाच्या झारांचीही तीच भूमिका आहे. पण पदवीचा अंगीकार करून ते धर्मपीठाचे मालक बनण्याऐवजी त्याचे सेवक बनले आहेत. धर्मपीठाचे स्वरूप बदलण्याचा अधिकार प्राप्त होण्याऐवजी ते अस्तित्वात ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या शिरावर पडली आहे. ते कायदे करणारे नसून फक्त अधिकारी असतात. उपाध्यायवर्गाची जिथे संघटित संस्था असते, तिथे त्या वर्गाच्या अधिकारक्षेत्रात तो वर्गच स्वामी म्हणून नांदतो आणि कायदे करतो.[१] म्हणजेच इंग्लंडमध्ये आणि रशियामध्ये इतर ठिकाणांप्रमाणेच दोन सत्ता असतात आणि दोन सार्वभौम असतात.

ख्रिस्ती ग्रंथकारांमध्ये हॉब्स हा तत्त्वज्ञानीच फक्त हा दोष व त्याच्यावरील उपाय

---

१. उपाध्याय एकत्र येऊन त्यांची संघटित संस्था बनते, ती औपचारिक स्वरूपाच्या मेळाव्यामुळे बनत नाही; ती बनते ती प्रार्थनामंदिराच्या सहसंवेदनेमुळे. सहसंवेदना आणि धर्मनिष्कृती हा उपाध्यायांचा सामाजिक करार आहे; ती सत्ता हाती असल्यामुळे ते राजावर व लोकांवरही कायमचे स्वामित्व गाजवू शकतात. धर्मपीठाशी ज्यांचा सहसंवाद आहे, ते उपाध्याय जगाच्या कोठच्याही कोपऱ्यातील असले तरी त्यांचे एकमेकांशी समान नागरिकत्वाचे नाते असते. ही समान नागरिकत्वाची कल्पना हा एक मोठा राजकीय विजय आहे. ख्रिश्चनेतरांच्या उपाध्यायवर्गात अशा तऱ्हेचे कोणतेही नाते नव्हते. त्यांच्यामध्ये उपाध्यायांची संघटित संस्थाच मुळी नव्हती.

स्पष्टपणे पाहू शकला. त्यानेच एकट्याने हे सुचवण्याचे धाडस केले आहे की, गरुडाची दोन्ही डोकी एकत्र आणावी आणि एका राजकीय समष्टीत सर्वांचा समावेश व्हावा. तसे केल्याखेरीज कोणतेही राज्य व कोणतेही शासन कधीही सुप्रतिष्ठित होणार नाही, असे देखील त्याचे म्हणणे होते. परंतु खिश्चन धर्मांची उद्धट वृत्ती त्याने सुचविलेल्या योजनेशी सुसंगत नाही व राज्याच्या हितसंबंधापेक्षा उपाध्यायांचे हितसंबंध नेहमीच अधिक प्रबळ ठरतील हे त्याच्या ध्यानात यावयास हवे होते. त्याचे राजकीय सिद्धांत इतके तिरस्करणीय वाटतात त्याचे कारण त्याच्यातील भीतिदायक व खोटा भाग नसून त्याच्यातील खरा भाग आहे.[1]

या दृष्टिकोनातून इतिहासातील वस्तुस्थितीकडे पाहता कुणालाही बेल (Bayle) आणि वारबर्टन ( Warburton ) यांचे जे विरोधी स्वरूपाचे विचार आहेत, त्यांचे खंडन करता येईल याविषयी मला शंका नाही. त्या दोघांपैकी एकाचे म्हणणे आहे की राजकीय समाजाला धर्म कधीही उपकारक ठरत नाही, तर त्याच्या उलट दुसरा म्हणतो की खिश्चन धर्म हा राजकीय समाजाचा मोठा आधार आहे. धर्माच्या आधाराखेरीज आजवर कोणतेही राज्य प्रस्थापित झालेले नाही, हे पहिल्याला सहज रीतीने सिद्ध करून दाखवता येईल व समाजाच्या स्थापनेला खिश्चन कायदा मूलतः उपकारक ठरण्याऐवजी अपकारकच ठरतो हे दुसऱ्याला दाखवता येईल. माझा अर्थ स्पष्ट ठरण्यासाठी माझ्या विषयाच्या संदर्भात धर्माची जी फार ढोबळ कल्पना आहे, तिला थोडा अधिक काटेकोर आकार देणेच फक्त जरूरीचे आहे.

समाजाच्या दृष्टीने ( दोघांमधील संबंध सर्वसाधारण असतो किंवा विशिष्ट असतो ) धर्मांचा विचार केला तर त्याचे दोन भाग पाडता येतील; एक मानव म्हणून मानवाचा धर्म आणि दुसरा नागरिकाचा धर्म. पहिल्या धर्माला देवळे, पूजास्थाने व उपचार लागत नाहीत; सर्वश्रेष्ठ देवाची आंतरिक उपासना व नीतीच्या चिरंतन मूल्यांची नोपासना एवढ्या-पुरताच तो मर्यादित असतो; तो विशुद्ध आणि सरळ धर्म बायबलमध्ये ( Gospels ) सांगितलेला आहे. तो अत्यंत सत्य स्वरूपातील देववाद ( Theism ) आहे; नैसर्गिक असा तो परमेश्वरी कायदा आहे असेही त्याचे वर्णन करता येईल. दुसरा एकाच देशा-पुरता मर्यादित असतो; तो त्या देशाला त्याचा खास रक्षणकर्ता असा संरक्षक ( Tutelary ) देव देतो. त्या धर्माचे सिद्धांत, त्याचे उपचार, त्याची उपासनापद्धत, सर्व कायद्यानुसार ठरते. तो धर्म स्वीकारणाऱ्या देशाच्या सीमेबाहेरील सर्व वस्तू पाखंडी,

१. इतर गोष्टींबरोबरच ता. ११ एप्रिल १६४३ च्या भावाला लिहिलेल्या पत्रात ग्रोशिअसने ( Grotius ) जे लिहिले आहे ते वाचा. त्यावरून द सिव्ह ( De Cive ) या ग्रंथातील कोणता भाग त्या विद्वान् माणसाला आवडतो आणि कोणता दोषार्ह वाटतो ते स्पष्ट होते. दोषाकडे दुर्लक्ष करण्याची त्यांची प्रवृत्ती आहे हे खरे; लेखकाच्या अव-गुणांचा विचार करून तो त्याच्या गुणाबद्दल त्याला क्षमा करतो, परंतु ते अशी दया दाखव-णार नाहीत.

परक्या व रानटी आहेत असे समजले जाते. त्या धर्मांची पूजास्थाने सार्वभौम आहेत असे मानले जाते. त्या प्रदेशापुरतीच तो धर्म माणसांचे हक्क व कर्तव्ये मर्यादित करतो. प्राथमिक अवस्थेतील लोकसमुदायांचे धर्म होते ते या स्वरूपाचे; त्या धर्मांना आपण दैवी कायदा, नागरी वा अस्तिपक्षी, असे नाव देऊ शकतो.

अतिशय वेगळा असा एक तिसऱ्या तऱ्हेचा धर्म आहे. तो माणसांना दोन कायद्यांच्या संहिता देतो, दोन प्रमुख देतो, दोन देश देतो व त्यांच्यावर दोन परस्परविरोधी कर्तव्यांच्या प्रणाली लादतो आणि त्यामुळे त्यांना धर्मनिष्ठ व्यक्ती आणि चांगला नागरिक एकाच वेळी बनणे अशक्य होते. लामांचा धर्म हा असा आहे, जपानी लोकांचा धर्मही तसाच आहे, आणि रोमन तऱ्हेचा ख्रिस्ती धर्मही तसाच आहे. या तऱ्हेच्या धर्माला उपाध्यायावलंबी ( priestly ) धर्म असे म्हणता येईल; त्या धर्मांपासून मिश्र व समाजहितनिरपेक्ष असा कायदा निष्पन्न होतो. त्या कायद्याला नाव नाही.

राजकीय दृष्टीने विचार करता या तिन्ही तऱ्हेच्या धर्मांत दोष आहेत. तिसरा इतका उघड उघड वाईट आहे की, त्याचा वाईटपणा प्रस्थापित करणे जरी मनोरंजक होण्यासारखे असले तरी ते वेळ वाया दवडण्यासारखे होईल. एकीचा सामाजिक बंध तोडणाऱ्या कोणत्याही गोष्टीला किंमत नसते; माणसाला स्वतःविरुद्ध उभ्या करणाऱ्या संस्थांनाही मोल नसते.

दुसरा धर्म चांगला आहे, कारण तो देवाच्या उपासनेची कायद्यावरील प्रेमाशी जोड घालतो. देश हे नागरिकांचे पूजास्थान बनवून राज्याची सेवा करणे म्हणजे त्यांच्या अधिष्ठात्री देवतेची सेवा करण्यासारखे आहे अशी तो त्यांना शिकवण देतो. धर्मनिष्ठा (Theocracy) राज्याचाच तो एक प्रकार आहे. परंतु तिथे राज्यप्रमुखाखेरीज दुसरा धर्मगुरू ( pontiff) नसतो व दंडाधिकाऱ्याखेरीज दुसरे उपाध्याय नसतात. स्वतःच्या देशासाठी मरणे हे त्या ठिकाणी धर्मासाठी मरण पतकरण्यासारखे होते; कायदे मोडणे म्हणजे पाप केल्यासारखे होते; आणि वाईट गोष्ट करणाराची अब्रू वेशीवर टांगणे म्हणजे देवाचा राग त्याच्यावर ओढवेल अशी योजना आखण्यासारखे होते.

परंतु तो धर्म वाईट देखील आहे; कारण तो चुकीच्या समजुती, खोट्या गोष्टी यांच्यावर आधारलेला आहे. तो माणसांना फसवतो, त्यांच्या ठिकाणी अंधविश्वास आणि भोळसटपणा निर्माण करतो, व अर्थशून्य उपचारांच्या जंजाळात देवाची खरी उपासना दडपतो. तो सर्वसंग्राहक बनण्याऐवजी काही लोकांपुरताच मर्यादित राहतो व जुलमी बनतो म्हणून देखील तो वाईट आहे. तो लोकाना रक्तपिपासू, असहिष्णू बनवतो; त्याच्यामुळे लोक नेहमी खून व कत्तल यांचाच विचार करतात आणि आपला देव जे मानत नाहीत, त्यांना ठार मारले म्हणजे आपण एखादे पवित्र कृत्य केले असे त्यांना वाटते. यामुळे शेजाऱ्यांशी त्यांचे नेहमी युद्धच चालू असते आणि युद्धाच्या परिस्थितीमुळे त्यांच्या सुरक्षिततेलाही नेहमी धोका पोचतो.

यानंतर उरतो तो म्हणजे मानवांचा धर्म किंवा ख्रिश्चन धर्म. ख्रिश्चन धर्म आज

आपल्याला दिसतो तसा नव्हे तर बायबलमध्ये वर्णन केले आहे तसा आणि तो अजीबात वेगळा आहे. त्या पवित्र, उदात्त व खऱ्या धर्मामुळे एकाच परमेश्वराची लेकरे म्हणून माणसे एकमेकांना भाऊ मानतात आणि त्यांना एकत्रित करणारा समाज मृत्यूने देखील तुटत नाही.

या धर्मांचा राजकीय समाजाशी निश्चित संबंध नसल्याकारणाने कायद्यांचे जे अंगभूत सामर्थ्य आहे तेवढेच कायम राहते; धर्म त्याच्यात भर घालत नाही. या कारणामुळे समाजव्यवस्थेतील एक महत्त्वाचा बंध पुरेसे कार्य करू शकत नाही. परंतु दुसराही मोठा एक दुष्परिणाम घडून येतो. राज्याबद्दल नागरिकांच्या मनात प्रेम उत्पन्न करण्याऐवजी सर्व आधिभौतिक गोष्टींच्या बरोबरीने तो राज्यापासूनही लोकांची मने परावृत्त करतो. समाजाच्या चिद्‌भावनेशी अधिक विरोधी असे दुसरे मला काहीही माहीत नाही.

खऱ्या ख्रिश्चनांचा मिळून कल्पनाही करता येणार नाही असा सर्वोत्कृष्ट समाज बनेल असे सांगण्यात येते. हे मान्य करण्याच्या मार्गांत मला एकच मोठी अडचण भासते. ती ही की खऱ्या ख्रिश्चनांचा समाज मानवांचा समाज उरणार नाही. याच्याही पुढे जाऊन मी असे म्हणेन की हा कल्पनेतील समाज, तो कितीही उत्कृष्ट असला तरी, तो समर्थ व चिरस्थायी होणार नाही. तो सर्वांगपरिपूर्ण आहे म्हणून त्याच्यामध्ये एकी नसेल. सर्वांगपरिपूर्णता हाच एक दोष बनेल व तो दोष त्याच्या नाशाला कारणीभूत होईल.

समाजाचा प्रत्येक सभासद आपले कर्तव्य करील; लोक कायद्यांचे पालन करतील; त्यांचे राज्यकर्ते न्यायी आणि संयमी असतील; त्यांचे दंडाधिकारी प्रामाणिक असतील आणि लाचलुचपतीला बळी पडणारे नसतील. सैनिकाना मृत्यूचे भय वाटणार नाही. समाजामध्ये गर्विष्ठपणा नसेल व ऐषआरामही नसेल. जमेच्या बाजूला या साऱ्या गोष्टी आपल्याला मांडता येतील. परंतु आपली नजर आपण जरा अधिक दूरवर फेकू या.

धर्म या नात्याने ख्रिश्चन धर्म पूर्णतया आध्यात्मिक स्वरूपाचा आहे. तो फक्त स्वर्गाचाच विचार करतो. ख्रिश्चन लोकांचा देश इहलोकातील नसतो. तो आपले कर्तव्य करतो हे खरे; पण आपल्या प्रयत्नाला यश येते की अपयश येते याबद्दल तो अत्यंत उदासीन असतो. स्वतःला दोष देता येईल असे काही घडले नसेल तर, इहलोकातील गोष्टी चांगल्या घडताहेत की वाईट घडताहेत याबद्दल त्याला पर्वा नसते. राज्याची भरभराट झाली तर सर्वांचे जे सुख असते त्याच्यातील आपला हिस्सा तो कधीही आनंदाने उपभोगत नाही; देशाचे वैभव वाढले तर आपण गर्विष्ठ बनू याची त्याला धास्ती वाटते. राज्याचा विनाश झाला तर आपल्या लोकांवर देवाने अधिक भार टाकला असे समजून तो परमेश्वरी कृतीबद्दल त्याला धन्यवाद देतो.

समाजामध्ये शांतता नांदावयाची व सलोखा व्हावयाचा तर सर्व चांगल्या नागरिकानी, अपवाद न करता, चांगले ख्रिश्चन बनण्याची फार आवश्यकता आहे. परंतु दुर्दैवाने त्यांच्यामध्ये एक महत्त्वाकांक्षी किंवा भोंदू मनुष्य निघाला, उदाहरणार्थ, एखादा कॅटिलिन ( Catiline ) किंवा क्रॉमवेल ( Cromwell ) निर्माण झाला तर आपल्या श्रद्धाळू

नागरिक बंधूंवर तो नक्कीच मात करू शकेल. खिश्चन माणसाच्या ठिकाणी जी दयाळू वृत्ती असते, तिच्यामुळे त्याला आपला शेजारी वाईट आहे असे कल्पिणे कठीण जाते. त्यांच्यापैकी एखादा जर काही डाव खेळून आणि इतरांच्यावर पगडा बसवून सार्वजनिक सत्ता बळकावू शकला तर त्याच्यावर मानसन्मानांचा वर्षाव होईल. त्याला मान द्यावा ही परमेश्वराची इच्छा आहे असा समज होईल. तो शक्तिशाली बनला तर समजतील की त्याचे हुकूम पाळले जावे अशी परमेश्वराची इच्छा आहे. सत्तेचा त्याने दुरुपयोग केला तर आपल्या मुलांना शिक्षा करण्यासाठी परमेश्वराने उपयोगात आणलेला तो आसूड आहे असे समजले जाते. बेकायदेशीरपणे सत्ता हस्तगत करणाऱ्या माणसाला हाकून लावतानाही ख्रिश्चन माणसाची सदसद्विवेक बुद्धी त्याला टोचत राहील. त्याच्या योगाने सार्वजनिक शांततेला धक्का पोचेल, हिंसाचार घडेल, रक्त सांडावे लागेल,—या सर्व गोष्टी खिश्चन माणसाच्या मृदुतेला शोभण्यासारख्या नाहीत. शिवाय दुःखांच्या या दरीमध्ये मनुष्य स्वतंत्र आहे की गुलाम आहे, या गोष्टीला काही महत्त्व आहे का? स्वर्ग गाठणे ही महत्त्वाची गोष्ट आणि परिस्थितीला शरण जाणे हा ते उद्दिष्ट गाठण्याचा आणखी एक मार्ग आहे. परक्यांशी युद्ध सुरू झाले तर नागरिक लढाईवर जायला मागे-पुढे पाहणार नाहीत. पळून जाण्याची कल्पना त्यांच्यापैकी कुणालाही स्वप्नात देखील सुचणार नाही. ते आपले कर्तव्य करतील, पण विजयाच्या दुर्दम्य इच्छेविना विजय कसा मिळवावा, यापेक्षा मरावे कसे ते त्यांना अधिक माहीत आहे. जिंकणे किंवा हरणे या गोष्टीला काही महत्त्व आहे का? आपला लाभ कशात आहे, हे आपल्यापेक्षा देवाला अधिक कळत नाही का? त्यांच्या या स्थितप्रज्ञतेचा ( Stoicism ) गर्विष्ठ, आवेगी व विकारवश शत्रू आपल्या फायद्यासाठी कसा उपयोग करून घेईल त्याची कल्पना करणे कठीण नाही. देशाबद्दलच्या व वैभवाबद्दलच्या उत्कट प्रेमाने ज्यांची मने भारलेली आहेत, अशा उदारमनस्क लोकसमुदायाशी त्यांची गाठ पडू द्या. स्पार्टा अगर रोमशी सामना द्यावा लागतो आहे अशा एखाद्या ख्रिश्चन लोकराज्याची कल्पना करा. काय होते आहे ते समजण्यापूर्वीच त्या धार्मिक ख्रिश्चन लोकांचा पराभव होईल, ते दडपले जातील आणि त्यांचा सर्वनाश होईल; ते यदाकदाचित् सुरक्षित राहिले तर ते शत्रूला त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या तिरस्कारामुळे. फेबिअस ( Fabius ) च्या सैनिकांनी केलेली प्रतिज्ञा, मला वाटते, चांगली होती. आम्ही जिंकू अगर मरू अशी ते प्रतिज्ञा करत नसत; त्यांची प्रतिज्ञा असे ती जिंकू आणि परत येऊ. आणि ते आपला शब्द खरा करीत. कुणाही ख्रिश्चन माणसाने तशी प्रतिज्ञा केली नसती. अशी प्रतिज्ञा करणे म्हणजे देवाला मोहात टाकण्यासारखे आहे असे त्याला वाटले असते. ख्रिश्चन लोकराज्य हा शब्दप्रयोग करण्यात माझी चुकी होते आहे; कारण ते शब्द एकत्र उच्चारणे शक्य नाही. ख्रिश्चन धर्म फक्त गुलामी व परावलंबन शिकवतो. त्याची वृत्ती जुलूमशाहीला अत्यंत अनुकूल आहे; आणि जुलूमशाही त्या गोष्टीचा नेहमीच फायदा घेते. खऱ्या ख्रिश्चनांची घडणच मुळी अशी आहे की, त्यांनी गुलाम म्हणून राहावे. त्यांना ते माहीत आहे,

पण त्यांना त्याची पर्वा नाही; कारण त्यांच्या दृष्टीने या घटीभराच्या जीवनाला काहीच महत्त्व नसते.

खिश्चन सैनिक उत्तम असतात असे सांगितले जाते. पण मला ते मान्य नाही. मला ते कुणीही दाखवावे, असे माझे आव्हान आहे. खिश्चन सैन्य यासारखी एखादी वस्तू आहे हे देखील मला माहीत नाही. क्रुसेडस ( crusades ) या धर्मयुद्धांचे उदाहरण माझ्याविरुद्ध मांडले जाईल. त्या धर्मयुद्धात ज्यांनी भाग घेतला त्यांचे शौर्य मला नाकारायचे नाही; परंतु मला दाखवायचे आहे ते हे की ते खिश्चन नव्हते, एका उपाध्यायाच्या नोकरीतील ते सैनिक होते; धर्मपीठाचे ते नागरिक होते. ज्या देशासाठी ते लढले तो आधिदैविक स्वरूपाचा होता; परंतु मला उलगडत नाही अशा मार्गाने धर्मपीठाने त्याला ऐहिक स्वरूप दिले होते. खरे बोलायचे तर, हे उदाहरण बहुदेवत्व पद्धतीतील ( paganism ) आहे. बायबलने कोणताही राष्ट्रीय धर्म प्रस्थापित केला नाही, म्हणून खिश्चन लोकांमध्ये धर्मयुद्ध ( Holy war ) होणेच मुळी अशक्य आहे.

अनेक देवांची पूजा करणाऱ्या सम्राटांच्या हाताखालील खिश्चन सैनिक शूर लढवय्ये होते. सर्व खिश्चन ग्रंथकारांनी ती गोष्ट नमूद केलेली आहे; आणि मी तिच्यावर विश्वास ठेवायला तयार आहे. मानापमानाच्या एका बाबीमध्ये खिश्चनेतर सैनिकांशी त्यांची चढाओढ चालू होती. सम्राट जेव्हा खिश्चन बनले तेव्हा ही चढाओढ संपली. क्रूसाने गरुडाला पळवून लावल्यानंतर रोमन लोकांच्या शौर्याचा लोप झाला.

सर्व राजकीय विचार आपण बाजूला ठेवू या आणि अधिकाराच्या (Right) विचाराकडे वळून या महत्त्वाच्या गोष्टीचे मूलभूत तत्त्व निश्चित करू या. सामाजिक करारामुळे सार्वभौमाला लोकांच्यावर जो अधिकार प्राप्त होतो तो, मी पूर्वी दाखविल्याप्रमाणे, सार्वजनिक उपयुक्ततेच्या क्षेत्रापलीकडे जात नाही.[१] समाजाचा ज्यांच्याशी संबंध नाही, अशा मतांचा सार्वभौमाला हिशेब देण्याचे प्रजाजनावर बंधन नसते हे देखील सांगणे जरूरीचे आहे. आता नागरिकाचा धर्म त्याला कर्तव्यावर प्रेम करायला शिकवितो की नाही हे राज्याला काळजीपूर्वक पाहावे लागते. त्या धर्मांच्या सिद्धांतांशी राज्याचा अगर त्याच्या

१. मार्किस द अर्गेनसॉ ( Marquis d' Argenson ) म्हणतो : ' लोकराज्यात दुसऱ्याला त्रास पोचत नाही अशा सर्व बाबतीत प्रत्येक मनुष्याला पुरे स्वातंत्र्य असते. ' हा बदलता येणार नाही असा निकष आहे आणि तो अधिक अचूक शब्दांत सांगता येणार नाही. या हस्तलिखितातून अनेक वेळा अवतरणे देण्याचा मोह मला टाळता आला नाही. हे लिखाण अद्याप लोकांसमोर आलेले नाही. लिखाणाच्या प्रतिभाशाली लेखकाचा बहुमान करण्याच्या इच्छेने मी अवतरणे दिली. लेखक असा आहे की सर्वांनी त्याला सदोदित मान द्यावा. मंत्री असतानाही नागरिकत्वाचा खरा आदर्श त्याने कधी सोडला नाही आणि आपल्या देशाच्या शासनाबद्दल सुबुद्ध आणि प्रामाणिक विचार जाहीर रीतीने व्यक्त करायलाही त्याने कधी कमी केले नाही.

अधिकाऱ्यांचा काहीही संबंध नसतो. तो धर्म पाळणारा नागरिक इतरांशी वागताना जे नीतिनियम पाळतो व कर्तव्ये बजावतो तेवढ्यापुरताच त्यांचा धर्माच्या सिद्धांताशी संबंध येतो. तो भाग सोडून दिला तर, प्रत्येकाला आवडतील ती मते स्वीकारण्याचा अधिकार आहे; आणि त्या मतांची दखल घेणे हे राज्याच्या कार्यक्षेत्रात पडत नाही. परलोकातील कारभाराबद्दल राज्याला काही बोलता येत नाही. त्यामुळे जोवर नागरिक इहलोकातील आपली कर्तव्ये पार पाडतो तोवर, परलोकातील जीवनात त्याचे काहीही होवो, राज्याचा त्याच्याशी संबंध नसतो.

परंतु केवळ नागरी स्वरूपाचा असा एक वेगळा धर्म असतो. या धर्माची सूत्रे सार्वभौमाने निश्चित केली पाहिजेत. धार्मिक सिद्धांताइतके त्यांचे स्वरूप स्पष्ट नसेल; सामाजिक कर्तव्यांची संहिता या दृष्टीनेच त्यांच्याकडे पाहावयास हवे; परंतु अशी एखादी संहिता असल्याखेरीज कुणालाही चांगला नागरिक किंवा निष्ठावंत प्रजाजन बनता येणार नाही.[1] त्या संहितेवर विश्वास ठेवला पाहिजे अशी सार्वभौमाला कुणावरही सक्ती करता येत नाही, हे जरी खरे असले, तरी ज्याना ती मान्य नसेल त्याना त्याला राज्याबाहेर घालवून देता येते. हे घालवून देणे अधार्मिक म्हणून घडणार नाही तर सामाजिक जाणीव नाही म्हणून म्हणा किंवा कायदे व न्याय यावर खरे प्रेम नाही म्हणून, किंवा जरूर पडली तर, कर्तव्यासाठी स्वतःच्या प्राणांचा बळी देण्याची तयारी नाही म्हणून म्हणा. ही संहिता मान्य केल्यानंतर जो मनुष्य ती आपल्याला मान्य नाही अशा पद्धतीने वागायला लागेल, तो खरोखरच देहदंडाच्या शिक्षेला पात्र ठरेल. कारण त्याने कायद्यासमक्ष खोटे बोलण्याचा मोठ्यातला मोठा गुन्हा केलेला असतो.

या नागरी धर्माचे सिद्धांत मोजके असावेत, पण ते स्पष्ट आणि काटेकोर स्वरूपात सांगितलेले असावेत आणि स्पष्टीकरणाची अगर टीकेची आवश्यकता नसावी. अस्तिपक्षी कलमे पुढीलप्रमाणे असावीत: समर्थ, बुद्धिमान्, दयाळू व उदार परमेश्वराचे अस्तित्व, आगामी जीवनाची सत्यता, सद्वर्तनाबद्दल बक्षीस आणि दुर्वर्तनाबद्दल शिक्षा, सामाजिक करार आणि कायदे यांचे पावित्र्य. नास्तिपक्षी कलम फक्त एक असावे, असे मी म्हणेन: असहिष्णुता, कारण मी जे पंथ वगळले आहेत, त्यांचा तो गुणधर्म आहे.

नागरिकी व धार्मिक असहिष्णुतेत जे फरक करतात त्यांची माझ्या मते चूक होत

१. कॅटिलिनच्या समर्थनार्थ बोलताना सीझरने आत्मा नाशवंत असतो, हा सिद्धांत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्याचे खंडन करताना कॅटो आणि सिसरो तात्त्विक प्रश्नांच्या मनाला सुख देणाऱ्या जटिल चर्चेत गुंतून पडले नाहीत; त्यांनी एवढेच सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, राज्याला विघातक असा सिद्धांत मांडून सीझरने केलेला युक्तिवाद चांगल्या नागरिकाला शोभण्यासारखा नाही. रोमच्या वरिष्ठ लोकसभेस निर्णय करावा लागला तो या प्रश्नाचा, धर्मशास्त्रातील सिद्धांतांच्या एखाद्या मुद्याचा नव्हे.

असते. दोन्ही असहिष्णुता अविभक्त आहेत. जी मंडळी नरकात जाणार असा आपला विश्वास असतो, त्यांच्याबरोबर गुण्यागोविंदाने नांदणे अशक्य असते. त्यांच्यावर प्रेम करणे म्हणजे जो देव त्यांना शिक्षा देणार असतो त्या देवाबद्दल वैरभाव बाळगण्यासारखे आहे. परिवर्तन करणे अगर त्यांना शिक्षा देणे जरूरीचे होते. धार्मिक असहिष्णुता आली की तिचा नागरी जीवनावर परिणाम होतोच.[1] आणि तो परिणाम घडला की त्यापुढे सार्वभौम ऐहिक गोष्टीमध्ये देखील सार्वभौम उरत नाही. त्यावेळेपासून उपाध्याय खरे मालक बनतात व राजे केवळ त्यांचे अधिकारी बनतात.

केवळ राष्ट्रीय स्वरूपाचा असा धर्म आता नसल्यामुळे व असणे शक्य नसल्यामुळे आपण दुसऱ्या धर्मपंथाबद्दल सहिष्णुता दाखवणाऱ्या सर्व धर्मपंथांशी सहिष्णुतेने वागावे; अट एकच व ती ही की, त्यांच्या सिद्धांतामध्ये नागरिकाच्या कर्तव्याला बाधक होईल असे काही नसावे. परंतु धर्मपीठाखेरीज मुक्ती नाही असे म्हणण्याचे धाडस करणाराला मात्र देशाबाहेर हाकलून द्यावे. याला अपवाद एकच आणि तो म्हणजे जेव्हा राज्यच धर्मपीठ असते आणि राज्यप्रमुख धर्मगुरू असतो. हा सिद्धांत उपयुक्त ठरतो तो शासन धर्माधिष्ठित

१. लग्न हा एक नागरी स्वरूपाचा करार असल्यामुळे त्याचे नागरी स्वरूपाचे परिणाम घडून येतात. त्या परिणामाखेरीज समाजाला जगणे देखील अशक्य होईल. लग्न लावण्याचा अधिकार आपल्यालाच असावा, हे उपाध्यायांचे म्हणणे मान्य झाले–आणि असहिष्णू धर्माचे सेवक म्हणून ते तो आग्रह धरणारच–तर या बाबतीत धर्मनिष्ठाची सत्ता प्रस्थापित झाली की राज्यप्रमुखाची सत्ता संपुष्टात येते आणि मग उपाध्याय जे देतील त्यांनाच प्रजाजन म्हणून स्वीकारण्याची पाळी राजप्रमुखावर येईल हे उघड नाही का ? लग्नेच्छू मंडळी एखादा सिद्धांत मानतात की नाही, एखाद्या विधीचा कायदेशीरपणा ते मानतात की नाकारतात, किंवा ते कमी अगर अधिक धर्मनिष्ठ आहेत, हे पाहून त्यांच्या लग्नाला परवानगी द्यावयाची की नाकारावयाची हे ठरविण्याचा अधिकार धर्मपीठाला लाभल आणि त्याने थोडे धोरणीपणाचे वर्तन केले व आपली बाजू सोडली नाही तर धर्मपीठाला वारसा हक्क, अधिकाराच्या जागा, नागरिक व प्रत्यक्ष राज्य यांचे नियंत्रण करण्याची एकमेव सत्ता लाभेल. केवळ अनौरस संततीने भरलेले आहे, असे राज्य कधी टिकू शकत नाही. पण मला असे सांगण्यात येईल की, माणसे अधिकाराच्या दुरुपयोगाविरुद्ध दाद मागतील, निर्णय पुढे ढकलतील, हुकूम काढतील व ऐहिक सत्तेचा कबजा घेतील. किती दुःखाची ही गोष्ट होईल ! उपाध्यायांच्या ठिकाणी–मी धैर्य म्हणणार नाही–सुबुद्धपणा कितीही कमी असला तरी ते असल्या सर्व चळवळीपासून अलिप्त राहतील आणि शांतपणे आपले कार्य करत राहतील. निर्लेपपणे ते सर्व दाव्याना आणि स्थगितींना, सर्व हुकुमांना आणि जप्तीना मान्यता देतील; पण शेवटी प्रभुत्व राहील ते त्यांचेच राहील. पुऱ्या गोष्टीचा ताबा मिळेल अशी खात्री असल्यानंतर काही वेळ एखादा भाग सोडून देणे म्हणजे मोठा स्वार्थत्याग करण्यासारखे आहे असे मला वाटत नाही.

असेल तेव्हा. इतरत्र तो अनर्थावह ठरतो. लोकांमध्ये प्रचलित असलेल्या गोष्टींप्रमाणे एका विवक्षित कारणासाठी चवथ्या हेन्रीने रोमच्या धर्माचा स्वीकार केला; परंतु ते कारण असे आहे की, त्यामुळेच कुणाही प्रामाणिक माणसाला तो धर्म सोडणे भाग पडेल. स्वतःची बुद्धी वापरू शकणाऱ्या राज्यप्रमुखाचीही तीच गत होईल.[1]

## प्रकरण ९

# निष्कर्ष

राजकीय हक्काची खरी तत्त्वे मी येणेप्राणे मांडली आहेत आणि राज्याची चिरस्थायी पायावर प्रस्थापना करण्याचा प्रयत्न केला आहे. इतर राज्यांशी त्याचे जे संबंध येतात त्या बाबतीत ते शक्तिशाली कसे बनेल ते मला आता पाहिले पाहिजे. त्या विषयात आंतर-राष्ट्रीय कायदा, व्यापार, युद्धजन्य आणि विजयजन्य हक्क, सार्वजनिक हक्क, राष्ट्रसंघ, वाटाघाटी व तह यासारख्या अनेक गोष्टी येतील. पण हा एक वेगळाच प्रांत आहे आणि माझ्या मर्यादित दृष्टीने तो फारच विस्तीर्ण आहे. जवळ असलेल्या गोष्टीकडेच मी लक्ष पुरवावे हे अधिक इष्ट.

* * *

---

१. एका इतिहासकाराने असं लिहिले आहे की, राजाने आपल्या समक्षतेत दोन्ही धर्मपीठांच्या विद्वानांची एक परिषद भरवली होती. परिषदेत प्रॉटेस्टंट धर्मपीठाच्या एका प्रचारकाने असे म्हटले की, कॅथलिक धर्माचे पालन करणाऱ्या माणसाला मुक्ती लाभणे शक्य आहे. ते ऐकताच राजाने चर्चा थांबवली आणि तो म्हणाला : " काय, समोर बसलेल्या सद्गृहस्थांचा धर्म स्वीकारला तरी देखील माणसाला मुक्ती लाभणे शक्य आहे, हे तुला मान्य आहे का ? " प्रचारकाने उत्तर दिले की, " त्या माणसाचे जीवन चांगले असेल तर त्याला निःसंशय मुक्ती लाभेल " राजा त्यानंतर जे बोलला ते येणेप्रमाणे : " तसे असेल आणि मी शहाणपणाने वागायचे तर मी त्यांचा धर्म स्वीकारीन, तुझा नव्हे. त्याच्या योगाने दोघांच्याही म्हणण्यानुसार मला मुक्ती लाभेल अशी मी खात्री करून घेईन. कारण मी प्रॉटेस्टंट झालो तर तुझ्या मते मला मुक्ती लाभेल, परंतु त्यांच्या मते लाभणार नाही. माझी दूरदृष्टी मला सांगते की, मी अधिकात अधिक सुरक्षित मार्गाचा अवलंब करावा. "

# उल्लेख-सूची*

( रूसोने पुस्तकामध्ये ग्रीस व रोम यांच्या इतिहासातील व पुराणकथांतील अनेक घटनांचे व व्यक्तींचे विपुल उल्लेख केले आहेत. नंतरच्या युरोपच्या इतिहासातील काही ग्रंथकारांचे व घटनांचेही उल्लेख आहेत. त्यापैकी महत्वाच्या उल्लेखाविषयी त्रोटक माहिती खाली दिली आहे. )

**अथेन्स** ( Athens ) : ग्रीसमधील अत्यंत प्रख्यात असे नगर राज्य.

**अर्केडिया** ( Arcadia ) : पुराणकालीन ग्रीसमधील टेकड्यांनी वेढलेला असा प्रदेश. त्या प्रदेशाचा बाहेरच्या जगाशी संबंध नव्हता. त्या प्रदेशातील लोकांचे जीवन साधे आणि सुखी होते.

**अॅमनाइटस्** ( Ammonites ) : ख्रिस्तपूर्व काळातील पॅलेस्टाइनच्या प्रदेशात राहणारी एक जमात.

**ॲरिस्टॉटल** ( Aristotle ) : इसवी सन पूर्वकाळातील सर्व विद्या पारंगत असा असामान्य विचारवंत. तो प्लेटोचा शिष्य होता व अलेक्झांडर द ग्रेट याचा गुरू होता. तत्त्वज्ञान, विज्ञान, साहित्य आदिकरून विषयांवर त्याने विपुल लेखन केले असून पुढे वाढलेली युरपिअन संस्कृती बऱ्याच अंशी त्या लेखनाच्या पायावर उभी आहे. जन्म इ. स. पूर्व ३८४, मृत्यू इ. स. पूर्व ३२२.

**ऑथो** ( Otho ) **मार्कस सल्व्हिअस** : जन्म इ. स. ३२, मृत्यू इ. स. ६९. नीरोच्या विरुद्ध झालेल्या बंडात भाग घेतला व नंतर बादशहा झाला. व्हायटेलिस-कडून पराभव झाल्यानंतर त्याने आत्महत्या केली.

**आदम** ( Adam ) : पाश्चिमात्य पुराणकथांनुसार सर्व मानवांचा पूर्वज.

**आर्किमेडिस** ( Archimedes ) : जन्म इ. स. पूर्व २८७, मृत्यू इ. स. पूर्व २१२. मोठा गणिती म्हणून तो प्रसिद्ध आहे. पदार्थविज्ञानशास्त्रातील व यंत्रविद्येतील अनेक शोधांचे जनकत्व त्याच्याकडे जाते.

**एगिस** ( Agis ) **चौथा** : स्पार्टामध्ये इ. स. पूर्व २४४ साली तो अधिकार-पदावर आला, पण मालमत्तेची फेरवाटणी व्हावी असे त्याने सुचविल्यामुळे तीन वर्षां-नंतर त्याला मृत्युमुखी पडावे लागले.

---

* ही सूची तयार करण्याच्या कामी मुंबई येथील रूपारेल कॉलेजमधील प्राध्यापक श्री. विलास बा. पाटणकर यांचे मला जे सहाय्य झाले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

एफर्स ( Ephores ) : स्पार्टांच्या राज्यघटनेत लोकांनी पाच प्रतिनिधी निवडण्याची सोय होती. त्याना एफर्स म्हणत. राजावर व वरिष्ठ समितीवर जनहिताच्या दृष्टीने नजर ठेवणे हे त्यांचे काम असे.

कनानाइट्स ( Canaanites ) : इसवी सन पूर्वकालात पॅलेस्टाइनच्या सखल प्रदेशात राहणारी एक जमात. इस्राएली लोकांनी त्या जमातीवर हल्ले करून त्या प्रदेशातून तिला हाकलून लावले.

कॅमो ( Chamos ) : जुन्या काळातील एक देव.

कॅटिलिन ( Catiline ) : रोमन लोकराज्याच्या शेवटच्या काळातील एक बंडखोर विचारवंत. त्याचे विचार लोकराज्याच्या सुरक्षिततेला धोकादायक वाटले म्हणून त्याचा छळ झाला.

कॅटो ( Cato ) मार्कस : जन्म इ. स. पूर्व २३४ मृत्यू इ. स. पूर्व १४९. सेनानी, राज्यकारभार चालविणारा व सुधारक म्हणून तो प्रख्यात आहे. त्याने शेवटी आत्महत्या केली. प्लेटो आदिकरून ग्रीक तत्त्ववेत्यांचे ग्रंथ वाचण्याची त्याला मोठी आवड होती.

कालव्हिन ( Calvin ) जॉन : जन्म १५०९, मृत्यू १५६४. रोमन कॅथलिक धर्मामध्ये माजलेला अनाचार व अंध श्रद्धेवर आधारलेल्या समजुती त्याला पसंत नव्हत्या. म्हणून त्याने नवीन, शुद्ध, सुधारलेला ख्रिश्चन धर्मसंप्रदाय प्रस्थापित केला. स्वित्झर्लंड, स्कॉटलंड, नेदरलंड व इंग्लंड–अमेरिकेचे काही भाग या ठिकाणी त्याला खूप पाठिंबा मिळाला. तो एक कडवा व असहिष्णू असा धर्मसुधारक होता.

कालिगुला ( Caligula ) : इसवी सनाच्या पहिल्या शतकातील रोमचा सम्राट. त्याच्या सैन्याने केलेल्या लूटमारीमुळे त्याला कालिगुला हे टोपण नाव पडले. सुरवातीला तो उदारमनस्क होता. परंतु मागाहून तो स्वच्छंदी व स्वैराचारी बनला. अनेक नातेवाईकांची व इतरांची त्याने कत्तल केली. शेवटी त्याचा खून झाला. जन्म इ. स. १२, मृत्यू इ. स. ४१.

क्रूस आणि गरूड ( Croos and Eagle ) : क्रूस हे ख्रिश्चन धर्माचे प्रतीक तर गरूड रोमन साम्राज्याचे प्रतीक. इसवी सनाच्या चवथ्या शतकात रोमन सम्राट कॉन्स्टन्टाइन याने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करीपर्यंत रोमच्या साम्राज्यात ख्रिश्चन धर्माचा छळ होत होता. म्हणजेच क्रूस आणि गरूड यांच्यामध्ये विरोध होता.

क्रूसेडस ( Crusades ) : ख्रिश्चन धर्माच्या पवित्र स्थळांची मुसलमानी सत्तेपासून मुक्तता करण्यासाठी पोपच्या आज्ञेवरून युरोपमधील ख्रिश्चन राजांनी व सरदारांनी केलेल्या लढाया.

क्रॉमवेल ( Cromwell ) : इंग्लंडमध्ये सतराव्या शतकात चार्लस राजाविरुद्ध जे बंड झाले त्याचा तो पुढारी होता. चार्लस राजाच्या उच्चाटनानंतर तो सत्ताधारी झाला आणि काही वर्षे त्याने इंग्लंडवर आपला करडा अंमल चालवला.

**क्रीट** ( Crete ) : भूमध्य महासागरावरील ग्रीक लोकांचे एक बेट. त्या बेटावर त्यांच्या मुख्य देवाची वसती आहे असा त्यांचा समज होता. पुराणकाली म्हणजे इ. स. पूर्व २५०० पासून १४०० पर्यंत त्या बेटावर एक महान संस्कृती नांदली होती. त्या संस्कृतीला मिनोअन संस्कृती असे नाव आहे. बेट सुपीक होते. तिथे पाणी आणि फळे मुबलक होती आणि लोक सधन होते.

**ग्राची** ( Gracchi ) : इ. स. पूर्व दुसऱ्या शतकातील रोमन राजकारणी पुरुष. सामान्य जनतेचा त्याला पाठिंबा होता. तिच्या वतीने त्याने प्रचंड आंदोलन उभारले होते.

**ग्रोशिअस** ( Grotius ) **ह्युगो** : डच ग्रंथकार आणि तत्त्ववेत्ता. जन्म १५८३. मृत्यू १६४५. आंतरराष्ट्रीय कायद्यावरील त्याचा प्रख्यात ग्रंथ १६२५ मध्ये प्रसिद्ध झाला. राज्यशास्त्रावरील त्याचे लिखाण मौलिक स्वरूपाचे असून नंतरच्या काळातील राज्यशास्त्रीय विचारांवर त्याचा चिरस्थाई परिणाम झाला आहे.

**चार्डिन** ( Chardin ) **सर जॉन** : जन्म १६४३, मृत्यू १७१३. पॅरिस येथे जन्म झाला, परंतु नंतर इंग्लंडमध्ये स्थाईक झाला. प्रवासाचा त्याला मोठा षोक. त्याने आपल्या प्रवासाचा वृत्तांत ' जर्नल दु व्हायेज ' या नावाने प्रसिद्ध केला.

**ज्युपिटर कॅपिटोलिनस** ( Jupiter Capitolinus ) : रोम शहराच्या मुख्य भागात बांधलेल्या मंदिरातील ज्युपिटर देवाची प्रतिमा.

**टॅसिटस** ( Tacitus ) **कॉर्नेलिअस** : प्रसिद्ध इतिहासकार. इसवी सनाच्या पहिल्या शतकात तो होऊन गेला. रोम येथे तो वकिली करत असे.

**डिसेंव्हिर्स** ( Decemvirs ) : दहा जणांचे मंडळ. रोमच्या इतिहासात असे मंडळ न्यायदानाच्या व अंमलबजावणीच्या कामासाठी मधून मधून नेमले गेलेले दृष्टीस पडते. रोमन कायद्याचा मूळ आधार म्हणून प्रसिद्ध झालेली बारा कोष्टके ( Twelve Tables ) अगदी सुरुवातीला नेमलेल्या दहांच्या मंडळाने तयार केली.

**डायोनिसिअस** ( Dionysius ) : धाकटा डायोनिसिअस प्लेटोच्या काळात सिरॅक्युज येथे राज्य करत होता. तो विद्वान होता. तो आदर्श राज्य स्थापन करील अशी प्लेटोची कल्पना होती. पण ती फलद्रूप झाली नाही.

**तारेन्तम** ( Tarentum ) : दक्षिण इटलीतील सधन ग्रीक शहर.

**दालांबेर** ( D'alembart ) : अठराव्या शतकातील फ्रान्समधील प्रख्यात तत्त्वज्ञानी व लेखक.

**देकार्त** ( Descarte ) : जन्म १५९६, मृत्यू १६५०. तत्त्वज्ञानाच्या इतिहासात त्याचे स्थान खूप मोठे आहे. आधुनिक तत्त्वज्ञानाचा त्याला जनक समजले जाते. तो मोठा गणिती होता. विश्व आपोआप निर्माण झाले असून त्याचे कार्य यंत्राप्रमाणे चालू आहे हे सिद्ध करण्यासाठी त्याने आवर्तांचा ( Vortices ) सिद्धांत प्रतिपादन केला.

**नवव्या लुई राजाचे हुकूम** ( Ordinances of King Louis IX ) : १२१४ पासून १२७० पर्यंत नवव्या लुईने फ्रान्सवर राज्य केले. तो कनवाळू व धार्मिक वृत्तीचा होता. राज्यकारभार व्यवस्थित रीतीने चालावा म्हणून त्याने हुकूम काढले. राजाची सत्ता अबाधित रहावी, परंतु प्रजेवर जुलूम होऊ नयेत असा त्या हुकमांचा उद्देश होता. राज्याच्या रक्षणासाठी लढाई करण्याचा राजाचा हक्क त्या हुकुमांमध्ये अभिप्रेत होता.

**नुनेझ बालबॉ** ( Nunez Balbao ) : जन्म १४७५, मृत्यू १५३७. स्पेनमधील एक धाडसी सरदार. पॅसिफिक महासागर ओलांडून तो जेव्हा दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यावर उतरला तेव्हा तो सारा प्रदेश स्पेनच्या राजाच्या मालकीचा आहे असे त्याने जाहीर केले. स्पेनने नंतर त्या प्रदेशावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले. कॅस्टिल येथे त्यावेळी स्पेनची राजधानी होती.

**नुमा** ( Numa ) **पॉंपिलिस** : रोमच्या जुन्या इतिहासातील हा दुसरा राजा. ३९ वर्षे त्याने राज्य केले. त्याच्या अमदानीत शांतता नांदत होती आणि प्रजा मोठी सुखात होती.

**नोआ** (Noah) : पुराणकाळात जलप्रलयात जग बुडून चालले होते. त्यावेळी दैवी आज्ञेवरून सम्राट नोआने एक नौका बनवली व त्या नौकेच्या सहाय्याने स्वतःला, स्वतःच्या कुटुंबाला आणि अनेक पशुपक्ष्यांना वाचविले अशी त्याच्याबद्दल कथा आहे.

**पेगन्स** ( Pagans ) : देवांचे अनेकत्व मानणारे जुन्या संस्कृतीचे लोक.

**पांपी** ( Pompey ) : सतराव्या वर्षापासून त्याने लढाईत भाग घ्यायला सुरुवात केली. त्याने अनेक लढाया जिंकल्या व तो लोकांचा आवडता बनला. अनेक महत्त्वाची पदे त्याला मिळाली. पण शेवटी अंतर्गत भांडणात त्याचा खून झाला.

**पीटर द ग्रेट** ( Peter the Great ) : रशियाचा जगप्रसिद्ध बादशहा जन्म १६७२, मृत्यू १७२५. त्याने रशियात खूप सुधारणा घडवून आणल्या. आपल्या देशाची त्याने युरोप खंडातील इतर देशांशी जवळीक प्रस्थापित केली. आपल्या देशातील लोकांना युरपिअन संस्कृतीची माहिती व्हावी या हेतूने त्याने अनेक विद्वानांना बोलावले व त्यांचा चांगला आदरसत्कार केला.

**प्लिनी** ( Pliny ) : प्रख्यात रोमन ग्रंथकार. तत्कालीन भूगोलाबद्दल त्याच्या ग्रंथावरून पुष्कळ माहिती मिळते.

**फिलो** ( Philo ) : येशू ख्रिस्ताचा समकालीन असा हा तत्त्ववेत्ता धर्माने ज्यू होता. पण ग्रीक संस्कृतीचे त्याच्या मनावर खूप परिणाम झाले होते.

**बेल** ( Bayle ) **प्येर** : जन्म १६४७, मृत्यू १७०६. प्रख्यात तत्त्ववेत्ता. प्रचलित धर्मसमजुती त्याला मान्य नव्हत्या. म्हणून त्याचा खूप छळ झाला.

**मॅकिआव्हेली** ( Machiavelli ) : ' प्रिन्स ' या राज्यशास्त्रावरील विख्यात ग्रंथाचा लेखक. त्या ग्रंथाद्वारे त्याने राजाला केलेल्या उपदेशामुळे त्याच्याविषयी अनेक गैरसमज प्रचलित आहेत. तो जसा राजकारणधुरंधर होता तसाच तो प्रतिभाशाली कवी व नाटककारही होता. इटलीमध्ये तो जन्मला व तिथेच त्याचे कार्य झाले. जन्म १४६९, मृत्यू १५२७.

**मॉंटेस्कू** (Montesquieu) **चार्लस द** : जन्म १६८९, मृत्यु १७५५. राज्य-शास्त्राचा प्रकांड पंडित. त्याचा ' ए स्पिरिट द लॉय ' हा ग्रंथ राज्यशास्त्रावरील मूलगामी ग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहे.

**मेरिअस** ( Marius ) : जन्म इ. स. पूर्व १५७, मृत्यू इ. स. पूर्व ८६. प्रख्यात रोमन योद्धा आणि राजकारणी पुरुष. सत्तालालसेमुळे पुढे तो फार संशयी बनला.

**मोझेस** ( Moses ) : इस्राएली लोकांचा पहिला प्रेषित आणि पुढारी. त्याने इस्राएली लोकांना इजिप्शिअन राजांच्या गुलामगिरीतून सोडवले आणि पॅलेस्टाइनमध्ये त्यांची वसाहत केली. ज्यू धर्माचा संस्थापक आणि धर्मनियम सांगणारा प्रेषित म्हणून तो प्रसिद्ध आहे.

**युलिसिस** (Ulysses) : ग्रीसमधील पुराणकालीन महापुरुष. ट्रोजन युद्धामध्ये त्याने ग्रीक लोकांचे पुढारीपण केले. त्याच्या पराक्रमांचे होमरने आपल्या महाकाव्यात वर्णन केले आहे. त्याच्यामधील एक कथा अशी आहे की युलिसिसच्या अनुयायांना एका राक्षसिणीने डुकरे बनविले व त्यांना तेच जीवन आवडू लागले.

**राबेले** ( Rabelais ) **फ्रँका** : पंधराव्या शतकाच्या शेवटच्या दशकात तो जन्मला आणि सोळाव्या शतकाच्या मध्यास तो वारला. तो महापंडित होता. वैद्यक, खगोलशास्त्र, गणित, वनस्पतिशास्त्र वगैरेंचा त्याने खूप अभ्यास केला होता. त्याला बऱ्याच भाषा अवगत होत्या. उच्छृंखल, विनोदी व उपहासगर्भ लिखाणाबद्दल तो फार प्रसिद्ध आहे.

**रॉबिन्सन क्रूसो** ( Robinson Crusoe ) : डॅनिएल डिफो या अठराव्या शतकातील इंग्रज लेखकाने निर्मिलेला काल्पनिक पुरुष. वादळामध्ये बोट फुटल्यानंतर तो एका निर्जन बेटावर फेकला गेला. त्या बेटावर त्याला एकट्याने जे अनेक दिवस काढावे लागले त्यांचे डिफोने केलेले वर्णन जागतिक वाङ्मयात अजरामर झाले आहे.

**रोम्युलस** ( Romulus ) : रोमचा संस्थापक.

**लॅसिडिमोनिअन्स** ( Lacedaemonians ) : स्पार्टा ज्याची राजधानी त्या प्रदेशातील लोक.

**लायकरगस** ( Lycurgus ) : ही ऐतिहासिक व्यक्ती होती की नाही याबद्दल संशय आहे. स्पार्टाच्या राज्यव्यवस्थेबद्दलचे नियम त्याने तयार केले अशी समजूत आहे.

**सॅम्युएल** ( Samuel ) : ह्यू लोकांचा मोठा धार्मिक पुढारी आणि प्रेषित. जुन्या करारामधे ( Old Testament ) त्याचा उल्लेख आहे.

**सर्व्हिअस** ( Servius ) **तुलिअस** : हा रोमचा सहावा राजा. त्याने रोमन नागरिकांची सहा जमातींत विभागणी केली. जन्मावरून नागरिकाचा दर्जा ठरवण्याऐवजी मालमत्तेवरून तो ठरण्याची प्रथा त्याने रूढ केली. त्याच्या सुधारणा उच्च कुलीनांना पसंत पडल्या नाहीत, म्हणून त्याचा खून झाला.

**सला** ( Sulla ) **लुसिअस कॉर्नेलिअस** : जन्म इ. स. पूर्व १३८, मृत्यू इ. स. पूर्व ७८. सुरवातीला तो मेरिअसच्या हाताखाली होता. नंतर त्याचे आणि मेरिअसचे मोठे भांडण झाले. इ. स. पूर्व ८२ मध्ये इटलीवर त्याने आपले प्रभुत्व प्रस्थापित केले.

**सायक्लप** ( Cyclop ) : ग्रीक पुराणातील एकाक्ष राक्षस. शेतकरी अगर लोहार म्हणून ते काम करत असत. ते गुहेमध्ये राहात असत. ट्रॉयहून परत जाताना युलिसिस व त्याचे अनुयायी चुकीने एका राक्षसाच्या गुहेत शिरले. राक्षसाने काही जणांना मारून खाल्ले. पण शेवटी युक्तीने राक्षसाचा डोळा फोडून युलिसिसने स्वतःची व उरलेल्यांची सुटका करून घेतली अशी कथा आहे.

**सायरिन** ( Cyrene ) : उत्तर आफ्रिकेमधील इ. स. पूर्व सहाव्या शतकात ग्रीक लोकांनी वसवलेल्या सायरेनिका या वसाहतीची राजधानी. व्यापार व पांडित्य यासाठी ते शहर प्रसिद्ध होते.

**सिसरो** ( Cicero ) **मार्कस टुलिअस** : जन्म इ. स. पूर्व १०६, मृत्यू इ. स. पूर्व ४३. प्रभावी वक्ता म्हणून तो प्रख्यात आहे. तो चांगला लेखकही होता. रोमच्या राज्यव्यवस्थेत त्याला महत्त्वाच्या जागा मिळाल्या होत्या. राजकारणी पुरुष म्हणून मात्र तो यशस्वी ठरला नाही.

**सीझर** ( Ceasar ) **ज्युलिअस** : इसवी सन पूर्व काळातील पहिल्या शतकात तो रोममधील अत्यंत बलाढ्य असा सेनापती होता. रोमच्या लोकशाहीचे राजेशाहीत रूपांतर करून तो रोमचा बादशहा बनला. युद्धशास्त्राइतकीच त्याची गणितात व न्यायशास्त्रात गती होती. आपल्या ठिकाणी दैवी अंश आहे असे त्याने लोकांना मानायला लावले होते. शेवटी त्याचा खून झाला.

**सोलन** ( Solon ) : इसवी सन पूर्व सहाव्या शतकातील अथेन्स या ग्रीक नगर राज्याचा स्मृतिकार. त्याचे कायदे स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय यांचा पुरस्कार करणारे होते. गरीबांबद्दल कळवळा वाटणारा न्यायी राजकारणपटू म्हणून त्याची ख्याती आहे.

**स्पार्टा** ( Sparta ) : ग्रीसमधील एक नगरराज्य. लष्करी सामर्थ्य व लष्करी शिस्त यासाठी ते प्रसिद्ध होते. समाजव्यवस्था व विचार यांच्या दृष्टीने स्पार्टा अथेन्सपेक्षा अगदी वेगळे होते. या वेगळेपणामुळे त्या दोन नगरराज्यांत नेहमी चढाओढ चालू असे.

**हरक्युलिस** ( Hercules ) : ग्रीक पुराणकथांतील शक्तिशाली देवपुरुष.

**हॉब्स** ( Hobbes ) **थॉमस** : इंग्रजी तत्त्ववेत्ता व लेखक. जन्म १५८८, मृत्यू १६७९. राज्यशास्त्रावरील त्याचे लेव्हिएथन आदिकरून ग्रंथ फार प्रख्यात आहेत. समाज व शासन कसे अस्तित्वात आले त्याबद्दल त्याने मूलगामी विवेचन केलेले आहे.

**व्हलगेट** ( Vulgate )–इस्राएली लोकांचा एक धर्मग्रंथ.

**व्हायटेलिस** ( Vitelius ) : ऑथोचा पराभव केल्यानंतर तो रोमचा बादशहा झाला. तो दुष्ट आणि लहरी होता. त्याच्या विरोधकांनी त्याचा पराभव करून त्याला रोमच्या रस्त्यातून फरफटत ओढत नेले आणि मग त्याचा खून केला.

* * *

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/ 80/2
मंत्रालय